UNIVERSAL LIBRARY
OU_196146
UNIVERSAL LIBRARY

'रावराजे वाङ्मय पारितोषिक ' (गोवा), इंदूरच्या ' महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक मंडळा'कडून पुरस्कार, व ' डेक्कन व्हर्नाक्युलर सोसायटी'कडून पारितोषिक मिळालेलें; नागपूर विद्यापीठानें एम्. ए. व बी. ए. (ऑनर्स) साठी, आणि मुंबई व पुणें विद्यापीठांनीं बी. ए. साठी पाठ्यक्रमांत नेमलेलें पुस्तक—

# नीति आणि कलोपासना

[ संशोधित वर्धित द्वितीयावृत्ति ]

लेखक

ग. वा. कवीश्वर, एम्. ए.,

तत्वज्ञान व तर्कशास्त्राचे प्राध्यापक, इंदूर;

' पावित्र्यविडंबनाचा वाद, ' ' The Metaphysics of Berkeley, ' आदि पुस्तकांचे कर्ते.

किंमत

| इसवी सन | साधी प्रत ३ रुपये | शालिवाहन शक |
|---|---|---|
| १९५० | जाडी प्रत ३॥ रुपये | १८७२ |

प्रकाशक—
ग. वा. कवीश्वर,
तत्वज्ञान व तर्कशास्त्राचे प्राध्यापक,
न्यू हॉस्टेल, होळकर कॉलेज,
इंदूर (मध्यभारत)

सर्व हक्क स्वाधीन

मुद्रक—
द. ह. ओक,
श्रीनाथ प्रेस लि. इंदूर.

श्री.

# प्रस्तावना

या पुस्तकाची प्रथमावृत्ति सुप्रसिद्ध साहित्यिक के. वामन मल्हार जोशी यांच्या अध्यक्षतेखाली मंडलेश्वर मुक्कामीं पंधरा वर्षांपूर्वी प्रकाशित झाली होती. त्यासमयीं त्यांनी केलेल्या भाषणापासूनच महाराष्ट्राने या पुस्तकाचें मोठ्या प्रेमाने स्वागत केलें; आणि अनेक नियतकालिकांनी व विद्वानांनीं या पुस्तकावर उत्कृष्ट अभिप्राय व्यक्त करून, व साहित्यसंस्थांनी पुरस्कार देऊन लेखकास प्रोत्साहित केलें. त्या सर्वांचे या प्रसंगीं आभार मानणें आमचें कर्तव्य आहे. नागपूर विद्यापीठाने हें पुस्तक एम्. ए. व बी. ए. (ऑनर्स्) साठी पाठ्यपुस्तक म्हणून नेमून याचा गौरव केला; इतरहि कांही विद्यापीठांनीं याचा अभ्यासक्रमांत समावेश केल्याचें कळलें. आणि आता पुणें व मुंबई विद्यापीठांनी हें बी. ए. साठीं नेमलें आहे. प्रथमावृत्तीच्या प्रती पुरेशा शिल्लक नसल्याने ही द्वितीयावृत्ति काढीत आहे.

प्रथमावृत्तीच्या प्रकाशनानतर लोटलेला काळ लक्षांत घेऊन या आवृत्तींत आवश्यक तेथे संशोधन करून घेतलेलें आहे. मात्र असें करण्यांत मूळ मध्यवर्ति विचारसरणीला कोठेहि हात लावलेला नाही. बहुतेक बदल किरकोळ शाब्दिक स्वरूपाचे असून तेहि मुळांतले कांही अनावश्यक शब्दप्रयोग गाळण्याच्या स्वरूपाचेच आहेत. मुळांत भर टाकली ती भिन्नभिन्न स्थळीं न टाकतां एकाच नवीन प्रकरणांत समाविष्ट केली आहे. तें म्हणजे या आवृत्तींतलें 'नीति, व्यक्ति आणि समाज' हें

क्रमांकाने सहावें असलेलें प्रकरण. हें या आवृत्तींत सर्वस्वी नवीन असून या महत्वाच्या प्रकरणामुळे या पुस्तकांतील विचारसरणीच्या वास्तविक मूल्यांत निश्चितपणे भर पडली आहे असें विद्यापीठांतील व विद्यापीठा-बाहेरील विद्वानांनाहि आढळून येईल अशी अपेक्षा आहे.

या आवृत्तींत शुद्धलेखनाच्या नवीन नियमांना अनुसरण्याचा शक्य तितका प्रयत्न केला आहे.

शेवटीं, जिच्या कृपाप्रसादेंकरूनच हें पुस्तक लिहिलें गेलें, व आता हा द्वितीयावृत्तीचा सुयोग आला, त्या श्रीशारदेच्या चरणारविंदीं लीन होऊन हें पुस्तक पुनश्च रसिकांच्या सेवेस सादर करितों.

मंगळवार, वैशाख शु. १५, शके १८७२,
दि. २–५–१९५०

होळकर कॉलेज,
इंदूर, मध्य-भारत.

ग. वा. कवीश्वर

# नीति आणि कलोपासना

## अनुक्रमणिका


| प्रकरण. | | पृष्ठ. |
|---|---|---|
| उपोद्घात ... | ... ... | १ |
| ,, पहिलें: कलेविषयीं सामान्य विवेचन | ... | ३ |
| ,, दुसरें: परिवर्तनशील व शाश्वत नीति | ... | १९ |
| ,, तिसरें: नीतिपर आणि नीतिविषयक | ... | ४० |
| ,, चवथें: त्रिविध सौंदर्य व नीति-अनीति | ... | ५९ |
| ,, पांचवें: साहित्यक्षेत्रांतली बेबंदशाही | ... | ७० |
| ,, सहावें: नीति, व्यक्ति आणि समाज | ... | ९० |
| ,, सातवें कला आणि नीति | ... | १११ |
| ,, आठवें: कांहीं अवांतर महत्वाच्या गोष्टी | ... | १४३ |
| ,, नववें: उपसंहार | ... | १६३ |
| परिशिष्ट अः श्री. भा. रा. तांबे यांच्या कांहीं विधानांचें खंडन... | | १८० |
| परिशिष्ट आः कांहीं आक्षेपांस उत्तरें | ... | १९७ |

'नीति आणि कलोपासना' या पुस्तकाच्या संशोधित द्वितीयावृत्तीस जोडलेलें, व ज्यांचे जवळ प्रथमावृत्तीच्या प्रती असतील त्यांचे सोयीसाठी वेगळें छापून घेतलेलें नवीन प्रकरण—

**नीति, व्यक्ति आणि समाज**

किंमत एक रुपाया

# नीति आणि कलोपासना

श्री.

# नीति आणि कलोपासना.

## उपोद्घात.

महाराष्ट्रांत अलीकडे ज्या कांहीं थोड्या महत्त्वाच्या विषयांवर विशेष उत्साहानें वादविवाद चालला आहे, त्यांमध्येच नीति आणि कला यांच्या परस्पर संबंधाचा प्रामुख्यानें समावेश केला पाहिजे यांत शंका नाहीं. वर्तमानपत्रांतून, मासिकांतून, विद्यालयीन विवादसंघांतून, व्याख्यानांतून, पुस्तकांतून, साहित्यसंमेलनांतून, फार काय, न्यायालयांतील खटल्यांतून देखील या वादाचे पडसाद जोरजोरानें उठत असून, त्याप्रीत्यर्थ उलटसुलट योद्ध्यांचीं रणें माजत आहेत. महाराष्ट्रांत या वादाचा उगम ‘ ओलेती ’ च्या चित्रापासून झाला असो; किंवा कांहीं पुस्तकांच्या अनिष्ट प्रकाशनामुळे झाला असो; अगर दरवर्षी साहित्य-संमेलनांत अश्लीलतानिवारणाचा ठराव मांडण्याच्या कांहीं गृहस्थांच्या चिकाटींत झाला असो; तो कोठेंहि उगम पावला असला व त्याला कशानेंहि महत्त्व प्राप्त झालें असलें, तरी इतकें मात्र खरें कीं, एकदा जोरांत आलेल्या या वादविवादाचा कांहीं तरी समाधानकारक निकाल लावणें आता आवश्यक होऊन बसलें आहे. कारण उलटपक्षीं, अश्लीलतेचा व अनीतीचा नुकताच रोवला गेलेला खुंटा हलवून बळकट केल्याचें श्रेय मात्र या वादापासून महाराष्ट्रसरस्वतीचे पदरांत पडणार असून, आज आपल्या समाजांत जो कव्हींशीं दबत दबत व कांहीं अंशीं उघड

असा अश्लीलतेचा प्रचार सुरू झाला आहे, त्याचें लवकरच अनीतीच्या पूर्णपणे उघड, व निःसंकोच नाचांत रूपांतर झालेलें दिसून येईल. निरक्षर लोकांच्या अधर्माचरणापेक्षां साक्षर लोकांचें अधर्माचरण अधिक निंद्य; आणि त्यांतहि जर त्याला विद्वन्मान्यतेचा, किंवा नुसता विद्वन्विमूढतेचा देखील शिक्कामोर्तब मिळाला, तर मग 'आधींच मर्कट तशांतहि मद्य प्याला' या न्यायानें त्याचे दुष्परिणाम किती भयंकर व दूरवर पसरणार होतील याची कल्पनाच करणें बरें. यास्तव, महाराष्ट्रवाङ्मयास व सदभिरुचीस लागूं पाहणाऱ्या या कीडीचा एकदांच बीमोड व्हावा या हेतूनें आपापल्यापरीनें निःसंदिग्ध व निःपक्षपाती प्रयत्न करून, महाराष्ट्रशारदेवर होऊं पाहणाऱ्या या अश्लीलतेच्या व अनीतीच्या हल्ल्यापासून तिचें संरक्षण करणें हें सर्व साहित्य-सेवकांचें एक आवश्यक व पवित्र कर्तव्य आहे. आणि असा एक प्रयत्न ह्मणूनच पुढील प्रकरणें लिहिण्यांत आलीं आहेत.

# प्रकरण पहिलें.

# कलेविषयी सामान्य विवेचन.

कोणत्याहि वादग्रस्त विषयाच्या विचारास सुरवात करण्यापूर्वी त्यांतील मुख्य महत्वाच्या पदांची व्याख्या करणें आवश्यक आहे, हें उघडच आहे. आणि या सामान्य नियमास अनुसरून कलोपासने-संबंधीच्या या प्रस्तुत वादांत शिरण्यापूर्वी, कलेची योग्य व शास्त्रशुद्ध व्याख्या केली पाहिजे असा आग्रह धरणें अगदींच अयुक्तिक होणार नाही. परंतु सर्व शास्त्रांच्या अभ्यासाचे प्रारंभीं येणारी एक अडचण येथेहि आपल्यापुढे उभी राहण्याचा संभव आहे. कोणत्याहि शास्त्राचा जसा प्रारंभ तसाच शेवट देखील तत्प्रतिपाद्य विषयाच्या व्याख्येंत होत असतो वरवर विसंगत दिसणारें हे विधान वास्तविक तसें नाही. कारण, प्रारंभीच्या व शेवटच्या व्याख्येत वस्तुतः महदंतर असतें. प्रारंभीची व्याख्या ढोबळ मानानें केलेली असते; व तिचा उद्देश केवळ जिज्ञासूला त्या विषयाची जगांतील इतर विषयांपासून ओळख पटावी इतकाच असतो. ज्याला पद्य ह्मणजे काय हेंच माहीत नाही तो वृत्तदर्पण काय शिकणार आणि ज्याला इतर वस्तूपासून सुवर्ण नेमकें ओळखून काढतां येत नाही तो सुवर्णकाराची कला अवगत तरी कशी करून घेणार ? उलट, शेवटची व्याख्या शास्त्रशुद्ध, अव्याप्तिअतिव्याप्ति इत्यादि दोषांपासून पूर्णपणे अलिप्त, व प्रतिपाद्य वस्तूच्या सर्व-व फक्त-" आवश्यक " गुणांचा निर्देश करणारी अशी असते. किंबहुना कोणत्याहि शास्त्राचा उद्देश

तत्प्रतिपाद्य विषयाची संपूर्ण व शास्त्रशुद्ध व्याख्या करणें हाच शोध असें ह्मणण्यास प्रत्यवाय नाही. यासाठी कलेची आमच्या मतें योग्य अशी व्याख्या वाचकांस येथे प्रारंभींच देणें युक्त होणार नाही. कारण तसें केल्यास ज्या पुढे सिद्ध करावयाच्या आहेत अशा कांही गोष्टी आधीच गृहीत धराव्या लागतील व वाचकांचा निरर्थक घोटाळा होईल. यास्तव सामान्यत: व्यवहारात यासंबंधांत ज्या कांही ठोकळ व्याख्या प्रचलित आहेत त्यांच्या परीक्षणापासून आपण या विषयास सुरवात केल्यास तें सोयीचें होईल.

सामान्य परिभाषेंत आपल्यास कलेच्या मुख्यत्वेंकरून दोन व्याख्या प्रचलित असलेल्या आढळून येतात. सौंदर्यसंपन्न वस्तु निर्माण करण्याची युक्ति ह्मणजेच कला, ही एक;* व मनाला आनंद देणारी प्रत्येक कृति व वस्तु कलापूर्ण ह्मटली पाहिजे ही दुसरी व्याख्या होय. थोडा अधिक विचार केला असतां यांतील पहिली व्याख्या दुसरींत समाविष्ट करतां येईल; कारण सौंदर्य ह्मणजे तरी काय असा प्रश्न उपस्थित केला असतां मनाला आनंद देण्याचा कोणत्याहि पदार्थाचा गुण असेंच उत्तर साधारण

* "Now I believe Art cannot be better defined than as the creation or the expression of the Beautiful" —*Shakespeare: His Life, Art and Characters,* by H. N. Hudson, Vol I. pp. 238-39. सामान्य मनुष्याच्या कलाविषयक कल्पनेबद्दल सुप्रसिद्ध रशियन लेखक टॉलस्टॉय् लिहितो: " 'Art is activity that produces beauty', says such a man... To him it seems clear and comprehensible that art consists in manifesting beauty, and that a reference to beauty will serve to explain all questions about art."—*What is Art,* chapter II.

जनसंमर्दाकडून दिलें जातें. याशिवाय आणखीहि एका दृष्टीने प्रस्तुत ठिकाणीं या दुसऱ्या व्याख्येला महत्व प्राप्त झालें आहे. नीति व कला यांचा वास्तविक पाहतां मुळींच परस्परसंबंध नाही असें निश्चितपणें प्रतिपादन करणाऱ्या लोकांकडूनहि हीच व्याख्या अधिक प्रामुख्याने पुढे केली जाते. नीतिअनीतीच्या झगड्यांत पडण्याचें कलाकाराला कारण नाही; त्याने आपल्या कृतीपासून लोकांच्या व स्वतःच्या मनाला आल्हाद होईल किंवा नाही, इतकें पाहिलें म्हणजे पुरें, असें या लोकाचें म्हणणें असतें. अतएव आपण येथे तूर्त या दुसऱ्या व्याख्येचा चिकित्सापूर्वक विचार करूं.

इतर कोणत्याहि तत्सदृश विषयाप्रमाणे, कलेच्या व्याख्येंतच आपल्यास तिच्या ध्येयाचाही सुगावा साहजिकच लागूं शकेल. मनाला आनंद देणारी प्रत्येक कृति व वस्तु कला या सदराखाली येते, असें म्हणणाऱ्यांचें मताने कलेचें ध्येय मनास आनंद देणें इतकेंच आहे, हें उघड आहे. परंतु येथे एक महत्वाचा प्रश्न उपस्थित होतो. जगांत मानवी मनांत निर्माण होणाऱ्या आनंद या सदराखालील सर्व अंतःकरणवृत्ति एकाच प्रकारच्या आहेत काय ? जगांतील कोणत्याहि दोन अगर अधिक आनंद-मनोवृत्ति घेतल्या, तर त्यांतील फरक केवळ कमीअधिकपणाचा-संख्येचा-च असूं शकेल, किंवा जातीचा देखील असूं शकेल ? आणि जर सुखांत अगर आनंदांत अशा प्रकारभेद असेल तर कोणत्या विशिष्ट प्रकारच्या आनंदाचे जनकत्व कलेकडे दिलें पाहिजे ? किंवा, सरसकट सर्वच आनंदाचें जनकत्व कलेकडे देणें इष्ट आहे ?

हे दोनहि प्रश्न बरेच वादग्रस्त आहेत; व विशेषतः पहिल्यावर तर नीतिशास्त्रांत आजपावेतों बरींच रणें माजलीं आहेत. परंतु या प्रश्नांच्या तपशिलांत शिरणें आपल्यास येथे शक्य नाही, व फारसें आवश्यकहि

नाही. पहिल्या प्रश्नाचें थोडक्यांत असें उत्तर देतां येईल कीं, जगांतील सर्व सुखें एकाच प्रकारचीं नसून त्यामध्ये प्रकारभेद मानणें आवश्यक आहे. कारण, सर्व सुखें एकाच प्रकारचीं असून त्यांमधील भेद जर केवळ कमीअधिकपणाचाच असता, तर एका विशिष्ट स्थितींत दुसरीपेक्षा उघड उघड आधिक सुख दिसत असतां, कोणीहि त्या दुसऱ्या स्थितीस पतकरलें नसतें. परंतु, जगांत वास्तविक आपल्याला याच्या उलट स्थिति अनेक वेळां दृष्टोत्पत्तीस येते. * दरिद्री ज्ञानी मनुष्याला श्रीमंतींत लोळणाऱ्या व प्रकृति उत्तम असणाऱ्या पण अत्यंत अज्ञानी मनुष्यापेक्षा अधिक सुख असतें काय ? पण मग तो ज्ञानी मनुष्य आपली स्थिति सर्वस्वी टाकून त्या अज्ञानी बहुसुखी मनुष्याची स्थिति पतकरण्यास कां बरें तयार होत नाही ? एक जुलमी सत्ताधीश सत्य व स्वातंत्र्याप्रीत्यर्थ जीविताचा होम करण्यास तयार झालेल्या राष्ट्रवीरास हाल हाल करून ठार मारींत आहे अशी कल्पना करा. आता या वेळेस कोणाची स्थिति अधिक दुःखप्रद आहे व कोणाची सुखप्रद आहे हें स्पष्टपणे सांगावयास पाहिजे काय ?

* पहा: "पशूला जें जें सुख उपभोगणें शक्य आहे तें तें सर्व तुला देतों असें सांगून कोणास "तूं पशु होण्यास राजी आहेस काय ?" असा प्रश्न केला तर एक देखील मनुष्य पशु होण्यास तयार होणार नाहीं."– लो. टिळक कृत "गीता रहस्य," पृ. ९२. तसेंच "Few human beings would consent to be changed into any of the lower animals for promise of the fullest allowance of a beast's pleasure."-- *Utilitarianism* by J. S. Mill. मानवी जीवनाचें अंतिम ध्येय केवळ सुख हेंच आहे असें म्हणणाऱ्या या उपयुक्ततावादी इंग्रज तत्वज्ञान्याला याच कारणामुळे शेवटीं सुखांत प्रकारभेद मान्य करून स्वतःच्या प्रतिपादनात परस्पर विसंगति उत्पन्न करणें भाग पडलें.

पण असें असतांहि ते दोघे आपापल्या जागा बदलण्यास कां बरें तयार होत नाहीत ? त्यांतील जुलमी मनुष्य या अदलाबदलीस तयार होणार नाही यांत आश्चर्य नाही; परंतु, त्या दुसऱ्या स्वार्थत्यागी व्यक्तीनेही यासाठी तयार होऊं नये, यांत आश्चर्य नव्हे काय ? एखादा जातिवंत उच्च दर्जाचा कलाकार श्रेष्ठ अशा कलानिर्मितींतील स्वर्गीय आनंद सोडून क्षुद्र विषयानंदाच्या अतिमोठ्या संचयाकडे देखील वळेल काय ? या अनेक उदाहरणांवरून एकच गोष्ट उघड होते की, आनंद या सदराखाली येणाऱ्या सर्व मनोवृत्ति एकाच जातीच्या नसून त्यांत प्रकारभेद आहेत. कांही आनंदवृत्ति जात्याच उच्च प्रकारच्या असतात, तर कांही हलक्या प्रकारच्या असतात; असें मानल्यावांचून आपल्यास वरील कोड्यांचा उलगडा होत नाही. *

आनंदाच्या या दोन प्रकारांमधील बारीक भेदांत शिरण्याचें आपल्यास येथे कारण नाही; आपल्या प्रस्तुतच्या विषयास आवश्यक इतकाच भेद येथे दाखविला म्हणजे पुरें. आणि तसें पाहूं गेलें असतां अश्लील अनीतीच्या उथळ सौंदर्यापासून उत्पन्न होणारा हीन आनंद (कोणी कोणी

* "I have already endeavoured to show that, when we pronounce one pleasure higher than another, we mean that, though both of them are pleasant—it may be equally pleasant— the one is more valuable than the other for some other reason than its pleasantness...... I may say to myself in a certain mood : ' I should get more pleasure from going to this farce than I should from going to that tragedy'; and yet I may say to myself: 'The tragedy is the nobler and higher pleasure, therefore to the tragedy I will go.' "—*The Theory of Good and Evil* by Hastings Rashdall, Vol, II, pp. 31-33.

तर त्यांना केवळ सौंदर्याभास आणि आनंदाभासच म्हणतलि *) आणि सात्त्विक सौंदर्यापासून उत्पन्न होणारा उच्च कोटीचा व उन्नतीप्रत नेणारा 'ब्रम्हास्वादसहोदर' आनंद यांतला फरक कोणत्या सुज्ञाला अवगत नाही ? $ एक पापापासून उत्पन्न होतो तर दुसरा उच्च पुण्यकृत्यांत उगम पावतो. एक शाश्वत असतो तर दुसरा क्षणिक असतो. पण यांतील मुख्य भेद शाश्वत व क्षणिक या शब्दांनी चांगल्या तऱ्हेने व्यक्त होत नाही. कारण, कित्येक प्रसंगीं उपर्निर्दिष्ट उच्च कोटीच्या एखाद्या आनंदापेक्षा दुसऱ्या कोटींतला आनंद वर वर पाहणाऱ्या दृष्टीला तरी कांही काळ अधिक टिकलेला या जगांत आढळून येतो. यासाठी त्यांतील महत्त्वाचा व मुख्य भेद आपण येथे लक्षांत ठेवला पाहिजे, तो हा कीं, वर ज्याला हलक्या प्रतीचा आनंद असें संबोधिलें आहे त्यांत स्वतःतच त्याच्या नाशाचें व भावी दुःखाचें बीज अंतर्भूत असतें. तें बीज आज, उद्यां, पर्वा, अगर अधिक कालांतराने फळल्यावांचून राहत नाही. उलट उच्च कोटीच्या आनंदांत असें दुःखबीज लपलेलें नसतें; म्हणूनच तो खरा आनंद, व पहिला केवळ आनंदाभास होय असें कित्येकांचें म्हणणें आहे. उच्च कोटीचा आनंद एकदा प्राप्त झाला म्हणजे त्याच्यानंतर दुःखानुभव येणार नाहीच असें नाही. परंतु नंतरच्या या दुःखाचा संबंध त्या आनंदाशीं

* उदाहरणार्थ, प्रो. अळतेकर एके ठिकाणीं काय म्हणतात पहाः "अनीतीचें सांनिधान असलेले सौंदर्य, सौंदर्य नसून सौंदर्याचा भास असतो व तेथें खरोखर असुंदरतेनें कृत्रिम उपायांनीं सौंदर्याचें सोंग आणलेलें असतें." ('पारिजात' फेब्रुवारी १९३४, पृष्ठ ५१.)

$ " The artist's pleasure is not the pleasure of the voluptuary........ but a specifically aesthetic pleasure"—*Outlines of a Philosophy of Art by Collingwood, p 11.*

नसून, इतर एखाद्या घटनेशीं असतो. शिवाय, उच्च कोटीच्या आनंदाचा विषय प्रत्यक्ष सृष्टींतून नाहीसा झाला तरी त्याची नुसती स्मृति देखील आनंददायक असते. उलट, दुसऱ्या प्रकारच्या आनंदाची कालांतराने स्मृति झाली असतां, ती दुःखकारक, तापदायक, व कित्येक प्रसंगीं तर लज्जास्पद देखील असते. किमानपक्षी त्यांतील आनंद पूर्वीपेक्षा फार कमी होत जातो यांत संशय नाही.

येथे जाताजाता एका आक्षेपाचा विचार केल्यास चांगलें होईल. आनंदाचे जे वर प्रकारभेद केले आहेत त्यावर कोणी अशी शंका घेतील कीं, वास्तविक पाहतां आनंदमनोवृत्ति ही सर्वठिकाणीं व सर्वकाळीं एकाच प्रकारची असून, 'तिच्यांत जो उच्चनीचपणाचा भेद दिसतो तो तिच्या विषयांतर्गत उच्चनीचपणामुळे तिच्यांत शिरतो. या आक्षेपांत कांहीसे तथ्य आहे हें आम्ही कबूल करतों. परंतु आमचें म्हणणें इतकेंच कीं, हा आक्षेप जीवनाचें अंतिम ध्येय निश्चित करूं पाहणाऱ्या एखाद्या केवळ नीतिशास्त्रावरील पुस्तकांत कितीहि महत्वाचा असला, तरी कला व नीति यांच्या संबंधाच्या प्रस्तुत वादांत त्याला महत्व नाही. कारण, आनंदांतील उच्चनीचपणा अशा रीतीने वास्तविक त्याच्या विषयांत आहे असें मानलें तरी आमच्या मुख्य प्रमेयाला मुळीच बाधा न येतां, कलेचें ध्येय सात्विक आनंद उत्पन्न करणें हें आहे, या आमच्या विधानाला 'व हें ध्येय कलेचे विषय सात्विक, नैतिक व उच्च प्रकारचेच ठेवल्याने प्राप्त होईल' अशी पुष्टि जोडली की झालें. एवंच, उच्चनीचत्व वास्तविक आनंदांत आहे असें मानलें काय, किंवा विषयांत आहे असें मानलें काय, कला व नीति यांचा संबंध सुटत नाही हें उघड आहे.

परंतु, याशिवाय येथे दुसरीहि एक गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे. केवळ आनंद ही मनोवृत्तीची एक जाति या दृष्टीने विचार केल्यास ही जाति

सर्वत्र सारखी असेल. परंतु प्रत्यक्ष व्यवहारांत आपल्याला अशा या समष्टिरूप आनंदजातीचा अनुभव कधीच येत नाही. जसें सर्व गाईंत गोत्वजाति एकच असली तरी प्रत्यक्ष व्यवहारांत ही नुसती गोत्वजाति आपल्यास उपलब्ध होऊं शकत नाही, उलट निरनिराळ्या अनेक गुणांचें संमिश्रण होऊन व्यक्तिरूप बनलेल्या गाईच दिसतात; त्याचप्रमाणे केवळ आनंदजातीचा आपल्यास प्रत्यक्ष अनुभव कधीच न येतां त्यांत समाविष्ट होणाऱ्या व्यक्तिरूप आनंदवृत्तींचाच अनुभव नेहमी येतो. आणि या व्यक्तिरूप आनंदमनोवृत्तींत विषयांचा समावेश होत असल्याने त्यांचे प्रकारभेद होऊं शकतात. कोणीहि 'मला नुसता आनंदाचा अनुभव झाला, त्याला विषय नव्हता; सारांश, तो कशापासूनहि झाला नव्हता' असें म्हणू शकत नाही; तर 'मला अमक्या गोष्टीपासून आनंद झाला' असेंच त्याला म्हणावें लागेल. प्रत्यक्ष अनुभवास येणाऱ्या सर्व आनंदमनोवृत्तींत अशा रीतीने विषयांचा समावेश होत असल्याने, व ह्यांना उद्देशूनच आमचें प्रस्तुतचें विवेचन असल्याने, आम्ही वर आनंदाचे प्रकारभेद मानिले आहेत. हीच गोष्ट आधुनिक पाश्चिमात्य नीतिशास्त्रवेत्त्यांच्या पद्धतीस अनुसरून सांगावयाची झाल्यास 'जगांत सुख एकाच प्रकारचें आहे; परंतु सुखें अनेक प्रकारचीं आहेत' असें वरवर विरोधी भासणारें परंतु अंतर्यामीं सत्य असलेलें विधान करतां येईल.

आता, या दोन प्रकारच्या आनंदवृत्तींपैकी कोणत्या प्रकाराशीं कलेची कल्पना निगडित झाली आहे हें स्पष्टपणें सांगावयास पाहिजे काय ! कलेचें जन्म व पर्यवसान उच्च कोटीच्या, सात्त्विक, शाश्वत, एकजिनसी—ज्यांत दुःखबीजाची भेसळ नाही अशा, व उन्नतीप्रत नेणाऱ्या आनदांतच झालें पाहिजे यांत आम्हाला संशय नाही. उलट प्रकारच्या आनदाशीं कलेचा संबंध आहे असं म्हणणारा कोणी सुज्ञ असेल असें वाटत नाही. कलेचा एक विशिष्ट प्रकार जो काव्यलेखनकला

त्याविषयी कै. वा. गो. आपटे लिहितात: "काव्यवाचनापासून होणारा आनंद शुद्ध व उच्च प्रतीचा आनंद पाहिजे. काव्यांत माणसाला पशुत्व देणारा व त्याला अधोगतीला नेणारा आनंद नसावा एवढी खबरदारी मात्र अवश्य घेतली पाहिजे." * समर्थ रामदास स्वामींची काव्याची व्याख्या तर सुप्रसिद्धच आहे. "कवित्व असावें रम्य गोड" असे सांगून "मृदु मंजुळ कोमळ। भव्य अद्‌भुत विशाळ। गौल्य माधुर्य रसाळ" अशीं काव्याचें आनंदजनकत्व दाखविणारीं विशेषणे दिल्यानंतर समर्थ लागलीच पुढील ओव्या लिहिण्यास विसरले नाहीत. "जेणें अनुताप उपजे। जेणें लौकिक लाजे। जेणें ज्ञान उमजे। या नांव कवित्व ॥ जेणें देहबुद्धि तुटे। जेणें भवसिंधु आटे। जेणें भगवंत प्रगटे। या नांव कवित्व ॥"$

साहित्यांत अश्लीलतेचें एक मोठें आश्रयस्थान म्हणजे विनोद. या विनोदाबद्दल एक विद्वान लेखक म्हणतात: "विनोद सात्विक व शुद्ध असावा... अपवित्र झालेला विनोद, मग तो शब्दांची कितीही गोड कसरत करून व्यक्त केलेला असला तरी हीनच म्हणावा लागेल, आणि अशा विनोदामुळें हसून मुरकुंड्या वळतात अशी कोणी त्याची जरी अज्ञानाने वाखाणणी करीत असेल तरी जाणत्यांनीं त्यासंबधीं सत्य कल्पना निर्विकारपणें प्रसृत केली पाहिजे."† कलेच्या आनंदाच्या शाश्वततेबद्दल एक इंग्रज ग्रंथकार लिहितो, "And men of culture and judgment in that line naturally feel, in general, that a work of art which is not worth seeing many times is not worth seeing at all, and if they are at first taken with such a work, they are apt to be ashamed of it afterwards,

*"लेखनकला" (१९२६) पृ. ६९. शिवाय "सौंदर्य आणि ललितकला" (१९१९) पृ. १८-२२ पहा.

$ श्रीमद्दासबोध १४।३।३६-५०.

† शि. गो. भावे कृत "गडकऱ्यांचा विनोद" पृष्ठें १७-१८.

and to resent the transient pleasure they found in it, as a sort of fraud upon them. In other words, Art aspires to interest permanently, and even to be more interesting the more it is seen." *

असेच उद्गार श्रेष्ठ कवि व रसज्ञ मोरोपंत यांनी आपल्या 'केकावलींत' भगवत्कथेस उद्देशून काढले आहेत. ते म्हणतात:

तुम्ही बहु भले, मला उमज होय ऐसे कथा;
कसा रसिक तो ? पुन्हां जंरि म्हणेल आली कथा;
प्रतिक्षण नवीच दे रुचि, शुकाहि संन्यासिया;
न मोहिति भवत्कथा अरसिका अधन्यासि या ॥
कथा श्रवणचत्वरीं जरि पुनः पुन्हा ये, रते—
महारसिक तद्रसीं, विटति ऐकनां येर ते; §

सुप्रसिद्ध आंग्ल कवि कीट्स् याची " A thing of beauty is a joy for ever, its loveliness increases; it will never pass into nothingness." ही उक्ति देखील हेंच सांगते. त्याचप्रमाणे कलेपासून होणारा आनंद केवळ 'अनुकूलसंवेदना' या सदराखाली न येतां त्याने धार्मिक व नैतिक मानसोन्नतीसहि कारणीभूत झालें पाहिजे, या आमच्या विधानास पुष्टिकारक म्हणून उपरिनिर्दिष्ट आंग्ल ग्रंथकाराचींच पुढील वाक्ये येथे उद्धृत करण्यास हरकत नाही. तो लिहितो:— "But Art has its dangers as well as its uses: especially it is apt to degenerate from a

* *Shakespeare:- His Life, Art and Characters, by Hudson P. 131.*

§ केकावली, श्लोक १००–१०१. येथे इतकें लक्षांत घेतल्यास चांगलें होईल कीं या श्लोकांत मोरोपंत त्याच गोष्टीचें पण कलाकृतीच्या ऐवजी रसिकाच्या दृष्टीने प्रतिपादन करीत आहेत.

discipline of religious virtue into a mere relaxation, losing the severity that elevates and purifies, in what is merely pretty or voluptuous or pleasing." जी गोष्ट कलेच्या आनंदाची तीच तिच्या सौंदर्याची. "Indeed the beauty ( if it be not a sin to call it such ) that sacrifices or postpones truth to pleasure is not good .....nor can I deem our case a very hopeful one when we surrender ourselves to that style of beauty which pleases without chastening the soul. For it is but too certain that when Art takes to gratifying such an unreligious taste, and so works its forces for the pleasing of men without touching them with awe, it becomes no better than a discipline of moral enervation." * प्रसिद्ध आंग्ल लेखक बेकन् याने देखील हीच गोष्ट पुढील सुन्दर वाक्यांत सांगितली आहे. " Beauty, if it light well, maketh virtues shine, and vices blush." $ आणि आधुनिक कविसम्राट् रवींद्रनाथ ठाकुर यांनी तर स्पष्टच म्हटलें आहे कीं, " जें खरोखर मंगलमय तेंच सौंदर्य. सौंदर्यमूर्ति हीच पूर्ण मंगलाची मूर्ति व मंगलमूर्ति हीच सौंदर्याचें पूर्ण स्वरूप. सत्य हेंच सौंदर्य आणि सौंदर्य हेंच सत्य". × जर्मन् तत्वज्ञ कँट् याने देखील आपल्या सौंदर्यविषयक ग्रंथांत ह्याच लक्षणांचें प्रतिपादन केलें आहे.

असो. येथपावेतो आपण कलेचें ध्येय सात्विक, शुद्ध व उच्च कोटीचा आनंद उत्पन्न करणें हेंच होय हें पौर्वात्य,व पाश्चिमात्य देशांतील मोठमोठ्या

* Hudson ( *op-cit* ) PP. 136-137.
$ *Essays.*
× पहाः वा. गो. आपटे कृत " सौंदर्य आणि ललितकला ", पृष्ठ १०.

लोकांच्या विधानांच्या आधारें ठरविलें. परंतु याच गोष्टीचा आपल्यास एका निराळ्या व स्वतंत्र दृष्टीनेहि विचार करितां येईल. कलेचें ध्येय केवळ आनंदोत्पत्ति इतकेंच नसून सात्त्विक, शुद्ध व उन्नतिप्रत नेणारा आनंद निर्माण करणें हें आहे, या विधानाबद्दल संशय बाळगणाऱ्यांनी पुढील विचारसरणीकडे लक्ष द्यावें. ज्या एकंदर मानवी जीवनाचें कला हें एक अंग आहे त्या मानवी जीवनाचें तरी ध्येय काय आहे ? केवळ अनुकूल संवेदना या सदराखाली येणारें सुख अधिकांत अधिक कसें प्राप्त करून घेतां येईल हाच मानवी जीवनाचा अंतिम प्रश्न आहे काय ? सुदैवाने या वादाच्या तपशिलांत शिरण्याची आतां फारशी गरज उरलेली नाही. कारण, अशा ध्येयाचें प्रतिपादन करणारा केवलसुखवादी सुज्ञ आता कोणी असेलसें वाटत नाही. अनेक वर्षेंपावेतो चाललेल्या वादविवादाकडे पाहतां, मनुष्याच्या अंतिम ध्येयांत केवळ आनंद हा एकच घटक नसून नीतीचाहि त्यांत समावेश केला पाहिजे, हा सिद्धांत आता सर्वमान्य झाला आहे असें म्हणण्यास फारशी हरकत नाही. आणि इतक्यावरहि ज्यांना ही गोष्ट पटली नसेल त्यांच्याशीं वादविवाद करणेंच एका दृष्टीने व्यर्थ आहे; कारण ज्यांना मानवी जीवनाच्या अंतिम ध्येयांतच नीतीचें निःसंदिग्ध अस्तित्व मान्य नाही, त्यांना कलेंतच काय पण या विश्वांत कोठेंहि नीतीचें अस्तित्व खात्रीलायक रीतीने पटविणें अशक्य आहे. आमच्या हिंदुधर्मशास्त्रांत तर या अंतिम ध्येयाचें वर्णन स्पष्टपणें सत्यम्, शिवम् आणि सुंदरम्, किंवा सत् चित् आणि आनंद असें केलेलें आहे. आणि कित्येक पाश्चिमात्य विद्वान देखील आपली ध्येयाची कल्पना अशीच करतांना आढळून येतात. उदाहरणार्थ, सौंदर्यशास्त्राचा ( Aesthetics ) आद्य संस्थापक बॉम्गार्टन् ( Baumgarten ) याच्या मताने अंतिम पूर्णत्वाचें ( The Perfect or Absolute ) इंद्रियांनी ग्रहण

केलें म्हणजे त्याला सौंदर्य ( Beauty ) म्हणावें; त्याच अंतिम तत्वानें बुद्धीने आकलन केलें म्हणजे त्याला सत्य ( Truth ) म्हणावें; व त्यालाच नैतिक इच्छाशक्तीने ( Moral will ) प्राप्त करून घेतलें म्हणजे शिवम् ( Goodness ) म्हणावें. सुप्रसिद्ध जर्मन् तत्वदेत्ता हेगल ( Hegel ) याच्या मतानेहि सौंदर्य व सत्य हीं दोन्हीं जगाच्या बुडाशीं असलेल्या एकाच अंतिम तत्वाचीं--ज्याला तो Absolute Idea असें संबोधितो--निरनिराळीं रूपें आहेत; सत्य हें त्याचें मूल-स्वरूप असून तेंच सत्य बाह्यरूपाने प्रगट होऊन इंद्रियांना दृग्गोचर झालें म्हणजे त्याला सुन्दर असें म्हणतात, * सारांश, मानवी जीवनाच्या अंतिम ध्येयांत आनंदाचें अस्तित्व आहे ही गोष्ट जरी निर्विवाद असली, तरी त्याचबरोबर तो आनंद सत्य किंवा नीति यांपासून उत्पन्न झालेला, व म्हणूनच सात्विक, नैतिक, व शुद्ध असा आहे हें विसरता कामा नये. ब्रह्मप्राप्तीपासून होणारा आनंद जर विषयानंदाहून भिन्न कोटीचा नसता, तर 'तूं ब्रह्मज्ञानाचा मार्ग सोड, मी तुला विषयानंदाच्या अव्याहत प्राप्तीचा वर देतों,' असें एखाद्या ज्ञानेच्छूस देवाने म्हटल्यावर त्याने ब्रह्मज्ञानाचा मार्ग सोडावयास पाहिजे. परंतु ब्रह्मज्ञानजन्य शुद्ध आनंदाची ज्याला थोडीहि चव कळली आहे असा ज्ञानी पुरुष असें करण्यास स्वप्नांतहि तयार होईल काय ? †

मानवी जीवनाचें ध्येय सात्विक व शुद्ध आनंद प्राप्त करून घेणें हें आहे ही गोष्ट स्पष्ट झाली म्हणजे साहजिकच कलेच्या ध्येयाचाही प्रश्न सुटतो. एकंदर मानवी जीवनाचें जे ध्येय तेंच त्यांत समाविष्ट झालेल्या

* अलीकडील आंग्ल नीतिशास्त्रवेत्ता Hastings Rashdall याचें मतहि याबाबतींत यासारखेंच आहे. त्याच्या *Theory of Good and Evil* ( vol. I ) या पुस्तकाचें सातवें प्रकरण पहा.

† कठोपनिषदांतील नाचिकेताची प्रसिद्ध गोष्ट पहावी.

त्याच्या निरनिराळ्या अंगांचेंहि असलें पाहिजे हें उघड आहे. यासाठी कला ही मानवी जीवनाच्या कक्षेच्या मुळी बाहेरच आहे, असें म्हणणाऱ्या आततायी वाद्यांची गोष्ट वगळल्यास, इतर सर्वांना कलेचें ध्येय सात्विक आनंदाची प्राप्ति हेंच आहे हें मान्य करावें लागेल. * आता असें पहा कीं, कोणत्याहि कृतीचा परिणाम कर्त्यास व भोक्त्यास अंतिम ध्येयाकडे घेऊन जाणें, त्यापासून दूर नेणें, व जेथल्या तेथेंच ठेवणें, या तिघांपैकी कोणता तरी एक झालाच पाहिजे हें उघड आहे. वास्तविक आम्हांला यांतील तिसऱ्या पंथानें अस्तित्व मान्य नाही व आम्ही तसें लवकरच

* कला ही कलेसाठीच असून स्वतःच्या कक्षेबाहेर तिचा संबंध अगर उद्देश पोंचत नाही, इत्यादि विधानें पुढे करून कलेची व एकंदर मानवी जीवनाच्या नैतिक ध्येयाची फारकत करूं इच्छिणाऱ्यांनी पुढील वाक्यें अवश्य वाचावींत: "There is therefore no such thing as this life of pure imagination which is the life of art. Art is not a life but a subordinate element or phase in a life which is indissolubly one, the unitary life of the spirit. Hence art always has its centre of gravity outside itself. It is not a self-contained and self-sufficient activity, but a mere segment of that trajectory which is the spiritual life as a whole .....,The attempt at a self-contained life of art is therefore of necessary futile. An art which hugs itself in the conviction of its own self-sufficiency and pretends to exist for its own sake is an illusion, and can only end by becoming invertebrate and unproductive."—*Outlines of a Philosophy of Art* by Collingwood pp. 95-97. ( See also p. 8 para 3) याच संबंधांत टॉलस्टॉयच्या *What is Art ?* या पुस्तकाचें पृ. १२० पहा.

दाखवूं देखील; परंतु कांही लोकांना तें मान्य नसल्याने आम्हीहि सुरवातीस तें मान्य करूनच चालतो. आता अंतिम ध्येयाच्या जवळ घेऊन जाणें म्हणजे उन्नति करणें—हीच नीति होय; व त्यापासून दूर नेणें म्हणजे अवनति करणें—हीच अनीति होय. बाकी राहिला तिसरा परिणाम. तो म्हणजे इकडे अगर तिकडे, उन्नतीकडे अगर अवनतीकडे, कोणीचकडे न हालतां जेथल्या तेथेच राहणें. पण याचेंच नांव व्यर्थ कालक्षेप करणें! आणि ईश्वराने आपल्याला नेमून दिलेल्या मोजक्या कालक्षणांचा कांहीच उपयोग न करतां व्यर्थ क्षेप करणें ही एक अवनतीलाच नेणारी गोष्ट नव्हे काय? आपल्या वेळेचा कांही तरी योग्य उपयोग करण्यास आपण बांधलेले गेलों नाही काय? जर असली ही विश्रांति योग्य कारणासाठी व योग्य कालापावेतोंच असेल, तर तिचा समावेश पहिल्या परिणामांत होईल; कारण, सर्व योग्य विश्रांति उन्नतीलाच कारणीभूत होत असते. आणि जर ती केवळ आळसजन्य, अज्ञानजन्य, किंवा इतर एखाद्या अयोग्य प्रकारची असेल, तर तिचा परिणाम दुसऱ्या परिणामांत समाविष्ट होईल. एवंच आम्ही वर म्हटल्याप्रमाणे, शेवटी दोनच परिणाम शिल्लक राहतील—उन्नति अगर नीति; आणि अवनति अगर अनीति. आता कोणत्याहि कलाकृतीचा परिणाम तिच्या कर्त्याला व भोक्त्याला अंतिम ध्येयापासून—म्हणजेच वर सांगितल्याप्रमाणे नैतिक, सात्विक, शुद्ध आनंदापासून—दूर नेणें हा असावा काय? या प्रश्नाला स्पष्ट नकार देण्याची आवश्यकता आहे असें आम्हांस वाटत नाही. कारण जो या प्रश्नाला होकारार्थी उत्तर देईल, त्याला कला व कलि यांतलाच भेद कळला नाही, असें कै. वामनराव जोशी यांच्या कोटीचा अवलंब करून म्हणतां येईल. अर्थातच प्रत्येक कलाकृतीचें ध्येय व तिचा परिणाम मानवी मनांत सात्विक आनंद उत्पन्न करणेंच होय हें सिद्ध झालें.

प्रत्येक कलेचें साध्य कर्त्यांच्या व भोक्त्याच्या मनांत शुद्ध सात्विक व नैतिक आनंद उत्पन्न करणें हेंच होय असें एकदा मान्य केलें, म्हणजे नीति व कला यांचा किती निकटचा संबंध आहे हें तेव्हांच लक्षांत येईल. कारण, कलाकृति निर्माण होत असतांना जर नीतीकडे योग्य लक्ष दिलें गेलें नाही, तर कलेपासून उत्पन्न होणारा आनंद सात्विक व शुद्ध राहणार नाही. "नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सत: " या सुप्रसिद्ध भगवदुक्तीचा थोड्या निराळ्या संदर्भास अनुसरून अर्थ काढून असें म्हणतां येईल कीं, कलेच्या उगमस्थानांत व नंतर ती पूर्णत्वास प्राप्त होत असतांना योजलेल्या निरनिराळ्या साधनांत जर नीतीचा अभाव असला, तर तिच्या पर्यवसानावस्थेत नीतीचें अस्तित्व सांपडणें अशक्य आहे; व उलट, त्यांत जर कोठेंहि अनीति असली तर तितक्याच प्रमाणांत ती शेवटीं देखील राहिलीच पाहिजे--तिच्या अस्तित्वाचा परिणाम तिच्या अभावांत होऊं शकणार नाही. संतशिरोमणि तुकोबा यांचे 'शुद्ध बीजा पोटीं, फळें रसाळ गोमटीं' हें सुंदर व सर्वसंमत विधान इतर सर्व बाबींप्रमाणे याही बाबतीत खरें ठरलें तर त्यांत नवल कोणतें ?

प्रकरण दुसरें.

# परिवर्तनशील व शाश्वत नीति.

मागील प्रकरणांत आपण कलेच्या ध्येयाचें व तदनुषंगानें तिच्या सामान्य स्वरूपाचें थोडेंसें विवेचन केलें. आतां कला व नीति यांच्या परस्पर संबंधाच्या विवेचनांत अधिक खोल शिरण्यापूर्वी नीतीबद्दल थोडा विचार करणें आवश्यक आहे. वरील विवेचनांत वाचकांस हा शब्द पुष्कळ वेळां आढळून आला असेल; व कलेसंबंधीच्या यापुढील विवेचनांत तर तो आणखी कित्येक प्रसंगीं येणार आहे. यास्तव प्रथम या पदार्थांचें या प्रकरणांत आवश्यक तितकें स्पष्टीकरण करून, नंतरच कलेचा नीतीशीं असलेला निकटवर्ति संबंध स्पष्ट करणें सयुक्तिक होईल.

येथें प्रथमदर्शनींच आपल्यापुढे विरुद्ध पक्षाकडून एक आक्षेप आणला जातो; तो असा कीं, या जगांत शाश्वत अगर सनातन नीति अशी मुळींच नसून, नीति ही कालानुसार व देशानुसार रंग पालटणारी आहे. कारण, जी गोष्ट एका कालांत नीतीची म्हणून समजली जाते तीच कालांतरानें अनीतीच्या अडगळींत फेकली जाते; व त्याचप्रमाणें एका देशांतील लोक ज्या गोष्टीला अनीतीच्या सदरांत घालतात, तिलाच त्याच कालांत दुसऱ्या एखाद्या देशांतील लोक नीतिमान म्हणून उदो उदो करीत असतांना आढळून येतात. अस्पृश्यतानिवारण, सतीप्रतिबंधक कायदा, विधवांचा पुनर्विवाह, देवताकृपेच्या

अपेक्षेने केलेली निरपराध मुक्या जीवाची हिंसा, इत्यादि अनेक धार्मिक व सामाजिक प्रश्नाबद्दल आढळून येणारा भिन्न भिन्न मताचा गलबला वरील आक्षेपाच्या पुष्ट्यर्थ पुढे करण्यांत येतो. आणि अशा प्रकारे त्रिकालाबाधित नीतीचें अस्तित्व नाकारून, हे आक्षेपक असा आव आणतात कीं, जरी कलेने नीतीच्या बंधनात राहावें असें एक वेळ मान्य केले तरी शाश्वत, सर्व देशात व कालात मान्यता पावणारी अशी नीति तरी कोठे आहे कीं, जिच्या अनुरोधाने कलावंताने आपली कृति निर्माण करावी ? असाच एक आंग्ल आक्षेपक म्हणतो:—

" Sincerity we may demand from the artist but not truth, for who knows what is truth outside the narrow limits of mathematical science ? "* अग्रगण्य मराठी लेखक श्री. वि. स. खांडेकर यानीहि " कला व नीति " या विषयावरील आपल्या एका व्याख्यानात पुढील उद्गार काढल्याचें प्रसिद्ध झाले आहे. " मानवी समाजाला उच्चत्वाला नेणारे नियम म्हणजे नीति असें सर्वसामान्यतः समजलें जातें. परंतु हे नियम कालाच्या ओघाप्रमाणें बदलत असतात हें लक्षात ठेवले तर बरेच वाद कमी होतील. आज आपण ज्याला 'नीति' समजतो, ती २५-३० वर्षांपूर्वी खास 'अनीतींत' मोडली जात होती. 'चांगलें' आणि 'वाईट' या कल्पना प्रत्येक पिढींत बदलत असतात ...बाह्य वेषासंबंधीं सभ्यतेच्या व शिष्टाचाराच्या कल्पना ज्याप्रमाणे आजच्या पिढींत बदलल्या आहेत त्याचप्रमाणे मानसिक नीतिकल्पनाहि आतां बदलल्या आहेत. " † परंतु, असल्या प्रकारच्या आक्षेपाचें एक सर्वांत उत्तम उदाहरण वाचकांस रा. रा. भास्करराव तांबे यांच्या पुढील वाक्यांत सांपडेल. ते लिहितात: " या जगांत जिला आपण नीति ह्मणतो ती

* *The Rudiments of Criticism*, by E. A. G. Lamborn, p. 13.

† " साप्ताहिक ज्ञानप्रकाश " ता. २९ जुलै १९३४, पृष्ठ २.

खरोखरच सत्यस्वरूप अशी कांहीं वस्तु आहे काय? ......आज जी गोष्ट नीतीची आपण ह्मणतों तीच उद्या अनीतीची ठरते. एका देशांत जी नीतिमत्ता समजली जाते तीच दुसऱ्या देशांत अनीति मानण्यांत येते. मग खरी नीति कोणती ह्मणायची? **या जगांतील नीति अशी बहुरूपिणी आहे**......मग कलेनें कोणाला मान तुकवावी? कोणाचा पक्ष धरावा आणि कोणाचा सोडावा? कलेच्या क्षेत्रांत हा वादाचा झगडा धुमाकूळ घालूं लागला तर त्याला कंटाळलेल्या माणसानें शांतीसाठीं कोणाला शरण जावें? **खरें पाहूं जातां केवळ नीति या जगांत नाहींच असें म्हटलें तर अतिशयोक्ति होणार नाहीं.** नीतिखंड मात्र येथें दृष्टीस पडतात, ह्मणूनच **सरड्यासारखे नीति आपले रंग पालटीत असते.** अशा **अशाश्वत परिवर्तनशील नीतीचा** अवलंब कलेनें केला **तर** नीतीचें तत्कालीन स्वरूप नाहींसें होतांच **कला देखील नष्ट होईल.**"*

कला आणि नीति यांच्या परस्परसंबंधाच्या वादांत हा आक्षेप इतक्या वारंवार व प्रामुख्याने पुढे केला जातो कीं, त्याचें विस्तृत खंडन करणें येथे आवश्यक आहे. आणि या संबंधांत प्रथमदर्शनीच अशी तक्रार केली पाहिजे कीं, वरील आक्षेप पुढे करणारे बहुतेक वादी एका महत्वाच्या गोष्टीकडे हेतुपुरःसर अगर न कळत दुर्लक्ष करीत असतात. वास्तविक या जगांत सर्वच नीति अशाश्वत, परिवर्तनशील व सरड्याप्रमाणे क्षणोक्षणीं रंग बदलणारी असून त्रिकालाबाधित व सनातन अशीं नीतितत्वें मुळी नाहींतच कीं काय, या महत्वाच्या प्रश्नाचा विचार थोडासा बाजूस ठेऊन, आम्ही वरील आक्षेपकांना प्रथमच असा एक उलट प्रश्न विचारूं इच्छितों कीं, जो आक्षेप तुम्ही नीतिविरुद्ध पुढे करतां, तोच कोणी कलेविरुद्ध पुढे आणूं शकणार नाही काय? तसें पाहूं

*" कला आणि नीति ", पृष्ठें १६-१७ (जाड टाइप आमचा)

गेलें असतां या विश्वांतील प्रायः सर्वच वस्तु परिवर्तनशील आहेत; आणि या परिवर्तनशील व क्षणोक्षणीं बदलणाऱ्या बाह्य देखाव्याच्या बुडाशीं दडून बसलेलें—व तसें तें तेथे खात्रीने असलेलें — शाश्वत व सनातन तत्व हुडकून काढणें हेंच तत्वज्ञानाचें, शास्त्राचें, किंबहुना मानवी जीविताचें कार्य होय. कलेसंबंधीच्या पांचशें वर्षांपूर्वीच्या कल्पना आजहि जशाच्या तशाच कायम आहेत असें छातीवर हात ठेवून म्हणण्यास कोणी तयार आहेत काय ? किंवा पुढेही त्या कधी बदलणार नाहीत अशी हमी कोणी भरूं शकतील काय ? अथवा, आज पाश्चिमात्य देशांत एखाद्या कलेच्या आदर्श स्वरूपाविषयी ज्या कांहीं कल्पना प्रचलित आहेत, त्याच कल्पना तंतोतंतपणे इतर देशांत देखील आहेत काय ? सुप्रसिद्ध अजंटाचीं लेणीं, आग्र्याचा ताजमहाल, इजिप्तचे मनोरे, इत्यादिकांना निर्माण करणारे कलावंत आणि त्याचप्रमाणे पाश्चिमात्य देशांतील नामांकित शिल्पकार व चित्रकार या सर्वांच्या मनांत कलेविषयी अगदीं एकसारख्याच कल्पना व समजुती घोळत होत्या काय ? यासंबंधांत कलकत्त्याच्या ' गव्हर्न्मेंट् स्कूल् ऑफ् आर्ट् ' चे विद्वान मुख्याध्यापक पर्सी ब्राउन् हे एके ठिकाणीं पौर्वात्य व पाश्चिमात्य देशांतील कलांचें तुलनात्मक विवेचन करतांना लिहितात: "No true comparisons can be instituted between the art of the Orient and that of the Occident. Each starts from a different origin, aims at a different object, and arrives at a different end." * आदर्श नाटक, कादंबरी, निबंध, वगैरे संबंधीच्या कल्पना गेल्या पन्नास

* *Indian Painting, p. 6.* इतकेंच नव्हे, तर या शतकाच्या सुरवातीपावेतों पौर्वात्य कृतींना कला या सदराखाली घालण्यास देखील पाश्चिमात्य परीक्षक तयार नव्हते !

वर्षांत देखील पुष्कळच बदलल्या आहेत ही गोष्ट खोटी आहे काय ? " भौतिकता आणि वाङ्मय " नामक एका लेखांत रा. प्रभाकर पाध्ये यांनी पुढील उद्गार काढले आहेत: " या विवेचनावरून हें ध्यानांत येईल कीं प्रत्येक कालखंडांतील वाङ्मयाचा दृष्टिकोन व दर्जा त्या त्या कालांतील भौतिक परिस्थितिवर अवलंबून असतो... जो नियम आपण सरहा वाङ्मयाला लावतों तोच नियम उत्कृष्ट वाङ्मयाच्या दंडकांना लावतां येतो. मनुष्याच्या उत्कृष्ट वाङ्मयाच्या कल्पना त्याच्या भौतिक जीवनाबरोबर बदलत असतात. निरनिराळ्या काळीं निरनिराळे दंडक प्रचारांत येतात. " * ' कलाशास्त्राची रूपरेषा ' या उपर्निर्दिष्ट आंग्ल पुस्तकाचा लेखक तर स्पष्टच लिहितो कीं, " And in many cases it is perfectly certain that the qualities which we admire in ancient works of art are the opposite of the qualities which their contemporaries enjoyed.........What is true of individual works is true of styles and forms. Painting now-a-days means painting easel-pictures; but this is a recent innovation in the history of art, and not one that is likely to endure. The ballad, the play, the symphony, and all such forms, depend upon historical circumstances which cannot be permanent. The work of art itself on a different level. What new forms, it may take in the future, no one can pretend to know; we can only be certain that they will not be those which it has assumed in the past."† खुद्द लाइकांनी देखिल उपर्निर्दिष्ट व्याख्यानांतच या संबंधाची स्पष्ट कबूली देऊन इतर

*" प्रतिभा ", पाक्षिक, वर्ष २ अंक १

†*Outlines of a Philosophy of Art, p. 99*

एकांगी आक्षेपकांपेक्षा स्वतःचा निःपक्षपातीपणा सिद्ध केला आहे. ते म्हणतातः " जी गोष्ट नीतीची तीच कलेची. जुन्या काळांत कलेची जी आवड होती तीच आज कायम असणें शक्य नाहीं. नीती-प्रमाणे कलेविषयींच्या लोकांच्या कल्पनाही पालटत असतात " * सौंदर्याच्या कल्पना तर पाश्चिमात्य देशांत इतक्या झपाट्याने पालटत आहेत कीं, एका वर्षी सौंदर्यसंपन्न म्हणून नावाजलेली वस्तु स्वतःची महती तशीच पुढील वर्षापावेतो कायम ठेवीलच असें निश्चित सांगतां येत नाही. मग पाश्चिमात्य व पौर्वात्य सौंदर्यकल्पनांच्या तुलनेची गोष्टच कशाला ? चीन, इंग्लंड, हिंदुस्थान इत्यादि देशांत सौंदर्यासंबंधी प्रचलित असलेल्या भिन्नभिन्न कल्पनांचा निर्देश करून रा. आपटे लिहितातः " या आमच्या सौंदर्यकल्पनांशीं पाश्चात्य कल्पनांची तुलना करून पाहिली तर जमीन अस्मानाचा फरक दिसेल. केव्हां केव्हां तर एकाच्या दृष्टीनें जें सौंदर्याचें लक्षण तेंच दुसऱ्याच्या दृष्टीस हिडीसपणाचें वाटतें असेंही आढळून येतें. गायनाच्या सौंदर्याविषयींही असाच मतभेद दृष्टीस पडतो " $

आता या सर्व गोष्टी उघड असतांना, आणि त्यापासून कलेची परिवर्तनशीलता निर्विवादपणे सिद्ध होत असतांना, नीति परि-वर्तनशील व सरड्याप्रमाणे रंग पालटणारी आहे असा केवळ एकांगी आक्षेप आणून, तिच्या नादी लागल्यास कलेचें स्वतःचें अपरि-वर्तनशील स्वरूप नष्ट होईल अशी खोटीच आरोळी मारणाऱ्या आक्षेपकांच्या विधानांत तथ्य तें कोणतें उरलें ? वास्तविक पाहतां, कला व नीति यांपैकीं अधिक परिवर्तनशील काय आहे याचा

* " साप्ताहिक ज्ञानप्रकाश ", ता. २९ जुलै १९१४ पृष्ठ १.

$ " सौंदर्य आणि ललितकला ", पृष्ठें १२ १३.

निर्णयच करण्याची वेळ आली तर, पहिलीकडे बोट दाखवावें लागेल याबद्दल आम्हांस तरी संशय वाटत नाही. किंबहुना, थोडें आणखी पुढे जाऊन असेंहि म्हणतां येईल कीं, कलेच्या वारंवार बदलणाऱ्या अशाश्वत स्वरूपाच्या बुडाशीं असलेलें सनातन तत्व जर कोणीं शोधून काढलें---आणि तें इतर सर्व वस्तूंप्रमाणे कलेंतहि आहे याबद्दल आम्हास शंका नाहीं—तर तें तत्व म्हणजे कलेंतील नीतिपर अंशच होय असें त्यास आढळून येईल. नीतीशिवाय या जगांत कोणतीच गोष्ट शाश्वत राहूं शकत नाहीं. त्वरित नाश पावणाऱ्या वस्तूंना कांही काळ अधिक टिकविणाऱ्या मसाल्याप्रमाणे, नीति हें अशाश्वत वस्तूंना शाश्वत स्वरूप देण्याचें एकमेव साधन होय. या जगांत सर्वच नीति 'क्षणभंगुर आहे हें म्हणणें तर खरें नाहीच, परंतु नीति जर अशी सर्वस्वी परिवर्तनशील असती तर या विश्वांत इतर कोणतीहि वस्तु सर्वकाळ अस्तित्वांत राहूं शकली नसती, हें वरील आक्षेपकांनी ध्यानांत ठेवावें.

नीतीप्रमाणेच कला देखील परिवर्तनशील कशी आहे हें आपण येथपावेतो पाहिलें. परंतु हें केवळ ' जशास तसें ' किंवा ' मी चोर तर तूं दरवडेखोर ' अशा प्रकारचें उत्तर असून याने नीतीवरील मूळ आक्षेपाचें खंडण होत नसल्याने, आपण आता नीति खरोखरच सर्वस्वी परिवर्तनशील व अशाश्वत आहे काय या प्रश्नाचा विचार करूं. वरील आक्षेपकांचें म्हणणें असें आहे कीं, नीति–अनीतीसंबंधी जे नियम व दंडक कांही वर्षांपूर्वी समाजांत मान्यता पावले होते त्यांना आज कोणी मानीत नाही, व ज्यांना आज मान दिला जातो त्यांना कालांतराने समाज दूर टाकून देईल. आता नीत्यनीतीचे नियमांत कालाच्या प्रभावाने

थोडाबहुत फरक पडतो हें कोणासहि मान्य करावें लागेल. जगांतील प्राय: सर्वच वस्तूंचा परिवर्तनशीलता हा एक गुण आहे हें आम्हीं वर सांगितलेंच आहे. परंतु हे आक्षेपक म्हणतात त्याप्रमाणे नीति ही सर्वस्वी परिवर्तनशील आहे काय? 'सरड्याप्रमाणे रंग बदलणाऱ्या' चंचल स्वरूपाचे मुळाशीं नीतीचीं कांही सनातन व सर्वमान्य तत्वें मुळी नाहीतच कीं काय? जिला सर्व कालीं व सर्व देशांत मान्यता मिळाली आहे अशी आजपावेतोच्या जगाच्या इतिहासांत एखादीहि घटना घडून आली नाही? नीति-अनीतीबद्दलचे समाजाचे निकाल नेहमीच परस्परविरोधी असून प्रयत्न करूनहि त्यांमध्ये एकसूत्रीपणा मिळणें अशक्य आहे काय?

आता या प्रश्नांचा थोड्याशाहि आस्थेने विचार केला असतां वरील आक्षेपकांच्या विधानांच्या धाष्टर्याचें आश्चर्य वाटल्यावाचून राहणार नाहीं. या एकांगी विद्वानांच्या दृष्टीला, शेंकडो वर्षे लोटून गेलीं असतांहि ज्या प्रसंगांनी व नियमांनी स्वत:ची नीति अगर अनीति सर्व देशांत कायम ठेविली आहे, ते कसे दिसत नाहीत याचें आश्चर्य वाटतें! अनेक शतकांपूर्वीपासून समाजांत प्रचलित झालेल्या रामायणाच्या अभूतपूर्व नायकाच्या अत्युच्च नीतिमत्तेबद्दल कोणी अद्यापिही शंका घेतली आहे काय? किंवा, वरील आक्षेपकांचे मताने आता रामजन्माऐवजी रावणजन्माचा उत्सव, व कृष्णजन्माऐवजी कंसजन्माचा उत्सव मोठ्या आदराने, भक्तिभावाने व पूज्य बुद्धीने साजरा करण्याची वेळ आली आहे? सीतेला, सावित्रीला अगर अनुसूयेला आजहि कोणी विद्वान अनीतिमान स्त्रियांच्या मालिकेंत घालण्यास तयार होईल काय? किंवा, संबंध रोम शहर अग्नीच्या भक्ष्यस्थानीं पडत असतां स्वत: बांसरी वाजविण्यांत गुंग होणाऱ्या अमानुष क्रूर नीरो बादशहाला वरील आक्षेपकांच्या मतें आज अगर पुढे केव्हांहि एखाद्या

नीतिमान सज्जनांच्या परिषदेचें अध्यक्षस्थान स्वीकारण्याची विनंती करण्यांत येईल काय ? शतकेंच्या शतकें लोटलीं तरी साधुवर्य तुकाराम, रामदास, एकनाथ, इत्यादींच्याबद्दल सध्या समाजांत प्रचलित असलेल्या पूज्य व सादर भावनेंत फरक पडेल काय ? गोब्राह्मण प्रतिपालक श्रीशिवाजीमहाराज, स्वातंत्र्यवीर राणा प्रतापसिंह, वीरशिरोमणि तानाजी मालुसेर, आधुनिक हिंदी राष्ट्रीय चळवळीचे पूज्य जनक लो. टिळक, आखिल जगताला ललामभूत होऊन राहणारे महात्मा गांधी, इत्यादि थोर थोर व्यक्तींबद्दल समाजानें विचारपूर्वक दिलेले निकाल पुढे कधी सरड्यासारखे रंग पालटतील काय ? आता, एका वेळेस उपलब्ध नसलेली माहिती कालांतरानें उपलब्ध झाल्यावर तदनुरोधानें एखादें मत बदलल्यास ती गोष्ट अर्थातच वेगळी; कारण, त्यायोगें नीत्यनीतीच्या ज्या नियमांस अनुसरून तें मत बनविलें जातें त्यांच्या सनातनत्वाला बाधा येत नाही. विश्वांतील कोणत्याहि साहित्यांत अनुपम अशा भगवद्गीतेंतील दुसऱ्या अध्यायाच्या शेवटीं दिलेलें स्थितप्रज्ञ मुनींचें अत्यंत सुंदर व श्रेष्ठ वर्णन, किंवा बाराव्या अध्यायाच्या तेरा ते एकोणवीस श्लोकांत दिलेलें परम भक्ताचें वर्णन, किंवा त्यांत आणखी कित्येक ठिकाणीं आलेलीं आदर्श मानवी जीविताचीं वर्णनें घ्या, त्यांना किती शेंकडों वर्षांपासून व किती निरनिराळ्या देशांतून नीतीचीं अत्युच्च तत्त्वें म्हणून मान्यता दिली जात आहे तें पहा, आणि मग नीति ही सरड्यासारखी रंग बदलणारी आहे, कधीला मार्गदर्शक होऊं शकतील अशी त्रिकालाबाधित व चिरंतन टिकणारीं नीतितत्त्वें मुळा नाहीच, असले निरर्गल प्रलाप काढा. उगीच उचलली जीभ आणि लावली टाळूला असला प्रकार करण्यांत काय हंशील ? ख्रिश्चन धर्माच्या पवित्र ग्रंथांतील ' सर्मन् ऑफ् दि माउंट् ' मध्ये प्रतिपादन केलेल्या सुंदर नीतितत्त्वांना अद्याप देखील जगांतील विद्वान मान देतच आहेत ना !

नीतिअनीतीसंबंधी पूर्ण विचारांतीं दिलेले व विद्वन्मान्य झालेले निकाल कालाच्या प्रबळ प्रवाहाला देखील भीक न घालतां जसेच्या तसेच कसे राहूं शकतात, हें वर दिलेल्या अनेक उदाहरणांवरून वाचकांस स्पष्ट होईल आता, निरनिराळ्या देशांत नीतिअनीतीसंबंधी अगदी भिन्न व परस्परविरोधी समजुती रूढ असतात असें म्हणणाऱ्यांना आम्ही इतकेंच सांगतों कीं, त्यांनीं जगांतील निरनिराळ्या धर्मांचें निःपक्षपातीबुद्धीने तुलनात्मक विवेचन करणारें कोणतेंहि एखादें चांगलें पुस्तक उघडावें, म्हणजे त्यांना भिन्नभिन्न धर्मांच्या मुळाशीं असलेल्या मुख्य नीतितत्वांमध्ये किती विलक्षण साम्य आहे हें कळून येईल. देशकालानुसार आचारधर्मांत आणि नीतीच्या बारीकसारीक तपशिलांत बदल पडणें केव्हांहि साहजिकच आहे; परंतु म्हणून यांच्या मुळाशीं असलेल्या सनातन नीतितत्वांच्या विश्वव्यापित्वावर आक्षेप घेणें योग्य होणार नाहीं. वाचकांच्या माहितीसाठी आम्ही येथे एका सर्वमान्य ग्रंथकाराचें म्हणणें उद्धृत करतों. सुप्रसिद्ध 'गीतारहस्य' ग्रंथाच्या समारोपांत लो. टिळक लिहितात: "गीतेंत स्थितप्रज्ञाचीं, ब्रह्मनिष्ठ पुरुषाचीं व भक्तियोग्याचीं जीं लक्षणें सांगितलीं आहेत त्यांत, आणि निर्वाणपदास अधिकारी झालेल्या अर्हतांचीं म्हणजे पूर्णावस्थेस पोचलेल्या बौद्ध भिक्षूंचीं निरनिराळ्या बौद्ध ग्रंथांत जीं लक्षणें दिलेलीं आहेत त्यांत विलक्षण साम्य आहे असें दिसून येतें."* "कायमची शांती किंवा सुख मिळविण्यास तृष्णेचा किंवा वासनेचा क्षय करून मन निष्काम करण्याचा बुद्धानें उपदेशिलेला मार्ग [ चवथें

* "गीतारहस्य" (१९१५) पृ. ५६५. यासंबंधांत वाचकांनी सदर ग्रंथाच्या परिशिष्ट प्रकरणाचे सहा व सात हे भाग सगळेच वाचावे, व शिवाय पुढील पृष्ठेंहि पहावीं: ९३-९४, ३७४-७६, ४८५ इ. इ.

सत्य ] आणि मोक्षप्राप्त्यर्थ उपनिषदांत वर्णिलेला मार्ग हे दोन्ही वस्तुतः एकच असल्यामुळें, दोन्ही धर्मांत मनाची निर्विषय स्थिति, हेंच अखेरचें दृश्य साध्य आहे हें उघड होतें. " * परंतु बुद्ध धर्माचा उदय किती झालें तरी हिंदुस्थानांतच झाला होता म्हणून आता ख्रिश्चन धर्माची गोष्ट पाहा: " लॉरिनसर यांनी आपल्या पुस्तकाच्या ( म्हणजे गीतेच्या जर्मन भाषांतराच्या ) अखेर भगवद्गीता आणि बायबल विशेषेंकरून नवा करार—यांतील शब्दसादृश्याचीं सुमारें शंभरांहून अधिक स्थळें दाखविलीं असून त्यांपैकीं कांहीं विलक्षण आणि मनन करण्यासारखीं आहेत. "§ " ख्रिस्तचरित्र व ख्रिस्ताचा उपदेश यांचेंहि बुद्धाच्या धर्माशीं शतपट अधिक विलक्षण साम्य आहे, असें बौद्ध धर्मग्रंथ आणि बायबलाचा नवा करार यांची तुलना केली असतां स्पष्ट दिसून येतें. " $ निरनिराळया धर्मांतील नीतितत्वांमधील या साम्याचें कारण काय असावें याबद्दलच्या ऐतिहासिक वादांत शिरण्याची आपल्यास येथे आवश्यकता नाही. कारण कांहीं पाश्चिमात्य पंडित म्हणतात त्याप्रमाणे हा उपदेश प्रथम ख्रिस्तोन सांगितलेला असून नंतर तो इतर धर्मांनी उचललेला असो, किंवा लोकमान्य टिळक म्हणतात त्याप्रमाणे तो प्रथम हिंदुधर्मातच उगम पावून तेथून इतरत्र पसरला असो, अगर निरनिराळ्या देशांत निरनिराळ्या व्यक्तींनी स्वयंस्फूर्तीने व स्वतंत्रबुद्धीने तो प्रसृत केला असो—यांपैकी कोणताहि पक्ष खरा असला तरी, नीतीच्या मूल तत्वांना भिन्न भिन्न देशांत, लोकांत, व कालांत कशी कायमची मान्यता मिळाली आहे हें मात्र निःसंदिग्धपणे प्रस्थापित होतें.

येथपावेतो आपण नीति ही सर्वस्वी परिवर्तनशील व देशकालानुसार उलटसुलट कोलांट्याखाणारी नसून तिचा निदान कांही भाग तरी सनातन,

* सदर पृ. ५६९.	§ सदर पृ. ५८०	$ सदर पृ. ५८४.

त्रिकालाबाधित, व विश्वव्यापी कसा आहे हें पाहिलें. परंतु आता आपण उपर्निर्दिष्ट आक्षेपाचा थोड्या निराळ्या दृष्टीने विचार करूं. कल्पना करा कीं, आपले आक्षेपक म्हणतात त्याप्रमाणे नीति ही सर्वस्वी परिवर्तनशील आहे; पण असें गृहीत धरलें तरी कलावंत नीतीचा संबंध नाकारूं शकतील काय ? किंवा, हाच प्रश्न निराळ्या रीतीने व सत्यास अधिक धरून मांडावयाचा झाल्यास पुढीलप्रमाणे म्हणतां येईल. आम्हीं स्वतःच वर कबूल केलें आहे कीं, नीतीचे नियम, सर्वस्वी नसले तरी, कांही अंशाने परिवर्तनशील व वादग्रस्त आहेत हें खरें आहे. आता नीतीच्या या परिवर्तनशील व वादग्रस्त अंशासंबधाने कलाकाराने आपलें वर्तन कसें ठेवावें ? त्याने 'कोणाला मान तुकवावी ? कोणाचा पक्ष धरावा आणि कोणाचा सोडावा ?' नीतिअनीतीसंबंधीच्या ज्या नियमांबद्दल भिन्न भिन्न देशांत व कालांत ऐकमत्य नाही, त्या सर्वांना एवढ्याच कारणांवरून कला समूळ झुगारून देऊं शकते काय ? आणि ती तसें करूं शकत नसल्यास तिने कोणाला मान्यता द्यावी आणि कोणाला अमान्य करावें ? या असल्या मतामतांच्या गलबल्यांतून तिने आपला मार्ग कसा काढावा ?

या प्रश्नांनाहि आपण प्रथम मागे दिलेल्या पद्धतीनेच उत्तर देऊन नंतर मुख्य उत्तर स्पष्ट करूं. नीतिनियमांच्या वादग्रस्ततेबद्दल ओरड करणाऱ्यांनी आजपावेतोच्या जगाच्या इतिहासाकडे नीट लक्षपूर्वक नजर टाकली, तर कलेचे नियम देखील असेच परिवर्तनशील व वादग्रस्त आहेत असें त्यांना दिसून येईल. कलेच्या क्षेत्रांतील या वादग्रस्ततेबद्दल व पक्षोपपक्षतेबद्दल सुप्रसिद्ध रशियन लेखक टॉलस्टॉय् स्पष्टपणे लिहितो: "The artists of various sects, like the theologians of various sects, mutually exclude and destroy one another. Listen to the artists of the schools of our times, and in all branches you will find each set of artists disowning others. In poetry the old

romanticists deny the parnassians and the decadents; the parnassians disown the romanticists and the decadents; the decadents disown all their predecessors and the symbolists; the symbolists disown all their predecessors and *les mages*; and *les mages* disown all, all their predecessors. Among novelists we have naturalists, psychologists, and 'nature-ists', all rejecting each other. And it is the same in dramatic art, in painting, and in music. So that art.........is not only *not* a thing clearly and firmly defined, but is understood in such contradictory ways by its own devotees that it is diffcult to say what is meant by art, and especially what is good, useful art." * हीच गोष्ट रा. आपटे यांनी पुढील वाक्यांत सांगितली आहे: "इतकीं वर्षें विचार व शोध चालला आहे, पण सौंदर्याभिरुचीची योग्य, व सर्वांना समाधानकारक अशी उपपत्ति कोणाही तत्वज्ञाला अद्याप लावतां आली नाहीं ही आश्चर्य करण्यासारखी गोष्ट आहे." §

परंतु, कलेच्या क्षेत्रांत असला हा पक्षोपक्षांचा व मतामतांचा घोंटाळा आहे म्हणून कोणा खऱ्या कलावंताने वैतागून कलेला

* *What ts Art*, Chap. I, concluding sentences. कलेच्या क्षेत्रांत भिन्न भिन्न मतांचा कसा विलक्षण गलबला आहे याची स्पष्ट कल्पना करून घ्यावयाची असल्यास, वाचकांनीं सदरहू पुस्तकाचें तिसरें प्रकरण, व आपटे कृत "सौंदर्य आणि ललितकला" भाग १ प्रकरणें ४-५ अवश्य वाचावींत. शिवाय सविस्तर माहितीसाठीं *Philosophy of the Beautiful* by Knight (vol 1) पहावें.

§ "सौंदर्य आणि ललितकला", पृ. ११.

तिलांजली दिली आहे काय ? मग नीतीविरुद्धच मात्र ही ओरड कां ? एक विद्वान एका गोष्टीला कला म्हणतो, दुसरा त्याला खोटें पाडून निराळयाच एखाद्या गोष्टीला कला म्हणतो, तर तिसरा कोणी या दोघांनाहि मूर्ख ठरवून आपला एक वेगळाच पंथ काढतो, हा प्रकार पाहून, " आता यांत मी कोणत्या गुरूचे पाय धरूं, कोणाला मान तुकवूं, कोणाला शरण जाऊं ? " असले विमोहनिदर्शक उद्गार काढून, कोणी जातिवंत कलाकार " यापेक्षा नको ती कला, आणि नको तिचा संबंध " असें कधीहि म्हणेल काय ? भिन्न भिन्न देशांत आणि कालांत नीतीचे भिन्न भिन्न नियम प्रचलित असतात, या सबबीवर कलावंतांनी जर नीतीचा संबंध तोडूं म्हटलें, तर त्याच कारणांसाठी एखादा सामान्य व्यवहारांतील मनुष्य देखील नीति-अनीतीचे नियम झुगारून देऊं लागल्यास त्याला हे काय उत्तर देणार ? निरनिराळ्या देशांत निरनिराळी वैवाहिक नीति प्रचलित आहे, म्हणून मी स्त्रीपुरुषसंबंधविषयक कोणतीच नीति पाळणार नाही, असा आग्रह कोणी धरल्यास त्याचें म्हणणें जितकें सयुक्तिक होईल, तितकेंच नीतिनियमांच्या परिवर्तनशीलतेला व वादग्रस्ततेला पुढे करून तिच्याशीं पूर्ण काडीमोड करूं पाहणाऱ्या कलावंतांचेंहि होईल. गोविंदभाऊ वैद्य एखाद्या रोगावर एक देशी काढा देतात, रामभाऊ डॉक्टर त्याच रोगावर एक विलायती मिक्श्चर घ्यावयाला सांगतात, हाजीमुल्ला आपलें तिसरेंच एक युनानी पद्धतीचें औषध घेण्याचा आग्रह करतात, आणि इकडे कोणी बायोकेमिस्ट्रीचा तज्ज्ञ आपल्या निवडक औषधांपैकी एखादें पुढे करतो,—याशिवाय नुसत्या सूर्यकिरणांनी, पाण्याच्या उपचाराने, विशिष्ट झाडांच्या नुसत्या हवेने, आसनांनी, किंवा लंघनाने रोग बरे करूं म्हणणारे निराळेच—

कोणी सुज्ञ रोगी करील काय? आणि त्याने केलाच, तर "औषध नेघे असोन वेथा" या समर्थकृत पढतमूर्खलक्षणांखाली त्याची वर्तणूक आल्याशिवाय कशी राहील?

या असल्या प्रकारच्या सर्व प्रश्नांना एकच उत्तर देतां येईल. आणि तें प्रस्तुत विषयाच्या शब्दांत सांगावयाचें झाल्यास पुढीलप्रमाणे द्यावें लागेल. एखाद्या गोष्टीसंबंधी निरनिराळ्या देशांत नीतीचे निरनिराळे व परस्परविरोधी नियम प्रचलित आहेत असें जर कलावंतास आढळून आलें, तर त्याने आपल्या देशांतील नीतीचा अवलंब करावा. कारण, एकतर त्याच्या स्वतःच्या मनावर जन्मापासून त्या देशांतील वातावरणाचेच संस्कार झालेले असतात, आणि दुसरी गोष्ट म्हणजे त्याची कृति ज्या लोकांसमोर येईल ते लोकहि बहुशीं त्याच देशाचे रहिवासी असतात. आता, स्वतःच्या देशांतहि भिन्न भिन्न कालीं भिन्न भिन्न मतें प्रतिपादिलीं गेलीं असल्यास, त्याने तो ज्या काळांत राहत असेल त्या काळांत विद्वन्मान्यता पावलेल्या नीत्यनीतीच्या नियमांकडे लक्ष देऊन आपली कलानिर्मिति करावी. परंतु हे सामान्य नियम झाले; आणि इतक्यावरच आपण थांबलों, तर एखाद्या श्रेष्ठ कलावंताला समकालीन जनतेच्या रूढ कल्पनांच्या तटापलीकडे आपली तीक्ष्ण व पवित्र दृष्टि फेंकणें अशक्य होईल. यासाठी असें म्हणणें आवश्यक आहे कीं, अशा एखाद्या कलावंताला जर पूर्ण विचाराअंतीं स्वतःच्या देशांतील व कालांतील नीति-अनीतिसंबंधीच्या नियमांत कांही अयोग्यता किंवा मतवैचित्र्य दिसून येत असेल, तर त्याने स्वतःच्या सदसद्विवेकबुद्धीला शुद्ध व निर्विकार मनाने कौल लावावा; आणि पुरेशा आत्मविश्वासाच्या अगर ज्ञानाच्या अभावीं तेंहि शक्य न होऊन, अर्जुनाप्रमाणे विमूढावस्थाच प्राप्त होण्याचा प्रसंग आला, तर धैर्य न सोडतां शेवटचा मार्ग म्हणून "महाजनो येन गतः स पन्थाः" या सुप्रसिद्ध

उक्तींत सांगितल्याप्रमाणे, सर्वमान्यता पावलेल्या महान् विभूतींच्या आचरणाचें व उपदेशाचें सूक्ष्म निरीक्षण करून त्यांतील नीतितत्वें हुडकून काढावीं. एवंच, कोणत्याहि स्थितींत त्याने नैतिक बंधनांना झुगारून देण्याच्या गोष्टी करणें युक्त होणार नाही. कलेच्या क्षेत्रांत देखील परिवर्तनशीलता, वाग्ग्रस्तता आणि पक्षोपपक्षता असतांना ज्याप्रमाणे तो कलेला क्षणभरहि दूर टाकूं शकत नाही, त्याचप्रमाणे त्याने नीतीचा देखील त्याग करतां कामा नये.

नीतिशास्त्रांत आढळून येणाऱ्या मतवैचित्र्याबद्दल आणखी एका गोष्टीचा विचार करून आपण या आक्षेपाची रजा घेऊं. नीति-शास्त्रांत कित्येक वेळा वास्तविक व खचोटीचे मतभेद होऊन, त्यांपासून निरनिराळे पक्ष उत्पन्न होतात हें खरें आहे; व अशा प्रसंगीं कलाकाराने कसें वागावें हें वर सांगितलेंच आहे. परंतु कित्येक प्रसंगीं हे मतभेद लबाडीचे व स्वार्थमूलक असतात; तर इतर कित्येक प्रसंगीं ते उघड उघड घोर अज्ञानांत उगम पावलेले असतात. अशा मतभेदांकडे बोट दाखवून कोणी नीतिशास्त्रांतील दुहीवर जोर देऊं म्हणेल तर तें न्याय्य होणार नाही. स्वतःच्या स्वार्थासाठी लोकांची दिशाभूल करण्याच्या उद्देशाने जर कोणी धूर्त दुर्जन नीतीला अनीति व अनीतीला नीति म्हणून प्रतिपादन करील, व लोकांची क्षणभर दिशाभूलहि करील, तर त्याच्या या लबाडीच्या विरोधाने खऱ्या नीतिला बाधा येऊं शकणार नाही. कित्येक ढोंगी लोक साधूच्या वेषाने राहतात, म्हणून खऱ्या साधूंनी काय करावें ? त्याचप्रमाणे उघड उघड अज्ञानांत गुरफटलेल्या कोणा वेड्या पीराने जरी एखाद्या नीतिमान् गोष्टीला अनीतिमान् गोष्टींच्या सदरांत घालण्याचा प्रयत्न केला, तरी जाणत्या व विद्वान लोकांच्या निर्णयाला त्याचे बालिश बोल कसे हरताळ फासूं शकतील ?

नीत्यनीतीचे नियम परिवर्तनशील व देशकालानुसार बदलणारे असले तरी तेवढ्यामुळें कलावंत नीतीचा संबंध कसा झुगारून देऊं शकत नाहींत हें वर दाखविलें. परंतु, वास्तविक पाहतां हे नियम सर्वस्वी परिवर्तनशील नसून,

सर्वभूतेषु येनैकं भावमव्ययमीक्षते ।
अविभक्तं विभक्तेषु तज्ज्ञानं विद्धि सात्विकम् ।। गीता, १८-२०

या भगवद्वचनांत सांगितल्याप्रमाणे, असात्विक ज्ञानाला विभक्त व परस्पर संबंधरहित दिसणाऱ्या नीतीच्या अनेक निरानिराळ्या बदलत्या रूपांचे बुडाशीं, सात्विक ज्ञानाच्या दृष्टीला एकच नित्य व अविकारी नीतितत्व दिसणें कसें शक्य आहे, हें मागें सांगितलेंच आहे. आणि हीच गोष्ट ध्यानांत धरून सत्यासत्याच्या अनेक निरानिराळ्या, परस्परविरोधी व परम घोंटाळ्यांत टाकणाऱ्या व्याख्या प्रचलित असतांहि,

सत्यं नामाऽव्ययं नित्यमविकारि तथैव च ।।

अशी सत्याची व्याख्या, * व

न जातु कामान्न भयान्न लोभाद्धर्मं त्यजेज्जीवितस्यापि हेतोः ।
धर्मो नित्यः सुखदुःखे त्वनित्ये जीवो नित्यः हेतुरस्य त्वनित्यः ।।

अशी धर्माच्या नित्यत्वाची ग्वाही † महाभारतकारांनी बिनादिक्कत दिली आहे. आणि थोडासाहि खोल विचार केला असतां प्रत्येकाला नीतीचें व धर्माचें हें नित्यत्व कबूल करावें लागेल. पहा कीं, नीति जर सर्वस्वी अनिश्चित, परिवर्तनशील व सरड्याप्रमाणे रंग बदलणारी असती तर,

* महाभारत, शांतिपर्व, १६२।१०.

† महाभारत, स्वर्गारोहणपर्व, ५।६०. यांतील धर्म या पदाचा अर्थ लोकमान्यांनीं नीति असाच केला आहेः 'गीतारहस्य' पृ. ९४ पहा.

मानवी समाज कधींहि सुरळीतपणे चालूं शकला असता काय ज्याला काल अनीतिमान् म्हणून शिक्षा केली त्यालाच आज नीतिमान् म्हणून मस्तकीं धारण करण्याची पाळी प्रत्यहीं येऊं लागली, तर समाजांतील एकहि कार्य धडपणे चालूं शकणार नाही हें उघड आहे. मानवी व्यवहारांतील सुसंगति नष्ट होईल; आणि इतिहासाचें अध्ययन अगदींच व्यर्थ होऊन, पुराणें व धर्मशास्त्रावरील जुने ग्रंथ भारूडांत जमा होतील. केवल व शाश्वत नीति मुळीच नसून सर्वच नीति सरसकट परिवर्तनशील आहे असें एकदा मान्य केलें म्हणजे नीतिचा एखादा नियम किती वर्षांनी, महिन्यांनी, अगर दिवसांनी--नव्हे, क्षणांनी देखील --बदलून दुसराच एखादा त्याची जागा पटकावेल, हें कोण निश्चितपणे सांगूं शकेल ! अशी स्थिति प्राप्त झाली असतां, मनुष्याला एक दिवस तरी या जगांत धडपणे राहतां येईल काय ? सारांश, या जगाचा व्यवहार अनादिकालापासून असल्या अंदाधुंदीपासून व बेबंदशाहीपासून सुदैवाने अलिप्त आहे, व मानवी समाजाच्या इतिहासांत, ‘ अविभक्तं विभक्तेषु ’, किंवा आंग्ल शब्दांत सांगावयाचें झाल्यास Unity in diversity, या न्यायास अनुसरून, चिकित्सक इतिहासकार एकसूत्रीपणाचें अस्तित्व व कांहीं सनातन तत्वांना धरून होणारी उत्क्रांति पाहूं शकतात, एवढ्यावरून-देखील ‘ शाश्वत व त्रिकालाबाधित नीति नाहीच ’ या तक्रारीस पुरेसें उत्तर मिळणार आहे. आणि इतकें लांब न जातां, अखिल मानवी इतिहासाचे ऐवजी, नुसतें दैनंदिन सामान्य व्यवहाराचें आपण निरीक्षण केलें, तरी देखील यांच्या आक्षेपाचा फोलपणा स्पष्टपणे दिसून येईल. कला आणि नीति यांचा संबंध जोडावयाची वेळ आली म्हणजे मात्र ‘ कोण आणे खरी नीति कोणती आहे ती ! वास्तविक, निश्चित स्वरूपाची व शाश्वत अशी नीति नाहीच. ’ इत्यादि उद्गार काढ-

णारे हे आक्षेपक, उद्यां यांच्याच घरांतून किंवा पुस्तकांतून कोणीं चोरी केली तर त्याला अनीतिमान् मनुष्याच्या सदरांत घालून त्याच्याविरुद्ध कायद्याची मदत घेण्यास मागेपुढे पाहतील काय ? नीति-अनीतीच्या कांही निश्चित कल्पना असल्याशिवायच यांचा रोजचा व्यवहार चालतो काय ? मग कलानिर्मिति नीतीस धरून असावी असें म्हणतांच मात्र 'सत्याचें व नीतीचें निश्चित स्वरूप कोणास माहीत आहे ?' असे उद्गार यांनी कां बरें काढावे ?

सारांश, थोडासाहि खोल विचार केला असतां, सर्वसामान्य व सनातन अशीं कांही नीतितत्वें असल्याशिवाय मानवी व्यवहार चालणेंच शक्य नाही हें उघड होईल. आता प्रत्यक्ष जगांत आचरणांत आणलीं जात असतांना तदंतर्गत अपूर्णतेमुळे हीं कायम व शाश्वत नीतितत्वें तात्कालिक व परिवर्तनशील आवरणाने झांकली जातात हें खरें आहे. परंतु म्हणून या मायावी आवरणाचे अंतरंगांत लपून बसलेल्या सत्य नीतीचें अस्तित्व कोणता सुज्ञ नाकारेल ? धान्याच्या वरील भुसा टाकून देऊन ज्याप्रमाणे आंतील दाणे घ्यावयाचे असतात, त्याप्रमाणे परिवर्तनशील आवरणाच्या बुडाशीं असलेल्या शाश्वत नीतितत्वाचें ज्ञान करून घेणें हें प्रत्येकाचें कर्तव्य होय. आणि म्हणूनच "ध्रुवासारखें अढळ व नित्य नीतितत्व कोणतें हें प्रथम अवश्य ठरवावें" असें सांगून, नंतर लोकमान्य टिळक स्पष्टपणे लिहितात : "दुष्ट लोकांच्या समाजांत नीतिधर्मांचे पराकाष्ठेचें शुद्ध स्वरूप आढळून येत नाही, म्हणून अपूर्णावस्थेंतल्या समाजांत आढळून येणारें नीतिधर्मांचें अपूर्ण स्वरूपच मुख्य किंवा मूळचें होय असें म्हणतां येत नाही. हा दोष समाजाचा आहे, नीतीचा नव्हे. म्हणून जे पुरुष शहाणे आहेत ते शुद्ध व नित्य नीतीधर्माशीं तंटा

करीत न बसतां, समाज जेणेकरून चढत्या पायरीस लागून पूर्णावस्थेस पोंचेल असे प्रयत्न करीत असतात. ” *

आता, नीतीचा हा शाश्वत अंश कोणता व परिवर्तनशील अंश कोणता, याचा लक्षपूर्वक विचार करून पाहिल्यास आपल्यास असें आढळून येईल कीं, नीतीच्या परिवर्तनशील अंशांत मुख्यत्वेंकरून निरनिराळ्या देशांत व कालांत कमीजास्त प्रमाणाने बदल पावणाऱ्या कर्मकांडाच्या नियमांचाच समावेश केला पाहिजे. आणि, नीति ही परिवर्तनशील व सरड्याप्रमाणे रंग बदलणारी आहे असा आक्षेप घेणाऱ्यांच्या विधानांचा आपण जर खोल अभ्यास केला, तर त्यांच्या या आक्षेपाच्या बुडाशीं नीतीची ही अव्याप्तिदोषग्रस्त व म्हणून विपर्यस्त कल्पनाच आहे हें उघड होईल. या आक्षेपकांना कर्मकांडांतर्गत आचारधर्मांच्या नियमांच्या पलीकडे कांही सर्वसामान्य व सनातन नीतितत्त्वें या जगांत आहेत याची जाणीवच नसते; आणि म्हणूनच, असले हे कर्मकांडाचे नियम म्हणजेच सगळी नीति असें खोटेंच समीकरण ते आपल्या हृदयाशीं धरून बसतात. आता हे आचारधर्मांचे रोजच्या व्यवहारांतले नियम भिन्नभिन्न देशांत, धर्मांत व कालांत निरनिराळ्या रूपांनी प्रचलित असतात हें प्रसिद्धच आहे. यांचा संबंध लोकांच्या रोजच्या सामान्य वागणुकीशीं असल्याने, प्रत्येक समाजाच्या विशिष्ट परिस्थित्यनुसार हे नियम बसविलेले असतात. उष्ण कटिबंधांतील प्रदेशांत रोज स्नान न करणें हा एक अधर्म समजला जाईल, पण शीत कटिबंधांतील लोकांना तसें वाटण्याचें कारण नाही; एकाच्या धर्मशास्त्रानुसार नदीच्या तीरीं संध्यावंदन, तर दुसऱ्याच्या शास्त्रानुसार मशिदींत कुराणपठन, किंवा चर्चमध्ये बायबलश्रवण, हें दैनिक आवश्यक धर्मकर्म ठरेल;

* “ गीतारहस्य, ” पृ. ३७५–७६.

एका धर्मांत मूर्तिपूजेला अग्रस्थान दिलेलें असेल, तर दुसऱ्यांत तें एक पाप गणलेलें असेल; एका काळच्या महिलांस पतीच्या मृत देहाबरोबर सती जाणें हें एक आवश्यक कर्तव्य व महत्पुण्य वाटत असेल, तर त्यांच्याच तीन पिढ्यानंतरच्या वंशजांस विधवांचा पुनर्विवाह हें एक अभिनंदनीय व पुरस्करणयि कृत्य वाटत असेल. एका पंथाच्या लोकांस जेवतांना स्वतःच्या जन्मदात्या पित्याचाहि स्पर्श झाल्याने सोंवळयाचा भंग झाल्याबद्दल खेद होत असेल, तर दुसऱ्या पंथांतील लोकांना अनेकांनी एकाच मेजावर बसून—नव्हे, एकाच ताटांत देखील—जेवणें चालत असेल अशा एक ना दोन, हजारों प्रकारांनी आपल्यास निरानिराळ्या देशांत व काळांत प्रचलित असलेल्या आचारधर्मांच्या नियमांत कमीअधिक फरक आढळून येईल. परंतु नीति म्हणजे केवळ हे देशकालपरिस्थित्यनुसार बदलणारे नियमच नसल्याने, त्यांतील या भेदाने सनातन व शाश्वत नीतितत्वांच्या पवित्र नित्यत्वाला कोणताहि बाध येऊं शकत नाही. हा बदलणारा अंश म्हणजे नीतीचा तपशील होय. परंतु, हा तपशील 'ध्रुवासारख्या अटळ' अशा कांही मध्यवर्ति स्थिर नीतितत्वांचे भोंवतालीच फिरत असतो, हें अवश्य ध्यानांत ठेवलें पाहिजे. मध्ये एक प्रकाशमान दीप ठेवून, त्याच्याभोंवतीं निरानिराळया रंगांचे कांच वर्तुळाकार बसविले असतां, प्रत्येक कांचाचे द्वारा निरानिराळ्या रंगांचा प्रकाश बाहेर पडतांना दिसेल; परंतु, ज्याप्रमाणे बाह्य आवरणांच्या या परस्परभेदामुळे त्या सर्वांना आंतून प्रकाशित करणाऱ्या दीपाच्या एकत्वाला बाधा येत नाही, त्याचप्रमाणे देशकालपरिस्थित्यनुसार परिवर्तन पावणाऱ्या कर्मकांडाच्या नियमांतील भेद पुढे करून, त्या सर्वांना प्रकाशित करणाऱ्या सनातन नीतितत्वांच्या नित्यत्वाबद्दल शंका घेणें देखील रास्त होणार नाही.

## प्रकरण तिसरें.

# नीतिपर आणि नीतिविषयक.

कला आणि नीति यांविषयींच्या सामान्य कल्पना काय आहेत, व या पुस्तकांत त्यांचा कोणत्या अर्थानें उपयोग केला आहे, यासंबंधींचें ठोकळ विवेचन आपण मागील दोन प्रकरणांत केलें. अशा रीतीनें हें आरंभींचें आवश्यक प्रास्ताविक आटोपून आपण आता आपल्या मुख्य विषयाकडे वळूं. कला नीतिअनीतीविषयीं बेपर्वा राहून देखील आपलें उच्चत्व कायम ठेवूं शकेल काय ? तसें नसल्यास, कला आणि नीति यांचा संबंध नक्की कोठे येतो ? प्रचलित नीतिनियमांविरुद्ध कला जाऊं शकते किंवा नाही ? जाऊं शकत असल्यास, कोठपर्यंत जाऊं शकते ? कलाकारानें स्वतःचा हेतु शुद्ध ठेविल्यावर परिणामांकडे लक्ष देणें आवश्यक आहे किंवा काय ? अगर, एखाद्या कलाकृतीपासून कांही प्रेक्षकांच्या मनांत अनीतिकारक विचार उत्पन्न होत असल्यास त्याची जबाबदारी सर्वस्वी त्या प्रेक्षकांवरच टाकतां येईल काय ? कलाकारानें जगतांतील अनीतिमान् व्यक्तींचें आणि प्रसंगांचें चित्र रेखाटावें किंवा नाही ? कलेंत दुःखदिग्दर्शन कितपत् येऊं द्यावें ? इत्यादि अनेक प्रश्नांचा साधकबाधकदृष्टींनीं आपल्यास आता विचार करावयाचा आहे.

वर दिलेल्या या लांबलचक प्रश्नावलींपैकीं पहिला प्रश्न जसा अनुक्रमानें तसाच महत्वानें देखील सहज पहिला येऊं शकेल. कारण, जोंपर्यंत कला व नीति यांचा आवश्यक संबंध आहे असें अस्तिपक्षी

प्रमेय प्रस्थापित करून, तें नाकारणाऱ्या विरुद्धपक्षीयांच्या मुद्यांचें साधार खंडन आपण करीत नाही, तोंपर्यंत त्यांचा संबंध नक्की कसा व कोठे येतो हें विचारणें विशेष फायद्याचें नाही. आणि ज्याप्रमाणे एखाद्या दोऱ्यास पडलेला मुख्य गुंता एकदा नीटपणे सुटला म्हणजे बारिकसारिक गांठी तेव्हांच सुटूं लागतात, त्याप्रमाणेंच या मुख्य प्रश्नाचा एकदा आपण समाधानकारक रीतीने निकाल लावला, म्हणजे तदनुरोधाने उरलेल्या प्रश्नांचीं उत्तरें शोधून काढणें आपल्यास सोपें जाईल. आता, याविषयी आमचें म्हणणें काय आहे तें आम्हीं या पुस्तकांत इतरत्र सांगितलेंच आहे. अंतिम कला आणि नीति हीं एकच आहेत असें म्हटलें तरी त्यांच्या अपूर्णावस्थेंतल्या रूपांचा निकट संबंध उघड होतो; आणि कला ही मानवी जीवनाचें एक अंग किंवा अंतिम ध्येय साध्य करण्याचें एक साधन आहे असें मानिलें तरी तिने नीतीच्या बंधनांत असण्याची आवश्यकता सहजच सिद्ध होते. वास्तव कला व नीति यांचा हा आवश्यक संबंध नाकारूं पाहणाऱ्यांचें म्हणणें तरी काय आहे हें आपण येथे पाहिल्यास बरें होईल; म्हणजे त्यांच्या विधानांच्या खंडनाच्या मार्गाने देखील आपलें प्रमेय प्रस्थापित होऊन त्याला चांगली बळकटी येईल.

आता यासंबंधांत या लोकांकडून एक असा मुद्दा नेहमी पुढे केला जातो कीं, कला व नीति यांचा आवश्यक संबंध नाही याचा अर्थ कला व अनीति यांचा संबंध आहे असा नसून कला ही नीतिअनीतीच्या " पलीकडे " वावरत असते असा आहे. आपल्या " प्रतिभासाधन " या पुस्तकांत प्रो. फडके लिहितात: " नीति–अनीतीचा प्रश्न कलाविलासाच्या बाबतींत आगंतुक आहे......नीति–अनीतीच्या प्रांतांत तो ( कलाकार ) वावरतच नसतो. त्याचा प्रदेश नीति–अनीतीच्या पलीकडचा आहे लेखक कलेचा उपासक आहे. शंकराचार्यांचा चोपदार नाही

नीति किंवा अनीति कोणाचाच पक्ष न घेतां सत्यप्रदर्शन करण्याची कलेची खटपट असते......गंगाजळ घरोघरीं पोंचविणाऱ्या पंड्या-सारखा बोधामृताचे लहान मोठे घडे भरून लोकांच्या घरीं पोंचते करण्याचा कलाचतुरांचा धंदाच नव्हे......कलावंतानें निर्माण केलेल्या कृतींत सत्य व सौंदर्य ओतप्रोत भरलेलें दिसतांच वास्तविक नीतिअनीतीच्या पलीकडची अशी एक आनंदमय शांति आपल्या मनांत उत्पन्न झाली पाहिजे, व अफाट सागरांत शिरल्यावर किना-ऱ्यावरच्या दगडांची मोजदाद राहूं नये तद्वत् त्या क्षणीं नीति-अनीतीची गणना मनांतच येतां कामा नये......सौंदर्यांत वस्तुतः नीति—अनीति कांहींच नाहीं. "* असेंच मत कविवर्य तांबे यांनींहि व्यक्त केलें आहे. कलानिर्मितीच्या वेळची कलावंताची स्थिति वर्णन करतांना ते म्हणतात : "त्यावेळीं साऱ्या सांसारिक काळज्या, विवंचना नष्ट होतात. तेथे सत्यासत्य, नीत्यनीतीच्या झगड्याला वाव कोठून मिळणार !..... आणि रसिक देखील तशी अपेक्षा करीत नसतो. तो आनंदासाठीं तिचा आश्रय करीत असतो, रस लुटत असतो. त्यावेळी सत्यासत्य नीत्यनीतींची कोडीं तो तिच्या कृतीपासुन सोडवूं लागला तर रसास्वाद नाहींसा होईल......नीति-अनीतीच्या भानगडींत न पडतां आपल्या विलासांत स्वैरपणें आणि निष्कामपणें गुंग असावें असा कलेचा स्वभाव आहे......" § प्रो. फडके यांनी नुसता नीतिअनीतीचाच संबंध झुगारून सत्याचा संबंध कायम ठेवला; परंतु रा. तांबे यांच्या अधीर मनाला तर स्वैर रसास्वादांत कमतरता येईल या भीतीने सत्याचा देखील संसर्ग नकोसा झाला आहे !

* "प्रतिभासाधन", प्रकरण आठवें.

§ "कला आणि नीति," पृष्ठ १५–१७.

कला आणि नीति यांचा संबंध नाकारूं पाहणाऱ्या आक्षेपकांच्या या असल्या विधानांचा लक्षपूर्वक विचार केला तर आपल्यास असें आढळून येईल कीं, मागे सांगितल्याप्रमाणे नीतीच्या विपर्यस्त कल्पनेचा दोष तर यांचे पदरीं येतोच, परंतु त्याशिवाय हे दोन फार महत्वाच्या चुका करीत असतात. आणि या चुकांमुळेच यांच्या विधानांत सत्याभास उत्पन्न होऊन वरवर पाहणाऱ्या सामान्य वाचकाला यांचें म्हणणें खरें असावें असें वाटूं लागतें. यांची पहिली चूक अशी कीं, कला व नीति यांचा आवश्यक संबंध आहे या विधानाचा अर्थ, प्रत्येक कलाकृतींत नीतितत्वांचें नीरस प्रवचन असावें, किंवा तिने नीतिअनीतीचीं "कोडीं उलगडावीं" असा हे करीत असतात! वास्तविक पाहतां, उपर्निर्दिष्ट विधानाचा अर्थ प्रत्येक कलाकृति "नीतिपर" असावी इतकाच असतो. परंतु, नीतिपर आणि नीतीचा ( चो, चें ) या दोन सदृश विशेषणांमध्ये निष्कारण घोंटाळा करून हे आक्षेपक प्रत्येक कलाकृतींत एखाद्या नीतितत्वाचा स्पष्ट पुरस्कार असावा, किंवा तींत नीतिअनीतींविषयीं एखादा वादविवाद असून शेवटीं नीतीचें प्रयत्नपूर्वक प्रस्थापन असावें, असा अर्थ उगीचच आपल्या विरुद्धपक्षीयांच्या विधानांवर लादत असतात. परंतु, एखादें विवेचन "नीतीपर" असावें असें म्हटलें, तर याचा अर्थ तें "नीतींचेंच" असलें पाहिजे असा होईल काय? वरील विधान करणाऱ्यांचें म्हणणें खरोखर इतकेंच असतें कीं, विवेचनाचा विषय कोणताहि असो—सौंदर्यासंबंधीं असो, राजकीय असो, सामाजिक असो, वाटेल तो असो—विवेचनाचें एकंदर स्वरूप व धोरण नीतीला अनुसरून असावें. त्यांत नीतिअनीतीविषयी एकाहि स्पष्ट उल्लेख नसला, तरी तें ऐकून शेवटीं श्रोत्यांचे मनावर अनिष्ट परिणाम घडून येणार नाहीं अशाच रीतीने तें करण्यांत आलें

पाहिजे. त्याचप्रमाणे, प्रत्येक वर्णन "नीतिपर" असावें असें म्हट-ल्यानें तें नीतीचें—नीतितत्वांचेंच— असावें असें होत नाही. कांही लोकांना असें वाटत असतें कीं, कला व नीति यांचा आवश्यक संबंध आहे असें प्रतिपादन करणारे लेखक सामान्यतः इतके सोवळे असतात कीं, त्यांच्या मतें कोणत्याहि कलाकृतींत जगांतील अनीतिमान व्यक्तींचें, दुःखाचें, क्रूरतेचें, स्त्रीसौंदर्याचें किंवा अन्य शृंगाराचें वगैरे कोणतेंहि वर्णन अगर चित्र न येतां केवळ शुष्क व नीरस नीतितत्वांचेंच दिग्दर्शन असावें. व या समजुतीमुळेच कला व नीति यांच्या आवश्यक संबंधाला मान्यता देण्यास त्यांना भीति वाटते. परंतु, खरोखर पाहतां "नीतिपर" व "नीतिविषयक" या दोन विशेषणांतील घोटाळ्यामुळे उत्पन्न झालेल्या चुकीच्या विचारसरणीचाच हा एक परिणाम आहे. कारण, त्या लेखकांचें म्हणणें मुख्यतः इतकेंच असतें कीं, तुम्ही वाटेल त्या विषयाचें व प्रसंगाचें चित्र काढा किंवा वर्णन करा, परंतु तें सर्व अशा रीतीनें करा कीं, त्यायोगें तें करतांना तुमच्या आणि तें ऐकतांना श्रोत्यांच्या (पाहतांना प्रेक्षकांच्या अगर वाचतांना वाचकांच्या) मनांत कोणतीहि अनीतिकारक प्रवृत्ति उत्पन्न न होतां, शुद्ध व सात्विक आनंदाचाच अनुभव यावा. हें सर्व एका वाक्यांत उत्तम तऱ्हेनें सांगावयाचें झाल्यास असें म्हणतां येईल कीं, कला व नीति यांच्या आवश्यक संबंधाचें प्रमेय पुढें मांडणारे लेखक मुख्यत्वेंकरून कलानिर्मितीच्या रीतीचें अगर प्रकाराचेंच नियमन करूं इच्छितात; तिच्या विषयाचें नव्हे. परंतु, नेमकी हीच गोष्ट त्यांचे आक्षेपक विस-रतात, आणि कला व नीति यांचा संबंध मान्य केला तर आपल्या विषयस्वातंत्र्यावर गदा येईल आणि ललितकलांतला आनंदानुभव अशक्य होईल, या खोट्या आशंकेने ग्रस्त होऊन ते कांही तरी उद्गार काढूं लागतात.

ही महत्वाची गोष्ट अधिक सुलभतेने ध्यानांत यावी म्हणून आपण येथे दोन तीन तत्सदृश उदाहरणें घेऊन ती स्पष्ट करूं. सामान्य व्यवहारांत आपण एखाद्या पदार्थाला ' तिखट ' असें विशेषण लावतों; पण म्हणून तो पदार्थ निवळ तिखटाचाच आहे असा याचा अर्थ होतो काय? भाजी चवेने तिखट किंवा खारट असली तरी ती निवळ तिखटाचीच किंवा मिठाचीच असते काय? उलट, कशाची असें विचारल्यास आपण बटाट्याची, कांद्याची, वांग्याची, किंवा असेंच कांही उत्तर देऊं हें उघड आहे. किंवा, एखाद्या पोळीस गोड पोळी असें म्हटल्याने ती निवळ गुळाचीच असून आट्याची नसूं शकते काय? हीच गोष्ट इतरत्रहि लागूं आहे. एखादें चित्र गोल असलें ह्मणून तें गोल्याचें—गोलपणाचेंच—चित्र असतें काय? उलट, तें गोल चित्र घोड्याचें, मनुष्याचें, घराचें-वाटेल त्याचें- असूं शकेल. या सर्व उदाहरणांवरून वाचकांच्या हें स्पष्टपणें ध्यानांत येईल कीं, विषय व गुण हे भिन्न असून यांत घोंटाळा करणें योग्य नव्हे. एखाद्या पदार्थाचा गुण खारट, तिखट, गोड, काळा, गोल इत्यादि शब्दांनी व्यक्त होत असला, तरी त्या पदार्थांतला मुख्य विषय—त्यांतील मूल द्रव्य—या गुणांहून अगदी स्वतंत्र असूं शकेल—नव्हे, बहुतेक प्रसंगीं तो तसा असतोच. प्रत्येक लेखन नीतिपर असावें याचा अर्थ ' तें नीतितत्वांचेंच विवेचन असावें ' असें ह्मणणें, हें ' एखादी स्पष्ट व्याख्या द्या ' हें विधान करणाऱ्याच्या मनांत ' स्पष्टपणाचीच एक व्याख्या द्या—स्पष्टपणा ह्मणजे काय हेंच सांगा ' असें ध्वनित करण्याचा हेतु आहे, असें ह्मणण्यासारखेंच होय. स्पष्टपणा हा व्याख्येचा गुण होईल, पण ह्मणून तिचा विषय स्पष्टपणाच असला पाहिजे असें नसून, तो घोडा, पुस्तक, पर्वत—या जगांतील काय वाटेल ती वस्तु अगर गोष्ट असेल; फार काय, तो विषय म्हणजे खास अस्पष्टपणा देखील असेल. अस्पष्टपणाची स्पष्ट व्याख्या देणें अगदींच अशक्य आहे काय? किंवा, कुरूपतेची सुंदर व्याख्या हें वदतोव्याघाताचेंच एक उदाहरण आहे काय?

विषय व गुण यांचा घोंटाळा केल्याने उत्पन्न झालेल्या चुकीच्या विचारसरणीचें एक चांगलें प्रत्यक्ष उदाहरण आपल्यास पाश्चिमात्य केवल-सुखवादी तत्वज्ञानाच्या इतिहासांत सांपडतें. सुखी ( किंवा सुखदायक ) आणि सुखाची ( किंवा सुखविषयक ) या विशेषणांतील अत्यंत महत्वाचा भेद लक्षांत न घेतां, हे केवलसुखवादी असें प्रतिपादन करूं लागले कीं, प्रत्येक मनुष्य मग तो पाप्यांतला पापी असो अगर अत्यंत श्रेष्ठ महात्मा असो—आपलीं सर्व कृत्यें केवळ स्वतःला अधिकांत अधिक सुख प्राप्त करून घेण्याच्या इच्छेने प्रेरित होऊनच करीत असतो. स्वातंत्र्या-प्रीत्यर्थ अगर धर्मप्रीत्यर्थ स्वतःच्या जीविताचा होम करण्यास तयार झालेला महात्मा कोणत्या इच्छेने प्रेरित होऊनच असल्या अतुल स्वार्थ-त्यागास तयार होतो ? या प्रश्नाचें उत्तर ‘ ज्या इच्छेने प्रेरित होऊन एखादा चोर चोरी करीतो त्याच ’, असें ते देत असत ! आणि कारण काय, तर चोराला चोरींत सुख वाटतें म्हणून तो चोरी करतो, आणि त्या महात्म्याला आत्मयज्ञाने स्वतःस सुख प्राप्त होईल असें वाटतें म्हणून तो तसें करतो ! जणूं काय एकाला काळया रंगाचा कोट आवडतो, आणि दुसऱ्याला जांभळया रंगाचा आवडतो अशांतलाच हा प्रकार आहे ! परंतु, यांच्या विचारसरणींतली मुख्य चूक हीच होती कीं, कोणतेंहि कृत्य करण्यास प्रवृत्त होण्यापूर्वी, त्याची कल्पना व तें करण्याची इच्छा ‘ सुखी ’ असली तरच कोणीहि मनुष्य तें करील हें खरे असलें, तरी म्हणून ती इच्छा ‘ सुखाचीच ’ असली पाहिजे असें जें अनुमान हे लोक काढीत होते तें बरोबर नव्हतें. भावी आत्मयज्ञाची कल्पना त्या महात्म्याला थोडी तरी सुखदायक भासते यांत शंकाच नाहि; पण म्हणून ती सुखाचीच असते असें नसून उलट ती कैदेची, छळाची, मृत्यूची, किंवा अन्य तऱ्हेने होणाऱ्या क्लेशाची असते. एका शब्दांत सांगावयाचें झाल्यास ती सुखी कल्पना दुःखाची असते.

दोन परस्परसदृश दिसणाऱ्या विशेषणांतील भेद ध्यानांत न घेतल्यामुळे कसा दुष्परिणाम घडून येतो, याचें इतकें विस्तारपूर्वक व सोदाहरण विवेचन करण्याचें कारण असें कीं, हा असलाच घोंटाळा कला आणि नीति यांच्यामधील आवश्यक संबंधावर वारंवार येणाऱ्या आक्षेपांच्या बुडाशीं मुख्यत्वेंकरून असतो असें आढळून येतें; आणि म्हणूनच, यासंबंधीचा गैरसमज एकदा दूर झाला म्हणजे पुष्कळसे आक्षेपक प्रस्तुत वादाकडे पाहाण्याची आपली दृष्टि बदलतील असा भरंवसा वाटतो. उपर्निर्दिष्ट उदाहरणांवरून नीतिपर आणि नीतिविषयक यांतील अत्यंत महत्वाचा भेद वाचकांच्या ध्यानांत आलाच असेल. ज्याप्रमाणे, "सर्व व्याख्या स्पष्ट असाव्या" असें म्हटल्यानें 'सर्व व्याख्या स्पष्टपणाच्याच असाव्या' असा अर्थ अभिप्रेत होत नाही, किंवा एखादें वर्णन सुंदर आहे असें म्हटल्यानें त्याचा विषय मनुष्य, पर्वत, नदी इत्यादि कांही एक नसून, तें सौंदर्याचेंच वर्णन आहे असें होत नाही, त्याप्रमाणेच सर्व कलाकृति नीतिपर असाव्या असें म्हटल्याने त्यांचा मुख्य विषय नीतितत्वें हाच असावा असें होत नाही. त्यांचा विषय कांहीहि असो; त्यांचा गुण अनीतिपरता हा नसून नीतिपरता हा असला पाहिजे. एखादा कुशल लेखक अनीतिमान पुरुषाचें अगर प्रसंगाचें देखील नीतिपर असें वर्णन करेल; आणि, त्याचेंच एखादा श्रेष्ठ चित्रकार असें उच्च दर्जाचें चित्र काढेल कीं, तेणेंकरून प्रेक्षकांच्या मनांत त्या विशिष्ट अनीतिबद्दल यत्किंचितहि आवड उत्पन्न न होतां तिरस्कारच उत्पन्न होईल. या सर्व गोष्टींवरून, कला व नीति यांचा आवश्यक संबंध प्रतिपादन करणारे वादी कलेंतून सौंदर्याचें, सुखदुःखामिश्रित वास्तव जगाच्या सत्य वर्णनाचें, अगर शृंगाररसाचें समूळ उच्चाटन करून तिच्यांत कोरडा नीतिअनीतीचा वादविवाद भरूं इच्छितात, हा आरोप किती खोटा आहे हें स्पष्टपणे दिसून येईल.

आणि या विवेचनावरूनच, कालिदास, शेक्सपिअर, मिल्टन्, इत्यादि जगप्रसिद्ध कलावंतांच्या कृतींतील शृंगारिक अगर अनीतिमान प्रसंगांच्या वर्णनांकडे बोट दाखवून, कला आणि नीति यांमधील निकट संबंध नाकारणाऱ्यांच्या प्रयत्नांतला फोलपणाहि स्पष्टपणे दिसून येईल. कालिदास, शेक्सपिअर, यांसारखे अत्यंत श्रेष्ठ लेखक घेतले तरी त्यांच्या कृतींत अनीतिपर व म्हणून अनिष्ट अशीं स्थळें मुळींच नाहीत असें आमचें म्हणणें नाहीं; आणि तेवढ्यापुरतें त्यांना कमी दर्जाचे कलाकार लेखण्यासहि आमची तयारी आहे. परंतु अशीं कांही स्थळें वगळलीं असतां, त्यांच्या लेखनांत आढळून येणाऱ्या इतर शृंगारिक अगर अनीतिमान व्यक्तींचीं व प्रसंगांचीं वर्णनें कला व नीति यांच्या येथे सांगितलेल्या आवश्यक संबंधाला विरोध करीत नाहीत. कारण, एखादें वर्णन शृंगारिक असलें तरी जोंपर्यंत तें वाचून वाचकांच्या मनांत अनीतीची अनिष्ट भावना उद्भवत नाहीं, तोंपावेतो त्या वर्णनास हरकत नाहीं. परंतु, कालिदासानें कांही शृंगारिक वर्णनें केलीं असलीं, किंवा दुसऱ्या एखाद्या श्रेष्ठ कवीनें खुनाचें सुंदर वर्णन लिहिलें असलें, म्हणून स्त्रीपुरुषसंबंधाचीं, बलात्काराचीं व व्यभिचाराचीं घाणेरडीं व अश्लील चित्रें रेखाटणाऱ्या कांही आधुनिक लेखकांचा व चित्रकारांचा हीनपणा कसा झांकला जाईल ? *

* या संबंधांत प्रो मा. दा. आळतेकर यांचे पुढील उद्गार अवश्य लक्षांत घ्यावे : " समाजांतील दूषित स्थळें उघड करणें व तीं दूषित कां आहेत हें स्पष्टपणें सांगणें ही गोष्ट निराळी व त्या दूषित स्थळांचें आविष्करण करतांना मिटक्या मारावयास लागून त्यांतच समरसता पावणें ही गोष्ट निराळी. पहिली ग्राह्य आहे, दुसरी दूषणीय आहे. बर्नार्ड शॉ सारख्यांनीं पहिली गोष्ट केली आहे; त्याचे विचार मराठींत आणण्याच्या

असो. या सर्व वादाचा आता समारोप करून आपण दुसऱ्या विषयाकडे वळूं. वाचकांना हें वर स्पष्टपणे दाखविलेंच आहे कीं, नीति व कला यांचा आवश्यक संबंध आहे याचा अर्थ कला नीतिपर असावी इतकाच असून, ती केवळ नीतिविषयकच असावी असा होत नाही. तिचा विषय वाटेल तो असो, तिच्या अंगीं नीतिपरता हा गुण असणें आवश्यक आहे. नीतीशीं अशा प्रकारचा संबंध ठेवल्याने, कलेला सौंदर्यावर बहिष्कार टाकावयाला नको, शृंगाराचा विटाळ मानावयाला नको, जगांतील दुःखांकडे दुर्लक्ष करावयाला नको, किंवा संसारत्यागाला व अंगास राख फांसावयास लावून सर्व वैषयिक गोष्टींवर लाथ मारावयास सांगणाऱ्या संन्यासवृत्तीला कवटाळायला नको. तिने आपलें सारें अस्तित्व नीतितत्त्वांचा स्पष्ट व हेतुपुरःसर पुरस्कार करण्यांत, वादविवादपूर्वक अनीतीचा उच्छेद करण्यांत, किंवा सत्यासत्याची व नीति-अनीतीची कठीण कोडीं उलगडण्यांतच खर्ची घालावें, असा आमचा आग्रह नाही. अगर नीतीशीं संबंध कायम ठेवावयाचा असेल तर श्री शारदेने प्रमत्त मयूरपिच्छांनी सुशोभित केलेल्या सुंदर सिंहासनावरील आपलें आसन सोडून, एखाद्या ओबडधोबड व्यास-पिटावर बसून पुराण सांगणाऱ्याची भूमिका धारण करावी असेंहि

फंदांत पडलेल्या कांही जणांनी दुसरी गोष्ट केली आहे......" ('आधुनिक वाङ्मयांतील विचारप्रवाह '–'पारिजात,' फेब्रुवारी १९३८; "पानें व फुलें" भाग पहिला, (१९३८) पृ. १२८), श्री. द. के. केळकर ' वाङ्मयांतील नीतिअनीति ' या लेखांत लिहितात: " समग्र कृतीचा साकल्यानें मनावर उमटणारा ठसा नीतिकल्पनेशीं विसंगत नसला म्हणजे अनीतिमानांचें चारित्र्य वर्णिलें तरी नीति- अनीतींचा खरा प्रश्न उपस्थित होत नाहीं. " ("केसरी", ता. १८ सप्टेंबर १९३४. शिवाय, " काव्यालोचन " (१९३१) पृ. २०१-२०३ पहा.

आमचें म्हणणें नाही. आणि म्हणूनच नीतिपर आणि नीतिविषयक यांतील हा अत्यंत महत्त्वाचा भेद ध्यानांत ठेविला असता तर, कला व नीति यांचा " काडीचाही " संबंध नाही असें प्रतिपादण्याच्या भरांत, आपल्या विरुद्धपक्षीयांचे ठायीं, कलेचें " चंचल नृत्य, अपार शृंगार, सारें नाहींसें करून, तिचा वीणा हिसकून घेऊन, तिच्या हातीं एकतारी आणि चिपळया देऊन तिला जोगीण बनवावें, अशी कठोर वृत्ति " आहे, किंवा त्यांच्या मताने संगीतकलेने फक्त " ' धरी रे ध्यानी—जग अळवावरचें पाणी,' किंवा ' एक तुतारी द्या मज आणुनि—फुंकिन ती मी स्वप्राणांनीं ', किंवा ' झपूर्झा गडे झपूर्झा ', अशीं धर्माचीं, सामाजिक नीतीचीं किंवा तत्वज्ञानाचीं." पदें गावीं आणि या शिवाय इतर सर्वांचा विटाळ मानावा, असें श्री. तांबे यांनी ध्वनित केलें नसतें. कलेला नीतिपर असावयास सांगणें म्हणजे " तिचा सारा शृंगारसाज हिसवून तिच्या बांगड्या वाढवून, काजळ-कुंकू पुसून केशकलाप काढून तिला बांड नेसावयास देऊन गंगा-भागीरथी करून " " तिच्या हातांत स्मरणी " देणें व " कपाळाला गोपी-चंदनाचा टिळा फांसावयाचा " आग्रह धरणें नव्हे, हें आमचे आक्षेपक आता तरी नीट ध्यानांत घेतील काय ! आणि त्याचप्रमाणे, कला व नीति यांचा वर सांगितलेल्या रीतीने आवश्यक संबंध आहे असें प्रतिपादन करणारे लेखक " एखाद्या कादंबरीचें किंवा नाटकाचें मोल ठरवितांना यांत कोणत्या तत्वाचें हेतुपुर:सर प्रतिपादन साधलें आहे असा प्रश्न ज्यांना आधीं सुचतो " अशा " हिरेमाणेक चावून पहाणाऱ्या मर्कटां " पैकी नाहींत, आणि त्यांचें मत प्रत्येक कादंबरी-कारानें वाचकांस " नीतीचे किंवा पांडित्याचे डोस " पाजावे, किंवा " तत्वाची चर्चा किंवा नीतीचा उपदेश " करावा, किंवा वाचकांचे

भोंवती "तत्वसिद्धीची कटकट" करावी, किंवा "शंकराचार्यांचा चोपदार" होऊन "कोणत्या तरी उच्च बोधाचा स्पष्ट पुरस्कार" करावा, अगर "गंगाजळ घरोघरीं पोंचविणाऱ्या पंड्यासारखा बोधामृताचे लहानमोठे घडे भरून लोकांच्या घरीं पोचते करण्याचा कलाचतुरांचा धंदा" आहे, अशा कोणत्याच प्रकारें असणें आवश्यक नाहीं, या गोष्टीकडे देखील त्यांनी नीट लक्ष द्यावयास नको काय ?* हीं सर्व कामें करण्यास नीतिशास्त्र स्वतः एका पायावर तयार असून, कला नीतिपर असावी असा आग्रह धरण्यांत आपलें नीतितत्वांच्या वादविवादाचें नीरस व "कटकटीचें" कर्तव्य जबरदस्तीने कलेवर लादण्याचा नीतीचा मुळीच हेतु नाहीं.

परंतु येथे हें अवश्य लक्षांत घेतलें पाहिजे कीं, बोधवादाच्या अगदी पलीकडच्या टोंकाला अनुलक्षून केलेले हे आरोप जरी आमच्याविरुद्ध येत नसले, आणि म्हणूनच कलेने संन्यासदीक्षा घ्यावी आणि फक्त तात्विक चर्चाच करावी या एकांगी (व बव्हंशीं काल्पनिक ?) मताविरुद्ध प्रा. फडके व रा. तांबे यांनी काढलेल्या उपनिर्दिष्ट उद्गारांबद्दल जरी आम्ही त्यांच्याशीं सहमत असलों, तरी याचा अर्थ असा नव्हे कीं, म्हणून अगदी दुसऱ्या टोंकाला जाऊन याच लेखकांनी कलेच्या नीतिअनीतीविषयींच्या उदासीनतेबद्दल जे उद्गार काढले आहेत तेहि आम्हांस मान्य आहेत. कलेने नीतिविषयक असावें असा आग्रह नाहीं; परंतु वर अनेकवार सांगितल्याप्रमाणे तिने नीतिपर मात्र असलेंच पाहिजे. आणि इतक्यापुरतें

* या वाक्यांतील अवतरणचिन्हांकित शब्दसमूह प्रा. फडक्यांचे, व त्याच्या मागील दोन वाक्यांतले श्री. तांब्यांचे आहेत (जाड टाइप आमचा).

नीतीचें बंधन सर्व कलेने पाळणें अत्यंत आवश्यक आहे. कलेंतली नीति ही श्रेष्ठ कलाकृतींच्या मनोहर मंचकावर पहुडलेल्या सौंदर्य-सम्राज्ञीच्या राजप्रासादांत, मालकिणीचा निद्राभंग अगर इच्छा-मोड होऊं नये या बेताने भीत भीत वावरणारी एखादी हीन दीन सेविका नसून, आपल्या भक्ताने कोणतेंहि कार्य करीत असतांना असन्मार्गावर पदार्पण करूं नये म्हणून त्याच्याभोंवती सदैव गुप्त रीतीने वास करणाऱ्या एखाद्या देवतेप्रमाणे आहे. आणि, श्री शारदा देवी एखाद्या पुराणिकाच्या सौंदर्यहीन ओबडधोबड व्यास पीठावर बसली नसून, प्रमत्त मयूरपिच्छांच्या सुबक सिंहासनावर विराजमान झाली आहे हें जरी सत्य असलें, तरी तिचें तें सिंहासन म्हणजे केवळ मयूरपिच्छांची एक मऊमऊ पोकळ गादी नसून त्याच्या बाह्य सौंदर्याच्या कोमल आवरणाखाली नीतीचा भरीव व कठोर पदार्थच आधारभूत आहे, हें देखील प्रतिभासाध ( न ) कांनी कधीहि विसरून चालणार नाहीं.

अशा रीतीने, कलेंतून सौंदर्याचें समूळ उच्चाटण करून तिच्यांत एखाद्या नीतितत्वाचा स्पष्ट पुरस्कार करावा, किंवा तत्वचर्चा करावी, असा जरी आमचा आग्रह नसला, तरी तिचा मूळ आधार नैतिकच असावा, आणि तिचा एकंदर परिणाम म्हणून अस्पष्ट व अप्रत्यक्ष रीतीने कां होईना पण नीतीच ध्वनित व्हावी—थोड-क्यांत, ती नीतिपर तरी असलीच पाहिजे—याबद्दल मात्र आम्हांला मुळीच संशय नाही. * आणि हें साधावयांचें असेल तर नीति-

* या दृष्टीने प्रतिपादिलेला नीति व कला यांचा आवश्यक संबंध साहि-त्याचार्य न. चिं. केळकर यांनाहि मान्य आहे असें दिसतें. बडोद्याच्या (१९२१) साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदावरून ते म्हणाले: " ज्या अर्थी

अनीतीच्या महत्वाच्या भेदांकडे तिने लक्ष पुरविलेंच पाहिजे. यावरून "नीति-अनीतीचे प्रश्न कलाविलासाच्या बाबतींत आगंतुक आहेत", कलेच्या प्रांतांत "नीति-अनीतीचे भेद विशेष महत्त्वाचे मानतां येत नाहीं", किंवा "कला आणि नीति यांचा स्वभावतः कांहीं इतका संबंध नाहीं", असे अगदीं दुसऱ्या टोंकाप्रत पोंचून जे पूर्णपणे एकांगी

वाङ्मय हें मनुष्याच्या सद्भावनांना अलंकारिक स्वरूप देण्यानें निर्माण होतें, त्याअर्थी नीतिबोध हा वाङ्मयाचा अप्रत्यक्ष परिणाम होऊं शकेल. परंतु जें नीतिबोध करण्याच्या प्रत्यक्ष हेतूनें लिहिलें नाहीं तें वाङ्मयच नव्हे, असा जर आग्रह कोणी धरला तर अनवस्थाप्रसंग होईल असें वाटतें ".— "केळकर" पृ. ३३२-३३ (जाड टाइप आमचा) या संबंधांतच प्रा वा. म. जोशी म्हणतातः "काव्याकडे काव्यदृष्टीनेंच पहावें असें केळकर म्हणतात त्यावेळेस नैतिक अनौचित्याकडे दुर्लक्ष करावें असा त्यांचा भावार्थ नाहीं."—"श्री. केळकर व कांहीं साहित्यविषयक प्रश्न" ["केळकर" पृ. ११] खुद्द तात्यासाहेबानीहि नागपूरच्या मॉरिस कॉलेजांत ता २३-८-३४ रोजीं केलेल्या भाषणांत याला पोषक असेच पुढील उद्गार काढले: "वाङ्मयांत जरी कलेला प्राधान्य असलें तरी त्यांत सदभिरुचि नसावी असें जर कोणी म्हणेल, तर तें चुकीचें होईल...... जुनें काय, नवें काय, सदभिरुचीला सोडून नसलें पाहिजे. सदभिरुचीचे कोंदणांत जर हा पैलू पाडलेला (प्रतिभेचा) हिरा बसविला, तरच त्याची जिकडे तिकडे वाहवा होईल. नव्या लोकांना माझें इतकेंच सांगणें आहे कीं, तुम्ही नववाङ्मयानिर्मितीची भीति मनांत बाळगूं नका. परंतु, ज्ञान प्रकट करतांना ज्या मर्यादा पाळावयास पाहिजेत, त्या पाळण्यास चुकूं नका......" ("महाराष्ट्र", ता. २६-८-३४; आणि 'प्रतिभा," पाक्षिक वर्ष ३ अंक १८)

उद्गार कांहीं लेखक काढतात, ते कसे रास्त नाहींत, हें कोणाच्याहि ध्यानांत येईल. तूं वाटेल त्या विषयावर निबंध लिही, पण तो सुंदर व स्पष्ट मात्र असला पाहिजे, या गुर्वाज्ञेचें पालन करूं इच्छिणाऱ्याने स्पष्टपणा व अस्पष्टपणा, किंवा सौंदर्य आणि कुरूपता, यांतील भेदांकडे दुर्लक्ष करून कसें चालेल? कलेला नीतिपर राहावयाचें असेल, तर नीति-अनीतीच्या भेदाकडे तिनें लक्ष दिलेंच पाहिजे हें उघड आहे.

प्रकरण चवथें.

# त्रिविध सौंदर्य व नीति-अनीति

मागील प्रकरणाच्या शेवटच्या वाक्यांतील ‘ असेल ’ या शब्दप्रयोगाकडे वाचकांनी कृपा करून नीट लक्ष द्यावें; कारण, याच गोष्टीच्या विचाराच्या अनुरोधानें आपण आता कला व नीति यांच्या संबंधाच्या वादाच्या दुसऱ्या एका दालनांत शिरणार आहोंत. कला व नीति यांचा आवश्यक संबंध आहे या विधानाचा अर्थ, कला नीतिविषयकच असावी असा नसून, तिनें नीतिपर असावें इतकाच आहे, हें आपण वर स्पष्टपणें पाहिलेंच आहे. परंतु, आश्चर्याची गोष्ट अशी कीं, इतकी साधी गोष्ट देखील कित्येक लेखकांना मान्य नाही असें दिसतें. हे लेखक एकीकडे आपल्या विरुद्ध-पक्षीयांवर ‘ कलेनें नीतिपरच नव्हे तर नीतिविषयकहि असलेंच पाहिजे ’ असें मत निष्कारण लादून त्यांच्या म्हणण्याचा सामान्य वाचकांसमोर विनाकारण बाऊ करीत असतात; आणि दुसरीकडे, स्वतः ‘ कलेनें नीतिविषयक तर नव्हेच परंतु नीतिपर देखील असण्याची आवश्यकता नाहीं, ’ असें अगदी दुसऱ्या टोंकाचें एकांगी विधान करीत असतात. परतु येथें असा प्रश्न उद्भवतो कीं, कला नीतिपर देखील असणें आवश्यक नाहीं आणि नीतिअनीतीचे सारे भेद तिच्या ठायीं लीन पावून, वाघ व शेळी यांना एकत्र जेवावयास लावणाऱ्या सर्कशींतल्या माणसाप्रमाणे या दोन परस्परविरुद्ध गोष्टींना

कला अगदी खालच्या (तुच्छ?) भावनेने वागविते, असे खात्री-लायक उद्गार हे लेखक काढतात तरी कोणत्या आधारावर? याच प्रश्नाचा विचार करीत असतां आपल्यास या लेखकांचे हातून जी दुसरी एक महत्वाची चूक होत असते असें मागे म्हटलें आहे तीहि सांपडेल.

परंतु, या संबंधांत या लेखकाचे म्हणणें काय आहे व कोणत्या मुद्यांचे जोरावर ते त्याला सिद्ध करण्याचा प्रयत्न करतात, हें पाहण्या-पूर्वी, वाचकांनी सौंदर्याच्या तीन प्रकारांचें पुढील विवेचन नीट लक्षांत घेतल्यास चांगलें होणार असल्याने, प्रथम या प्रकरणांत तें विवेचन सविस्तर देऊन नंतर पुढील प्रकरणांत या लेखकांच्या विधानांचा परामर्श घेऊं. ग्राहकाच्या दृष्टीने पाहिलें असतां, आपल्यास सौंदर्याचे पुढील तीन प्रकारचे ठोकळ भेद पाडतां येतील; इंद्रियग्राह्य किंवा ऐंद्रियिक सौंदर्य, अंतःकरणग्राह्य किंवा मानसिक सौंदर्य, आणि तिसरें, आध्यात्मिक किंवा अंतिम सौंदर्य. इंद्रियग्राह्य सौंदर्याचें उदाहरण पाहिजे असल्यास, शरदृतूंतील एखाद्या रम्य व निरभ्र पहांटेस अत्यंत आल्हाददायक अशा मऊ हिरवळीने आच्छादलेल्या एखाद्या उद्यानांत किंवा मोकळ्या जंगलांत फिरावयास जावें; अथवा, लहानमोठ्या खड-कांवरून अल्लड बालबालिकांप्रमाणे आनंदाने नाचतबागडत जाणाऱ्या एखाद्या लहानशा ओढ्याच्या शुभ्र जलबिंदूंच्या नयनमनोहर संगीत-नृत्याचा आनंद लुटावा; किंवा, शांत आणि निस्तब्ध पहांटेच्या वेळेस एखाद्या कुशल गायकाने भैरवी रागाचे घेतलेले चार आलाप ऐकून, कोणी नवीनच पाहुणा घरीं यावयाचा असला म्हणजे घरांतील लहान मोठीं सर्व मंडळी दाराशीं एकत्र होतात, त्याप्रमाणे शरीरांतील सर्व चैतन्यशक्ति जणूं श्रोत्रेंद्रियांत एकवटल्याचा अनुपमेय अनुभव घ्यावा;

मानसिक सौंदर्याचें उदाहरण हवें असल्यास विश्वांतील दृश्य जड संसाराचा सारा पसारा एकीकडे सारावा, आणि विचारसृष्टींत एक सहल करून यावी. पृथ्वीच्या ठायीं असलेल्या आकर्षणशक्तीचा एका यःकश्चित गोष्टीवरून शोध लावून त्या विचाराने प्रफुल्लित झालेल्या न्यूटनची गोष्ट घ्या; शाकुंतल नाटक लिहीत असतांना निरानिराळे सुंदर सुंदर विचार, उपमा व प्रसंग मनाला सहज सुचल्याने होणाऱ्या आनंदाचा अनुभव घेणाऱ्या कालिदासाकडे पहा; एकाएकी कांही अत्यंत सुंदर कल्पना सुचून तिला योग्य भाषेत व्यक्त करण्याच्या उद्योगांत गढलेल्या एखाद्या जातिवंत कवीकडे नजर टाका; किंवा, विरुद्ध पक्षाचीं विधानें खोडून काढीत असतांना कांही जोरदार व समर्पक मुद्याचा विचार मनांत येऊन तो लिहून काढणाऱ्या कुशल लेखकाकडे पहा. आणि त्या मानसिक सौंदर्याचा स्वतःच अनुभव घ्यावयाचा असेल, तर यांसारख्या एखाद्या अवस्थेंत स्वतः जाऊन बसावें, किंवा एखाद्या सुंदर व श्रेष्ठ पुस्तकाचें, काव्याचें, अगर व्याख्यानाचें श्रवणवाचन करून त्यांत जागोजाग विखुरलेल्या सुंदर कल्पना व विचार ध्यानांत येतांच कसा आनंद होतो हें पहावें. आता राहिलें आध्यात्मिक सौंदर्य. परंतु, याचा प्रत्यक्ष अनुभव घेणाऱ्याचे ठायीं देहाची विस्मृति पडलेली असते, आणि मन किंवा अंतःकरण पूर्णपणें विलीन झालेलें असतें. याचें शब्दानें वर्णन करावयाचें असल्यास, फक्त व्यतिरेकन्यायानें ‘ नेति नेति ’ इतकेंच म्हणतां येतें, असें त्या आनंदाचा अनुभव घेणारांनी लिहून ठेविलें आहे. समर्थांनी या स्थितीचें पुढीलप्रमाणे वर्णन केलें आहे : “ जेथें नेति नेति म्हणती श्रुती । तेथे न चले भाषाव्युत्पत्ती । परब्रह्म आदि अंतीं । अनिर्वाच्य ।। ” * यामुळे, या अत्युच्च आध्यात्मिक आनंदाविषयी निदान प्रस्तुत लेखक तरी कांही विस्तारपूर्वक लिहूं शकत नाही;

* श्रीमद्दासबोध, ७-१०-५०.

आणि सुदैवाने, त्याची या वादांत फारशी आवश्यकताहि नसल्याचें वाचकांस दिसून येईल.

आता, सौंदर्याच्या या तीन प्रकारांचा नीतिअनीतीशीं काय संबंध आहे हें पाहण्यापूर्वी या तीन प्रकारभेदांबद्दल एका गोष्टीचा खुलासा करणें आवश्यक आहे. वाचकांनी हें जरूर लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, सौंदर्याचे हे तीन प्रकार ठोकळमानाने केलेले असून, इंद्रियग्राह्य सौंदर्य केवळ इंद्रियांनीच ग्रहण केलें जातें, किंवा मानसिक सौंदर्यांत इंद्रियांचा अगदीच संबंध येत नाही असें नाही. वास्तविक पाहतां, मनाच्या गैरहजिरींत मानवी इंद्रियें कोणतेंहि सौंदर्यग्रहण करूं शकत नाहीत. कित्येक प्रसंगीं मन दुसरीकडे गुंतलें असतांना, इंद्रियें कांही ठराविक हालचाली करूं शकतात हें खरें आहे. परंतु, त्यापासून आनंददुःखादि भावनांची उत्पत्ति व्हावयाची असल्यास, मनाशिवाय तें व्हावयाचें नाही. मन एखाद्या विचारांत अगर गीतश्रवणांत पूर्णपणें गुंतलें असतांना, समोर असलेल्या एखाद्या सुंदर दृश्यावरून जरी डोळे फिरत असले, तरी मनाचें लक्ष तिकडे जाईपावेतो तें सुंदर आहे अशी सानंद जाणीव होणें अशक्य आहे. परंतु, असें असतांहि या प्रकाराला ऐंद्रियिक असें संबोधण्याचें कारण इतकेंच कीं, मानसिक सौंदर्यानुभवांत जसें मनाचें कार्य मुख्य असून इंद्रियांचें गौण असतें तसें यांत नाही. यांत इंद्रियांच्या अभावीं मन अगदीच पंगू होईल; आणि इंद्रियें विकृत स्थितींत असल्यास मनाला विकृत अनुभवाचेंच ग्रहण करावें लागेल. एखादा मनुष्य बहिरा असल्यास नादसौंदर्याचा आणि अंध असल्यास दृश्यसौंदर्याचा अनुभव, त्याचें मन कितीहि उत्तम स्थितींत असलें तरी, त्याला येणें शक्य नाही. सारांश, या प्रकारांत

मनाचें काम पुष्कळ अंशीं एखाद्या नोंद ठेवणाऱ्या कारकुनाप्रमाणे असून, इंद्रियांच्या तंत्रानें त्याला राहावें लागतें.

परंतु, मानवी मनाचें क्षेत्र केवळ बाह्य इंद्रियांनी आणलेल्या संवेदनाचें ग्रहण करणें इतकेंच नसून, विचारसृष्टींत आपला प्रभाव गाजविणें हें देखील आहे—किंबहुना, हेंच त्याचें मुख्य क्षेत्र होय यांत संशय नाहीं. कारण, यांतील पहिलें कार्य पश्वादिकांचीं मनें देखील करीत असून, मानवी मनाचें वैशिष्टय जर कांहीं असेल तर तें दुसऱ्यांतच आहे. विचार, कल्पना, भावना, हींच त्याचीं मुख्य आयुधें; आणि यांचा योग्य उपयोग करून आध्यात्मिक सौंदर्याप्रत पोंचण्याचा प्रयत्न करणें हेंच त्याचें कार्य. यासाठींच मनाचें खरें कर्तृत्व आपल्यास इंद्रियग्राह्य सौंदर्यांत फारसें दृष्टोत्पत्तीस न येतां, मानसिक सौंदर्यांतच तें दिसूं शकतें. आतां, या मानसिक सौंदर्यानुभवांत मनाला कित्येक प्रसंगीं इंद्रियांची मदत घ्यावी लागते हें खरें आहे. उदाहरणार्थ, कांहीं एक सुंदर विचार एखाद्या वाक्यांत अगर पुस्तकांत व्यक्त केला असेल, तर प्रथम त्या शब्दांचें डोळ्यांनी अगर कानांनी ग्रहण करून नंतरच त्यांतील विचारसौंदर्याचा आनंद लुटतां येईल; आणि तीच कल्पना एखाद्या कुशल चित्रकारानें सुंदर चित्राच्या द्वारें व्यक्त केली असेल, तर प्रथम आपल्यास त्या चित्रांतील ऐंद्रियिक सौंदर्याचें ग्रहण करून नंतर तद्द्वारा त्यांतील कल्पनेचा आनंद उपभोगितां येईल. या दोन उदाहरणांतील भेदाकडे वाचकांनी लक्ष द्यावें. पहिल्यांत मानसिक सौंदर्यग्रहणाला आवश्यक असें जें इंद्रियांचें कार्य होतें तें नीरस होतें; कारण त्या शब्दांत अगर वाक्यांत इंद्रियांना स्वतःला सुखकारक असें कांहीं फारसें नव्हतें. उलट, दुसऱ्या प्रकारांत ऐंद्रियिक सौंदर्याच्या द्वारेंच मानसिक सौंदर्य व्यक्त झालेलें आहे. याशिवाय,

त्याच चित्रांत जर एखादी कुकल्पना ध्वनित होत असेल, तर ऐंद्रियिक सौंदर्याचें अस्तित्व असतांहि तेथे मानसिक सौंदर्याचा अभाव दिसून येईल. परंतु, वर दिलेल्या उदाहरणांप्रमाणे मानसिक सौंदर्य नेहमीच इंद्रियांवर कमीअधिक प्रमाणांत अवलंबून असतें असें मात्र नव्हे; कारण एखादे प्रसंगीं चक्षुश्रोत्रादि सर्व इंद्रियांवरून मन उडवून, तें एखाद्या विषयाच्या विचारांतच पूर्ण-पणें गुंगवून तज्जन्य आनंद उत्तम रीतीने उपभोगितां येतो, हें प्रसिद्धच आहे.

या सर्व उदाहरणांवरून वाचकांना इंद्रियग्राह्य, अंतःकरणग्राह्य व आध्यात्मिक अशा या तीन प्रकारच्या सौंदर्यांतले भेद चांगले ध्यानांत येतील अशी आशा आहे; आणि कला व नीति यांचें या पुढील विवेचन सुलभ रीतीने समजण्यास तें आवश्यक असल्या-नेच त्यांचें वर इतक्या विस्ताराने वर्णन केलें आहे. आता या तीन प्रकारांचा नीतिअनीतीशीं काय संबंध आहे हें आपण पाहूं. यासंबंधी नीट विचार केला असतां आपल्यास प्रथमच असें आढळून येतें कीं, ऐंद्रियिक सौंदर्याचा नीतिअनीतीशीं फारसा संबंध पोंचत नाहीं, इंद्रियग्राह्य सौंदर्योपभोगांत मुख्य कार्यभाग जड इंद्रियें व त्यांचेकडून अनुभविली जाणारी बाह्य जड सृष्टि यांचाच असल्याने त्याचा नीति-अनीतीच्या नियमांशीं संबंध येऊं शकत नाहीं; कारण, या नियमांचें खरें क्षेत्र स्वतंत्र इच्छाशक्ति हेंच होय. इच्छाशक्ति व विचारशक्ति यांचा अभाव असतांहि नीतिअनीतीचे नियम लागू झाले पाहिजेत असें म्हटल्यास, पाऊस पडणें, नद्या वाहणें, फुलें उमलणें, विद्युत्पात होणें, भूकंप होणें, इत्यादि निसर्गलीला नैतिक आहेत किंवा अनैतिक आहेत असें विचारण्याची पाळी येईल. परंतु, नीतिशास्त्रवेत्त्यांनी

असा स्पष्ट सिद्धांत प्रतिपादन केला आहे कीं, जीं जीं कार्ये केवळ ठराविक अशा नैसर्गिक किंवा इतर नियमांप्रमाणे होत असून ज्यांच्याशीं इच्छाशक्तीचा यत्किंचितहि संबंध येत नाही, तीं सर्व कार्ये नीतिशास्त्राच्या कक्षेबाहेर समजलीं पाहिजेत.* आणि म्हणूनच कोणत्याहि कृत्याची नीतिमत्ता अगर अनीतिमत्ता त्याच्या कर्त्यांच्या हेतूकडे मुळींच लक्ष न देतां केवळ परिणामांकडे पाहूनच ठरविली जावी, या मतांचें आता नीतिशास्त्रांतून उच्चाटण झालें आहे.

आता ऐंद्रियिक सौंदर्यापासून प्राप्त होणाऱ्या आनंदाकडे आपण चिकित्सक नजरेने पाहिलें असतां, आपल्यास त्याचा उगम कांही ठराविक प्राकृतिक नियमांतच प्रामुख्याने असलेला आढळून येईल. आणि या आनंदाच्या उत्पत्तींत मनाचा कांही भाग असलाच तर तो किती गौण प्रकारचा आहे हें मागे सांगितलेंच आहे. ज्याप्रमाणे साखर साधारणत: गोड लागावयाचीच, त्याप्रमाणे सुस्वर गायन कानाला गोड लागावयाचें आणि सुंदर दृश्य पाहून डोळ्यांना आनंद व्हावयाचा हा निसर्गनियमच आहे; आणि जसें आजारपणामुळे शरीरांतील महत्वाच्या द्रव्यांत कांही फेरफार घडून आल्याने साखरेची चव विकृत लागते, त्याप्रमाणेच एखाद्या व्यक्तीच्या श्रोत्रकर्णादिकांत कांही जन्मजात किंवा नंतर उत्पन्न झालेला बिघाड असल्यास त्याला

*याच कारणामुळे जनावरें व लहान अर्भकें हीं नीतिशास्त्राच्या कक्षेत येत नाहीत. श्री. ह. ना. नेने लिहितात: "नैतिक बाबतींतही हीच गोष्ट दिसून येईल. लहान मुलांच्या आचरणाला नीतिअनीतीची कसोटी लावतां येत नाही. त्यांच्या ठिकाणीं दोहोंचाही अभाव असतो. कर्त्याच्या हेतूवरून कोणतेंहीं कृत्य नीतियुक्त अगर नीतिबाह्य ठरतें--" "शिक्षणकला व मानसशास्त्र,"(१९३२) पृ.१०१

या इंद्रियांच्या द्वारें, इतरांप्रमाणें योग्य सौंदर्यानुभव होणार नाही हें उघडच आहे. ऐंद्रियिक सौंदर्याच्या उपभोगांत मानसिक विचारशक्तीचा व इच्छाशक्तीचा संबंध नसून केवळ ठरीव देहधर्मानुसारच तो कसा घडून येतो, हें पाहावयाचें असल्यास वाचकांनी मनुष्याच्या रानटी अवस्थेकडे नजर टाकावी. मानवी मनाची विचारशक्ति ज्या वेळेस अप्रगल्भावस्थेंत होती, त्यावेळस देखील रानटी मनुष्यांना सुस्वर गायनापासून किंवा सुंदर दृश्यापासून कांही कमी आनंद होत असेल काय ? किंवा, गेल्या अगणित वर्षांत मनुष्याच्या बुद्धीची, विचारशक्तीची, सहानुभूतीची वगैरे जी अवर्णनीय वाढ झाली आहे, तिने या ऐंद्रियिक सौंदर्योपभोगांत कांही विशेष म्हणण्यासारखी भर टाकली आहे काय ? इंद्रियांना सुख देण्याचे नवे नवे प्रकार निघाले असतील; परंतु हा आनंद उपभोगण्याच्या त्यांच्या शक्तींत किंवा त्या आनंदाच्या तीव्रतेंत कांही वाढ झाली आहे काय ? विश्वाच्या बाल्यावस्थेंतील पशुतुल्य रानटी समाजाची गोष्ट सोडून, आज देखील त्याच अवस्थेचीं जीं उदाहरणें प्रत्येक घरांत लहान अर्भकांच्या रूपाने दिसतात, तिकडे लक्ष फिरविलें तरी केवळ इंद्रियग्राह्य सौंदर्यानुभवांत मग्न होण्यासाठी मानसिक वाढीची कांही आवश्यकता आहे असें वाटत नाही. लहान मूल रडत असतांना सुंदर गायन किंवा वादन केलें तर त्याचें लक्ष तिकडे वेधून तें रडतांना थांबतें ( त्याला आंतूनच कांही त्रास होत असल्यास अर्थातच गोष्ट वेगळी ) चारपांच वर्षांच्या मुलाला रंगीबेरंगी चित्रांबद्दल किती आवड असते बरें ? आणि शेवटीं या अर्भकांनाहि सोडून आपण जीवनशक्तीच्या अत्यंत अप्रगल्भ अवस्थेचें उदाहरण म्हणून पशुसृष्टीकडे वळलों तरी आपल्यास हीच गोष्ट दिसून येईल. सुस्वर गायन ऐकून सर्प देखील मुग्ध होत नाही काय ? किंवा, बांसरी वाजवून श्रीकृष्ण गायींना मोहून टाकीत असे हें कोणास माहीत नाही ?

आता हा ऐंद्रियिक सौंदर्याचा अनुभव नेहमी आपल्यास निर्भेळ स्थितींत आढळतो, आणि मानसिक व्यापारांचें यांत कधीच संमिश्रण होत नाहीं असे आमचें म्हणणें नाही. उलट, बहुतेक प्रसंगीं हे आनंद आपल्यास संमिश्रित स्वरूपांतच आढळून येत असून, त्यामुळेच यांच्या वास्तविक स्वरूपाबद्दल सामान्य वाचकांची दिशाभूल होत असते. परंतु, ज्याप्रमाणें रसायनशास्त्राच्या विद्यार्थ्याला संमिश्रित स्वरूपांत एकाच ठिकाणीं आढळून येणाऱ्या अनेक द्रव्यांचें पृथक्करण करून त्यांचा निरनिराळा अभ्यास करावा लागतो, त्याप्रमाणेच सौंदर्य-शास्त्राच्या विद्यार्थ्यास देखील करणें आवश्यक आहे. आणि असें केल्यानंतर आपल्यास हेंच आढळून येतें कीं, ऐंद्रियिक सौंदर्या-नुभवाचा वास्तविक नीतिअनीतीशीं कांहीं संबंध नसून, त्यामध्ये जरी कधी नीतीचा किंवा अनीतीचा वास येऊं लागला तरी त्याचा उगम त्या अनुभवांत संमिश्रित झालेल्या मनाच्या स्वतंत्र इच्छाशक्तींतच होय यांत संशय नाहीं. सुस्वर गायन ऐकून श्रोत्रेंद्रियांस आनंद होणें यांत वस्तुतः नीति किंवा अनीति कांहीच नाही परंतु, जर कोणी आपलें योग्य कर्तव्य टाळून सुस्वर गायनाच्या आनंदांत रममाण झाला, तर मात्र त्याचा तो आनंदानुभव अनीतीच्या सदरांत जाईल. पण, येथे इतकेंच ध्यानांत घ्यावयाचें कीं, खरोखर पहातां या अनीतीचा संबंध त्या गायनसौंदर्याशीं नाहीं. कारण, तें गायन गायनदृष्ट्या जरी सुंदर नसतें, किंवा त्या मनुष्यानें या गायनश्रवणाऐवजीं आपला वेळ, आवश्यक कर्तव्यपूर्तीकडे न लावतां, आणखी कशांत घालविला असता, तर त्याच्या कृतींतील अनीतींत कांहीं बदल झाला असता काय? यावरून हें उघड होईल कीं, त्या अनीतीचा संबंध त्या गायनसौंदर्याशीं नसून योग्य कर्तव्य टाळण्याच्या त्याच्या स्वतंत्र इच्छाशक्तीशींच आहे.

येथपर्यंत केलेल्या विवेचनावरून वाचकांस हें कळून आलेंच असेल कीं, इंद्रियग्राह्य सौंदर्यापासून मनाला होणारा आनंद आणि अंतःकरणग्राह्य सौंदर्यापासून होणारा आनंद हे एकच नसून भिन्न कोटींतले आहेत. परंतु सौंदर्याच्या उपर्निर्दिष्ट तीन प्रकारांत वारंवार घोंटाळा करण्याची कांहीं आधुनिक मराठी साहित्यसेवकांची पुढील प्रकरणांत वर्णिलेली प्रथा पाहिली, म्हणजे हा भेद अधिक स्पष्ट करण्यासाठीं येथे एका प्रश्नाचा विचार करणें आवश्यक वाटतें. तो असा कीं, नीतिअनीतीशीं कांहीं संबंध नसतांहि, या ऐंद्रियिक सौंदर्यानुभूतीपासून आपल्यास जो अलोट आनंद व—क्षणभर कां होईना—शांति प्राप्त होते, याचें कारण तरी काय ? या सौंदर्यानुभवांत असे कोणते गुणधर्म आहेत कीं, जेणेकरून भोक्त्याच्या मनाला असा शांतिमय आनंद प्राप्त होऊन, त्यांत तो अगदी तन्मय व्हावा आणि क्षणभर त्याला जगाचाहि विसर पडावा ? आतां खरें सांगावयाचें म्हणजे या प्रश्नांचें निश्चित उत्तर देणें फार कठीण आहे. कारण, साखर गोड कां लागावी आणि मीठ खारट कां लागावें, अशांतलेंच विश्वांतील वस्तूच्या अंतिम गुणधर्मांचीं कारणें विचारणारे हे प्रश्न आहेत. परंतु, ठोकळ मानानें आपल्यास या प्रश्नांचा विचार करणें अगदींच अशक्य नाहीं. या संबंधांत कांहीं जीवनशास्त्रज्ञांचें म्हणणें असें आहे कीं, ज्या इंद्रियाला जो पदार्थ सुंदर वाटतो, त्याच्या अनुभवापासून त्या इंद्रियास मजबुती येऊन स्वतःचें अस्तित्व उत्तम स्थितींत कायम टिकवण्यास मदत होत असते. हिरवळ पाहून आनंद होतो; पण तेंच लाल भडक प्रकाश पाहून त्रास होतो. याचें कारण ते असें सांगतात कीं, हिरव्या दृश्यानें व प्रकाशानें डोळ्यांच्या स्नायूंना बळकटी येते, आणि उलट लाल प्रकाश

त्यांना क्षीण करतो. मोकळ्या मैदानांत गेल्यावर जो आल्हाद होतो त्याचें कारण तेथे रक्ताभिसरणादि देहाच्या क्रिया उत्तम रीतीने चालतात हें होय; आणि लहान मुलांना साखर फार आवडते यांत त्यांचा कांही एक दोष नसून ती त्यांच्या शरीरवाढीस फार आवश्यक असते. हाच न्याय सर्वत्र लागू करून सुस्वर गायनाची व्याख्या 'ज्या गायनापासून उत्पन्न होणाऱ्या वायुलहरी कानांवर आदळल्या असतां तेथील मज्जातंतूंस व स्नायूंस बळकटी येते तें' अशी करितां येईल! आता ऐंद्रियिक सौंदर्याकडे पाहण्याची ही दृष्टि सर्वस्वी सत्य नसली, तरी तिच्यांत पुष्कळ तथ्य आहे यांत मात्र संशय नाही; आणि बिघडलेल्या मनःस्थितीच्या व अभिरुचीच्या नादीं न लागतां जर कोणी केवळ शुद्ध व नैसर्गिक प्रवृत्तींच्या अनुसार आपली राहणी ठेवील तर त्याचें जीवन पुष्कळ सुखांत जाईल हें खरें आहे.

परंतु, ऐंद्रियिक सौंदर्यानुभवापासून उत्पन्न होणाऱ्या आनंदाचें कारण केवळ वर सांगितलेलेंच नसून त्यांत आणखीहि कांही गोष्टींचा समावेश करतां येईल असें वाटतें. पहिली गोष्ट म्हणजे चित्तैकाग्र्याची. एकीकडे सुस्वर गायन चालू असतां दुसरीकडे त्याच वेळेस चित्तांत व्यग्रता उत्पन्न करणारी घटना चालली असेल, तर उपर्निर्दिष्ट शांति व आनंद प्राप्त होणार नाहीत. इतर सर्व गोष्टींवरून लक्ष काढून तें एकाच इंद्रियावर केंद्रीभूत होणें यांतच त्या आनंदाचें एक महत्वाचें कारण आपल्यास सांपडेल. परंतु याशिवाय आणखीहि कांही गोष्टींचा विचार आपल्यास येथे करतां येईल. गजबजलेल्या वस्तींत व नानाविध व्यक्तींच्या सांनिध्यांत दिवसाचा सर्व वेळ घालवून, व्यवहाराच्या अनेक बारिकसारिक भानगडींनी आण कुलंगड्यांनी मन त्रस्त झाल्यानंतर जर कोणी सायंकाळचे

वेळेस एखाद्या प्रशांत रमणीय उद्यानांत जाऊन बसेल, तर त्याला तेथे काय वाटेल ? तेथील दृश्याचें केवळ नयनमनोहारित्वच त्याला आकर्षेल असें नव्हे, तर दैनिक व्यवहारांतल्या अनेकविध कुलंगड्यांचा, भानगडींचा, घोटाळ्यांचा, आणि अनीतीचा अभाव त्याला जाणवल्यावांचून राहणार नाही. सूर्योदयाच्या रम्य वेळीं होणारी पक्षांची मधुर किलबिल, या विश्वाच्या चित्रविचित्र मोहक रंगभूमीवर नुकतेंच पदार्पण केलेल्या कोमल अर्भकाच्या मुखावर विकसणारें मधुर गोंडस हास्य, किंवा गोरज मुहुर्तावर रानांतून परत येत असतांना घराजवळ येतांच लहानशा पाडसाला उद्देशून दिलेला सवत्स धेनूचा हंबरडा आणि त्याला अत्यंत आनंदानें मिळालेलें प्रत्युत्तर, इत्यादि साध्या साध्या गोष्टींत मानवी मन कां बरें रंगतें ? याचा नीट विचार केल्यास त्यांतील निष्पापता किंवा कोणत्याहि प्रकारच्या अनीतीचा अभाव, हेंहि इतर कारणांबरोबर एक महत्वाचें कारण आहे हें कबूल करावें लागेल. प्रत्यक्ष नीति त्यांत नसली तरी जगांतील स्वार्थीवृत्तीनें, लोभानें व लबाडीनें विटलेल्या मनाला यांतला नुसता अनीतीचा अभाव सुद्धा आल्हाददायक वाटतो. ग्रीष्म ऋतूंत ऐन मध्यान्हकालीं प्रखर सूर्यकिरणांतून मार्ग क्रमीत असलेल्या प्रवाशाला वाटेवरील आम्रवृक्षाच्या छायेंत सुद्धा अत्यंत सुख वाटतें; पण वास्तविक त्या वृक्षाच्या छायेंतील हवा यत्किंचितहि शीतल नसून, प्रखर उन्हानें त्राहिमान् झालेल्या त्या जीवाला प्रत्यक्ष उन्हाचा नुसता अभाव देखील फार आल्हादकारक वाटतो इतकेंच. असो. इंद्रियग्राह्य सौंदर्यानुभवाची याहून अधिक छाननी केल्यास अमक्या प्रकारचा रंग व मांडणीचा प्रकार नेत्रांना नैसर्गिक रीत्याच आल्हाददायक वाटतो, किंवा अमक्या तऱ्हेचा नाद कानांना संतोष देतो, अशा

प्रकारचीं विधानें करण्यापलीकडे अधिक कांहीं सांगतां येईल असें वाटत नाहीं.

आता, ऐंद्रियिक सौंदर्याचें क्षेत्र सोडून आपण अंत:करणग्राह्य अगर मानसिक सौंदर्याचा विचार करूं लागलों, ह्मणजे प्रथमदर्शनींच आपल्यास एक फार महत्वाचा फरक दृष्टोत्पत्तीस येतो. इंद्रिय-ग्राह्य सौंदर्याचा नीतिअनीतीशीं संबंध नव्हता; उलट मानसिक सौंदर्याचा नीतीशीं अत्यंत निकटचा संबंध आहे. नीतिअनीतीच्या नियमांचें क्षेत्र आणि मानसिक विचारशक्तीचें क्षेत्र या उभयतांची व्याप्ति एकाच प्रदेशांत असल्यानें, मानसिक सौंदर्य हें नीतिशास्त्राच्या कक्षेंत पूर्णपणे समाविष्ट झाल्यास त्यांत नवल कोणतें? कलेचा किंवा सौंदर्याचा नीतीशीं संबंध नाकारल्याने तो अनीतीशींच जडतो असें नव्हे, हें कांहीं लेखकांचें म्हणणें या क्षेत्रांत तरी निराधार असल्याचें दिसून येईल. या मानसिक सौंदर्याला अनुलक्षून आपल्यास असें म्हणतां येईल कीं, जें जें म्हणून सुंदर आहे तें तें नीतिपर असलेंच पाहिजे. मनुष्याची मन:स्थिति आणि विचारशक्ति पापाचरणाने, वाईट परिस्थितीनें, अज्ञानाने किंवा इतर कांहीं कारणाने बिघडली नसल्यास, त्याला कोणत्याहि अनैतिक कल्पनेस, भावनेस, अगर विचारास सुंदर म्हणण्याची इच्छा होणार नाहीं. पंधराव्या महाराष्ट्र-साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून केलेल्या विचारपरिप्लुत भाषणांत प्रा. वा. म. जोशी म्हणतात: "सौंदर्यप्रतीतीपासून एक प्रकारचा अलौकिक आनंद होतो. असा आनंद काव्यादिकांच्या द्वारें प्राप्त करून देतांना तत्वतः सत्याचा अपलाप करावयाचा नसतो किंवा असद्बोधहि करावयाचा नसतो; कारण असें केलें तर सात्विक आनंदच उत्पन्न व्हावयाचा नाहीं. बाह्यत: असत्य भासणाऱ्या गोष्टी सांगितलेल्या चालतील,

पण तत्वतः असत्य असलेल्या गोष्टी रसिकाला केव्हांही सुंदर वाटणार नाहीत. त्याचप्रमाणे बाह्यतःच नव्हे तर तत्वत: अनैतिक असलेला बोध रसिकाला केव्हांहि रुचणार नाही. " * जनतेच्या आचरणाच्या मुळाशीं असलेले सिद्धांत तुम्ही हुडकून काढा, किंवा अखिल विश्वाच्या बुडाशीं हात घालून त्यांतील अंतिम सत्य तुम्ही शोधून काढा, विचारशक्तीच्या क्षेत्रात तुमच्या मनाचें जें जें कार्य पडेल तें तें नीतिशास्त्राच्या कक्षेत आलेच पाहिजे. एखादें सुंदर चित्र पाहून किंवा गायन ऐकून उत्पन्न होणाऱ्या नुसत्या इंद्रिय-सुखांतच तुम्ही मग्न होणारे असलां तर गोष्ट वेगळी; पण त्या चित्रा-पासून अगर गायनापासून एखादाहि बारिकसा विचार, अस्पष्ट कल्पना किंवा भावनेचा थोडाहि अंश तुमच्या मनांत उत्पन्न झाला कीं, तो नीतिपर कीं अनीतिपर असा प्रश्न तेथे उपस्थित झालाच पाहिजे.

ऐंद्रियिक व मानसिक सौंदर्याचा नीतिअनीतीशीं काय संबंध आहे, हें आपण येथपावेतो पाहिलें असून, आध्यात्मिक सौंदर्याचा विचार करून हें प्रकरण संपवूं. आता नीत्यनीतीचे वाद विलीन पावण्याबद्दलच्या गोष्टी जर कशास उद्देशून करणें खरोखर योग्य असेल, तर तें या आध्यात्मिक सौंदर्याबद्दलच होय. या संबंधांत आपले विरोधक कोणती महत्वाची चूक करीत असतात हें आपण लवकरच पाहूं. परंतु, त्यापूर्वी येथे हें ध्यानांत ठेवले पाहिजे कीं, या शेवटच्या स्थितींत—निर्विकल्प समाधींत—ज्याप्रमाणे नीतिअनीतीचे प्रश्न विलीन पावतात, तसेच कला व नीति आणि इतर सर्व प्रकारचे भेदीह तेथे लय पावत असतात. तेथे द्रष्टा आणि दृश्य, किंवा श्रोता आणि श्राव्य, इत्यादि

* वसंत साहित्यसंमेलनांक ( एप्रिल—१९३० ) पृ. ४०

कांहीच नसतें ( असें म्हणतात ). अशा अनंत अपरंपार शांतिमव अद्वैतानभवांत अपूर्णावस्थेंत दृग्गोचर होणारे नीत्यनीतीचे वाद पूर्णपणे लय पावले तर तें साहजिकच होय. तेथे देह, किंवा इंद्रियें, किंवा मन, किंवा बुद्धि, यांपैकी कांहीच नसतें. तेथे विचारांचा अभाव असतो, भावना कल्पना अपरंपार शांतींत विलीन पावलेल्या असतात, आणि इच्छाशक्तीचा लय झालेला असतो. परंतु जरी नीतिअनीतीचे वाद तेथे लय पावले असतात असें या स्थितीसंबंधाने वर म्हटलें आहे, तरी याचा अर्थ ही स्थिति नीतिअनीतीविषयी 'उदासिन' किंवा 'बेपर्वा' असते असा मात्र नसून, तेथे सर्वच नीतिमय असून अनीतीला आंत शिरून वादग्रस्तता उत्पन्न करण्याला वावच नसतो इतकाच आहे. आणि यदाकदाचित् द्वारपाळाच्या जागेवर बसलेल्या नीतीच्या ( मनःसंयमनादि ) चोपदारांना न जुमानतां, अनीतीचे कांही बंडखोर सैनिक आंत घुसलेच, तर त्या क्षणींच आंतील आध्यात्मिक दरबाराचें स्वर्गीय दृश्य लय पावून, त्या बंडखोरांना हृदयाचा रिकामा दिवाणखाना मात्र वाटेल तसा धुडगूस घालण्यास मोकळा सांपडेल. सारांश, तिसऱ्या स्थितीचें दुसरींत रूपांतर होऊन मनाचे व्यापार पुनश्च सुरू होतील. *

*आध्यात्मिक उन्नतीच्या मार्गावर असलेला योगी मधेंच सिद्धीच्या नादीं लागला म्हणजे अशीच स्थिति प्राप्त होते, असें म्हणतात.

## प्रकरण पांचवें

# साहित्यक्षेत्रांतली बेबंदशाही

सौंदर्याचे तीन प्रकार कोणते आणि त्यांपैकी प्रत्येकाचा नीतिअनीतीशीं काय संबंध आहे हें आपण मागील प्रकरणांत पाहिलें. आता कलेचा नीतिअनीतीशीं मुळीच संबंध नसून तिचें क्षेत्र या दोहोंच्याहि पलीकडचें आहे, असा जो मुद्दा आपले विरुद्धपक्षीय पुढे आणीत असतात त्याचें साधार खंडन करणें फार सुलभ जाईल. या संबंधांत प्रा. फडके व रा. तांबे यांनी केलेलीं विधानें आम्हीं तिसऱ्या प्रकरणाचे आरंभीं उद्धृत केलीं आहेत, तीं वाचकांनीं कृपा करून पुन्हां एकदा ध्यानांत आणावीं. आता त्या विधानांच्या पुष्ट्यर्थ जे मुद्दे या लेखकांकडून पुढे केले जातात ते आपण पाहूं, म्हणजे उपर्निर्दिष्ट तीन निरनिराळ्या प्रकारच्या सौंदर्यांची हे कशी अक्षम्य सळमिसळ करीत असतात, याचें मनोवेधक दृश्य आपल्या नजेरस पडेल.

कला आणि नीति यांचा काडीइतकाहि संबंध नाही हें सोदाहरण दाखवितांना श्री. तांबे लिहितात: “ या दृष्टीनें विचार करून पहातां अगदीं सरळ उत्तर संगीत, नृत्य, शिल्प यांजकडून मिळतें. तोम् तन्नून् करणारा गायक कोणते नीतीचे पाठ घालतो ? बीन वाजवून आजपर्यंत कोणा पुरुषाला त्या कलाकारानें अन्नसंतर्पण करावयास

लाविलें ? नृत्यकार कत्थकानें नैवेद्यवैश्वदेवाचें महत्व कोणा गृहस्थास समजावून सांगितलें ? ........याचें उत्तर आबालवृद्धांच्या तोंडांतून विचार करण्याची गरज न वाटतां एकदम " छे ! नीतीचा या कलांशीं कोठेंच संबंध येत नाही ! " असें निघाल्यावांचून राहणार नाही. " * श्री. तांबे यांनी येथे दिलेल्या उदाहरणांत व त्यांपासून त्यांनी काढलेल्या सिद्धांतांत कशी विसंगति आहे, हें दाखविण्यापूर्वी त्या संबंधांत प्रा. फडके काय म्हणतात तें पाहूं. कला व सौंदर्य हे नीति-अनीतच्या " पलीकडे " कसे असतात हें दाखवितांना ते लिहि-तातः " अत्यंत मधुर असे चार स्वरालाप कानावर पडतांच साऱ्या व्यावहारिक चिंतेचा व विवंचनेचा फणकारा बंद होतो, आणि सौंद-र्याचा श्रुतिद्वारां प्रयत्य घडल्यानें कांही एक विलक्षण आल्हादकारी शांति मनांत कांठोकांठ भरते. ते स्वरालाप नीतिपोषक आहेत कीं अनीतिवर्धक आहे असें विचारणें केवढा वेडेपणा ? श्रोत्याला तो आल्हाद व्हावा हेंच त्या कलेचें कार्य बोध करणें हा त्या कलेचा विषयच नव्हे. सत्य किंवा सौंदर्य स्वतंत्र वस्तु आहेत. बोधामृताची तीं केवळ उपकरणें नव्हेत. सुंदर वस्तूंत मूळ बोधही नसतो आणि दुष्ट सल्लाही नसतो. सौंदर्यांत वस्तुतः नीति—अनीति कांहीच नाही. शरदृतूंत एखाद्या घाटमाथ्यावरून जें रमणीय दृश्य दिसतें त्यांत नीति असते कीं अनीति असते ? काय म्हणावयाचे ? किंवा अत्यंत गोंडस बालकांच्या मुखमंडलावर जें सौंदर्य विलसत असतें त्यांत नीति दिसते कीं अनीति ? काय म्हणावयाचें ? या दोन्ही उदाहरणांवरून हें दिसतें कीं, सौंदर्य हें तत्वतः नीति-अनीतीच्या अतीत-पली-कडचें—आहे. " §

* " कला आणि नीति " पृ. २-३.

§ " प्रतिभासाधन " पृ. ६४—६५

ज्या वाचकांनी मागील प्रकरणांत आम्हीं दिलेलें सौंदर्याचें विवेचन लक्षपूर्वक वाचलें असेल त्यांना या विधानांतील विचारसरणींतला दोष हुडकून काढण्यास फारसा वेळ लागणार नाही. कला ही नीतिअनीतीच्या "पलीकडे" वावरत असते हें दाखविण्याचा यांचा मार्ग म्हणजे केवळ इंद्रियग्राह्य सौंदर्याचीं उदाहरणें वाचकांसमोर मांडणें हाच होय! परंतु, ऐंद्रियिक सौंदर्याशिवाय सौंदर्याचे इतर प्रकार नाहीत काय? किंवा तसे प्रकार असूनहि कलेचा संबंध मात्र केवळ या इंद्रियग्राह्य सौंदर्याशींच येतो कीं काय? इंद्रियग्राह्य सौंदर्याचीं उदाहरणें घ्यावयाचीं आणि केवळ त्याच्याच संबंधांत बरोबर ठरणारे सिद्धांत सरसकट सर्व प्रकारच्या सौंदर्यांना लावण्याचा प्रयत्न करावयाचा, हा यांच्या तर्कदुष्ट आणि विसंगत विचारपद्धतींचा एक प्रकार आहे. इंद्रियग्राह्य सौंदर्याचा नीतिअनीतीशीं संबंध येत नाही हें आम्हीं स्वतःच वर सांगितलें आहे. परंतु मुख्य मुद्दा असा कीं, या इंद्रियग्राह्य सौंदर्याचे भोंवती घुटमळणें इतकाच कलेचा उद्देश नसून, त्या सौंदर्याचें द्वारें मानसिक सौंदर्य व्यक्त करणें हेंच तिचें खरें क्षेत्र होय. कलेचा मुख्य हेतु इंद्रियांना सुख देणें हा नसून, आध्यात्मिक उन्नतीचें ध्येय समोर ठेवून, मनांत सुंदर विचार, कल्पना, भावना निर्माण करणें हेंच तिचें खरें कार्य होय. आणि एखादी कलाकृति पाहिल्यावर जो तिच्या बाह्य सौंदर्यांतच गुंग होऊन ज्याचे सारे मानसिक व्यवहार लय पावतात, तो वास्तविक खरा रसज्ञच नव्हे. ऐंद्रियिक सौंदर्य अगदीच निरुपयोगी आहे किंवा कलेने तिकडे पूर्ण दुर्लक्ष करावें असें म्हणण्याचा हेतु नाही; आमचें म्हणणें इतकेंच कीं, असल्या बाह्य इंद्रियग्राह्य सौंदर्याचा उपभोग हा स्वतःच साध्य नसून, मानसिक व शेवटीं आध्यात्मिक सौंदर्यानुभवाचें केवळ एक साधन मात्र होय. या संबंधांत

महात्मा गांधींनी एका प्रसंगीं जे अत्यंत योग्य व समर्पक उद्गार काढले आहेत, ते येथे थोडे तरी दिल्यावांचून आमच्याने राहवत नाही. ते म्हणतातः " The outward has no meaning except in so far as it helps the inward. All true Art is thus the expression of the soul. The outward forms have value only in so far as they are the expression of the inner spirit of man......All true Art must help the soul to realise its inner self.....This, however, does not mean that I refuse to accept the value of productions of Art, generally recognised as such.. These productions of man's Art have their value only so far as they help the soul onward towards self-realisation."* कलेकडे पाहतांना रसिकाची दृष्टि कोणती असावी हें महात्मा गांधींनी या वाक्यांत फार चांगल्या रीतीने सांगितलें आहे. कलेच्या बाह्य सौंदर्याचा अनुभव घेतल्यावर खरा रसिक तेथेच विराम न घेतां त्यांतील मानसिक शुद्ध सौंदर्याचा ठाव घेण्यास उद्युक्त होत

**Young India*, 13th. Nov. 1924. कला व नीति यांच्या संबंधाविषयींचे म. गांधींचे विचार " यंग इंडिया " च्या ता. १३ व २०, नोव्हेंबर, १९२४, या दोन अंकांत महादेव देसाईच्या " A Morning with Gandhiji " या लेखांत आले आहेत. म. गांधींच्या १९२४–२६ मधील लेखांच्या पुस्तकांत हा लेख पृ. १०२५-३६ वर आला आहे; व सी. एफ. अँड्र्यूज् कृत *Mahatma Gandhi's Ideas* यांत पृ. ३३१-३४६ मध्ये तो सापडेल. वाचकांनीं जरूर वाचावा. जगद्विख्यात तत्ववेत्ता सॉक्रेटीस यानेहि बाह्य सौंदर्याबद्दल असेच उद्गार काढल्याचें त्याचा शिष्य प्लेटो याने लिहून ठेवलें आहे; *Plato's Dialogues*, Eng. Tran. by Jowett, Vol. I, pp. 10-11 (*charmides*) & p. 130 (*Protagoras*) etc. पहा.

असतो.* आणि म्हणूनच, इंद्रियगाह्य सौंदर्यानुभवांत नीतिअनितीचे प्रश्न उद्भवत नसले तरी त्यामुळे सरसकट सर्वच सौंदर्य नीति-अनीतीच्या "पलीकडे" असतें, किंवा कला नीतीविषयी 'बेपर्वा' अगर 'उदासीन' असून तिच्या स्वैर विलासाच्या आवर्तांत नीति-अनीतीचे प्रश्न आगंतुक असतात, असलीं भरमसाट विधानें ग्राह्य ठरूं शकत नाहीत.

या संबंधांत कलावंताच्या मुख्य ध्येयाविषयी दोन शब्द लिहिणें आवश्यक आहे. वर जी गोष्ट रसिकांबद्दल सांगितली तीच कलाकारांनाहि लागू आहे. कलानिर्मिति करतांना खऱ्या कलावंताचा उद्देश काय असतो याचा जर आपण नीट विचार केला तर आपल्यास असें आढळून येईल कीं, त्याचा हेतु प्रेक्षकांच्या अगर श्रोत्यांच्या इंद्रियांना सुखदायक होतील अशीं दृश्यें निर्माण करणें इतकाच नसून, स्वतःच्या अंतःकरणांत उत्पन्न झालेल्या कल्पना, भावना अगर विचारलहरी एखाद्या दृश्य कृतीच्या द्वारें इतरांच्या मनांत उत्पन्न करणें हाच असतो. आता एखाद्या जातिवंत कलाकारानें कांहीं एक खरोखर श्रेष्ठ अशी कलाकृति निर्माण केल्यावर, त्याची निवळ नकल करून कोणी इतरांनी, स्वतःच्या मनांत त्याच्यासारख्या शुद्ध सुंदर कल्पना नसतांहि, तत्सदृश कृति निर्माण करण्याचा प्रयत्न केला, आणि सामान्य जनता त्या निर्जीव नकलांना

* याचें एक उदाहरण म्हणून कै. शि. म. परांजपे यांचा "प्रणयिनीचा मनोभंग" (या चित्राचें परीक्षण) हा "रत्नाकर", वर्ष ४ अंक १ मधील लेख पहावा. शिवाय, आपटेकृत "सौंदर्य आणि ललितकला" पृ. ३ व ९ पहा. त्यांत बाह्य सौंदर्याचा अनुभव आध्यात्मिक उन्नतीची एक पायरी कसा होतो हें दाखविलें आहे.

देखील 'कला' म्हणून संबोधूं लागली, तर त्याची बाधा खऱ्या कलाकाराला आणि त्याच्या कलेला कां बरें लागावी! सामान्य जनता कित्येक भोंदू बुवांना साधु म्हणून मान देते; पण खऱ्या साधूंचीं लक्षणें त्यामुळे बदलतील काय? टॉलस्टॉयूच्या शब्दांत सांगावयाचें झाल्यास, कलेचा उद्देश केवळ भोक्त्याचें किंवा कर्त्याचें इंद्रियसुख आहे असें म्हणणें हें भोजनाचा उद्देश केवळ जिव्हा-सौख्य आहे असें म्हणण्यासारखेंच आहे! टॉलस्टॉयूची स्वतःची कलेची व्याख्या या बाबतींत अगदी स्पष्ट असून वाचकांनी ती येथे अवश्य लक्षांत घ्यावी. तो म्हणतो:" To evoke in oneself a feeling one has once experienced and having evoked it in oneself then by means of movements, lines, colours, sounds, or forms expressed in words, so to transmit that feeling that others experience the same feelinq—this is the activity of Art. Art is a human actity consisting in this, that one man consciously by means of certain external signs, hands on to others feelings he has lived through, and that others are ınfected by these feelings and also experience them "* वाचकांना आता कलेंत कोणत्या प्रकारच्या सौंदर्याचा प्रामुख्याने समावेश होतो हें कळलेंच असेल. आध्यात्मिक सौंदर्य हें कलेचें अंतिम ध्येय खरें; पण तेथे पोंचल्यावर मार्गदर्शक कला स्वतः मात्र विलीन होऊन जाते. § त्या स्थितीच्या अवर्णनीय अद्वैतानुभवांत कोणताच प्रश्न उद्भवूं शकत नाही हें मागे सांगितलेंच आहे. आता, उरलेल्या

* What ıs Art? Chap. v, p. 123.

§ खुद्द तांबे देखील लिहितात: " जेथें केवळ एकजिनसी संपूर्णता मात्र आहे अशा ठिकाणीं कला संभवतच नाहीं."—'कला आणि नीति,' पृ. ३४

दोन प्रकारांपैकी इंद्रियग्राह्य सौंदर्य हें केवळ मानसिक सौंदर्याचें एक साधन आहे हेंही वर दाखविलेंच आहे. अतएव, केवळ इंद्रियग्राह्य सौंदर्यांत नीतिअनीतीचे प्रश्न उद्भवत नाहीत, म्हणून कला व नीति यांचा संबंध नाही असें प्रमेय पुढे मांडणें किती चुकीचें आहे हें आता वाचकांना उघड होईल. प्रा. फडके यांचाच दृष्टांत घ्यावयाचा म्हणजे, एखाद्या घरांत नोकरीसाठीं ठेवलेल्या मोलकरणीला शिळें व ताजें अन्न यांतील भेद महत्वाचा वाटत नाही, म्हणून तिच्या मालकिणीनेंहि त्याकडे दुर्लक्ष करावें असें म्हणण्यासारखेंच तें आहे !

आणि आश्चर्याची गोष्ट अशी कीं, कला आणि नीति यांचा संबंध नाकारण्याच्या वेळीं केवळ ऐंद्रियिक सौंदर्याचीं उदाहरणें पुढे करणाऱ्या या लेखकांना, कलेचा मुख्य उद्देश फक्त बाह्य इंद्रियोपभोग हा नसून ऐंद्रियिक सौंदर्याच्या द्वारें मानसिक सौंदर्य व्यक्त करणें हाच आहे हें माहीत नाही असे नाही ! कारण दुसरीकडे हेच लेखक ही गोष्ट अगदी स्पष्टपणे प्रतिपादन करीत असतात. उदाहरणार्थ, प्रा. फडके यांचे पुढील उद्गार पहा : " यावरून कलेंतील आल्हाददायक भागाचा आणि केवळ दृश्य सौंदर्याचा नित्यसंबंध नसतो हें सहज ध्यानांत येईल. कलाकृतीपासून होणाऱ्या आल्हादाचें खरें कारण त्यांतील दृश्य सौंदर्यापेक्षा त्यांतील यथातथ्यत्वावरच अवलंबून असतें. सत्य हेंच सौंदर्य होय असें म्हणतात तें उगीच नाही ".* कलावंताने निर्माण केलेल्या आकर्षक कलाकृतीचा हेतु केवळ इंद्रियसुखांतच जनतेला मग्न करणें हा नसून, त्या सुखाच्या द्वारें स्वत: शोधून काढलेले सत्याचे कांही सिद्धांत जनतेसमोर मांडणें हाच असतो, हें प्रा. फडकेच पुढील शब्दांत सांगत

*" प्रतिमा-साधन " पृ. ३५.

आहेत: "आणि हे सिद्धांत त्याला स्वत:ला समजल्यावर प्रत्यक्ष वस्तूंच्या ऐवजी निराळ्याच आकर्षक वस्तु कल्पनेच्या सहाय्यानें निर्माण करून त्यांच्या योगानें ते सिद्धांत लोकांच्या मनावर तो ठसवीत असतो...... ललित लेखक—किंवा कोणत्याही कलेचा उपासक हें त्रिविध कार्य सारखें करीत असतो, व या त्रिविध कार्यांच्या पोटींच सर्व कलासृष्टि जन्माला येते." † यासंबंधांत याहून विशेष वेगळें आम्ही तरी काय म्हणत आहोंत ? आणि या ठिकाणीं प्रा. फडक्यांना एक प्रश्न विचारावासा वाटतो तो असा कीं, 'अत्यंत मधुर असे स्वरालाप कानांवर पडून त्यामुळें एक विलक्षण आल्हादकारी शांति मनांत कांठोकांठ भरल्यावर ते स्वरालाप नीतिपोषक आहेत कीं अनीतिवर्धक आहेत असें विचारणें हा जर वेडेपणा' आहे, तर त्या स्वरालापांपासून सत्याचे कोणते व किती "सिद्धांत" त्यांच्या गायकाने श्रोत्यांचे मनावर "ठसविले" हें विचारणें देखील तितकाच वेडेपणा कां नव्हे, अशी शंका कोणी उपस्थित करणें अगदीच असंभाव्य आहे काय ? किंवा, त्या गायनाने सत्याचे किती व कसे सिद्धांत श्रोत्यांवर 'ठसविले', असा नुसता

† सदर, पृ. ५६–५७. आणि हे "सत्याचे सिद्धांत" ज्याला आम्हीं मानसिक सौंदर्य म्हणून म्हटलें आहे त्यांतच येतात ! कारण बाह्य विश्वाप्रमाणे इंद्रियांना प्रत्यक्ष दृश्यमान न होतां मनाने आकलन करावे लागतात, म्हणून ते मानसिक झाले; आणि "असत्याच्या अंगीं सौंदर्य नसतें हें प्रतिमावाद्यांचें म्हणणें खरें आहे" ('प्र. सा.' पृ. ५५) व "सत्य हेंच सौंदर्य होय असें म्हणतात तें उगीच नाहीं" ('प्र. सा. पृ. ३५), म्हणून ते सुंदर झाले ! आता सत्याच्या या सिद्धांतांचा नीति-अनीतीशी कांही संबंध नाही असें म्हणणें म्हणजे नीतिविषयी विपर्यस्त व कोती समजूत व्यक्त करणें होय. प्रकरण दुसरें व नववें पहावें.

प्रश्न सुचणाऱ्यांची तुलना देखील " हिरेमाणक चावून पाहणाऱ्या मर्कटाशींच " केली पाहिजे, असें कोणीं म्हटल्यास त्याला फडके काय उत्तर देणार ? " रचनाकौशल्यानें नटविलेली चित्ताकर्षक कथा सांगणें " इतकाच कलाकाराचा हेतु असून " त्याला कांहीं एक सिद्ध करावयाचें नसतें; त्याला घटकाभर तुमच्या मनाला अनुपम आल्हाद द्यावयासाठीं गोष्ट सांगावयाची असते. त्याच्या भोंवती तत्व-सिद्धीची कटकट कशासाठीं ? " हें जर खरें, तर असलें हें घटकाभर करमणुकीचें ध्येय सोडून, ही सत्याचे " सिद्धांत " लोकांच्या मना-वर " ठसविण्याची " " कटकट " कलेच्या भोंवती कशाला ? थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे, ऐंद्रियिक व मानसिक सौंदर्याची योग्य व्याप्ति न ठरवितां कला आणि नीति या वादावर कोणी लिहूं लागला म्हणजे परस्परविरोधीं विधानें करावीं लागून त्याची कशी तारांबळ उडते याचें हें एक उत्तम उदाहरण आहे. आता " तोम् तनन्न् करणारा गायक कोणते नीतीचे पाठ घालतो ? " ( अर्थात कोणतेच नाही ) असें उपहासानें विचारणारे तांबे स्वतःच काय लिहितात पाहा: " जगांतील नीतीचें छिन्नविच्छिन्न स्वरूप एक संपूर्ण नीतींतून कसें निघालें आहे, हें कलाकार सुचवीत असतो. "* आणि तरी कला व नीति यांचा ' काडीइतका ' संबंध नाही तो नाहींच ! आता कलानिर्मितींत मानसिक सौंदर्याला किती उच्च स्थान आहे हें त्यांच्याच शब्दांत पाहा. " अमूर्त कल्पनामय जगांतून प्रत्यक्ष जगांतील मूर्त वस्तु कशी प्रगटली आहे हें रहस्य त्याच्या प्रतिसृष्टींत न कळत ध्वनित होत असतें......वास्तवाच्या सूक्ष्म निष्काम सप्रेम निरीक्षणानें ज्या भावना, जे विचार, जे तरंग कलाकाराच्या मनांत उद्भवतात ते सर्व त्याच्या प्रतिसृष्टींत प्रगट होत असतात. "$

*'कला आणि नीति' पृ. ३२. $ सदर, पृ. २१.

" प्रत्यक्ष वास्तव जग जड असतें तर कला मनोमय चैतन्यस्वरूप असते." * अशा रीतीने मानसिक व्यापाराचें व सौंदर्याचें कलेच्या क्षेत्रांतील आवश्यक स्थान वर्णन करूनच श्री. तांबे राहिले नाहीत, तर केवळ बाह्य इंद्रियसुखांतच गुंग होणाऱ्या व्यक्तीला कलेचें सत्य स्वरूप समजलेंच नाही, हेंही त्यांनी स्पष्ट शब्दांत पुढीलप्रमाणे सांगून टाकलें आहे. "जी कला वास्तवाच्या दुर्भेद्य व अजस्त्र भिंतीपर्यंत पोचून तेथेंच थबकते व तदंतर्गत एकजिन्सी सत्वापर्यंत पोचण्याचें जीत बल नसतें ती देखील हीन कलाच होय "† किंवा दुसरीकडे म्हटल्याप्रमाणे, "केवळ बहिरंगापलीकडे जाण्याची जीस शक्ती नाहीं ती त्याच्याच (शेक्सपियरच्याच) कॅलिबनसारखी होय. ती स्वतःच्याच कुरूपतेनें लज्जित होऊन प्रत्यक्ष जगाला शिव्या देईल. तीही कला या संज्ञेस अपात्र होय." § पण, अशा रीतीने नीतिअनीतीशीं संबंध नसलेल्या ऐंद्रियिक सौंदर्योपभोगापुरतीच खऱ्या कलेची व्याप्ति नसून, प्रत्येक कलाकृतीने जर यापलीकडे जाऊन मानसिक व्यवहाराच्या क्षेत्रांत पदार्पण करणें अत्यंत आवश्यक आहे, तर मग बीन वाजविणाऱ्या पुरुषांचीं, तोम् तनूनन् करणाऱ्या गायकांचीं, नृत्यकारकत्थकांचीं, अत्यंत मधुर स्वरालाप कानावर पडतांच लागणाऱ्या तंद्रीचीं, शरद्-ऋतूंत एखाद्या घाटमाथ्यावरून दिसणाऱ्या रम्य दृश्यांचीं, किंवा अशींच इतर उदाहरणें पुढे करून, त्यांवरून 'कलेचा नीतिअनीतीशीं मुळीच संबंध नाहीं' असा सिद्धांत काढणाऱ्या याच लेखकांच्या

* सदर, पृ. २३. † सदर, पृ. २८.

§ सदर, पृ. ३५. आमच्या विरुद्धपक्षीयांचीं हीं असलीं विधानें पाहिलीं म्हणजे कला व नीति यांविषयींच्या कांहीं विपर्यस्त कल्पनांमुळेच यांचा घोटाळा होत असून, तो दूर झाला तर प्रस्तुत पुस्तकांतल्या मध्यवर्ती प्रमेयाला मान्यता देण्यास यांना हरकत येणार नाही असें वाटतें.

विचारसरणींत आता तथ्य तें कोणतें उरलें ? आणि जोंपर्यंत मानसिक व्यवहारांचा देखील नीतिअनीतीशीं संबंध नाही असें सिद्ध होत नाही, तोंपर्यंत कलेचा आणि नीतीचा संबंध नाकारणें कसें युक्त होईल ? व कोणी महात्मा तसा आग्रहच धरूं लागला तर त्याला इतकेंच विचारावयाचें कीं, मग हे नीतिअनीतीचे प्रश्न उद्भवतात तरी कोठे ? या अखिल विश्वाच्या पसाऱ्यांत त्यांना एखादा कोपरा देखील नाही की काय ? कारण ऐंद्रियिक व्यवहाराचें क्षेत्र त्यांच्या अलीकडे असतें; आणि आध्यात्मिक सौंदर्याचें क्षेत्र त्यांच्या पलीकडे असतें. आता, उरलेल्या मानसिक व्यवहाराच्या क्षेत्रांतूनहि जर त्यांचें उच्चाटन व्हावयाचें असेल तर त्यांचे हाल खाणार तरी कोण ? कीं, मानवी व्यवहारांत हे भेद व तन्मूलक प्रश्न कधीच व कोठेच उद्भवत नसून, तें नीतिशास्त्रवेत्त्यांनी आपल्या रिकामटेकड्या मेंदूंतून उठविलेलें एक खूळ आहे ?

कलेचा आणि मानसिक सौंदर्याचा अत्यंत आवश्यक संबंध असतांहि, आणि त्याचें स्पष्ट प्रतिपादन हेच लेखक अन्य ठिकाणीं करीत असतांहि, कला व नीति यांचा संबंध ठरविण्याची वेळ आली म्हणजे मात्र त्यांना त्याची कशी विस्मृति पडते हें वर पाहिलें. परंतु, कला व नीतिअनीति यांचा मुळीच संबंध नाही हें दाखविण्याचा प्रयत्न करतांना, एकीकडे प्रत्यक्ष उदाहरणें मात्र केवळ ऐंद्रियिक सौंदर्याचीं घ्यावयाचीं, आणि दुसरीकडे गोष्टी मात्र शुद्ध आध्यात्मिक अवस्थेला अनुलक्षून करावयाच्या, असा यांचा प्रकार पाहिला म्हणजे तर हसूंच येतें ! यांचींच उदाहरणें घेऊन यांना असें विचारतां येईल कीं, अर्थाकडे यत्किंचितहि लक्ष न देतां आपल्या सुस्वर आवाजांत 'तोम् तनन्न् करणाऱ्या' गायकाचे गाण्यांत "स्वर्ग, मृत्यू,

पाताळांत यथासुख भराऱ्या मारून या दृश्य पसाऱ्याच्या आंत हात घालून त्याच्या रहस्याचा ठाव घेण्याची ताकत " कितीशी आहे? बीन वाजविणाऱ्या एखाद्या अशिक्षित वाद्यकाराला " जगांतील कितीक न्यूनांचा चटका बसून त्यांना वगळून तो कोणत्या पूर्णतेकडे धांव घेत असतो "? नेत्रश्रोत्रादि बाह्य इंद्रियांनाच तोषविणारा एखादा नृत्यकार कत्थक ' वास्तवावर दृढ पदन्यास करीत असतांना कोणत्या तदंतर्गत स्वसंवेद्य कल्पनागम्य पूर्णत्वापर्यंत भरारी मारीत असतो '? ओलेतीच्या चित्राने ' वास्तवांतील कोणत्या विषाचें अमृत केलें आहे '? ' अत्यंत मधुर असे चार स्वरालाप ' काढणारा गवई प्रत्यक्ष विश्वाच्या बुडाशीं असलेले कोणते " सत्याचे सिद्धांत " श्रोत्यांच्या मनावर " ठसवीत " असतो? ताजमहाल पाहून किंवा सुंदर सुस्वर गायन ऐकून कितीकांची पोंच ' संसाराच्या बुडापर्यंत ' जाऊन, त्याच्या ठायीं असलेल्या एकजिनसी सत्वाचा त्यांना थांग लागतो? साऱ्या श्रोतृवृंदाला आपल्या अतिमधुर गायनाने क्षणभर मुग्ध करून देहभान देखील विसरावयास लावणाऱ्या एखाद्या उत्तम गवयाला, आणि त्याच्या त्या तल्लीन होणाऱ्या श्रोत्यांना, जर या अखिल दृश्य पसाऱ्याच्या बुडाशीं असलेलें एकजिनसी सच्चिदानंदात्मक तत्व हस्तगत करून घेतां येत असेल, तर ब्रह्मज्ञानासाठी वर्षेंच्या वर्षे देहकष्ट सोसून तपश्चर्या करणारे आद्य ऋषिमुनी, आपल्या प्रासादिक वाणीने अनेक संसारत्रस्त जीवांना शांतीचा मार्ग दाखविणारे उपनिषद्कार आणि रामदासतुकारामादि इतर महान् साधुसंत, अखिल जगताला ललामभूत होणाऱ्या येशू ख्रिस्त, महात्मा गांधी, भगवान् बुद्ध, सेंट् फ्रॅन्सिस् ऑफ् ऑसिसी यांच्यासारख्या अतुल स्वार्थत्यागी विभूति—हे सर्व ब्रह्मप्राप्तीचा अत्यंत सुलभ मार्ग उपलब्ध असतांना उगीचच कष्टांत पडले म्हणावयाचे!! आणि त्या गायक सम्राटाचे अत्यंत मधुर स्वरालाप ऐकून क्षणभर ' कोण देहांत

सांभाळी ' अशी स्थिति होणाऱ्या भोल्याला जर त्या एकजिनसी अंतिम तत्वाची प्राप्ति होते, आणि या बाह्य असार संसाराच्या मुळाशीं असलेल्या केवल नीतीचें आणि समतेचें ज्ञान होतें, असें म्हणावयाचें असेल, तर त्याच तर्कपद्धतीस अनुसरून बांसरीचे मधुर स्वर कानांवर पडतांच देहभान विसरून आनंदाने डोलूं लागणाऱ्या नागाला किंवा रानटी मनुष्याला देखील त्या अंतिम तत्वाची प्राप्ति होते असें कां म्हणूं नये ? बरेंच झालें ! जीवनाचें अंतिम ध्येय साध्य करून घेण्यास मनाची प्रगल्भता नको, ज्ञानाची जोड नको, संयम-नियमादिकांचें पालन नको, किंवा ईश्वराची भक्ति नको ! ' शरदृतूं-तलें घाटमाथ्यावरून दिसणारें एखादें रम्य दृश्य ' पाहावें, किंवा एखाद्या उत्तम गवयाने काढलेले सुंदर आलाप ऐकून त्याच्या ' आनंदमय शांतींत ' अगदी मग्न होऊन जावें, आणि ' अफाट सागरांत शिर-ल्यावर किनाऱ्यावरील दगडांची मोजदाद ठेवण्याचें कारण नाही, त्याप्रमाणे ' झाडून साऱ्या नीतिअनीतीसंबंधीच्या नियमांना व कल्पनांना, त्यांची गणना न करतां व त्याविषयी पूर्ण ' उदासीन ' आणि ' बेपर्वा ' राहून त्यांची ' बूज न ठेवतां ' खुशाल लाथाडून द्यावें; आणि इकडे आपल्या मनांत मात्र, 'मी प्रत्यक्ष विश्वाच्या बुडाशीं असलेले " सत्याचे सिद्धांत " मनावर उत्तम रीतीने " ठसवून " घेत असून, ' अखिल संसाराच्या मुळाशीं असलेले अंतिम एकजिनसी तत्व प्राप्त करून घेत आहे ' असे मांडे खात बसावें ! !

कलेची शक्ति वर्णन करतांना अंतिम आध्यात्मिक स्थितीला अनुलक्षून बोलावयाचें, तिचें नीट शास्त्रशुद्ध विवेचन करतांना मानसिक व्यवहारांचा समावेश करावयाचा, आणि प्रत्यक्ष उदाहरणें देतांना केवळ ऐंद्रियिक सौंदर्यानुभवाचा निर्देश करावयाचा, अशी

यांची ही विलक्षण पद्धति व तिच्यामुळे होत असलेली दिशाभूल पाहिली म्हणजे सखेदाश्चर्य वाटतें. बरें, ज्या इंद्रियग्राह्य सौंदर्याचीं उदाहरणें घेऊन कला नीति–अनीतीविषयीं उदासीन असते असें हे प्रतिपादन करूं पाहतात, त्याचें वर्णन तरी यांच्याकडून बरोबर केलें जातें काय ? या सौंदर्याबद्दल हे नेहमी असें म्हणत असतात कीं, तें नीति-अनीतीच्या भेदांच्या " पलीकडे " असतें. परंतु थोडा नीट विचार केला तर तें या भेदांच्या " पलीकडे " नसून " अलीकडे " असतें, असेंच आढळून येईल. या नीति-अनीतींच्या भेदांच्या पली-कडे जर कांहीं खरोखर असूं शकेल, तर ती म्हणजे अंतिम आध्यात्मिक अद्वैतानुभवाची स्थितीच होय हें आम्हीं मागे सांगितलेंच आहे. ऐंद्रियिक आणि आध्यात्मिक अनुभावांमध्यें अशा रीतीनें घोटाळा करण्याचा आणि एकाचे गुण दुसऱ्यावर लादण्याचा हा असला प्रयत्न, आळशी मनुष्याची झोप आणि एखाद्या योगस्थ महात्म्याची समाधि हे दोन्ही समान समजण्याइतकाच हास्यास्पद होय. केवळ इंद्रियग्राह्य सुखाचा अनुभव घेऊन त्यांतच रममाण झाल्यानें क्षणभर चित्तैकाग्र्य होऊन जो शांति व आनंद यांचा लाभ होतो, त्याच्या स्वरूपाचें कांहींसें सविस्तर विवेचन आम्हीं मुद्दाम मागील प्रकरणांत केलें आहे, तें हा घोटाळा दूर करण्यासाठीच होय. त्यावरून अंतिम तत्वाची प्राप्ती झाल्यामुळे अखंड अशा शांतिमय सच्चिदानंदांत मिसळून जाणाऱ्या महात्म्याचें शांतिसुख कोठें, आणि केवळ डोळ्यांना, कानांना, किंवा इतर इंद्रियाला सुखकर अशा अनुभव घेऊन त्याच्याच ठायीं आपलें चित्त पूर्णपणे गुंग करणाऱ्या मानवाची शांति कोठें, हें वाचकांच्या स्पष्टपणे ध्यानांत येईल. एकांत देह, इंद्रियें, मन, बुद्धि इत्यादि सर्वांचा पूर्णपणे लय झालेला असतो; तर दुसऱ्याचा संबंध प्रत्यक्ष जड इंद्रियांशींच असतो. एकांत सर्व

मानसिक व्यवहार, शक्य होते तेवढे सर्व परिश्रम करून शेवटीं हतबल होऊन, नम्रपणे विलीन झालेले असतात; तर दुसरी स्थिति त्यांच्या अलीकडे असून तींत यांचा स्पष्ट उद्भवहि झाला नसतो. आणि तरी, घाटमाथ्यावरील एखादें सुंदर दृश्य पाहिलें किंवा एखादें सुस्वर गायन ऐकलें, म्हणजे तेवढ्यावरूनच किनाऱ्यावरील दगडांप्रमाणे नीति-अनीतीच्या नियमांना लाथेनें तुडविण्याचा उपदेश करण्यास कोणी कोणी तयार असतातच ! अल्पज्ञानाप्रमाणेच अल्पशांति व अल्पानंद हीं देखील उन्मादकारक असतात म्हणावयाचीं !

असो. हा विषय अधिक न लांबवितां शेवटीं एका महत्वाच्या गोष्टीचा विचार करून हें प्रकरण संपवूं. कलेच्या ध्येयाचा संबंध मुख्यत्वेंकरून ऐंद्रियिक सौंदर्याशीं नसून मानसिक सौंदर्याशीं आहे हें वर सांगितलेंच आहे. आता, साहित्यक्षेत्रांत तर ही गोष्ट आपल्यास फारच स्पष्टपणे दिसून येते. कारण, पुस्तक वाचतांना त्यांतील अक्षरें डोळ्यांना सुंदर भासतात, किंवा व्याख्यान ऐकतांना त्यांतील शब्दांचा नाद कानांना आनंद देतो, म्हणून कोणीहि सामान्यतः यांचें वाचनश्रवण करीत नाही. यासाठी निदान साहित्य कलेंत तरी मानसिक व्यवहारांचें इतकें जबरदस्त प्राधान्य असतांना तिचा आणि नीतिअनीतीचा निकटवर्ति संबंध आहे, हें वास्तविक अगदी उघड आहे. परंतु, आश्चर्याची गोष्ट अशी कीं, या साहित्य-कलेचेच कांही उपासक नीति व कला यांचा मुळीच संबंध नाही असें प्रतिपादन करीत असतात ! कुऱ्हाडीचा दांडा गोतालाच काळ होतो म्हणतात तो असा ! एखादें सुस्वर गायन ऐकून पुष्कळांचीं मनें त्यांतील श्राव्य सौंदर्यांतच गुंग होऊन मानसिक सौंदर्याच्या क्षेत्रांत पदार्पण करणार नाहीत; आणि ताजमहाल पाहिल्या नंतर त्याच्या बाह्य सौंदर्याच्या मोहदायक आवरणाला भेदून तत्वदर्शन

करणारा महात्मा तर विरळाच. परंतु एखादें पुस्तक वाचून किंवा व्याख्यान ऐकून ज्याच्या मनांत कोणतेहि विचार उत्पन्न होत नाहीत, अगर ज्याच्या कल्पनेला यत्किंचितहि चालना मिळत नाही असा कोणी जाणता मनुष्य सहसा आढळणार नाही. साहित्यांत केवळ वर्णनात्मक वाक्यें नसतातच असें नव्हे, परंतु तो त्यांतील एक अत्यंत अल्प क्षेत्र व्यापणारा भाग आहे. उदाहरणार्थ, आपण पुढील सुंदर वाक्यें घेऊं. " उषःकालीं मी उठलें आणि परसांतल्या बागेत गेलें. अत्यंत मधुर अशा सुवासानें सबंध बाग दरवळून गेली होती. फुलांच्या विपुल बहरानें वेली टवटवल्या होता. प्रातर्वायूच्या मंद झोतानें हलणाऱ्या पानांतून डोकावणारीं अर्धोन्मीलित फुलें अत्यंत नयनमनोहर दिसत होतीं. कुंडींतल्या कलमांवर फुललेल्या गुलाबाच्या टपोर कळ्या—त्यांवर मोत्यासारखे चकाकणारे शुभ्र दंवबिंदू—आणि त्या दिव्य सौंदर्यावर लुब्ध होऊन सभोंवतीं नाचणारीं तीं चिमुकलीं फुलपांखरें व मधूनच " गुं—गुं—गुं " करीत उंच उंच ताना घेणारा मधुलोलुप भ्रमर इत्यादि देखावा चित्ताला अत्यंत आल्हादकारक वाटत होता. " * या चार वाक्यांत वाचकांच्या मनासमोर त्या मनोहर सृष्टिसौंदर्याचें चित्रच लेखकानें उभें केलें आहे; पण म्हणूनच ज्याप्रमाणे त्या प्रत्यक्ष दृश्याचा नीतिअनीतीशीं संबंध येत नाही, त्याचप्रमाणे या त्याच्या गद्यकाव्यात्मक वर्णनाचाहि येत नाही असें म्हणण्यास प्रत्यवाय नाही. इंद्रियग्राह्य सौंदर्याचेंच हे एक हुबेहुब चित्र असल्याने असें होणें साहजिकच आहे. परंतु आता प्रश्न असा कीं, साहित्यांत सर्वत्र केवळ वर्णनात्मक गद्यकाव्येंच भरलीं आहेत की काय ? उलट, सर्व मोठमोठ्या विद्वानांची याबद्दल एकवाक्यता दिसते कीं, वास्तवाची

* हा उतारा श्री. म. रा. उपासनी यांच्या " घरटें " नामक गद्यकाव्यांतला आहे. ( " मालवसाहित्य ", इंदूर-विशेषांक. )

नुसती तंतोतंत नक्कल करणें हें साहित्यकलेचें मुख्य कार्यच नव्हे. साहित्यशास्त्रांत जेव्हा कल्पना या शब्दाचा उपयोग केला जातो, तेव्हा त्याचा अर्थ केवळ बाह्य दृश्याचीं हुबेहुब चित्रें अंतःचक्षूपुढे उभे करण्याची शक्ति असा नसतो. कल्पना ही एक उत्पादक शक्ति असून, प्रतिभा व कल्पना हे दोहोंशीं समानार्थकच आहेत असें म्हटल्यास चालेल. * प्रत्यक्ष विश्वांतील अपूर्णतेला कलावंत आपल्या कल्पनासामर्थ्यानेच दूर करून पूर्णत्वाचा आदर्श जनतेसमोर ठेवूं शकतो. आता, विचारसृष्टीच्या, कल्पनासाम्राज्याच्या, घटनाकथनाच्या, सारांश मानसिक व्यवहारांच्या क्षेत्रांत तुम्हीं पाऊल टाकलें कीं, नीति-अनीतीच्या नियमांकडे तुम्हांस लक्ष पुरविलेंच पाहिजे. तुम्ही वाचकांच्या, श्रोत्यांच्या अगर प्रेक्षकांच्या मनासमोर जें मांडीत आहां तें नीतिपर आहे किंवा अनीतिपर आहे, त्यापासून त्यांच्या अंतःकरणांत सद्वृत्ति उत्पन्न होतील किंवा दुराचरणाकडे त्यांची प्रवृत्ति वळेल, त्यांच्या मनांत पापाविषयीं तिरस्कार उत्पन्न होईल किंवा आवड उत्पन्न होईल, इत्यादि प्रश्नांचा विचार करणें तुम्हाला भागच आहे. सारांश, केवळ इंद्रियग्राह्य सौंदर्याचीं उदाहरणें घेऊन, या प्रकारच्या सौंदर्याला गौण स्थान असलेल्या शारदेच्या क्षेत्रांत देखील नीतिअनीतीविषयीं तोच न्याय लागू करणें हा खरोखर या लेखकाच्या तर्कसरणींतील विसंगतित्वाचा कळसच होय.

* प्रतिभेची व्याख्या एका संस्कृत साहित्यकोविदाने अशी केली आहे: " प्रतिभा अपूर्ववस्तुनिर्माणक्षमा प्रज्ञा. " ( अभिनवगुप्त ). दुसरा एक म्हणतो, " अपारे काव्यसंसारे कविरेव प्रजापतिः । यथास्मै रोचते विश्वं तथेदं परिवर्तते ". आंग्ल भाषेंत सुद्धां Merely Reproductive Imagination आणि Creative Imagination असे दोन भेद कल्पून, साहित्याशीं दुसऱ्या भेदाचाच मुख्यत्वेंकरून संबंध जोडला जातो.

आणि खेदाची गोष्ट अशी कीं, येऱ्हवीं अत्यंत समतोल रीतीनें लिहिणारे न. चिं. केळकर यांचे हातून देखील हीच चूक झाली आहे असें दिसून येतें. बडोद्याच्या [ १९१५ ] साहित्यसंमेलनांत अध्यक्षपदावरून भाषण करतांना ते म्हणाले, " शिल्पशास्त्रांत कलेच्या दृष्टीने निरनिराळे आकार बनविणें यांत प्रतिभाकौशल्य दिसून येतें. पण देवळाचें उंच शिखरच सुंदर कां तर तें आकाशांत ईश्वर आहे असें उंच बोट करून दाखवितें म्हणून, अथवा तीन तीन कमानींची जोडीच कां शोभते तर तिजवरून त्रिमूर्ति ब्रह्माविष्णुमहेश्वराची आठवण होते म्हणून, असें म्हणणें बरोबर होईल काय ? ताजमहालच्या पांढऱ्या शुभ्र दगडांत रंगीबेरंगी कुसर बसविली आहे तिचा नैतिक हेतु शोधून काढणारानें ताजमहाल पाहण्यास जाण्याचे श्रम न घेतलेलेच बरे. चित्रकार पौराणिक किंवा ऐतिहासिक चित्रें रंगवितो तेव्हा त्याचा हेतु कलेच्या दृष्टीनें सुंदर चित्रें रंगविण्याचा असतो कीं नीतिबोध करण्याचा असतो ? पोहावयास पडणारा मनुष्य जलक्रीडा करतो ती स्नानाच्या हेतूनें नव्हे. शिकारी क्षत्रिय अरण्यांत मृगयाविलास करतो तो एक दिवस चांगलें मांस खावयास मिळावें म्हणून करीत नाहीं ? गवई दीपराग आळवितो तो अर्थशास्त्रदृष्ट्या मशालजीचा खर्च वांचविण्याकरितां नव्हे. तात्पर्य, ' अधिकस्याधिकं फलं ' या न्यायानें, कलेच्या दृष्टीनें वाङ्मय सुंदर असून त्यांतूनच नीतिबोध निघण्यासारखा असल्यास दुधांत साखर पडेल; पण ज्याचा मूळ हेतु नीतिबोध नाहीं तें वाङ्मय नव्हे हें म्हणणें यथार्थ नाहीं. " * आता थोड्याशा खोल दृष्टीने या वाक्यांकडे

* " केळकर " ( १९३२ ) पृ. ३३३, ( किंवा " गद्यगुच्छ ", १९२६, पृ. ६, पहा ) वास्तविक, ' कला नीतिविषयकच असावी असें नसलें तरी तिनें नीतिपर मात्र असलें पाहिजे', हें आमचें मत तात्यासाहेबांनाहि

पाहिलें असतां असें आढळून येतें कीं, महत्वाच्या बाबतींत विसदृश असलेल्या दोन गोष्टींतील बरवर दिसणाऱ्या सादृश्याला भुलून, एकीच्या गुणधर्मांचा दुसरीवर आरोप करणें या तर्कदुष्ट विचारसरणीचा [ हिलाच आंग्ल भाषेंत The fallacy of false analogy असें म्हणतात ] हा उतारा एक उत्कृष्ट उदाहरण होय. ज्या वाङ्मयांत नित्यनीतीशीं अत्यंत निकट संबंध असलेल्या मानसिक सौंदर्यांशिवाय प्रायः एक पाऊलहि टाकितां येत नाही, त्या वाङ्मयाची केवळ किंवा प्राधान्येकरून इंद्रियसुखच ज्यांत अभिप्रेत आहे अशा कृतीशीं तुलना करूं पाहणें, हें एखादा जिवंत मनुष्य व त्याचा हुबेहुब तयार केलेला दगडाचा पुतळा बाह्यतः सारखेच दिसतात म्हणून एकाच्या गुणधर्मांचा दुसऱ्यावर अध्यास करण्या-इतकेंच न्याय्य होईल ! वरील उताऱ्यांत निर्देशिलेल्या निरनिराळ्या ऐंद्रियिक सुखोपभोगजनक कला आणि वाङ्मय यांत वाचकांना खरोखरच साम्य आहे असें वाटतें काय ? खुद्द केळकरांनीं त्याच भाषणांत "खरी सविकल्प समाधि उत्पन्न करूं शकेत तें वाङ्मय" अशी स्वतःची नवीन व्याख्या दिली आहे. आता हीच गोष्ट

मान्य आहे हें मागे दाखविलेंच आहे. परंतु विशेषतः या उताऱ्यांत त्यांनी स्पष्ट नीतिबोध व अस्पष्ट नीतिबोध यांतील महत्वाचा भेद दृष्टीआड केला असल्याने येथे संदिग्धता उत्पन्न झाली आहे. आणि शिवाय कला नीतिविषयक नसली तरी चालेल हा सिद्धांत बरोबर असला, तरी तो सदोष पद्धतीने सिद्ध करून कसें चालेल ? कारण, या सदोष प्रमाणांना वेळींच आक्षेप न घेतला, तर त्यांच्याच जोरावर कांही इतर लेखक कलेची नीतिपरता देखील नाकारूं पाहतात हें मागे आपण पाहिलेंच आहे.

कोणी पोहण्याची कला, मृगयेची कला, इत्यादिकांना लावून दाखवूं शकतील काय ? किंवा, याच व्याख्येवर भाष्य करतांना "तेंच वाङ्मय अधिक उत्कृष्ट कीं, ज्याच्या सेवनानें अधिकांत अधिक कल्पना मनांत एकदम उठतील व अधिकांत अधिक भूमिकांचा मनाला अनुभव घडेल" हें केळकरांनी केलेलें विधान वरील उताऱ्यांत निर्दिष्ट केलेल्या वाङ्मयाव्यतिरिक्त आणखी किती कलांना लावून दाखवितां येईल ? असें असतांना, या अशा कलांचीं उदाहरणें एक नव्हे हजार घेतलीं, आणि त्यांच्याविषयीं कांहीं गोष्टी सत्य आहेत म्हणून त्या वाङ्मयालाहि लागू झाल्या पाहिजेत, असा आग्रह कोणीं धरला तर तें कसें सयुक्तिक होईल ? "सब घोडे बारा टके" या अंधेरनगरींतील बेबंदशाही पद्धतीचा अवलंब करण्याची ही रीत ज्या वेळेस आमचे साहित्यसेवक सोडतील, आणि अतिमंगलप्रद अशा स्वतःच्या शुद्ध सात्विक पावित्र्याचें काळजीपूर्वक रक्षण करण्यांत सदैव दक्ष असलेल्या श्रीशारदेवरील तिच्याच कांहीं भक्तांनी उठविलेला नीतिअनीतीविषयीं उदासीनतेचा अगर बेपर्वाईचा असन्मूलक आरोप ज्या वेळेस विराम पावेल, तोच सुदिन !

## प्रकरण सहावें.

# नीति, व्यक्ति आणि समाज

कलोपासना आणि नीतिनिर्बंध यांच्या परस्परसंबंधाविषयीं चर्चा करितांना, कित्येक प्रसंगीं असा एक मुद्दा उपस्थित केला जातो कीं, कलाकृतीचें जनतेसमोर प्रदर्शन करतेसमयीं नीतिनियमांकडे लक्ष पुरविणें आवश्यक असेल, तथापि कलेची निर्मिति ही वास्तविक इतरांकरितां नसून कलाकाराच्या आत्मानंदार्थच असते. इतरांच्या पुढे तिचें प्रकाशन हा तिचा एक गौण उद्देश असून, स्वतःला आनंद प्राप्त करून घेणें हाच कलावंताचा आद्य व प्रधान हेतु असतो, व म्हणून त्या निर्मितीचा नीतिअनीतिविषयक नियमांशीं संबंध येत नाहीं. या मतानुसार कलेचे प्रकाशन ही एक सामाजिक बाब असली तरी तिची निर्मिति ही सर्वस्वी वैयक्तिक बाब आहे; आणि उलट नीति ही मात्र सर्वस्वी सामाजिक बाब असून तिचा केवळ वैयक्तिक जीवनाशीं कांहीहि संबंध नाही. अतिप्राचीन काळीं व्यक्तीने केवळ आत्मरंजनार्थ कला निर्माण करण्यास प्रारंभ केला; समाज त्यावेळीं अस्तित्वांतहि नव्हता. नंतर समाज स्थापन झाला, आणि समाजाबरोबरच नीतिबंधनें आलीं. आजहि एखादा जातिवंत कवि काव्य रचतो, तेव्हा काव्यगायनाच्या जाहीर कार्यक्रमास दृष्टीसमोर ठेवून तो ती रचना करीत नाही; किंवा नियतकालिकांच्या वाचकीय अभिरुचीकडेहि लक्ष देऊन तो तसें करीत नाही. तो केवळ आत्मप्रकटीकरणाच्या द्वारें पुनःप्रत्ययाच्या कलानंदांत

रंगून जात असतो; आणि हा प्रधान हेतु सफल झाल्यानंतर दुय्यम कार्य म्हणून त्याची ती कृति प्रकाशकाची वाट चालूं लागते. कवीकडून तें काव्य प्रकाशकाच्या मेजावर येऊन पडलें, म्हणजे त्याने मात्र त्यांतील नीतिअनीतींचें मोजमाप करीत बसावें; खुद्द कवीने त्या भानगडींत पडण्याचें कारण नाही !

आता या विचारसरणीस उत्तर म्हणून कलानिर्मिति ही केवळ आत्मरंजनार्थच उत्पन्न होते, किंवा रसिकरंजनाचाहि तिच्या मुळाशीं प्रथमपासूनच हेतु असूं शकतो, या प्रश्नांत येथे शिरण्याचा आमचा विचार नाही. त्याचप्रमाणे समाजाव्यतिरिक्त व्यक्तीच्या अस्तित्वाची शक्यता मानतां येते काय, आणि समाजहिताशीं यत्किंचितहि संबंध नसलेलें आत्मसुख मानवी जीवनाचें—कोणत्याहि स्तुत्य मानवी कृतीचें—ध्येय होऊं शकतें काय, या समाजशास्त्रांतील व नीतिशास्त्रांतील प्रश्नांचाहि उहापोह आम्ही करणार नाही. मात्र, जातां जातां येथे पुढील गोष्टींकडे वाचकांचें लक्ष वेधणें अप्रासंगिक होणार नाही. कलानिर्मितीच्या मूल-हेतूविषयी सुप्रसिद्ध कवि माधवराव पटवर्धन यांनी एके ठिकाणीं पुढील उद्गार काढले आहेत : “आत्मरंजनासाठीं आरंभ केला तरी काव्याची समाप्ति ही रसिकरंजनासाठींच असते”. आणि श्री. वामनराव जोशी यांनीहि मंडलेश्वरच्या शारदा-सेवा-संघाच्या अध्यक्षपदावरून भाषण करितांना, एकाच व्यक्तीच्या निर्माता व रसिक या दोन भूमिकांतील मार्मिक भेद व्यक्त करून म्हटलें : ‘‘कला आत्मानंदासाठींच असून इतरांसाठीं ती मुळी नव्हेच, हें कित्येकांचें म्हणणें खरें नाही. कला ही मुख्यत्वेंकरून रसिकांसाठी आहे. कधी कधी कलाकार एकांतांतच कला-निर्मिति करतो, पण तेव्हा सुद्धा तो आपल्या कलाकृतीकडे रसिकाच्या-दृष्टीने पुनः पुनः पाहिल्यावांचून राहत नाही. म्हणजे त्या वेळेस तो

स्वतःच कलाकाराची, व रसिकाची अशा दोन भूमिका आळीपाळीने करीत असतो. गवई स्वतःशींच गातो; पण तोच रसिक होऊन तें ऐकतो. चित्रकार एकांतांत चित्र काढतो; पण तोच रसिकाच्या दृष्टीने त्याच्याकडे पाहतो." * आता, समाजपूर्व मानवी व्यक्तीचें अस्तित्व थॉमस हॉब्स सारख्या आंग्ल लेखकाने कांही शतकांपूर्वी प्रतिपादन केलें होतें तरी तें मत अलीकडील शास्त्रज्ञ ग्राह्य मानीत नाहीत. हॉब्स प्रणीत 'कॉन्ट्रॅक्ट थियरी ऑफ् सोसायटी' चें स्थान आता उत्क्रांतिवादास अनुसरून असलेल्या 'ऑर्गॅनिक थिअरी' ने घेतलें असून समाजा-व्यतिरिक्त मानवी व्यक्तिजीवन शक्य नाही या विचारसरणीला समाजशास्त्रांत, आणि समाजहिताला पूर्णपणें सोडून असलेलें वैयक्तिक सुख हें मानवी जीवनाचें ध्येय होऊ शकत नाही या मताला नीतिशास्त्रांत आता सर्वसाधारणपणें मान्यता मिळाली आहे असें म्हणण्यास प्रत्यवाय नाही.

परंतु, समाजाशीं पूर्णपणें असंबंधित असें व्यक्तिजीवन शक्य आहे आणि कलानिर्मितीचा उद्देश वैयक्तिक आत्मानंदाची प्राप्ति हाच आहे, या विधानांना आपण मान्यताहि दिली, तरी तेवढ्यावरून देखील कलानिर्मिति नीतिनिर्बंधमुक्त ठरूं शकेल काय ? ज्या गोष्टीचा संबंध केवळ माझ्या वैयक्तिक जीवनाशींच आहे, तिच्याविषयी नीत्यनीतीच्या नियमांना हस्तक्षेप करण्याचा कोणताहि अधिकार नाही काय ? सारांश, नीतिनिर्बंधांची व्याप्ति सर्वस्वी मानवाच्या सामाजिक जीवनापुरती मर्यादित आहे काय ? याच प्रश्नांची चर्चा प्रस्तुत प्रकरणांत आपल्यास मुख्यत्वेकरून करावयाची आहे. सर्व समाजाचा त्याग करून कोणी

* पहा 'महाराष्ट्र' (नागपूर) १६-१-१९३५.

मनुष्य एकटाच वास करूं लागला, तर तेथें त्याला नीति–अनीतीचा कोणताच प्रश्न विचारांत घ्यावा लागणार नाही असें कोणाकोणास वाटत असतें. प्रसिद्ध आंग्ल कादंबरीकार थॉमस हार्डी यांनी 'टेस' नामक आपल्या उत्कृष्ट कादंबरींत हाच दृष्टिकोण फार तीव्रपणे सुचविला आहे. त्यांत टेस या अल्पवयी बालिकेच्या असहाय परीस्थितीचा फायदा घेऊन खलनायक तिजवर बलात्कार करितो; आणि याचा परिणाम म्हणून टेस समाजाकडून, व स्वत: तिच्या मनानेहि, दूषित मानली जाते. आता यावर हार्डींचा प्रश्न असा आहे कीं, टेसवर येऊन पडलेल्या त्या परिस्थितीच्या सदोषत्वाची ती समजूत केवळ तिच्या भोंवतालच्या सामाजिक वातावरणामुळें व कल्पनांमुळेच उद्भवली ना? विजन अरण्यांत जर तिजवर असाच प्रसंग गुदरला असता (अर्थात् खलनायकाचे दुष्ट पाय तेथपावेतो पोचले असते हें गृहीत धरावयाचें) तर तेथे नीति-अनीतीचा कोणता प्रश्न उभा राहिला असता? आणि या प्रसंगाच्या निमित्ताने नीतिकल्पनांचा मूळ उद्भवच केवळ सामाजिक परिस्थितींत असतो असें हार्डींनी मोठ्या युक्तीने वारंवार ध्वनित केलें आहे* महाराष्ट्राचे

* हार्डींची भाषा फारच भेदक व कसलेली आहे. निरपराध टेस-बद्दल सहानुभूति उत्पन्न करण्याच्या भरांत त्यांनी प्रचलित नीतिकल्पनां-वरच जोराचा हल्ला चढविला आहे. टेसला स्वत:बद्दल वाटणाऱ्या शरमेच्या भावनेबद्दल ते म्हणतात (प्रकरण १३)"...a sorry and mistaken creation of Tess's fancy—a cloud of moral hobgoblins by which she was terrified without reason." तेथेंच ते पुढें म्हणतात:"She had been made to break an accepted social law, but no law known to the environment in which she fancied herself such an anomaly." यांत विवाहबाह्य संबंधाला निषिद्ध मानणाऱ्या सामाजिक समजुतीवर उघडच रोख आहे. आता हा संबंध तिजवर बलात्काराने लादला

नामांकित कादंबरीकार श्री. वि. स. खांडेकर हे देखील " नीति आणि कला यांच्या मर्यादा " नामक लेखांत § स्पष्टच विचारतातः 'रॉबिन्सन्

गेल्याने ती स्वतः पूर्णपणें निर्दोषी होती हें हार्डीचें म्हणणें आम्हांला निःसंशय मान्य आहे. पण याच्या पुढे जाऊन, अशा संबंधाला निषिद्ध मानणाऱ्या नियमावरच, तो केवळ सामाजिक आहे असें म्हणून, हल्ला चढविल्याने अत्याचार करणारा खलपुरुषहि निर्दोषी ठरतो; आणि हें आम्हांस मान्य नाही. पुढील प्रकरणांत हार्डी म्हणतातः "Moreover, alone in a desert island would she have been wretched at what had happened to her ? Not greatly." स्वतःच्या इच्छेविरुद्ध झालेल्या बलात्काराने टेसला निर्जन वनांत फारसें वाईट वाटलें नसते हेंहि आम्हांस बरोबर वाटत नाही. जर तिच्या खुशीच्या व्यभिचाराचा प्रश्न असता तर गोष्ट वेगळी होती. पण याशिवाय, निर्जन बेटावर ती पूर्णपणे एकटी असतां दुसरी पुरुष व्यक्ति तरी तेथे कशी संभवेल ? चाणाक्ष हार्डींच्या ध्यानांतून हा वदतोव्याघात सुटला नाही. म्हणून पुढल्याच वाक्यांत त्यांनी मातृपदीं अधिष्ठित स्थितींतच स्वतः टेसचाच जन्म झाला असता तर त्यांत तिला कांही वाईट वाटलें असतें काय, अशी भलतीच असंभाव्य ओढाताणीची कल्पना करून स्वतःच्या वरील विधानास पुष्टी देण्याचा प्रयत्न केला आहे ! पण इतकें करूनहि, अशा स्थितींत जन्म होणें, व प्रत्यक्ष स्वतःवर बलात्कार होणें यातलें महदंतर कोठे जाईल ? म्हणूनच हार्डींची " Most of the misery had been generated by her conventional aspect, and not by her innate sensations" (प्र. १४) व "But for the world's opinion those experiences would have been simply a liberal education" (प्र १५) हीं विधानें दिशाभूलकारक आहेत असें म्हणणें भाग आहे. नीति-अनीतीच्या साऱ्या कल्पना म्हणजे केवळ सामाजिक समजुती होत व त्यां व्यतिरिक्त चांगलें वाईट असें कांहीच नाही या हेत्वाभासपूर्ण दृष्टिकोनावरून हे सारे उद्गार हार्डींनी काढले आहेत.

§ 'वनभोजन' नामक त्यांचा लेखसंग्रह पहा

क्रूसोप्रमाणे निर्जन बेटावर राहणाऱ्या एकट्या मनुष्याच्या मनाला नीतीचा विचार करण्याचें कारण काय ? "; आणि याचेंच स्पष्टीकरण करितांना कांही ओळीनंतर म्हणतातः " मनुष्य हा समाजप्रिय प्राणी आहे. आणि समाज म्हटला कीं त्याच्या पाठोपाठ नियमनाची कांहीं तरी बंधनें आलींच ! "

हार्डी, खांडेकर, आणि त्यांच्या मताचे इतर अनेक विद्वान समजतात त्याप्रमाणे नीति ही सर्वस्वी सामाजिक आहे. किंवा काय याच्या विवेचनांत खोल शिरण्यापूर्वी एक गोष्ट येथे मान्य करण्यास हरकत नाही. ती ही कीं, जसजशी समाजाची वाढ होत जाते तसतशी प्रचलित नीतिनियमांतहि भर पडत जाते हें खरें आहे. नीतिकल्पनांचा मूळ उगम कोठेहि असला—त्याची निश्चित चर्चा आपण या प्रकरणांत पुढे करणारच आहों— तरी लहानशा समाजांत न उद्भवणारे कित्येक नीत्यनीतीच्या तपशिलाचे प्रश्न वर्धिष्णु समाजांतील जबाबदार व्यक्तींची मस्तकें भंडावून सोडीत असतात. जेथें ग्रंथनिर्मितीच होत नाही तेथे आक्षेपार्ह ग्रंथ विरोधी निर्बंध अर्थातच अस्तित्वांत नसणार; आणि ज्या गांवांत चलच्चित्रपट दाखविण्याची सोयच नाही तेथे अनिष्ट चित्रपट दाखविण्याविरुद्ध नियमाची काय आवश्यकता ! जसजसा परिस्थितींत बदल होत जातो, तसतसें त्याला अनुसरीत, पण मागे दुसऱ्या प्रकरणांत सांगितल्याप्रमाणे मध्यवर्ती सनातन नीतितत्त्वांभोवतीं स्थिर राहून, नवीन निर्बंधांचें जाळें विणीत जावें लागतें. वाहन उजव्या बाजूनें चालविणें हा खेडगांवांत गुन्हा न मानला तरी मुंबईसारख्या नगरांत त्याचा भंग आक्षेपार्ह ठरेल. समाजांत नाट्यकलेचा उत्कर्ष होतांच, स्त्रियांनी रंगभूमीवर परपुरुषांसमवेत कामें करावीं किंवा नाही, विद्यार्थ्यांनी त्यांत कितपत् भाग घ्यावा, इत्यादि नवनवीन प्रश्न चर्चिले जाऊं लागले. शंभर माणसांच्या फिरत्या टोळीचें कालांतराने

विराट समाजांत रूपांतर झालें कीं अनेक नवीन नीतिविषयक व इतरहि प्रश्न उद्भवलेच पाहिजेत.

परंतु समाजाच्या वाढीबरोबर नीतिकल्पनांतहि अशा प्रकारें विस्तार होतो हें खरें असलें तरी, नीतिनिबंधांचा उगम सामाजिक परिस्थितींतच आहे, व तिच्या अभावीं ते निर्बंधहि समूळ अंतर्धान पावतात हा ग्रह मात्र सयुक्तिक नाही. यासंबंधात प्रथमच ध्यानांत घेण्याची गोष्ट म्हणजे, नीतिनियमांतली वाढ कांही अंशीं सामाजिक वाढीशीं समांतर असली, तरी त्या उभयतांत समप्रमाण नाही. म्हणजे असें कीं, समाज कालेकरून दसपट वाढला तर नीतिनियमहि त्याच प्रमाणांत वाढतील असें नाही. लोकसंख्या वाढली म्हणजे सर्वांच्या हितार्थ व्यक्तिस्वातंत्र्यावर अधिक निर्बंध घालणे आवश्यकच असेंत; परंतु म्हणून ती वाढ लोक-संख्येच्या वाढीइतकीच राहील असें नाहीं. आणि ज्याप्रमाणे नीति-निर्बंधांची वाढ समाजाच्या वाढीशीं समप्रमाण नसते, त्याचप्रमाणे समाजाच्या संपूर्ण अभावीं नीतिनिर्बंधांचाहि संपूर्ण अभाव राहील हेंहि सिद्ध होत नाही. दोन गोष्टींच्या उत्कर्षापकर्षांत कांही प्रमाणांत पर-स्परावलंबित्व असलें तरी हा त्यांचा संबंध अमर्याद रीत्या टिकून राहील असें नव्हे. दोन वस्तूंतल्या बदलांतलें हें असलें समांतरत्व बहुधा कांही एक मर्यादेच्या आंतच खरें ठरतें. त्या मर्यादित क्षेत्राच्या बाहेरहि त्यांचा तो संबंध तसाच अबाधित राहील असें मानणें, किंवा त्यांचा उगम अगर अंतहि परस्परावलंबी व एकसमयावच्छेदी मानणें, या तर्क-शास्त्राच्या दृष्टीने चुका असून, आंग्ल परिभाषेंत त्याना Wrong application of the Method of concomittant variations असें म्हणता येईल. चालण्याच्या व्यायामाने पचनशक्ति वाढते हें खरें; पण पचनशक्तीने कांही एक मर्यादा गांठल्यानंतर अधिक व्यायामाने

तिच्यांत कितीशी वाढ होत राहणार ? आणि अशा व्यायामाच्या अभावींहि पचनशक्ति अगदी नसते असेंहि नाहीं. नूतन जन्मलेलें बालक दूध पचावितेंच; आणि व्यायाम न करितां थोडेंबहुत पचविणारे प्रौढहि आढळतातच. व्यापार व द्रव्यवृद्धि यांतील परस्परसंबंधालाहि अशीच मर्यादा आहे. वाचनाने बुद्धि प्रगल्भ होते हें खरें; पण ज्याला मुळीच वाचतां येत नाही त्याचेठायीं बुद्धीचा संपूर्ण अभाव असतो असें नव्हे. बुद्धीचा उगमच जर वाचनांत असता, तर जगांतलें पहिलें पुस्तक तरी कसें लिहिलें गेलें असतें ?

यासाठीं, समाजाच्या वाढीबरोबर नीतिकल्पनांतहि वाढ होते हें मान्य केलें तरी, समाजाचा संपूर्ण अभाव कल्पून नुसत्या वैयक्तिक जीवनाचा आपण विचार करूं लागलों म्हणजे नीतिअनीतिच्या कोणत्याच कल्पना तेथे प्रवेश करूं शकणार नाहीं असें मानणें योग्य नव्हे. मानवी समाजांत संस्कृतीचा प्रवेश होऊन सुधारणा होत गेली, तसतशी समाजांतील घटकांना स्वतःच्या व इतरांच्या सर्वांगीण स्वास्थ्यासाठी वैयक्तिक वागणुकीवर नवीन निर्बंध घालण्याची आवश्यकता अधिकाधिक भासूं लागली. पण एवढ्यावरून संस्कृतिहीन रानटी समाजांत व्यक्तीच्या आचरणावर नियंत्रण घालणाऱ्या कोणत्याच कल्पना नसतात असें म्हणतां येत नाहीं. तद्वतच हा असा समाजहि आपण क्षणभर दूर सारून केवळ एकाद्या मानवी व्यक्तीचेंच चित्र मनासमोर आणण्याचा प्रयत्न केला, तर त्या अवस्थेंतहि नीतिनिर्बंधांचा समूळ अभाव असतो असें नाहीं. आणि आजच्या या वर्तमान युगांत जन्मापासून उभें आयुष्य सामाजिक वातावरणाच्या सुरक्षित उबेंत घालविणाऱ्या एखाद्या व्यक्तीने काव्यनिर्मितीच्या—कलोपासनेच्या—प्रसंगीं सर्व समाजाला आपल्या विचारक्षेत्रांतून अर्धचंद्र देऊन (पण त्याच्या कलाविषयांत समाजाचा

संबंध कोठेंच न येणें शक्य आहे काय?) केवळ वैयक्तिक आत्मानंदावरच आपलें लक्ष केंद्रित करण्याचा प्रयत्न केला, तर त्याला त्या वेळांत नीति-अनीतीविषयी कोणताच विचार करण्याचें कारण नाही, असेंहि म्हणणें योग्य होणार नाही. समाजाव्यतिरिक्त नीतिअनीतीच्या प्रश्नांना वावच नाही, अशा विधानांच्या मुळाशीं अस्तित्व व वाढ यांतील भेदाकडे दुर्लक्ष आढळून येतें. सामाजिक परिस्थितीवर नीतिकल्पनांची वाढ कांहीं अंशीं अवलंबून असली, तरी त्यांचें अस्तित्वच त्या परिस्थितीवर अवलंबून असतें असें मानणें चूक आहे. खांडेकरांचा क्रूसो एखाद्या निर्जन बेटावर झोपडी बांधून राहूं लागला, तर त्याच्या मागचा नीतिनिर्बंधांचा ससेमिरा कांहींसा कमी झाला तरी पूर्णपणे सुटणार नाही.

समाजाच्या अभावीं नुसत्या वैयक्तिक जीवनांतहि नीतिकल्पनांचा अभाव सिद्ध होत नाही, व त्यांचा मूळ उगम सामाजिक परिस्थितींत नसतो हें वर सांगितलें; पण तो उगम दुसऱ्या कोणत्या परिस्थितींत आहे हें आपल्यास अद्याप निश्चितपणे पाहावयाचें आहे. या दृष्टीने विचार करितां असें आढळून येतें कीं, नीतिकल्पनांचा हा उद्भव मानवी प्राण्याच्या विशिष्ट मनोरचनेंतच असून, जोंपावेतो कोणी व्यक्ति त्या स्वभावधर्माचाच त्याग करीत नाही, तोंपावेतो तिने समाजाचा संसर्ग सोडला, हिमालयाच्या उत्तुंग शिखरांवर किंवा सह्याद्रीच्या भयाण दऱ्यांच्या तळाशीं एकट्यानेच वास केला, तरी मूलभूत नीतिपालनाच्या आवश्यकतेपासून ती मुक्त होणार नाही. मानवी व्यक्तीच्या या विशिष्ट स्वभावरचनेस नीट लक्षांत घेतलें म्हणजे नीति, व्यक्ति आणि समाज यांतील परस्परसंबंधहि यथार्थतेने ध्यानांत येतील. आपण कल्पना करूं की, क्रूसोला त्या निर्जन बेटावर एक दिवशीं फिरतां फिरतां एक अपरिचित झाड आढळलें; त्याचीं फळें त्याला फार रुचकर वाटून त्याने त्यांतलीं कांहीं खाल्लीं.

परंतु तीं त्याला न पचल्याने दुसरे दिवशीं त्याच्या पोटांत दुखूं लागलें. तिसरे दिवशीं तो पुनः त्याच झाडाजवळ गेला असतां, त्याला तीं फळें खावीशीं वाटूं लागलीं. त्यांचा मादक वास व चवेची पूर्वस्मृति त्याला आकृष्ट करीत होती. आता या परिस्थितींत क्रूसोवर कांही बंधन आहे किंवा नाही ? समाजाच्या सान्निध्याने किंवा अभावाने जिव्हालौल्याला बळी न पडण्याच्या मूळ तत्वांत व कर्तव्यांत कांही अंतर पडेल काय ? बरें, थोडें निराळें उदाहरण घेऊं. क्रूसोला तेथे एक सुंदर हरिणी दिसली; व तिला मारून तिचें चर्म हस्तगत करण्याची त्याला इच्छा झाली. पण इतक्यांत तिचीं दोन गोजिरवाणीं पाडसें दृष्टीस पडून त्याच्या मनांत अनुकंपा उत्पन्न झाली व त्याने आपला हात आवरला. परंतु कांही दिवसानंतर तीच हरिणी त्याच्या दृष्टीस पडली असतां, तिच्या चर्मसौंदर्याचें आकर्षण अनावर होऊन, त्याने मानवाच्या हीन प्रवृत्तीचें त्या निष्पाप अरण्यांत अत्यंत क्रूर प्रदर्शन केलें ! पण क्रूसो समाजांत राहत नव्हता येवढ्यामुळेच त्याने प्रथम दाखविलेली दया व नंतर प्रदर्शित केलेली निष्ठुरता यांत नीति–अनीतीच्या दृष्टीने कांहीच फरक राहिला नाही असें कसें म्हणतां येईल ? तीं कृत्यें कोठेहि होवो, त्यांतील हा मूलभूत भेद नाहीसा होऊन तीं एकतोडीचीं ठरणार नाहीत हें उघड आहे.

क्रूसोने त्या एकांतवासांतहि नियमित आहार व योग्य व्यायाम घेऊन शरीर सुस्थितींत ठेवणें हें त्याचें कर्तव्य आहेच ना ? त्या अरण्यांत येऊन पडण्यापूर्वी त्याच्या मनांत असलेला एखादा वाईट विचार तेथे पुनः त्याच्या मनांत आला तर त्याची अनिष्टता कमी लेखली जाणार नाही. दोन व्यक्तींना क्रूसोप्रमाणे वेगवेगळ्या निर्जन स्थळीं नेऊन सोडलें असतां, एकाने आपलें जीवन अविचाराने खाण्यापिण्यांत व्यतीत करून अखेरीस एक दिवशीं आपला व्याधिग्रस्त

देह नाइलाजाने तेथे टाकला; तर दुसऱ्याने प्राचीन आर्य ऋषिमुनींचा आदर्श स्वतःसमोर ठेवून, आपलें जीवन इंद्रियदमन, मनःसंयम व अध्यात्मचिंतन या मार्गे घालवून शेवटीं शांत चित्ताने अगम्य अनंततत्वांत आपलें पर्याप्त चैतन्य विलीन करून जड पार्थिव देहाचा त्याग केला. आता समाजाच्या अभावीं चांगल्यावाइटाच्या, पापपुण्याच्या, साऱ्या कल्पना विलीन पावतात असें मत गृहीत धरल्यास या उभय व्यक्ति एकाच नैतिक पातळीच्या मानाव्या लागतील. परंतु आमचे वाचक–व विरोधकहि–तसें न मानतां यांतील द्वितीय व्यक्तीला पहिलीपेक्षा अधिक नीतिमान व श्रेष्ठ मानतील असा आम्हांला विश्वास वाटतो.

हीन स्वार्थाने प्रवृत्त होऊन केलेली हिंसा केवळ समाजांत वाईट असते, व अरण्यांत समर्थनीय ठरते असें नाही. इंद्रियाधीनता अनिष्ट ठरविण्यास समाजाचीच आवश्यकता नाही. आत्महत्या वाईट मानली म्हणजे ती भरवस्तींत केली काय किंवा एकांतांत केली काय, निंद्यच. निर्जन जंगलांतून भ्रमण करीत असतां जखमी झालेलें चिमणीचें पिल्लू पाहून कोणाचें मन द्रवलें व त्याने प्रेमाने त्याची जोपासना केली, तर त्याच्या त्या कृत्याला नीतीच्या क्षेत्रांत प्रवेश मिळण्यासाठी त्याने प्रथम सभोंवतालचें अरण्य कापून तेथे मानवी समाजाची प्रस्थापना केली पाहिजे असा आग्रह योग्य होणार नाही! वनांतल्या क्रूसोने सूर्योदयाच्या वेळीं उठण्याचा निश्चय आपल्या मनाशीं करून दुसरे दिवशीं आळसाने तो मोडला तर समाजांत राहून मोहामुळ केलेल्या वचनभंगाप्रमाणेच तेंहि निंद्य ठरेल.

मानवी व्यक्ति समाजाहून वेगळी राहूं लागली तरी तिच्या मनांतील बऱ्यावाईट प्रवृत्तींतला भेद तेवढ्यानेच नाहीसा होत नाही हें वरील उदाहरणांवरून दिसून येईल. परंतु वनवासी क्रूसोच्या मनांत कधी दया

तर कधी क्रूरता, कधी आळस तर कधी उद्योगप्रियता, अशा भिन्न भिन्न वृत्ति उद्भवणें शक्य आहे हें मान्य करूनहि, कोणी येथे एक महत्वाचा आक्षेप उपस्थित करण्याचा संभव आहे. क्रूसोने निरपराध हरिणीला जीवदान देणें व तिची हत्या करणें या दोन कृत्यांत भेद आहे हें खरें; त्यांच्या भिन्न परिणामांवरूनच तो भेद उघड आहे. परंतु त्यांतलें एक ' चांगले ' व एक ' वाईट ' असा नीतिअनीतीचा शिक्का त्यावर कोण मारतें ? आपलें, म्हणजे त्रयस्थ निरीक्षकाचें 'सामाजिक मन'च ना ? स्वत: क्रूसोने त्या कृत्यांना भिन्न मानलें तरी त्यांच्या भेदाकडे तो अशा नैतिक दृष्टीने पाहील काय ? बेटावर या बाजूस फिरणें व त्या बाजूस फिरणें याही भिन्न कृति आहेत. कारण इकडे फिरल्यास निराळीं दृश्यें दिसतील व तिकडे फिरल्यास निराळीं दिसतील. परंतु या कृतींत हा असा भेद असला तरी त्यांतली एक चांगली व दुसरी वाईट असा नैतिक भेद क्रूसो त्यांत करीलच असें नाही. दोन कृतींत भेद मानला तरी तो नीतिविषयकच असतो असें नाही. अन्न खाणें व पाणी पिणें या भिन्न कृती आहेत; पण म्हणून त्यांतल्या भेदाचा नीतिअनीतीशीं कितपत् संबंध आहे ? यासाठी दया व निष्ठुरता यांतला भेद स्वतः क्रूसोनेहि मान्य केला तरी तो त्यांत नैतिक भेद मानेल काय हा मुख्य प्रश्न आहे. आणि रॉबिन्सन क्रूसोसारख्याने तसा भेद मानला, तरी त्या निर्जन बेटावर येण्यापूर्वी ज्या सामाजिक वातावरणांत व कल्पनांत तो वावरत होता, व ज्यांच्या योगें त्याच्या स्वतःच्या आंतहि एक ' सामाजिक मन ' तयार झालें होतें त्याचाच तर तो परिणाम नव्हे ! सामाजिक विचारांच्या कोठारांतून उचललेल्या नीतिअनीतीच्या कल्पनांचें गांठोडें जर क्रूसोने बेटापलीकडे समुद्रात फेकून दिलें, तर तो आपल्या भिन्न भिन्न कृत्यांत नैतिक भेद करील काय ? आणि जर करणार नसेल तर कोणाहि व्यक्तीने कलोपासनेच्या वैयक्तिक

आत्मानंदांत विहार करीत असतां, हीं नीति-अनीतिविषयक कल्पनांची जड 'बोजकी' पार दूर फेकून केवळ स्वतःच्या रंजनाच्या कमी-अधिक तीव्रतेचीच पर्वा करण्यास काय हरकत आहे ?

या सूक्ष्म आक्षेपाच्या निरसनांत आपल्यास नीत्यनीतीच्या कल्पनांचा खरा उगम हातीं लागेल. क्रूसोच्या उदाहरणाच्या आधारेंच आपण विचार करूं. तिसरे दिवशीं तो पुनः त्याच झाडाजवळ गेला असतां त्याला त्या फळांचा मोह पडून, थोडेसें मागेपुढे केल्यानंतर त्याने शेवटीं तीं खाल्लींच असें आपण समजूं. पण प्रथम दिवशींच्या खाण्यांत व या खाण्यांत अंतर आहे. तीं प्रथम खातांना त्याला निर्भेळ ऐंद्रियिक सुख होत होतें. नंतर पोटांत दुखूं लागल्यावरहि, त्यांचा गुणधर्म मला माहीत नव्हता त्याअर्थी तीं खाण्यांत माझा तरी काय दोष होता असें तो स्वतःचें समर्थन करीत होता. मात्र इतःपर तीं खावयाचीं नाहीत असा त्याने त्याच वेळीं मनाशीं निश्चय केला होता; पण इतक्यावरहि तिसऱ्या दिवशीं त्याने तीं फळें पुनः खाल्लीं तेव्हा मात्र त्याला निर्भेळ आनंद झाला नाही. जिव्हेचा ऐंद्रियिक आनंद होत असेल; पण त्याचबरोबर पूर्वनिश्चयाची स्मृति होऊन, आपण त्याविरुद्ध वागण्यांत कांही तरी 'वाईट' करीत आहोंत ही जाणीव त्यांत कटुता कालवीत होती; व तें तात्कालिक जिव्हासौख्य नष्ट झाल्यावर तर ती जाणीव त्याला चांगलाच त्रास देऊं लागली.

क्रूसोला होणाऱ्या या पश्चात्तापाचा खरा अर्थ काय ? ह्या पश्चात्तापाचें बीज त्याच्या स्वतःच्या हृदयांतच आहे. स्वतःच्या हातून कांही तरी 'वाईट' गोष्ट झाल्याची ही जाणीव त्याच्यावर समाजाने लादलेली नाही हें येथे अवश्य ध्यानांत घेतलें पाहिजे. क्रूसोच्या पश्चात्तापाचें मूळ कारण व मर्म हेंच कीं, त्याने तात्कालिक जिव्हा-

सौख्याच्या इच्छेला बळी पडून उत्कृष्ट व निरोगी शरीरस्वास्थ्यविषयक स्वतःच्याच दुसऱ्या एका श्रेष्ठ इच्छेला तितक्या अंशाने विफल केलें होतें. या उभय विरोधी इच्छा त्याच्या स्वतःच्या हृदयांतल्याच आहेत. तात्कालिक सुखेच्छा पूर्ण केली तर आरोग्याच्या इच्छेला विरोध येतो, व आरोग्याची इच्छा पूर्ण करावयाची म्हटल्यास या तात्कालिक सुखेच्छेचें नियंत्रण अनिवार्य ठरतें. अशा परिस्थितींत तात्कालिक सुखेच्छा पुरविल्यास आपण कांही तरी 'वाईट' केल्याचें, व त्या दुसऱ्या इच्छेनुसार वर्तन केलें तर 'चांगलें' केल्याचें, त्याचें त्यालाच वाटूं लागतें. चांगल्यावाइटाच्या या मूलभूत भावनेचा उगम सर्वस्वी त्याच्या स्वतःच्या स्वभावघटनेत असून सामाजिक परिस्थितीचा तो परिणाम नव्हे.

प्रत्येक मानवी व्यक्तीच्या हृदयांत ज्या अशा परस्परविरोधी इच्छा असतात त्यांच्या आपसांतल्या संघर्षांत नीतिकल्पनांचें मूळ सांपडतें. स्वतःच्या दोन अगर अधिक मानसिक प्रवृत्तींच्या या विरोधांतूनच नीतीचे यमनियम उद्भवत असतात. सामाजिक परिस्थितीचा परिणाम होऊन या कल्पनांना व यमनियमांना पुढे अधिक व्यापक व रेखीव स्वरूप येतें हें खरें. पण त्यांचा प्रारंभ व्यक्तीच्या स्वभावांतर्गत या द्वैतभावांतच आहे. नीतीच्या या उगमांत दोन मानसिक घटक आढळतात. परस्परांस पोषक होतील अशा प्रकारें, एकाच वेळीं किंवा भिन्न भिन्न काळींहि, ज्यांचें समाधान करितां येणें शक्य नाही, अशा विरोधी इच्छा मानवी मनांत उद्भूत होत असतात ही एक गोष्ट; व अशा इच्छाद्वंद्वापैकी कोणती तरी एक, दुसरीच्या तुलनेने, 'श्रेष्ठ', 'चांगली', असते ( व अर्थातच ती दुसरी 'कनिष्ठ' व 'वाईट' असते) इतकी जाणीव अगदी सहजगत्याच व्यक्तीच्या मनांत वास करीत असते ही दुसरी गोष्ट. या दोन स्वभावसिद्ध वस्तुस्थितिविशेषांच्या संगमांतून नीतिगंगेचा उगम

होत असतो. व्यक्तीच्या मानससरोवरांत अशा प्रकारें उगम पावणाऱ्या या प्रवाहास पुढे नवनवीन ओहोळ येऊन मिळतात, निरनिराळीं वळणें मिळतात, हा भाग वेगळा.

ज्या प्राण्याच्या स्वभावांत या दोन घटकांपैकी कोणत्याहि एकाचें अस्तित्व नसेल त्याच्या बाबतींत नीतिअनीतीचे प्रश्न उद्भवणार नाहीत. ज्यांच्या मनांत परस्परविरोधी भावनाच नाहीत, व्यवस्थित सैन्यांत सर्व शिपाई एकाच रेषेंत एक दुसऱ्याच्या मागे किंवा बाजूने योग्य प्रकारें उभे असतात त्याप्रमाणे ज्यांच्या सर्व इच्छा एकाच ध्येयावर केंद्रीभूत होऊन त्यांत संघर्षाचा प्रसंगच येऊं शकत नाही, अशा 'स वै मुक्तोऽथवा पशुः' कोटीच्या व्यक्तींच्या ठायीं नीतिविषयक प्रश्न उत्पन्न होत नसतील; परंतु मानव प्राणी हा पशु व देवता यांच्या मधल्या अवस्थेवर असतो. त्याच्या मनांत परस्परविरोधी इच्छा असतात इतकेंच नव्हे, तर त्यांतली एक चांगली व एक वाईट असते ही जाणीवहि तेथे वास करिते. पश्वावस्थेंत व मानवी बाल्यावस्थेंत ही जाणिव नसते. मात्र मानवी बालक मोठ झालें म्हणजे मानसिक वाढीबरोबर ही जाणीवहि स्वभावतःच येते; समाजाकडून उत्पन्न केली जात नाही. अशा दोन विरुद्ध इच्छांपैकी कोणती तरी एक चांगली व दुसरी वाईट मानली पाहिजे ही तुलनात्मक जाणीव व्यक्तीच्या मनांतच निर्माण झाल्यावर, ही इच्छा चांगली का ती चांगली या संबंधीचे कांही धडे समाज व्यक्तीला देऊं शकेल. परंतु नीतिअनीतीच्या भेदाची जाणीवच ज्या अंतःकरणांत मुळांतच नसेल तेथे समाज ती बाहेरून निर्माण करूं शकणार नाही.

अशा या इच्छाद्वंद्वापैकी श्रेष्ठ इच्छेचें पालन करणें म्हणजेच नीति, सद्गुण, पुण्य, सदाचार; व श्रेष्ठ इच्छेस बाजूस सारून कनिष्ठेचे कोड पुरविणें ही अनीति, दुर्गुण, पाप, दुराचार. तरें, अमुक एक इच्छा

श्रेष्ठ व अमुक कनिष्ठ इतकी जाणीव झाल्यावरहि मनुष्य श्रेष्ठ इच्छेला लाथाडून कनिष्ठ इच्छेकडे वळतो तरी कशाने ? याचें उत्तर असें कीं, त्या कनिष्ठ इच्छेच्या विषयांत व्यक्तीला त्या समयीं कांहीं विशेष नकली आकर्षणशक्ति किंवा ओढ प्रतीत होते; ही अनैतिक ओढ वाटण्याचें कारणहि मानवी स्वभावांतच आहे—तें म्हणजे कामक्रोधादि मनोविकार. यांच्या योगेंच मनुष्य सुवर्ण लाथाडून चमकणाऱ्या पितळाकडे, हिरा सोडून चमचमणाऱ्या कांचेकडे, अमृत नाकारून मद्याकडे, धांवतो. या मनोविकारांना नियंत्रणांत ठेऊन, आपली दिशा नेहमी इच्छाद्वंद्वांतील श्रेष्ठ वस्तूकडेच वळलेली ठेवून, वागणें याचेंच नांव नीतिपालन; व याच्या उलट वागणूक म्हणजे पापाचरण. गीतेंत तिसऱ्या अध्यायाचे शेवटीं अर्जुनाने श्रीकृष्णास यासंबंधीं पुढील मार्मिक प्रश्न विचारला आहे:

अथ केन प्रयुक्तोऽयं पापं चरति पूरुषः
अनिच्छन्नपि वार्ष्णेय बलादिव नियोजितः ॥ ३-३६ ॥

यावर सर्वज्ञ भगवान विश्वबोधार्थ उत्तर देतात:

काम एष क्रोध एष रजोगुण समुद्भवः
महाशनो महापाप्मा विद्ध्येनमिह वैरिणम् ॥ ३७ ॥

आवृतं ज्ञानमेतेन ज्ञानिनो नित्यवैरिणा ।
कामरूपेण कौंतेय दुष्पूरेणानलेन च ॥ ३९ ॥

इन्द्रियाणि मनो बुद्धिरस्याधिष्ठानमुच्यते ।
एतैर्विमोहयत्येष ज्ञानमावृत्य देहिनम् ॥ ४० ॥

तस्मात्त्वमिन्द्रियाण्यादौ नियम्य भरतर्षभ ।
पाप्मानं प्रजहि ह्येनं ज्ञानविज्ञाननाशनम् ॥ ४१ ॥

नीति-अनीति, पाप-पुण्य, यांचा वैयक्तिक स्वरूपाचा उगम या दैवी प्रश्नोत्तरांत समर्पक रीतीने वर्णिला गेला आहे. झांकलें जाणारें ज्ञान व त्याला झांकणारा शत्रू हे उभयपक्ष आपल्याच हृदयांत वास करून असतात. इतर मानवबंधूंकडून किंवा अन्य परिस्थितींतून त्यांना थोडीफार कुमक येत असेल; परंतु ते पक्ष मूळचे आपल्यांतलेच आहेत. कित्येक पाश्चिमात्य नीतिशास्त्रज्ञांनीहि हाच दृष्टिकोन व्यक्त केला आहे. मानवी हृदयांतील इच्छासंघर्षाला उद्देशून विख्यात जर्मन तत्वज्ञ हेगेल म्हणतात: "I am not one of the combatants, but rather both of the combatants and also the combat itself."* प्रो. ड्यूई लिहितात: "It is a strife or conflict which goes on in the man himself; it is a conflict of himself with himself. It is not a conflict of himself with something external to him .... It represents the man at strife with himself. He is the opposing contestants as well as the battlefield." † आणि म्हणूनच या अशा संघर्षांत व्यक्तीचें कर्तव्य म्हणून भगवान श्रीकृष्ण अर्जुनास सांगतात:

उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत् ।
आत्मैवह्यात्मनो बंधुरात्मैवरिपुरात्मनः ॥

नीति-अनीतीच्या द्वंद्वाचा उगम अशा प्रकारें मनुष्याच्या विशिष्ट स्वभावरचनेंत असून समाजावर तो अवलंबून नाही. आणि म्हणूनच समाजाचें सान्निध्य असो या नसो, आपोआपच परस्परविरुद्ध श्रेष्ठकनिष्ठ मनोप्रवृत्ती स्वतःतच साठविणारी मनुष्याची द्विधा स्वभावरचना

* Philosophy of Religion, I. 64.

† Psychology. PP, 364-65:

अस्तित्वांत आहे, तोंपावेतो नैतिक भेद व निर्बंध यांचें उन्मूलन शक्य नाही.

यास्थळीं एक खुलासा इष्ट आहे. इच्छांतील हा श्रेष्ठकनिष्ठ भाव तुलनात्मक असतो. जी इच्छा दुसऱ्या एका इच्छेशीं तुलनेत श्रेष्ठ भासेल तीच तिसऱ्या वेगळ्या इच्छेच्या तुलनेत कनिष्ठ ठरूं शकेल. शरीरस्वास्थ्यसंरक्षणाची इच्छा तात्कालिक जिव्हासौख्याच्या इच्छेच्या तुलनेत श्रेष्ठ प्रतीत होईल; परंतु तीच देशकार्यार्थ देहपाताच्या इच्छेच्या मानाने कनिष्ठ ठरेल. मातापितासारख्या जिवलगांच्या सहवासाची सर्व साधारण महती अमान्य न करितांहि समर्थांनी सूक्ष्म तरतमभावाने विचार करून म्हटलें: " देवाच्या सख्यत्वासाठीं । पडाव्या जिवलगांच्या तुटी । सर्व अर्पावें शेवटीं । प्राण तोही वेंचावा " ( दासबोध ); आणि त्याचें प्रत्यंतरहि त्यांनी आपल्या स्वतःच्या जीवनांत दाखवून दिलें. पुढील संस्कृत श्लोकांतहि असाच तरतमभावाचा क्रम आपल्यास आढळतो:

कुलस्यार्थे त्यजेदेकं ग्रामस्यार्थे कुलं त्यजेत्

यासाठीं भिन्न भिन्न परिस्थितींत एकच इच्छा नैतिक किंवा अनैतिक ठरते. आत्मबलिदान व आत्महत्या या उभयतांत स्वप्राणत्यागाचीच कल्पना असली, तरी नैतिक दृष्ट्या त्यांत जमीनअस्मानाचें अंतर मानतात त्याचेंहि कारण यांतच आहे. इच्छांच्या या तरतमपणाच्या पार्श्वभूमींत, स्वतःच्या वैचारिक क्षेत्रांत जी सर्वांत श्रेष्ठ अशी इच्छा व्यक्तीला वाटत असेल, तिचा विषय म्हणजे त्या व्यक्तीचें अंतिम ध्येय होय. इतर सर्व इच्छा-विषय त्या अंतिम ध्येयाला साधनभूत म्हणून स्वीकारलेले असतात. प्रत्येक मानवाच्या मनांत अंतिम ध्येयाची कांही ना कांही स्पष्टास्पष्ट कल्पना ही असणारच. त्या ध्येयाप्रत पोचविणाऱ्या वस्तूंना ती व्यक्ति नैतिक मानते, व विरुद्ध गोष्टींना अनैतिक मानते,

नीत्यनीतीच्या कल्पना अशा रीतीने व्यक्तीच्या हृदयांतच उत्पन्न झाल्यानंतर त्यांच्या वाढींत समाज कोणत्या स्वरूपांत हातभार लावूं शकतो ? एकतर, एखादी व्यक्ति जें अंतिम ध्येय मानीत असेल त्याच्याहि पलीकडे जाऊन अधिक विशाल व उदात्त ध्येय शक्य आहे हें समाज तिला सांगूं शकतो. आणि दुसरें म्हणजे, त्या व्यक्तीनेंच अंतिम ध्येय मान्य केलें तरी तेथें पोचण्यासाठी जीं साधनें ती योग्य समजत असेल त्याहून अन्य साधनांकडे समाज लक्ष वेधूं शकतो. या दोन प्रकारें व्यक्तीच्या नीति-अनीतिविषयक कल्पनांत नेहमीच उत्क्रांति संभवनीय असते; मग ती आत्मचिंतनाच्याच द्वारें होवो किंवा इतर कोणाकडून शिकविली जावो. मात्र अंतिम ध्येयाच्या कल्पनेंतला फरक शेवटीं व्यक्तीच्या स्वतःच्याच मनाला पटला पाहिजे. तिच्या मनाने तें नवें अंतिम ध्येय स्वखुषीने स्वीकारलें पाहिजे. अंतिम ध्येय बौद्धिक तर्कवादाने सिद्ध होत नाहीं; तें अंतिम आहे याचा अर्थच हा कीं, त्याच्या पुष्ट्यर्थ आस्तिस्वरूपी कारण-परंपरा देणें शक्य नाही. त्या अंतिम ध्येयाच्या कल्पनेला व्यक्तीच्या हृदयांतून स्वभावतःच स्वीकृतीचा पडसाद मिळाला पाहिजे. समाज, पिता, गुरु, ग्रंथ, इत्यादि बाह्य साधनें केवळ त्या कल्पनेप्रत व्यक्तीला नेऊन तिचा परिचय करून देऊं शकतील इतकेंच. पुढलें स्वीकृतीचें कार्य ज्याचें त्यानेच केल्याशिवाय त्या ध्येयाला त्या व्यक्तीच्या दृष्टीने नीतिक्षेत्रांत प्रवेश मिळणार नाही. बुद्धिवादाच्या पोचपलीकडच्या अशा विषयांत मनुष्य जो विश्वास ठेवतो, त्यालाच वास्तविक श्रद्धा म्हणतात.

अंतिम ध्येयाचीं, व त्याच्या साधनांचींहि, निरनिराळ्या सामाजिक वातावरणांत वेगवेगळीं रूपें दिसतात म्हणूनच या सार्‍या गोष्टी सर्वस्वी समाजोद्भवच आहेत असें मानण्याकडे कोणाकोणाची प्रवृत्ति होऊं लागते. परंतु अगदी रानटी मनुष्य घेतला तरी त्याच्याहि मनांत याबाबत कांही

तरी कल्पना असणारच; मग केवळ निरोगी दीर्घायुष्य इतकेंच का तीं असेना कालांतराने शारिरिक स्वास्थ्याची जागा मानसिक आनंदाने घेऊन, त्याच्याहि नंतर आध्यात्मिक अनुभवाने तें स्थान, सुसंस्कृत समाजांत तरी, विभूषित केलें आहे.

इन्द्रियाणि पराण्याहुरिन्द्रियेभ्य: परं मन:
मनसस्तु परा बुद्धिर्यो बुद्धेः परतस्तु सः

या भगवद्गीतेंतील उद्गारांत दर्शविलेला क्रम भारतवर्षांत सुपरिचितच आहे ! परंतु, जेथे शारिरिक सौख्य हेंच अंतिम ध्येय मानीत असतील, तेथेहि नीतिअनीतीचे भेद अस्तित्वांत राहतीलच हें विसरतां कामा नये. शारिरिक सौख्याच्या क्षेत्रांतहि सान्याच इच्छा परस्पर पूरक नसतात. आज अनिर्बंध जिव्हासौख्याला बळी पडल्यास उद्यां शारिरिक दु:ख भोगावें लागेल. नेत्रसौख्याच्या नादीं लागून अमर्यादपणे चित्रपट पाहूं लागल्यास डोळेच अधू होतील, मनावर काय परिणाम होईल तो वेगळा. गायकसम्राटाचें मधुर संगीत ऐकतां ऐकतां जागरणावर जागरणें घडूं लागलीं तर शरीरस्वास्थ्यावर व म्हणून श्रवणसामर्थ्यावरहि परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही. मानवी स्वभावांत विरुद्ध इच्छांचें अस्तित्व असल्यानेच आत्मनियंत्रण आवश्यक असतें. मनुष्यत्व व नीतिकल्पना यांचा उगम समकालीन आहे असें म्हणावेसें वाटतें तें यासाठींच. सामाजिक वातावरणांत या आत्मनियंत्रणाची आवश्यकता अधिक स्पष्टपणे प्रतीत होते इतकेंच. समाज मूलभूत वैयक्तिक प्रवृत्तींना जागृत व पल्लवित करूं शकेल, नवीन उत्पन्न करूं शकणार नाही

मानवाचा जन्म अपूर्णावस्थेंत होत असतो. तसें पाहिलें तर सर्वच चराचर सृष्टि अपूर्णावस्थेंत जन्म पावते. परंतु मानवांत व इतरांत

एक महत्त्वाचा भेद आहे. मानवाला स्वतःच्या अपूर्णावस्थेची जाणीव व पूर्णावस्था प्राप्त करून घेण्याची तळमळ असते. पशूंच्या ठायीं ह्याचा अभाव असतो. प्रत्यक्ष असलेली अपूर्णावस्था व अप्राप्त पूर्णावस्थेची लागलेली तळमळ या मानवी स्वभावांतील वैशिष्ट्याच्या पोटीं नीतिनिर्बंधांचा उद्भव होतो. कल्पनेच्या योगाने व आवश्यक तेथे श्रद्धेचें साह्य घेऊन पूर्णावस्थेचें काढलेलें जें चित्र तेंच अंतिम ध्येय होय. त्या अवस्थेला प्राप्त करून घेण्याच्या स्वाभाविक मानवी धडपडींतून नीति, धर्म, शास्त्रें, इत्यादि उगम पावतात. 'असतो मा सद्गमय, तमसो मा ज्योतिर्गमय, मृत्योर्मामृतं गमय' ही वैदिक प्रार्थना हीच तळमळ व्यक्त करिते. विश्वाला ही अपूर्णावस्था कशी प्राप्त झाली, मनुष्याच्या मनांत सत्प्रवृत्तीला विरोधक अशा हीन मनोप्रवृत्ति कां उत्पन्न होतात, याचें समाधानकारक उत्तर आजपावेतों कोणी दिलें असलेसें वाटत नाही. या अपूर्णावस्थेलाच कधी माया तर कधी अज्ञान वा मूल पाप असें संबोधिलें जातें. परंतु ही अवस्था कशीहि आली असली तरी, ती अस्तित्वांत आहे व तिच्यांतून पार पडणें हें मानवाचें स्वभावस्वीकृत ध्येय व कर्तव्य आहे हें खरें.

यासाठी अंतिम ध्येयाकडे जाण्यासाठी जे यमनियम, आचारविचार, व्यक्तीने स्वतः किंवा समाजांतील इतर सुज्ञ व्यक्तींनी, अनुभवोत्तर विचारपूर्वक ठरविले असतील त्यांचें योग्य पालन इष्टच आहे. त्यांतले कांही समाजाकडून शिकविले गेले आहेत येवढ्यामुळेंच व्यक्तीने त्यांची अवहेलना करणें हितकारी ठरणार नाही. अर्थात् ज्यांचा संबंध सर्वस्वी सामाजिक परिस्थितीशीं असेल त्यांचें पालन केवळ वैयक्तिक जीवनांत न केल्यास चालेल. परंतु नीतीचे सारेच नियम अशा स्वरूपाचे नसतात. त्यांतले कित्येक सामाजिक जीवनाप्रमाणेच वैयक्तिक जीवनांतहि आवश्यक

असतात. आणि ते व्यक्तीच्याच खऱ्या हितार्थ असल्याने, त्यांचें पालन म्हणजे कोणा बाह्य शक्तीचें जुलमी बंधन असें म्हणतां येणार नाही. भगवद्गीतेंत केलेला इंद्रियदमनाचा व स्थितप्रज्ञतेचा उपदेश केवळ मुंबई किंवा न्यूयॉर्क येथील रहिवासीच अमलांत आणूं शकतात आणि वनचर करूसोच्या दृष्टीनें तो निरर्थक ठरतो असें थोडेंच ? समाजाच्या त्यागाचा कोणावर प्रसंग आलाच, किंवा कलानिर्मितीच्या उद्देशानें कांही काल कोणी समाजाला आपल्या विचार क्षेत्राच्या बाहेर ठेऊं म्हटलें, तरी त्यासमयींहि नीतिअनीतींविषयी संपूर्ण उदासीनता समर्थनीय ठरणार नाही. ' ललितवाङ्मयाचा आद्यहेतु ' नामक लेखांत प्रा. ना. सी. फडके यांनी, कलानिर्मितीचा आद्यहेतु केवळ आत्मानंदाची अपेक्षा हाच आहे, असें प्रतिपादन केलें आहे.* प्रत्यक्ष जगांत स्थलकालानें बंदिस्त असल्याने वाटेल तेव्हां उपभोग न घेतां येणाऱ्या सौंदर्याला कलेच्या स्वतंत्र क्षेत्रांत अवतीर्ण करून, त्या सौंदर्याचा हवा त्यावेळीं मनसोक्त उपभोग व तज्जन्य आनंदाची निर्वेध लूट स्वतः करणें व अनुषंगानें ती इतरांसहि शक्य करून देणें हा कलावंताचा मुख्य हेतु असतो असें त्यांचें तेथें म्हणणें आहे. † पण असेंहि असलें तरी तो आनंद शुद्ध व सात्त्विक असावा, अंतिम ध्येयाकडे दिशा असणारा असावा, हीन मनोविकारांना उत्तेजित करणारा, अधोगतिगामी, नसावा इतकीच आठवण येथें दिली तर त्याबद्दल कोणीं काय म्हणून आक्षेप घ्यावा ? सौंदर्य हें जसें सात्त्विक व उन्नतिकारक असूं शकतें तसेंच तें मादक व मोहकारि असूं शकतें हें सांगावयास पाहिजे असें नाही. आनंदाचेहि

* ' प्रतिभा ' पाक्षिकाचा १९३५ चा विशेषांक, किंवा ' साहित्य आणि संसार ' हा लेखसंग्रह पहा.

† अभिनयकला, वक्तृत्वकला, यांच्याहि मुळाशीं रसिकनिरपेक्ष केवळ आत्मानंदच असतो काय ?

प्रकारभेद संभवतातच. एकांतांतील कलात्मक सौंदर्योपासनेच्या नांवाखाली, योग्य खबरदारी न घेतल्यास, मनांतल्या हीन अग्नींत घृताची आहुति पडणें अशक्य नाही. पण, कलेंतल्या देवतास्वरूप नीतीला सेविकेची भ्रष्ट उपमा देण्यांत ज्यांना अयोग्यता वाटत नाही, आणि नीतिनियमांना 'काळ्याच्या वस्त्रांतल्या ताजव्याची' हीन उपमा देऊन, क्षणिक ऐंद्रियिक सुखाची तुलना मात्र 'जवाहिऱ्याच्या दुकानांतल्या हिऱ्यां' शीं करण्याचा ज्यांना मोह होतो, त्यांच्यापुढे कलाजन्य आनंद सात्विक व शुद्धच असावा अशा आग्रहाची काय मातब्बरी ?

कलेची निर्मिति आत्मानंदासाठीं असो किंवा रसिकरंजनार्थ असो, तिचा नीतीशीं योग्य संबंध तोडणें इष्ट नाही हें वरील विवेचनावरून स्पष्ट होईल. यासाठीच कलानिर्मितीच्या हेतूसंबंधीच्या विकल्पांच्या वादांत न शिरण्याचा विचार आम्हीं या प्रकरणाचे सुरवातीस व्यक्त केला होता. कलाकाराचें मन समाजांत वावरत असो किंवा इतरत्र भटकत असो, नीति व कला यासंबंधीच्या आपल्या मध्यवर्ती प्रमेयास बाध येत नाहीं. आणि तसें पाहिलें तर समाज म्हणजे या आक्षेपकांना वाटतें तरी काय ? समाजाव्यतिरिक्त व्यक्ति नाही हें जसें खरें, तसेंच व्यक्तींच्याशिवाय समाज म्हणूनहि कांही चीज अस्तित्वांत नसते हेंहि खरेंच आहे. समाज हा व्यक्तींचाच झालेला असतो. व्यक्तींच्या वेगळें समाजाला अस्तित्व प्रदान करणें म्हणजे एक सहस्रांतून दहा शेकडे वजा केले असतां कांही शिलक उरेल असें समजण्यासारखेंच होय. व्यक्तीच्या मनाचेच कांही येरव्ही सुप्त असणारे पैलू सामुदायिक वातावरणांत विशेष स्वरूपांत जागृत होतात, व म्हणून सामाजिक मनोव्यापार वैयक्तिक मनोव्यापाराहून कांही अंशीं भिन्न भासतात. परंतु यांत कोणताहि नवा मानसप्रकार उदयास येत नसून, पिंडीं तेंच ब्रह्मांडीं

या न्यायाने, व्यक्तीचींच मतें त्यांत प्रतिबिंबित झालीं असतात हें विसरून चालणार नाही. सामाजिक व्यवहारांत दृष्टोत्पत्तीस येणाऱ्या गुणदोषांचें मूळ बीज मानवी व्यक्तीच्या स्वभावविशेषांतच असतें. सामाजिक समजुतींतील प्रसिद्ध रूढिप्रियता; परिस्थितींतील स्थित्यंतरामुळे निरर्थक ठरलेल्या जुन्या गोष्टींनाच चिकटून राहण्याची आवड; उपयुक्त नियमांच्याहि शाब्दिक आवरणालाच धरून ठेऊन योग्य अपवादांनाहि मान्यता न देतां सर्वसाधारण नियमांच्या नांवाखाली ज्ञानेश्वर, एकनाथ किंवा टेस् सारख्या निरपराधांचा छळ करण्याचा मूर्खपणा; अविचारी अतीव भावनावशता; प्रसंगीं अमानुष क्रूरता; उलट क्वचित् अनाठायीं विशेष उदारताहि; आवडत्या नेत्यावर अंधभक्ति ठेवण्याची प्रवृत्ति; इत्यादि सामाजिक मनाचे सर्व भलेबुरे गुणधर्म म्हणजे व्यक्तींच्या स्वभावांशांचेच आविष्कार होत! एकेकट्या व्यक्तींत ते सूक्ष्मरूपाने असल्याने सहसा प्रतीत होत नाहीत; तेच एकत्र आले म्हणजे आपल्या बऱ्यावाईट चेष्टांनी सर्वांचें लक्ष वेधून घेतात. *

नीतीचा वर सविस्तर चर्चिलेला उद्भव लक्षांत घेतला म्हणजे खांडेकरांच्या उपरोक्त लेखांतील "नीति कलेमागून जन्माला येते" या उद्गारांची अयथार्थता ध्यानीं येण्यास उशीर लागणार नाही. कलेची ही तथाकथित नीति–पूर्वता श्री. तांबे यांनीहि एका लेखांत निराळ्या दृष्टिकोनांतून प्रतिपादन करण्याचा प्रयत्न केला आहे. 'प्रतिभा' पाक्षिकाच्या वर्ष ३ अंक १०-११ मध्ये "कलेचा उद्भव" या शीर्षका-

* वैयक्तिक मनाशिवाय समष्टिमनाला वेगळें असें अस्तित्व नसतें हें डॉ. वा. वि. आठल्ये यांनी 'नवभारत' मासिकाच्या जुलै व आगस्ट १९४९ या अंकांत लिहिलेल्या शास्त्रीयपरिभाषायुक्त विस्तृत लेखांत समर्पक रीत्या प्रतिपादन केलें आहे.

खाली लिहिलेल्या लेखांत ते म्हणतात कीं कलेचा उद्भव भाषापूर्व असून, नीति–अनीतीच्या कल्पना मात्र भाषेनंतरच्या आहेत. हा कालानुक्रम खरा असेल तर अर्थातच् प्रारंभिच्या अवस्थेकडून पाहतां तरी कला-निर्मितीचा नीतिअनीतीशीं संबंध नाही हें मान्य करावें लागेल.

आता विश्वाच्या आद्यावस्थेचा हा सारा विचार केवळ अनुमान-मयच राहणार हें उघड आहे. परंतु तो करावयाचाच म्हटलें तर आमच्या मतें कलेला नीतिपूर्व मानण्यापेक्षा नीतीच कलापूर्व मानली पाहिजे. आणि भाषेचा वेगळाचें अवघड प्रश्न मध्ये आणल्याने यांत कांही फरक पडेलसें वाटत नाही. श्री. खांडेकर व तांबे यांच्या वरील विधानांच्या मुळाशीं कला व नीति यांच्या स्वरूपांविषयी चुकीचे ग्रह असावेत असें दिसतें. प्रथम कलेचा प्रश्न घेऊं. यासंबंधांत श्री. तांबे यांचें मत असें आहे कीं, कला म्हणजे निसर्गाच्या हांकेला मानवी अंतःकरणाने अपरि-हार्यपणे दिलेलें उत्तर होय. ते म्हणतात; 'कलेचा संभव माणसाच्या इच्छेवर अवलंबून नसून दुर्दम्य होय. मातींत पडलेलें बीज जसें रोपट्याच्या रूपाने उद्भवावयाचेंच तशीच निसर्गाची हाक ऐकल्या-बरोबर मनुष्याच्या हृदयांत ती कलेच्या रूपाने उद्भवावयाचीच ”; “ कला निसर्गाच्या हाकेला मानवी मनानें दिलेलें अपरिहार्य उत्तर होय. ती निसर्गच होय ”. आता आम्हांला असें म्हणावयाचें आहे कीं, ती हाक जरी नैसर्गिक असली, तरी तें उत्तर मात्र सर्वस्वी नैसर्गिक नव्हे. ' नैसर्गिक ' शब्दाचा ज्या नैसर्गिक अर्थाने उपयोग केला असतां, त्याचा स्वतंत्र मानवी इच्छाशक्तीशीं विरोध अगर किमानपक्षीं कार्यकारण-संबंधाभाव दिग्दर्शित होतो, त्या दृष्टीने कला नैसर्गिक नाही. ती हेतुविरहित अगर इच्छा-निरपेक्ष नसते. जी पूर्णपणे हेतुविरहित असेल

ती वास्तविक कलाच नव्हे. सहजगत्या हातांतला कुंचला रंगाच्या भांड्यांत पडून भिंतीवर उमटलेल्या शिंतोड्यांत एखादी सूचक आकृति तयार झाली तर ती कला ठरणार नाही. पण तीच कोणी हेतुपुरःसर काढली तर ती कला ठरेल. वर्षानुवर्षें एकाच खडकावर पाऊस पडून तेथे कांही मूर्ति तयार झाली तर तीहि कला ठरणार नाही. * कलेचा संबंध मानवी इच्छेशीं मुळीच नसून, ती खरोखरच ' अपरिहार्य ' व ' दुर्दम्य ' अशी निसर्गाची केवळ एक प्रतिकृति असेल, तर एखाद्याने चितारलेलें कोणा व्यक्तीचें सुंदर चित्र, व त्याच व्यक्तीचें दर्पणांत किंवा जलाशयांत पडलेलें प्रतिबिंब यांत भेद तो काय उरला ?

परंतु आतापावेतों घेतलेल्या उदाहरणांत मानवी मनाने दिलेलीं उत्तरें नाहींत असें कोणी म्हणेल; म्हणून कांही निराळीं उदाहरणें पाहूं. अरण्यांतून प्रवास करीत असतां वनराजाचें दर्शन होऊन कोणाचे ठायीं भीतीचीं चिन्हें तत्काळ दृग्गोचर झालीं तर भावनेचा हा आविष्कार नैसर्गिक ठरेल; पण म्हणूनच त्याचें स्थान कलेच्या क्षेत्राच्या बाहेर राहील उलट भावनांचा असलाच आविष्कार कोणी कुशल नट रंग-भूमीवर सुरक्षित वातावरणांत करून दाखवील तर ती मात्र कला ठरेल ! एकाएकी विशाल सृष्टिसौंदर्याचें उदात्त दृश्य नजरेस पडून सहजगत्या

* मात्र, भौतिक निसर्गाच्या हालचालीच्या मागेहि कांही सर्वसामर्थ्यशाली चैतन्यशक्ति आहे असें मानलें तर तिच्या दृष्टीने याच नैसर्गिक घटनांना कला म्हणतां येईल Nature is the Art of God असें कोणीसें म्हटलें आहे. आणि महात्मा गांधीहि एके ठिकाणीं म्हणतातः " Side by side with the wonderous mystery of God's artistic handiwork does not that of man appear to be the merest tinshell ?"

मुखांतून आश्चर्योद्गार किंवा ईश्वराविषयी धन्योद्गार बाहेर पडले तर तीहि कला नव्हे. कलेचा संबंध भावनांच्या पहिल्याच नैसर्गिक अपरिहार्य निर्हेतुक आविष्काराशीं नसून, नंतरच्या सहेतुक 'परिहार्य' आविष्काराशीं आहे. 'सिंधू' च्या भावना नटसम्राट बालगंधर्व सहेतुक रीतीने प्रदर्शित करून दाखवितात, म्हणूनच त्यांच्या कलेची ख्याति; परंतु एखादी दुर्दैवी स्त्री खरोखरच अशा प्रसंगांत सांपडून त्या भावना नैसर्गिक व अपरिहार्य रीत्या प्रकट करूं लागली तर 'काय उत्कृष्ट कला आहे ही!' असें म्हणणाऱ्याची समाज काय गत करेल हें न सांगतांहि कळण्यासारखें आहे! बकऱ्यांच्या केकाटण्याची तंतोतंत नकल करणाऱ्यास बक्षिस मिळालेलें पाहून, दुसरे दिवशीं स्वतःच्या कांखेत एक जिवंत पिल्लूच लपवून आणणाऱ्याची शेवटी जनतेने कशी फजीति केली हें ईसापनीतिच्या वाचकांना माहितच आहे. कलेचा उद्भव एका दृष्टीने भावनांच्या नैसर्गिक आविष्कारांत असेल; पण म्हणून कला म्हणजे तसा स्वयंस्फूर्त आविष्कार नव्हे. * कला ही कांही केवळ शारिरिक, यांत्रिक अगर नैसर्गिक क्रिया नव्हे. अंतःस्फूर्तीशिवाय कला उत्पन्न होणार नाही हें खरें;

* आणि यासाठीच *Prehistoric India* by Maitra (पृ. २११) मधील पुढील उताऱ्यांतील कलेच्या वर्णनाशीं आम्ही सहमत नाही. "Art is not a derivative nor a created product of skill; it is most elementary--even as elementary as religion or right, perhaps more elementary than language." श्री. तांबे यांनी या उद्गारांचा आधार आपल्या लेखांत घेतला आहे. परंतु यांतील कलेचें स्वरूप व तिचा भाषापूर्वता यासंबंधीचा भाग बाजूस ठेवला तर, या उताऱ्यांतूनहि कला ही धर्माहून व नीतीहून प्राचीन आहे असा ध्वनि मुळीच निघत नसून, उलट 'even' शब्दाने यांत कांही अंतर असलेंच तर धर्म व नीति हेच कलेहून प्राचीन आहेत असें सुचविलें आहे, या गोष्टीकडे श्री. तांबे यांचें लक्ष गेलेलें दिसत नाही!

पण म्हणून, वा ा जोराने आपोआपच मांड्यावरचें झाकण उडूं लागावें, किंवा एंजिनाचीं चाकें फिरूं लागावीं, तद्वत् अंतस्फूर्तीच्या योगानें कवीचें मुखकमल आपोआप उघडूं लागून त्यांतून निर्हेतुकपणे काव्यबाष्पाचे फवारे सहजगत्याच बाहेर पडूं लागतात, अगर चित्रकार, शिल्पकार, इत्यादींचे हात आपोआप कला निर्माण करूं लागतात हें मात्र खरें नव्हे ! कलेच्या द्वारें ज्याचें प्रकटीकरण करावयाचें तें भलेहि निसर्गाची देणगी असो; परंतु प्रत्यक्ष प्रकटीकरणाची, अमूर्ताला मूर्तावस्था देण्याची, क्रिया मात्र सहेतुक स्वतंत्रेच्छेने प्रेरित होऊनच केलेली असते §

कलानिर्मितीला आवश्यक असलेल्या भावनाविष्काराचें हें सहेतुकत्व ध्यानांत घेतलें म्हणजे कला प्रसविणारें मानवी मन अगदींच अप्रगल्भावस्थेंत असून चालणार नाही हें उघड होईल. प्रत्यक्ष वाघ पाहून भीति वाटणें हा प्रकार पशूंतहि आढळेल. परंतु खरोखर वस्तुस्थिति एक प्रकारची असतां कल्पनेने निराळीच उभी करून तदनुसार भावना प्रकट करणें याला मनाची कांहीं एक वाढ आवश्यक असते. भाषेला त्याच्याहि अधिक मानसिक वाढ हवी असें मानण्यास आधार दिसत नाहीं. वास्तविक पाहतां, मानवी मुखांत वाग्देवीचा प्रवाह प्रथम केव्हा अवतीर्ण झाला हें कोण निश्चित सांगू शकणार ? या क्षणीं मुखांतून बाहेर पडलेला शब्द लागलीच अखंड अवकाशांत समरस होऊन त्याचा मागमूसहि उरत नाही. जलतरंगाहूनहि विरळ व क्षणभंगुर असे हे वाणीचे सार्थ नाद मानवाने प्रथम केव्हा उच्चारले व ऐकले हें कोण सांगू शकणार ? पण कला व भाषा

§ आमचा एकंदर दृष्टिकोन एक प्रकारें थोडक्यांत व्यक्त करावयाचा झाल्यास "कला 'हेतुपुरःसर' असली पाहिजे, आणि त्याचप्रमाणे ती 'नीतिपर' देखील असली पाहिजे; मग ती 'हेतुपुरःसर नीतिपर' नसली तरी चालेल" असें विरोधाभासी वाक्य वापरतां येईल असें वाटतें.

यांना आवश्यक असलेल्या मनाच्या प्रगल्भावस्थेस नीट घ्यानात घेऊन अनुमान करावयाचें म्हटल्यास, भाषेचा उद्भव कलापूर्व मानणेंच आम्हांस रास्त वाटतें.

बरें, कला व भाषा या दोन भगिनींतल्या वडीलधाकुटपणाच्या या वादाचा निर्णय आपण कलेच्या बाजूनेंहि दिला, तरी तिसरी बहीण जी नीति तिच्या याचा वाद येवढ्यानेच कसा निकालांत निघणार? कला नीतीपेक्षाहि मोटीच आहे असा श्री. तांबे यांचा आग्रह आहे. आणि त्याच्या समर्थनार्थ नीति ही भाषेनंतर जन्म पावते असें त्यांनी विधान केलें आहे; परंतु त्या विधानास त्यांनी कोणताहि आधार दिला नाही. वस्तुतः त्यांचें मत कलेप्रमाणेच नीतीच्याहि विपर्यस्त समजुतीवर आधारलेलें आहे. कलेचें स्वरूप अतिव्याप्त मानून, नैसर्गिक मानसिक प्रतिक्रियांनाहि ते कलेतच समाविष्ट करतात व त्यामुळेच त्यांना कलेचा उगम सर्वांत प्राचीन वाटतो हें वर पाहिलें.* परंतु त्याबरोबरच दुसरीकडे नीतीची त्यांची कल्पना इतकी संकुचित दिसते कीं, नीतिशास्त्र (Ethics) व अध्यात्मशास्त्र (Metaphysics) यांत ते कांही भेदच मानीत नाहीत कीं काय असें वाटतें. नीति-अनीतीच्या कल्पना म्हणजे कांही तत्वज्ञानाचे अगर अध्यात्माचे गंभीर प्रश्नच नव्हेत. 'हें दृश्य जग कशापासून उदित झालें, याच्या मुळाशीं केवळ एकात्म शुद्ध चैतन्यच आहे किंवा प्रकृति व पुरुष या दोन तत्वांची मिळून ही सृष्टि झाली आहे, एकजीववादच शेवटीं खरा किंवा अनेकजीववाद योग्य, ईश्वर निर्गुण निराकार आहे किंवा सगुण

* आणि मग त्या निर्हेतुक अ-कलांच्या बाबतींत ज्या कांही गोष्टी लागू पडत असतील त्या आज होणाऱ्या सहेतुक कलानिर्मितीलाहि लागू करण्याचा आग्रह ते धरतात!

साकार आहे, अहिंसा व सत्य हीं निरपवाद तत्वें आहेत किंवा सापवाद आहेत' इत्यादि कूट प्रश्नांच्या उद्भवाच्या पूर्वीच कला उदयास आली असली, म्हणून ती नीतिकल्पनांच्याच उद्भवापूर्वी उगम पावली असें होत नाहीं. प्राचीन अवशेषांत यद्वातद्वा कोरलेली एखादी ओबडधोबड आकृति दिसली कीं तत्कालीन कला म्हणून तिचा उदाहरदा करावयाचा, आणि ती आकृति कोरणाऱ्या हातांच्या लगतच असलेल्या अंतःकरणांत नीतिअनीतिसंबंधी तशाच ओबडधोबडस्वरूपी कल्पनांकडे डोळेझांक करावयाची! अत्यंत रानटी लोकांमध्ये देखील नायकाविषयीं निःसीम स्वामिनिष्ठेच्या, जखमी सोबत्यांविषयी सहानुभूतीच्या, स्त्रीच्या पुरुषविषयक परम एकनिष्ठतेच्या, ज्या कांहीं समजुती रूढ असल्याचें दिसून येतें, त्यांच्या मुळाशीं त्यांच्या त्या अवस्थेस साजेशाच नीतिकल्पनांचें अस्तित्व विनाकारण नाकारणे आम्हांला तरी योग्य वाटत नाही. सारांश, मनाची जी प्रगल्भावस्था व बुद्धीचा जो विकास कलानिर्मितासाठी वर म्हटल्याप्रमाणे आवश्यक आहे, त्या अवस्थेंत एकंदर बाह्य व आभ्यंतर परिस्थितीला अनुरूप अशा बऱ्यावाईटाच्या कल्पनाहि मानवाचें जीवन नियंत्रित करीत असतात. आणि यासाठीच ज्या मानानें कला भाषापूर्व आहे असें कोणी मानेल, निदान त्याच मानानें नीति व धर्म यांच्या कल्पनाहि प्राचीन मानणें सयुक्तिक ठरेल.

शेवटीं, कला ही भाषेच्या व नीतिच्याहि पूर्वी जन्माला आली, व प्रारंभीची कला हेतुनिरपेक्ष अपरिहार्य स्वरूपाची होती, या विधानांनाहि आपण मान्यता दिली, तरी नीति आणि कलोपासना यांच्या परस्पर संबंधाविषयीचा जो वाद आज वर्तमानकाळीं चालला आहे त्याच्या निर्णयावर याचा कितपत् परिणाम होईल हें नीट पाहणें आवश्यक आहे. कला रांगू लागली होती त्यासमयीं वाग्देवी मानवतेच्या गर्भांतच होती

असें गृहित धरलें तरी आज तिचा जन्म होऊन शतकेंच काय पण युगें लोटलीं आहेत; व तिची शैशवावस्था संपून ती पूर्ण प्रौढत्वाप्रत प्राप्त झाली आहे. नीतीनेंहि आपला अंमल सर्वत्र प्रस्थापित केला आहे. आणि प्रारंभीची कला वैयक्तिक व हेतुनिरपेक्षहि असली तरी आज ज्या कलेला अनुलक्षून मुख्यतः हा वाद चालला आहे ती सारी कांही ना कांही हेतु व सामाजिक पार्श्वभूमि मनांत धरूनच निर्माण केली जात आहे. यासाठी प्रारंभीची कला वात्याच शुद्ध असली, व नीतिअनीतीच्या भेदाबद्दल ती उदासीनहि असली, तरी आजच्या आमूलाग्र बदललेल्या परिस्थितींतहि कलानिर्मिति व नीतिनिर्बंध यांत त्या अतिप्राचीन रानटी कालाप्रमाणेच पूर्ण संबंधाभाव शक्य व इष्ट आहे असें प्रतिपादन करणें योग्य होणार नाही. हिमाद्रीसारख्या अत्यंत निर्मळ व स्वभावतःच शुद्ध पर्वताच्या पवित्र अंतरंगांत असणाऱ्या उगमस्थलीं सरितेचें जल शुद्ध ठेवण्याची मुद्दाम खटपट करण्याचें कारण नसेल; परंतु तोच सरितौघ जेव्हां जनवस्तीच्या सपाट प्रदेशावर उतरून अनेक नगरांतून व खेड्यापाड्यांतून वाहत वाहत असंख्य प्राण्यांच्या जीवनाला आधार देतो, तेव्हां त्याच्या प्रवाहांत, विशेषतः जनसमुदायाच्या निकट सान्निध्यांतल्या जलभागांत, कोणीहि अज्ञानाने अगर दुष्टबुद्धीनें अनिष्ट घाण मिळवून तिची लोकोपयोगी शुद्धता नष्ट करूं नये, अशी काळजी घेण्याचा आग्रह धरला, तर तें गैर होईल काय?

## प्रकरण सातवें

# कला आणि नीति

मंडलेश्वरहून इंदूरास जावयाचें असल्यास मध्ये प्रचंड विंध्याद्रि पर्वत ओलांडावा लागतो. काळाकुंड स्टेशनाची हद्द सोडली, म्हणजे कधी उत्तुंग शैलशिखरें तर कधी खोल दऱ्या, कधी नागिणीप्रमाणे वाकडे तिकडे वळसे घेणाऱ्या चोरल नदीवर बांधलेले मोठमोठे पूल, तर कधी निसर्गनिर्मित अडथळयांना न जुमानतां मानवी चिकाटीने पोखरून काढलेले बोगदे, असे सपाट प्रदेशांत सामान्यतः न आढळणारे नानाविध प्रकार दृष्टीस पडून, ते थेट पातळपाण्याचा धबधबा निघून जाईपावेतो टिकतात. घाटीच्या उत्तर टोकाशीं असलेलें त्या धबधब्याचें मनोहर दृश्य नजरेआड झालें, म्हणजे मात्र दोन्ही बाजूंना सपाट मैदान दिसूं लागतें, थंडगार मोकळ्या हवेचा सुखकर स्पर्श पहाड आक्रमण करून आल्याची जाणीव करून देतो, खजुरीचीं उंच उंच झाडें माळवा आल्याची साक्ष पटवितात, आणि आतांपावेतो चढावामुळे हळूं चालणारी गाडी घराजवळ आलेल्या सवत्स धेनू-प्रमाणे जोराने धावूं लागते. बव्हंशीं अशीच स्थिति यावेळेस प्रस्तुत पुस्तकाच्या वाचकांच्या अनुभवास येत असावी. वादाच्या कठिण प्रदेशांतून आता आपण सुखरूपपणे पार पडलों असून मागील सहा प्रकरणांत आपण बराच महत्त्वाचा व अवघड टापू आक्रमण करून टाकला आहे. या प्रवासांत कित्येक मोठमोठ्या साहित्यसेवकांच्या मतांविरुद्ध आपला

मार्ग काढणें आपल्यास भाग पडलें असून, तसें करतांना आवश्यक तितकें आपण त्यांच्या मुद्यांचें व विधानांचें यथायोग्य साधार खंडनहि केलें आहे. आणि, अशा रीतीने शेवटीं कला नीतिविषयकच असावी असा आग्रह नसला तरी तिने नीतिपर मात्र असलेंच पाहिजे हें आपण सिद्ध केलें असून, आता कला व नीति यांच्या या संबंधाचें निश्चित स्वरूप आपल्यास ठरवावयाचें आहे. कलेने नीतिपर राहण्यासाठी कोणकोणत्या दृष्टीने काळजी घेतली पाहिजे, किंवा हीच गोष्ट दुसऱ्या शब्दांत सांगावयाची झाल्यास, कलेंत अनीति कोणकोणत्या मार्गांनी शिरूं शकते, हें आपण पाहूं.

या संबंधांत आपल्यास मुख्यत्वेंकरून चार दृष्टींनी विचार करणें आवश्यक आहे. कलाकाराचा हेतु, त्याने निवडलेला विषय, त्याने उपयोगांत आणलेलीं साधनें, आणि त्याच्या कृतीचा भोक्त्यांच्या मनावर होणारा परिणाम, या त्या चार दृष्टी असून, आपण आता त्यांचा अनुक्रमाने विचार करूं.

पहिली गोष्ट कलाकाराच्या मनांतील हेतूची. प्रत्येक कलाकाराचे मनांत कलानिर्मिति करतांना शुद्ध हेतु वास करणें आवश्यक आहे. आपल्या कृतीपासून इतरांना शुद्ध व सात्विक आनंद प्राप्त होऊन तिने त्यांच्या मानसिक व नैतिक उन्नतीस कारणीभूत व्हावें, या हेतूने प्रेरित होऊनच त्याने आपली कृति निर्माण केली पाहिजे. कर्त्याच्या मनांत याविपरीत हेतु वास करीत असल्यास त्याची कृति श्रेष्ठ कलेंत जमा होऊं शकत नाहीं.* त्याच्या हेतूच्या दुष्टत्वाची

* प्रतापरुद्रीय नामक ग्रंथाचा कर्ता तर स्पष्ट ह्मणतो कीं, "यथा वेदशास्त्रपुराणादेः हितप्राप्तिः अहितान्निवृत्तिश्च तथा तत्समात् काव्यादपि । इयान् विशेषः । काव्यात्कर्तव्यताधीः सरसा अन्यत्र न तथा." काव्याचे

बाधा त्या कृतीच्या भोक्त्यांच्या मनावर होणाऱ्या परिणामाला लागल्यावांचून राहणार नाही, असें सूक्ष्म दृष्टीने पाहिल्यास आढळून येईल. येथे कोणी असा आक्षेप पुढे आणतील कीं, प्रत्येक कलाकृतीच्या बुडाशीं जनतेचें हित करण्याचीच बुद्धि असली पाहिजे, असें म्हट-ल्यास स्वतःचा व स्वतःच्या कुटुंबियांचा चरितार्थ चालविण्यासाठी द्रव्यप्राप्तीच्या आशेने निर्माण केलेल्या उत्तम कृति श्रेष्ठ कलेच्या सदरांत येणार नाहीत. परंतु, कलावंतावर असा अन्याय करावा असें आमचें म्हणणें नसून, इतरांप्रमाणेच त्यांना देखील स्वतःचें व स्वतःच्या आप्तेष्टांचें पालनपोषण करणें आवश्यक आहे हें विसरण्याची गरज नाही. कलाकार म्हणजे कोणी संसारावर लाथ मारलेला विरक्त संन्यासी अगर देहावरील ममतेचा होम केलेला महात्माच असावा असा नियम नाही. यासाठी सर्व दृष्टींनी श्रेष्ठ असलेल्या एखाद्या कृतीला प्रारंभ करतांना जरी त्याच्या मनापुढे प्रत्यक्षपणे योग्य द्रव्यार्जनाची इच्छा असली, तरी तेवढ्यामुळे त्या कृतीच्या श्रेष्ठत्वांत कमीपणा येण्याचें कारण नाही. कित्येक मोटारींना चालू करण्यास एका दांड्याची आवश्यकता असते; परंतु म्हणून तो दांडाच त्या मोटारच्या गतीचें कारण असता असें म्हणतां येईल काय ? तिचें खरेंखुरें कारण आंतली यंत्रसामुग्रीच असून, त्या

योगाने श्रोत्यांना धर्मार्थकाममोक्षादिक चारी पुरुषार्थ प्राप्त झाले पाहिजेत हें रुद्रटाने देखील सांगितलें आहे: "ननु काव्येन क्रियते सरसानामवगमश्चतुर्वर्गे लघु मृदु च नीरसेभ्यस्ते हि त्रस्यन्ति शास्त्रेभ्यः" काव्याचें प्रयोजन काय असावें याविषयीं निरनिराळ्या संस्कृत साहित्यकारांचीं मतें देऊन शेवटीं श्री. काणे 'संस्कृत साहित्यशास्त्राचा इतिहास' या पुस्तकांत म्हणतात: "अशा रीतीनें, काव्याच्या योगानें सदाचाराचें गोड शब्दांनी शिक्षण देऊन धर्मार्थकाममोक्ष या पुरुषार्थांची प्राप्ति करून देणें हा एक काव्याचा उद्देश सर्व साहित्यकारांनीं मान्य केलेला आहे." (पृ. २७६ ).

दांड्याचें कार्य केवळ तिला चालना देणें इतकेंच असतें. तद्वतच्, द्रव्यार्जनाची इच्छा कलाकाराच्या मनांतल्या शुद्ध हेतूला व भावनाविष्करणाला चालना देण्याकारितांच असून, एकदा तशी चालना मिळाली म्हणजे मग विषयाची, साधनांची, व पद्धतीची निवड करतांना मात्र त्याच्यापुढे उपर्निर्दिष्ट हेतूच असला पाहिजे. तेथेहि जर कसेंहि करून अधिकाधिक द्रव्यार्जन करण्याचाच हेतु थैमान घालूं लागला, तर मात्र तो कलाकार आपल्या उच्चत्वापासून च्युत झाला असें म्हणण्यास प्रत्यवाय नाही. कलाकार व द्रव्यार्जन यांच्या संबंधाकडे या दृष्टीनें पाहिलें, म्हणजे पापक्षय किंवा आत्मिक उन्नति आणि द्रव्यलाभ किंवा आर्थिक उन्नति या दोघांचाहि काव्याच्या फलांत समावेश करणाऱ्या मम्मटाच्या पुढील उक्तीची नीट उपपत्ति लागते. काव्यप्रकाशाच्या पहिल्या उल्लासांत तो म्हणतो: 'काव्यं यशसेऽर्थकृते व्यवहारविदे शिवेतरक्षतये । सद्यःपरनिर्वृतये कान्तासंमिततयोपदेशयुजे ॥' रुद्रटाच्या काव्यालंकारांत देखील काव्यापासून कवीला धनलाभ होतो असें स्पष्ट म्हटलें आहे.* कला आणि जीवितसाधन यांचा काय संबंध आहे, कलानिर्मिति केवळ फुरसतीच्या वेळेसच करणें इष्ट आहे किंवा ती चरितार्थाचें मुख्य अगर गौण साधन होऊं शकते, इत्यादि प्रश्नांचीं उत्तरें वाचकांस यांत सांपडतील. §

* "संस्कृत साहित्यशास्त्राचा इतिहास" पृ. २७६ पहा.

§ "प्रतिभा" वर्ष १ अंक १९-२० यांत 'कलोपासकाची दृष्टि' या सदराखालीं 'कलानिर्मिति चरितार्थाचें साधन असावें किंवा नाही ?' या प्रश्नावर रा. रा. नातु, के. नारायण काळे, अ. तु. वाळके व प्रभाकर पाध्ये यांचीं मतें प्रगट झालीं आहेत. परंतु या सर्व वादांतून निश्चित असें कांही उत्तर वाचकांच्या हातीं लागत नाही असें खेदानें म्हणावें लागतें.

कित्येक लोकांचें म्हणणें असें असतें कीं, एखाद्या कृतीचे परिणाम जर चांगले असले तर तिची नीतिमत्ता ठरवितांना कर्त्याच्या

रा. नातू यांना "पोट भरण्याचा भार कलेवर टाकणाऱ्या कलोपासकाच्या एकनिष्ठ कलाप्रेमाच्या बातादेखील व्यर्थ आहेत" असा भरमसाट शेरा मारतांना, प्राचीन कालीं आर्यावर्तात व इतर केवळ एक राजाश्रयाच्या आधारानेच–म्हणजे जीवितसाधन म्हणून–सर्व कला कशा टिकूं शकल्या, आणि आज देखील पुष्कळ पाश्चिमात्य श्रेष्ठ कलावंत कलेवरच कशी उपजीविका करीत आहेत याची विस्मृति पडली असें दिसतें. कलावंताला अनिष्ट कला निर्माण करण्याचा मोह होईल या भीतीनें कलेला उदरपोषणाचें कार्य देणें अयोग्य असल्यास, समाजांतील डॉक्टर, व्यापारी, इत्यादि लोकांनाहि आपल्या धंद्याचा गाशा गुंडाळावयास सांगावें लागेल! कारण तीच भीति तेथेंहि नाही काय? शिवाय, श्री नातूंच्या लेखांत कलेची फार संकुचित व्याख्या गृहीत धरल्याचें दिसतें. रा. काळे यांनी 'फुरसतीचा वेळ' या शब्दसमूहाचा उगीचच बाऊ केला असून, त्यामुळेच फुरसतीच्या वेळीं कलानिर्मिति करूं पाहणाऱ्याला कलेच्या तंत्रावर 'प्रभुत्व मिळविणें व निर्मितीक्षम होणें शक्य नाहीं' असे उद्गार त्यांनी काढले आहेत. लो. टिळक, केळकर, खाडिलकर यांनी संपादकीय व इतर अनेकविध व्यवसाय सांभाळून, व कोल्हटकरांनी वकिलीला चरितार्थाचें साधन करूनच वाङ्मयनिर्मिति केली ना? रा. पाध्ये यांनी या वादांत समतावादाचें घोडें निष्कारण वाजवीपेक्षा जास्त दामटलें आहे. कारण, समतेच्या पायावर समाजरचना झाल्यावर प्रत्येक व्यक्तीला हल्लीपेक्षा अधिक 'विश्रांति' मिळेल हें कबूल केलें, तरी आपला मूळ प्रश्न शिल्लक राहतोच कीं, तेव्हा देखील जीवित-साधनाच्या व्यवसायाच्या वेळेंत केलेली कृति खरी कला होईल किंवा तद्व्यतिरिक्त उरलेल्या काळांत केलेली? समतेच्या काळांत देखील श्रमविभाग तर राहीलच ना? म्हणजे, चरितार्थाचें मुख्य साधन म्हणून एका व्यक्तीकडे एक, दुसरीकडे दुसरें, तिसऱ्या व्यक्तीकडे तिसरें काम अशी

हेतूकडे लक्ष देणें आवश्यक नाही. वास्तविक अशा लोकांना हेतु व परिणाम यांमध्ये जो आत्यंतिक भेद दिसतो, तसा मुळीच नसतो

कामांची वाटणी हल्लीप्रमाणेच होईल. आता, येथे मुद्दा हा प्रश्न उरतोच कीं, चारितार्थाचें मुख्य साधन म्हणून लेखन, शिल्पकाम, अगर इतर एखादें काम करणारी एक व्यक्ति, आणि जिच्या वांटेला स्वतःचें चारितार्थाचें साधन म्हणून एक निराळेंच काम आलें असतांहि आपल्या विश्रांतीच्या काळीं पहिल्या व्यक्तीचेंच--लेखनाचें, शिल्पाचें इ.--काम आवड म्हणून करणारी व्यक्ति, यांमध्ये इतर सर्व गोष्टी समान असतां श्रेष्ठ कलाकार कोण ? सारांश, समतवाद मध्ये आणल्याने आपल्या मुख्य प्रश्नाचा निकाल लागत नाही.

आमच्या मतें या प्रश्नाचें उत्तर आम्हीं वर दिलेंच आहे. पहिली गोष्ट म्हणजे कला व जीवितसाधन यांत आत्यंतिक भेद आहे ही कल्पना सोडली पाहिजे. दुसरी गोष्ट म्हणजे प्रत्यक्ष कलानिर्मिति करीत असतांना कलावंताने द्रव्याकडेच दृष्टि ठेवूं नये हें म्हणणें रास्त असलें, तरी त्याच्या शुद्ध हेतूला चालना देण्यासाठी म्हणून, वर सांगितल्याप्रमाणे, जर द्रव्यार्जनाची अपेक्षा असेल तर तेवढ्यावरून त्याला स्वार्थी व हलक्या कलाकारामध्ये काढ-ण्याचा अट्टाहास कोणीं करूं नये. कलेचा मुख्य संबंध पोटाशीं नसून हृदयाशीं असतो हें खरें; पण पोटाशिवाय नुसतें हृदय राहूं शकत नाही त्याची काय वाट ? उलट, धनाशेची अशी अपेक्षा प्रत्येक वेळेस असली तरच ती खरी कला होईल असा विपरीत आग्रहहि पण धरूं नये. आता एखाद्या कलेला चरितार्थाचे साधन केलें म्हणजे तिचा नीट रीतीने अभ्यास करण्यास चांगली संधि मिळते हा सामान्य नियम खरा; पण म्हणून, एखाद्या हुशार मनुष्याने आपला वकिलीचा ( किंवा डॉक्टरीचा ) धंदा सांभाळून उरलेल्या वेळांत मोठ्या हौसेने व श्रमानें चित्रकलेंत अगर गायनकलेंत नैपुण्य मिळविलें, तर तूं आपली वकिली ( किंवा डॉक्टरी ) सोडल्याशिवाय तुला खरा चित्रकार अगर गायनकार म्हणणार नाही असा दुराग्रह धरून कसें चालेल ?

हें आपण लवकरच पाहूं. परंतु याशिवाय, कर्त्याच्या हेतूकडे लक्ष न देतां केवळ परिणामांवरून नीतिमत्ता अगर अनीतिमत्ता ठरवावी हें मत नीतिशास्त्रांत आता अग्राह्य ठरलें आहे हें मागे सांगितलेंच आहे. भगवद्गीतेंत तर ' कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ' असा कर्त्याच्या बुद्धीला प्राधान्य देणारा स्पष्ट दंडकच घालून दिला आहे वाईट हेतूने प्रेरित होऊन केलेल्या कृतीचा परिणाम अनपेक्षित रीतीने चांगला झाला, तरी त्याचें श्रेय कर्त्याला न मिळतां, उलट त्याच्या हेतूच्या दुष्टत्वाबद्दल मात्र तो दोषी ठरविला जाईल. कल्पना करा कीं, खुंटीवर टांगलेल्या रामरावाच्या ओव्हरकोटावर त्याच्या शत्रूने सायंकाळचे अंधारांत रामराव समजून गोळी झाडली व कर्मधर्म-संयोगाने त्या कोटाच्या खिशांत जाऊन बसलेला एक लहानसा साप त्यायोगें जखमी होऊन बाहेर पडला. अशा रीतीने रामराव सर्पदंशा पासून बचावला खरा; पण त्याचें श्रेय त्या शत्रूस आहे काय? त्याच्या इच्छाशक्तीचा यांत यत्किंचितहि संबंध नसून तिची सर्व खटपट रामरावाच्या नाशासाठीच होती. आणि म्हणूनच शत्रूचें तें कृत्य, प्रत्यक्ष परिणाम चांगला झाला असला तरी, अनीतिच्याच सदरांत घातलें जाईल.

कलाकाराच्या हेतूचा विचार केल्यानंतर आता आपण कलेच्या विषयाकडे वळूं. यासंबंधांत, कला व नीति यांचा आवश्यक संबंध प्रतिपादन करणारे कलेच्या विषयाचें नियमन करीत नसून फक्त तिच्या पद्धतीचें व एकदर धोरणाचें स्वरूप ठरवूं पाहतात, असें आम्हीं मागें तिसऱ्या प्रकरणांत म्हटलें असल्याने, आता कलेच्या विषयासंबंधाने विचार तो काय करावयाचा अशी शंका कोणी येथे उपस्थित करतील. परंतु, कला नीतिपर असल्यावर तिचा विषय नाट्यशास्त्रांतल्या ( नाटकालाच उद्देशून लिहिलेल्या )

न तज्ज्ञानं न तच्छिल्पं न सा विद्या न सा कला ।
न तत्कर्म न वा योगो नाटके यन्न दृश्यते ॥

या श्लोकास अनुसरून वाटेल तो अर्थ शकेल हें जरी खरें असलें, तरी येथे हें देखील ध्यानांत ठेवणें आवश्यक आहे कीं, कांहीं थोडे विषय असे असतात कीं, त्यांचें विवेचन, वर्णन अगर चित्रण एखाद्या सामान्य अगर नवख्या कलावंताने कितीहि काळजीपूर्वक केलें, तरी त्यापासून सर्वसाधारण मनुष्याच्या मनांत प्रायः अनीतिप्रवर्तक विचार उत्पन्न झाल्यावांचून राहणार नाहीत. यासाठी एखाद्या श्रेष्ठ कलावंताने असल्या विषयांपैकी एखाद्याची निवड करून त्यासंबंधांत कांहीं उत्तम कलाकृति प्रसंगानुसार निर्माण करण्यास जरी हरकत नसली, तरी इतर कलाकारांनी त्या विषयांपासून दोन हात दूर राहणेंच इष्ट आहे. आणि ही गोष्ट ध्यानांत घेऊनच, असे कांहीं थोडे विषय कलेच्या सामान्य क्षेत्राबाहेर आहेत असें म्हणतां येईल. कोणत्याहि वस्तूचा योग्य प्रमाणाबाहेर उपयोग केला तर तो नुकसानकारकच होतो हें खरें असतांना देखील दवाखान्यांत कांहीं विशिष्ट औषधांनाच ' विषारी ' असें संबोधण्याचें प्रयोजन ज्याप्रमाणें इतकेंच कीं, त्यायोगें अत्यंत कुशल व प्रवीण चिकित्सकांखेरीज इतरांना त्या औषधांचा उपयोग करण्याची इच्छा होऊन अनर्थ ओढवूं नये. त्याप्रमाणेच कांहीं विशिष्ट विषयांना कलेच्या सामान्य क्षेत्राबाहेर स्थान देतांना कोणाहि श्रेष्ठ व अतिकुशल कलाकाराचें विषयस्वातंत्र्य मर्यादित करण्याचा हेतु नसून केवळ सर्वसाधारण व सामान्य कलाकारांना सावध करणें इतकाच आहे.

तिसरी गोष्ट कलाकाराने कलानिर्मिति करतांना उपयोगांत आणलेल्या साधनांची. वरवर पाहतां साधनांचा व कृतींच्या नीति-

मत्तेचा संबंध दिसत नसला, तरी खोल विचार केला असतां हे बरोबर नाही असें दिसून येतें. कलाकाराने जर आपली साधन अयोग्य रीतीने प्राप्त केलीं असतलि, तर त्यामुळे त्या कृती-पासून उत्पन्न होणाऱ्या कोणाहि सुज्ञ व्यक्तीच्या आनंदांत बिघाड आल्यावांचून राहणार नाही. कल्पना करा कीं, एखादें श्रेष्ठ चित्र पाहून आपलें मन शुद्ध आनंदांत पोहत असतां, कोणीं आपल्या कानांत हळूच असें सांगितलें कीं, त्यांतभरलेला लाल रंग एका निर-पराध मुक्या जीवाची हिंसा करून त्याच्या रक्तापासून तयार केलेला आहे. त्याक्षणींच आपल्या आनंदांत विकृति उत्पन्न झाल्याशिवाय राहील काय ? किंवा, ताजमहालाच्या एकाद्या रसिक प्रेक्षकाला जर अशी खात्रीलायक माहिती कळली कीं, ही भव्य व सुंदर इमारत बांधून होत असतांना अनेक गरीब मजूर केवळ जबरदस्तीने अर्धपोटी वेतनावर राबत होते, आणि त्यांतले कांही तर तें काम चालू असतांना होणाऱ्या जुलुमजबरदस्तीला बळी पडून मेले व पोरक्या झालेल्या त्यांच्या स्त्रीपुत्रादिकांची अत्यंत करुणास्पद दैना झाली, तर त्या रसिकाला इतःपर त्याच ताजमहालाच्या अनुपम बाह्य सौंदर्यापासून पूर्वीसारखाच आनंद होईल काय ? पण अशा रीतीने भोक्त्यांच्या आनंदांत बिघाड उत्पन्न करणारी कृति खऱ्या कलेच्या सदरांत जाऊं शकणार नाही हें उघड आहे. यासाठी प्रत्येक खऱ्या कलाकारानें कला-निर्मिति करतांना वापरावयाचीं साधनें अनीतीपासून अलिप्त ठेवण्याची काळजी घेतली पाहिजे. आता जोंपर्यंत साधनांतली ही अनीति भोक्त्यांना ज्ञात होत नाही तोपर्यंत तरी त्यांना त्या कृतीपासून शुद्ध आनंद प्राप्त होऊं शकेल, असें कोणी येथे म्हणतील. परंतु यावर उत्तर हेंच कीं, अज्ञानावर आधारभूत असलेला कोणताहि आनंद शुद्ध व नित्य असू शकत नाही, हें आजवर कोणीहि सुज्ञाने नाकारलें नाही. आणि याशिवाय असे कीं,

भोक्त्यांचा विचार बाजूस ठेवला तरी, असल्या अनीतिमान् साधनांच्या उपयोगाने कर्त्याचा पाय अनीतीच्या चिखलांत कसा अधिकाधिक रोंवला जातो, व त्याचें मन तात्पुरत्या मिळालेल्या यशाने फुलून अधिकाधिक अनीतीकडे कसें निर्लज्जपणे प्रवृत्त होतें, याचा विचार करावयास नको काय ? जी स्वतःच्या जन्मदात्यालाच अनीतिगर्तेत अधिकाधिक ढकलते, तिला खरी कला म्हणावें तरी कसें ? एवंच भोक्ता आणि कर्ता, या दोघांच्याहि दृष्टीने कलानिर्मितीचीं साधनें शुद्ध ठेवण्याची आवश्यकता सिद्ध होते.

कलानिर्मितीचा हेतु, विषय व साधनें यांचा येथपावेतों विचार झाला. आता राहिले परिणाम. वास्तविक उपनिर्दिष्ट गोष्टींच्या विचाराहून परिणामांचा विचार अगदींच स्वतंत्र आहे असें नाही. वरील गोष्टी अनीतीपासून अलिप्त ठेवण्याचें कारणच हें कीं, त्यांपासून अनिष्ट परिणाम घडून येऊं नयेत. परंतु आपल्यास येथे आता या परिणामांसंबंधी एका विशिष्ट दृष्टीने विचार करावयाचा आहे. कर्त्याचा हेतु उच्च असल्यावर त्याने आपल्या कृतीपासून जनतेवर होणाऱ्या परिणामांकडे लक्ष देणें आवश्यक आहे काय ? आणि तसें तें आवश्यक असल्यास, एखाद्या कृतीपासून घडून येणाऱ्या अनेकविध परिणामांपैकी. कितीकांबद्दल तो जबाबदार राहील, आणि कितीकांची जबाबदारी तो झुगारून देऊं शकेल ? यांपैकी पहिल्या प्रश्नासंबंधाने असें निःशंकपणे म्हणतां येईल कीं, केवळ स्वतःच्या हेतूच्या शुद्धतेकडे लक्ष देऊन कोणी कर्ता आपल्या कृतीच्या प्रत्यक्ष परिणामांकडे सर्वस्वी दुर्लक्ष करूं म्हणेल तर तें योग्य होणार नाही. कर्त्याच्या हेतूची अपेक्षा न ठेवतां नुसत्या परिणामांच्या बरेवाईटपणावरून कोणत्याहि कृतीची नीतिमत्ता ठरवूं पाहणारे एकांगी वादी जसे आपल्यास आढळून येतात, त्याचप्रमाणे केवळ हेतूकडेच लक्ष देऊन परिणामांकडे पूर्ण दुर्लक्ष करण्याचा उपदेश करणार दुसऱ्या टोंकाचे

एकांगी वादीहि कधी कधी निदर्शनास येतात. खरोखर पाहतां, यांपैकीं कोणताच पक्ष पूर्णपणे सत्य नसून, एखाद्या कृतीची नीतिमत्ता अगर अनीतिमत्ता ठरवितांना तिच्या मुळाशीं असलेला हेतु व तिच्यापासून उद्भवणारे परिणाम या दोहोंचाहि विचार करणें आवश्यक आहे. मात्र, एखाद्या कृतीच्या सर्वच परिणामाबद्दल तिच्या कर्त्यास जबाबदार धरूं म्हटल्यास तें देखील योग्य होणार नाहीं. यासाठीं कोणत्या परिणामांबद्दल तो जबाबदार ठरूं शकेल हें आतां आपण पाहूं.

या दृष्टीने पाहिल्यास परिणामांचे पुढील प्रकार करतां येतातः

- परिणाम—
  - अपेक्षित—
    - —इच्छित ( म्हणजेच हेतु. यालाच आंग्ल भाषेंत Motive असें म्हणतात. )
    - —अनिच्छित ( यालाच कांहीं पाश्चिमात्य नीतिशास्त्रज्ञ Intention असें म्हणतात. )
  - अनपेक्षित—
    - —खरोखर अनपेक्षित असतांहि ज्यांची अपेक्षा कर्त्यानें करणें शक्य व आवश्यक होतें असे.
    - —ज्यांची अपेक्षा करणें कर्त्याच्या शक्तीबाहेर होतें असे.

यांपैकीं पहिले इच्छित अपेक्षित परिणाम म्हणजेच कर्त्याच्या मनांतला मूळ हेतु होय. यांचीच कल्पना प्रथम त्याचे मनांत उद्भवून तिला मूर्त स्वरूप देण्यासाठीं तो कार्यास प्रवृत्त झाला असतो. हे परिणाम त्या कृतीपासून खरोखर घडून आले तर तो आपलें कार्य सफल झालें असें समजतो; व उलटपक्षीं विफल झालें

असें मानतो. कलाकाराच्या हेतूविषयीं मागे विवेचन केलेंच असल्याने येथे आता अधिक कांहीं लिहिण्याची आवश्यकता नाहीं. आणि ज्या-अर्थी हे परिणाम घडवून आणण्यासाठीच कर्ता कार्याला प्रवृत्त झाला असतो, त्याअर्थी त्यांच्या बरेवाईटपणाची जबाबदारी त्याचे शिरावर आल्यावांचून राहणार नाही, हें उघड आहे. इतकेंच नव्हे, तर शेवटीं ते परिणाम प्रत्यक्ष घडून न आले तरी देखील त्यांना हेतुस्थान दिल्याबद्दलहि कर्त्यावर जबाबदारी येते हें मागे दाखविलेंच आहे.

परंतु, सर्व इच्छित परिणाम अपेक्षित असले तरी सर्वच अपेक्षित परिणाम इच्छित असतात असें मात्र नव्हे. कित्येक प्रसंगीं आपल्या कृतीपासून एखादा विशिष्ट परिणाम घडून येणार आहे असें आपल्यास माहित असेल. परंतु तो परिणाम इच्छित नसतो, इतकेंच नव्हे तर कधीकधी तो परिणाम घडून न यावा अशीहि आपली इच्छा व खटपट असते. पण त्या मूळ हेतूच्या सफलतेला तो परिणाम अपरिहार्यच असला तर नाइलाजास्तव आपण त्यालाहि घडून येऊं देतो. अशा वेळेस तो अपेक्षित असतो, पण इच्छित नसतो. कल्पना करा कीं, एखाद्या राजाचा शत्रु एका घरांत गुप्तपणें बसला असून त्या घरावर तात्काळ तोफ डागण्याचा हुकूम त्याने सेवकास दिला आहे. दैवदुर्विलासाने त्याच सेवकाचा एकुलता एक मुलगाहि त्याच वेळेस त्या घरांत गोष्टी करीत बसला आहे. अशा वेळीं शत्रूला सावध न करतां मुलाला बाहेर काढण्याचे विफल प्रयत्न पुत्रवत्सल पितृहृदयाने कांहीं वेळ केल्यानंतर, कर्तव्य म्हणून, डोळ्यांत अश्रूंच्या धारा, अंतश्चक्षूंसमोर पत्नीची केविलवाणी मुद्रा, कानांत नवविवाहित स्नुषेच्या हृदयभेदक हंबरड्याचा अस्पष्ट आभास, पण हातांत तोफ शिलगाविण्याची बत्ती, अशा स्थितींत त्या कर्तव्यनिष्ठ अंमलदाराने ती तोफ सोडली, तर या प्रसंगीं स्वपुत्रवध हा अपेक्षित परिणाम असला तरी

इच्छित परिणाम होता असें कोण म्हणूं शकेल? शस्त्रक्रिया करतांना रोग्याला होणारा त्रास हा चिकित्सकाचा एक अपेक्षित परिणाम असला, तरी तो इच्छित होता असा आरोप कोणीं केल्यास चिकित्सक साहजिकच आक्षेप घेईल. माता मुलाला मारते तेव्हां आपल्या कृत्यापासून त्याला दुःख होईल हें तिला माहीत असतें. परंतु, तिचा हेतु मुलाला सुधरविणें हा असून त्याला दुःख देणें हा नसतो हें कोणास सांगावयास पाहिजे असें नाही. तक्षकाला इंद्र सोडीत नाही असें पाहतांच दोघांच्याहि आहुति यज्ञांत टाकूं पाहणाऱ्या जनमेजयाच्या कृत्याचा तक्षकवध हा इच्छित परिणाम झाला असता, पण इंद्रवध हा अपेक्षित परंतु अनिच्छित परिणामांच्या सदरांत गेला असता.

या अपेक्षित परंतु अनिच्छित परिणामांची जबाबदारी कर्त्यावर कितपत येते हें पाहूं गेल्यास असें आढळून येतें कीं, यासंबंधांत होय किंवा नाही असें सर्वत्र लागूं पडणारें एकठशाचें उत्तर देणें शक्य नसून, ही जबाबदारी प्रत्येक कृतीच्या विशिष्ट परिस्थितीवर अवलंबून राहील. जर मूळ इच्छित परिणाम चांगले असतील, व ते घडून येण्यासाठी अपेक्षित अनिच्छित परिणाम अपरिहार्य असतील, तर त्यांच्याविषयी, ते वाईट असले तरी, कर्त्यावर कांही जबाबदारी येणार नाही. उलटपक्षीं, मूळ हेतूच वाईट असला तर ते अनिच्छित परिणाम अपरिहार्य असले तरी कर्त्यावर त्यांची जबाबदारी आल्याशिवाय राहणार नाही. उदाहरणार्थ, आपल्या वैयक्तिक शत्रूचा खून करतांना त्याच्या बरोबरच्या दुसऱ्या एका मनुष्यालाहि मारणें कोणाला भाग पडलें, तर त्याला उभयतांच्या मृत्यूबद्दल जबाबदार धरलें जाईल. जर अनिच्छित अपेक्षित परिणाम अपरिहार्य नसून टाळता येण्यासारखे असतील, तर मात्र त्यांची जबाबदारी, मूळ हेतु

कसाहि असला तरी, कर्त्यावर आलीच पाहिजे. याशिवाय, जेथे हे परिणाम मूळ हेतूस अपरिहार्य असतील तेथे देखील तो मूळ हेतु तरी घडवून आणणें आवश्यक होतें किंवा काय हें पाहिलें पाहिजे.* एखादी कल्पना अश्लील शब्दांनी व्यक्त करण्यापूर्वी ती सभ्य शब्दांत व्यक्त होऊं शकते किंवा नाही हें पाहणें आवश्यक आहे, व तें अशक्यच असल्यास ती मूळ कल्पनाच टाकण्यासारखी नव्हे काय हें ठरविलें पाहिजे. इतका विचार केल्याशिवाय केवळ अनिच्छित असा शिक्का मारून त्या अश्लीलतेची जबाबदारी कर्ता दूर टाकूं शकत नाही. कित्येक प्रसंगीं 'शास्त्रीय विषयांच्या' विवेचनाचे नांवाखाली कांही लेखक आपली अश्लीललेखनाची हौस पुरवून घेतात; आणि नंतर, आमचा हेतु वाचकांस शास्त्रीय ज्ञान करून देणें हा असून त्यांच्या मनांत अश्लील विचार उत्पन्न करण्याचा नव्हता, असें स्वतःतर्फे प्रतिपादन करूं लागतात. अशा वेळेस त्यांनी त्याच विषयांचें सभ्य रीतीने विवेचन करणें अगदीच अशक्य आहे किंवा

* यासंबंधांत कै. श्री. कृ. कोल्हटकर यांनी एके ठिकाणीं केलेल्या अश्लीलतेच्या पुढील समर्थनाकडे लक्ष द्यावें : " अश्लील विचार गाळण्या-संबंधानें आमचें असें मत आहे कीं, नुसती अश्लीलता सर्वथैव निंद्य होय. तीच जर एखाद्या सुंदर विचारासशीं अशा रीतीनें संलग्न असली कीं, ती गाळली असतां तो विचारही आणतां येत नाहीं, तर ती क्षम्य असते. कारण अशा प्रसंगीं अश्लीलतेकडे गौणत्व येऊन, प्रेक्षकांचें मन त्या सुंदर विचारा-कडे वळून जातें." ( 'चंद्रसेन' नाटकावरील टीका ) ' आणतां येत नाहीं,' पण कोणाला ? एखाद्या विशिष्ट लेखकालाच ? असें असेल तर अश्लीलतेच्या धांगडधिंग्याला हा एक परवानाच झाला ! शिवाय, येथ पुढील संस्कृत सुभाषिताची आठवण येते: " मणिना भूषितः सर्पः किमसौ न भयंकरः ? "

काय याचा विचार प्रथम करणें अत्यावश्यक आहे. आणि हें शक्य असतांनाहि ज्यांना अश्लीलतेचा मोह आवरत नाही, त्यांनी या अव्यापारेषुव्यापारांत पडावें कशाला ?

येथपावेतो आपण ज्या परिणामांचा विचार केला ते सर्व अपेक्षित होते. आता अनपेक्षित परिणामांचा विचार करूं लागल्यास आपल्यास प्रथमच यांचे दोन भाग पाडावे लागतील. यांचा एक प्रकार म्हणजे ज्यांची अपेक्षा करणें कर्त्यास शक्य असतांहि त्याने तशी केली नाही, असे परिणाम. या परिणामांच्या जबाबदारींतून कर्ता सुटूं शकणार नाही. उदाहरणार्थ, एखाद्या खोलींत सात आठ वर्षांचा खोडकर मुलगा खेळत असतां एक मनुष्य तेथे भिंतीशी भरलेली बंदूक ठेवून बाहेर गेला. थोड्याच वेळांत त्या मुलाने तिला हात लावल्याने ती उडाली व कांही अपघात झाला. या प्रसंगीं जर तो मनुष्य 'असें कांही होईल याची मला कल्पनाच आली नाही' असें म्हणून आपला बचाव करूं पाहील, तर कोणीहि सुज्ञ 'ती गोष्ट इतकी साहजिक व उघड होती कीं, तुला तिची कल्पना यावयास पाहिजे होती' असें उत्तर देणार नाही काय ? सारांश, ज्यांची अपेक्षा करण्यासाठी एखाद्या विशिष्ट कर्त्याच्या ठायीं असलेल्यापेक्षा अधिक ज्ञानाची व बुद्धीची गरज नसते, त्या परिणामांबद्दलची जबाबदारी ते कर्त्याकडून खरोखर अनपेक्षित असले तरी, तो दूर टाकूं शकणार नाही. मनांत यत्किंचितही स्वार्थापेक्षा न ठेवतां, शुद्ध हेतूने दखील कोणी वैद्यकशास्त्रांतील अर्धवट विद्यार्थी एखाद्या दुर्धररोगपीडित रुग्णावर शस्त्रक्रिया करून त्याच्या अकाली निधनास कारणभूत होईल, तर जवळच राहात असलेला त्याचा वैद्यविद्यापारंगत शिक्षक त्यास या जीवितहानीबद्दल जबाबदार धरल्यावांचून राहणार नाही. कित्येकदां असाच प्रकार अश्लीललेखकांचा असतो. 'आमचा हेतु वाचकांचीं मनें बिघडविण्याचा नसून उलट

समाजास त्याचे दोष दाखवून उन्नतिपथावर नेणें हा आहे' असा त्यांचा नेहमी मुख्य मुद्दा असतो. परंतु त्यांच्या हेतूची शुद्धता आपण जरी मान्य केली तरी, ज्याअर्थी त्यांची दोषाविष्करणाची पद्धति इतकी घातुक असते कीं, त्यामुळे सर्वसाधारण जनतेच्या मनांत अनैतिक विचारच प्रामुख्याने उत्पन्न होतील हें कोणाहि सामान्य बुद्धीच्या मनुष्यास कळूं शकेल, त्याअर्थी या परिणामांची जबाबदारी ते नाकारूं शकत नाहीत.

आता जे परिणाम कर्त्याकडून अनपेक्षित असून ज्यांची अपेक्षा करणें त्याला खरोखर शक्यहि नव्हतें, अशा परिणामांची जबाबदारी मात्र त्याच्यावर टाकतां येणार नाही हें उघड आहे. भरलेली बंदूक एखाद्या आलमारींत शक्य तितक्या काळजीने ठेवून कुलुप लावल्यानंतर कोणी बाहेर गेला असतांना, त्याच्या पश्चात् आलेल्या पाहुण्याचा एखादा व्रात्य मुलगा तेथे शिरून कोठून दुसरीकडून किल्ली मिळवून त्या बंदुकीस हात लावेल, तर त्याला त्या गृहस्थाने काय करावें? कालिदासशूद्रकादिकांनी नाटकें लिहिलीं त्यावेळेस तरुण विद्यार्थीवर्गाचें जीवन अनेक कडक निर्बंधांनीं जखडलेलें असून, त्यांचीं नाटकें बव्हंशीं प्रौढ, विवाहित व सुविद्य स्त्रीपुरुषांचेच दृष्टीस पडण्याचा संभव होता. अशा स्थितींत कांहीं शतकानंतर मुद्रणकलेचा प्रसार होऊन आपल्या नाटकांच्या शेंकड्यांनीं प्रती निघतील, अनेक तरुण अपक्वबुद्धीच्या स्त्रीपुरुषविद्यार्थ्यांच्या हातीं त्या जाऊन त्यांना जाहीरपणे तीं नाटकें शिकविण्यांत येतील, त्याबरोबर समोंवतालची परिस्थिति इतकी बिघडेल कीं, दिवसां आपल्या नाटकांतील शृंगार वाचून सायंकाळींच अनेक अनिष्ट दृश्यें चलच्चित्रपटांत प्रत्यक्ष पाहिलीं जातील, मनुष्याला आपल्या वृत्ति ताब्यांत ठेवण्यास शिकविणाऱ्या निर्बंधांना झुगारून देण्यांत येईल, इत्यादि गोष्टींची

बिचाऱ्या कालिदासशूद्रकादिकांना मुळीच कल्पना नसली तर त्यांत त्यांचा काय दोष ? मग, तरुणांच्या मनोवृत्ति बिघडविण्याबद्दलचा आरोप त्यांचेवर करण्यापूर्वी या गोष्टीचा विचार आधुनिक सूज्ञांनी करावयास नको काय ? आणि, त्यांचीं नांवें पुढे करून, हल्लीची परिस्थिति प्रत्यक्ष पाहत असतांहि जे अश्लील वाङ्मय निर्माण करतात, ते तत्संबंधी जबाबदारींतून कसे सुटूं शकतील ?

एखाद्या कृतीपासून किती प्रकारचे परिणाम घडून येतात, व त्यांपैकी कितीकांची जबाबदारी कर्त्यावर असते हें वर पाहिलें. परंतु, नीति व कला यांच्या संबंधाचे प्रश्न येवढ्यानेच सुटत नाहीत. कित्येक प्रसंगीं असा मुद्दा पुढे केला जातो कीं, कलाकृतीपासून नीतिपर किंवा अनीतिपर विचार उत्पन्न होणें हा प्रत्येक व्यक्तीचा स्वतंत्र प्रश्न असून, त्याची जबाबदारी कलाकारावर टाकणें रास्त नाही. उदाहरणार्थ, प्रो. फडके यांचें मताने एखादी सुंदर कलाकृति "पहात असतां वासनांची बरीवाईट हालचाल झाली तर तो त्या कलावस्तूचा गुण नसून तो प्रेक्षकाच्या विकृत दृष्टीचा परिणाम होय...बोध, नीति, अनीति या साऱ्या गोष्टी मूळ कलाकृतींतल्या नसून तिच्याकडे मनुष्य ज्या दृष्टीनें पाहील त्या दृष्टीवर अवलंबून आहेत." * एखादी कलाकृति पाहून एका व्यक्तीच्या मनांत पापवासना उत्पन्न होतात, तर तीच कृति पाहतांना दुसऱ्या व्यक्तीच्या मनाची यत्किंचितहि चलबिचल होत नाही, असें आहे तर त्या पापवासनांची जबाबदारी कर्त्यावर मुळीच न येतां सर्वस्वी भोक्त्यांवरच टाकण्यास काय हरकत आहे, असें हे आक्षेपक विचारीत असतात.

* 'प्रतिभासाधन ' पृ. ६५-६६.

परंतु या विचारसरणीची सदोषता सिद्ध करणें फारसे कठीण नाहीं. कोणत्याहि कृतीचा परिणाम सर्वांवर सारखा होत नाही हें खरें आहे पण तेवढ्यावरून त्या परिणामाचें कारण सर्वस्वी पाहणाऱ्याच्या मनःस्थितींतच आहे हें म्हणणें, ज्याअर्थी एकच पाणी एकसमयावच्छेदेंकरून एका हाताला ऊष्ण व एका हाताला थंड लागूं शकते ( हें सुप्रसिद्धच आहे ), त्याअर्थी ऊष्णता त्या पाण्यांत मुळीच नाहीं, किंवा ती सर्वस्वी ‘ मनांतच ’ आहे असें म्हणण्याइतकेंच हास्यास्पद होय. एखादा पदार्थ सर्वांना सारखाच गोड लागतो असें नाहीं; पण म्हणून गोडी बाह्य पदार्थांत मुळीच नसून सर्वस्वी ‘मनांतच’ आहे असें म्हणता येईल काय ? * खरोखर पाहूं जातां या उदाहरणांवरून इतकेंच सिद्ध होतें कीं, एखादी कलाकृति पाहून भोक्त्यांच्या मनावर घडून येणाऱ्या परिणामांचें कारण सर्वस्वी बाह्य वस्तूंत किंवा मनःस्थितींत नसून, तें उभयतांत विभागानें वास करीत असतें. पहा कीं, वाईट अगर चांगल्या वासना उद्भवणें हें जर सर्वस्वी वैयक्तिक मनःस्थितीवरच अवलंबून असतें, तर एकाच मनुष्याला एकाच वेळेस दोन चित्रें पाहून निरनिराळ्या वासनांचा अनुभव कसा बरें येऊं शकला असता !

यावरून, भोक्त्यांच्या मनांत उद्भवणाऱ्या परिणामांची जबाबदारी त्यांच्या वैयक्तिक मनःस्थितीप्रमाणेच कलाकृतीवर देखील येते हें वाचकांस उघड होईल. आणि यासाठींच, कोणती मनःस्थिति चांगली व कोणती वाईट हें ठरवितांना अपवादात्मक कलाकृति

*या मनोरंजक प्रश्नांचा सविस्तर विचार आम्ही *The Metaphysics of Berkeley*, या पुस्तकांत ( पृष्ठें ११७-११९ ) केला आहे.

विचारांत न घेतां सर्वसाधारण कलाकृतींचाच विचार करणें रास्त होईल; आणि उलटपक्षीं, कोणती कलाकृति चांगली व कोणती वाईट हें निश्चित करतांना अपवादात्मक मनःस्थितींचा विचार न करतां सर्वसामान्य मनःस्थितीचाच विचार केला पाहिजे. एखाद्या अगदीं नीच कोटीच्या इसमास साधारण स्त्रीचें चित्र पाहून सुद्धा पापवासनांचा अनुभव येऊं लागला म्हणून तेवढ्यासाठीं त्या चित्राला अश्लील म्हणण्याचें कारण नाहीं. उलट, एखाद्या शुकमुनीस किंवा शाक्तमहात्म्यास जगांतील अत्यंत बीभत्स व घाणेरडें, चित्र, वर्णन अगर दृश्य पाहूनहि कांहीं वाटणार नाहीं; पण म्हणून त्या चित्राला योग्य कृतींच्या कोटींत घालणेंहि रास्त होणार नाहीं. हीं दोन्हीं अपवादांचीं उदाहरणें असून, साधारणतः कोणत्याहि कलाकृतीची इष्टानिष्टता ठरवितांना सामान्य मनःस्थितीकडे लक्ष ठेवूनच विचार केला पाहिजे. ज्या कलाकारास आपली कृति जनतेसमोर कधींच प्रदर्शित करावयाची नसून ती फक्त आपल्याच नजरेस पडेल अशा बेताने ठेवावयाची असेल, त्याने वाटल्यास जनतेच्या मनःस्थितीचा विचार करूं नये. पण ज्या कृति सर्वसाधारण जनतेसमोर यावयाच्या आहेत, ज्यांच्यावरून अनेक आबालवृद्ध स्त्रीपुरुषांची दृष्टि फिरणार आहे, त्यांच्या बाबतींत कर्त्याने सामान्य मनःस्थितीचा विचार करणें अत्यंत आवश्यक आहे. आणि यासाठीच हेनरने नग्न स्त्रियांचीं कितीहि ‘ सुंदर ’ चित्रें काढलीं, आणि त्यापासून एकहि अश्लील भावना उत्पन्न होत नाहीं असा ‘ तज्ञांनी ’ कितीहि शेरा मारला, तरी, जोंपावेतो सर्वसाधारण मनःस्थितीच्या बाबतींत तसा अनुभव येत नाहीं, तोंपावेतो सामान्य जनतेच्या दृष्टीने तीं चित्रें अत्यंत अपात्र, व जाहीर रीतीने प्रसिद्ध करण्यास अयोग्य होत यांत संशय नाहीं. या संबंधांत महात्मा गांधींनी एका प्रसंगीं जे अत्यंत समर्पक उद्गार काढले आहेत ते

वाचकांनी अवश्य ध्यानांत घ्यावें. प्रत्येक सुंदर वस्तूंत सत्य भरलें असल्यानें, सौंदर्याच्या द्वारेंच सत्याचा शोध करण्यास निदान कांही थोडे श्रेष्ठ कलावंत तरी समर्थ होऊं शकतील किंवा नाही, या प्रश्नास त्यांनी पुढीलप्रमाणे उत्तर दिलें: "'Some may,' said Gandhiji, 'but here too, just as elsewhere, I must think in terms of the millions. And to the millions we cannot give that training to acquire a perception of Beauty, in such a way as to see Truth in it. Show them Truth first, and they will see Beauty afterwards.'" *

एखाद्या कलाकृतीपासून सर्वसाधारण मनुष्याच्या मनांत जर अनैतिक विचार उत्पन्न होत असतील, तर त्यांची जबाबदारी सर्वस्वी त्या मनुष्यावरच न टाकतां ती कृति अनिष्ट कलेच्या सदरांत टाकली पाहिजे हें वर पाहिलें. परंतु यासंबंधांत आणखी एका गोष्टीचा विचार करणें येथे आवश्यक आहे. कोणत्याहि कलाकृतीपासून भोक्त्यांच्या मनावर होणाऱ्या परिणामांची दिशा कांही अंशीं तिच्या विषयाच्या विशिष्ट परिस्थितीवरहि अवलंबून असते. आणि यामुळेच भिन्न भिन्न परिस्थितींतले विषय घेऊन त्यासंबंधांत बह्यातः सदृश भासणाऱ्या कृति निर्माण केल्या, तरी एकापासून इष्ट पण दुसरीपासून अनिष्ट परिणाम उद्भवण्याचा संभव आहे. सर्वसाधारण हिंदु मनुष्याचे मनांत मारुतीबद्दल इतकी पूज्य भावना वसत असते, व त्याच्या मनांतील या देवतेच्या कल्पनेच्या भोंवतीं ब्रह्मचर्याचें, पावित्र्याचें व उत्कृष्ट शरीरसंपत्तिजनक व्यायामपटुत्वाचें इतकें जबरदस्त आवरण असतें कीं, फक्त लंगोट नेसलेल्या मारुतीचें चित्र कोणीहि खुशाल हिंदु

* *Young India*, 20th November 1924.

मनुष्य अश्लील आहे असें म्हणेलसें वाटत नाही. पण म्हणून वाटेल त्या गृहस्थाचें तत्सदृश चित्र काढलें तर तें सभ्य समजलें जाईल काय? नागपूर येथे डिसेंबर १९३३ मध्ये भरलेल्या मराठी साहित्य संमेलनाचे प्रसंगीं अश्लीलतानिवारणाचा ठराव मांडतांना, एका वक्त्यांनी दोन पती करणाऱ्या स्त्रीची हकीकत असणाऱ्या एका पुस्तकाचा आधुनिक अश्लील वाङ्मयाचें उदाहरण म्हणून उल्लेख केला असतां, त्याला उत्तर म्हणून एका विरोधकांनी पांच पतींना वरणाऱ्या द्रौपदीच्या जीवनाचें वर्णन करणाऱ्या महाभारताची श्रोत्यांस आठवण करून दिली! * परंतु ज्या महाभारतकारांनी पांच पतींना एकाच वेळेस वरणाऱ्या द्रौपदीला महासतींच्या मालिकेंत स्थान दिलें आहे, त्यांनीं तिच्या विवाहाच्या व एकंदर जीवनाच्या भोंवतीं अलौकिकतेचें, असामान्यतेचें, अद्भुततेचें व पवित्रतेचें किती दाट वातावरण निर्माण केलें आहे, व तिच्या त्या विवाहाचा मातृआज्ञापालनाशीं व इतर अनेक गोष्टींशीं निकट संबंध जोडून त्यांपासून मनांवर हीन परिणाम उत्पन्न होण्याचा संभव कसा कौशल्यानें नाहीसा केला आहे, याची सदरहू आक्षेपकांना विस्मृति पडली असें दिसतें! खरी स्थिति अशी असते कीं, सर्वसाधारण श्रोत्यांना त्यांतले प्रसंग इतके अलौकिक व रोजच्या जीवनाच्या कक्षेबाहेरचे वाटतात कीं, त्यांतल्या अशा कांही गोष्टींचें अनुकरण करण्याचा विचार त्यांचे मनांत सहसा उद्भवतच नाही. पण, महाभारतांत पांच पती करणाऱ्या द्रौपदीची हकीगत आहे म्हणून, कोणीं एखाद्यानें आधुनिक सामान्य जीवनांतल्या प्रसंगावर एक आकर्षक कथानक रचून, त्यांत एका स्त्रीस एक पती जिवंत असतांनाहि कांही वैयक्तिक

* "महाराष्ट्र", ता. ३१ डिसेंबर १९३३.

स्वार्थासाठी दुसरा पती करण्याची कशी इच्छा झाली याचें तरुण स्त्रीपुरुषांना असन्मार्गाकडे प्रवृत्त करणारें रसभरित वर्णन केलें, तर तें अश्लीलतेच्या आरोपांतून कसें सुटेल ? परशुरामानें मातृवध केल्याचें पुराणांतरीं वर्णन आहे; म्हणून असल्या कृत्यांचीं आधुनिक जीवनाला उद्देशून लिहिलेलीं कथानकें कोणी प्रसिद्ध करूं म्हणेल, तर तें योग्य होईल काय ? किंवा, वालीचा वध झाल्यानंतर त्याची पत्नी तारा आपल्या कनिष्ठ दीराजवळ—सुग्रीवाजवळ—पत्नी या नात्यानें राहिली असें प्रत्यक्ष रामायणांत वर्णन आहे, म्हणून आजहि तसें करण्यास प्रवृत्त करणारी चोपडीं कुणीं लिहिलीं तर त्याचें कृत्य निषेधार्ह नव्हे असें कोण म्हणेल ? असल्या प्रसंगांपैकीं एखाद्याचा संबंध आपल्या कृतींत आणणें अत्यंत आवश्यकच वाटलें तर त्याला इतक्या कौशल्याची, दक्षतेची व सारासारविवेकयुक्त शुद्ध हेतूची आवश्यकता आहे कीं, आम्हीं मागे म्हटल्याप्रमाणे, सामान्य व नवख्या कला-कारांनी त्याला आपल्या क्षेत्राबाहेरच समजलें पाहिजे. पुराणांत वर्णन केलेल्या सर्वच घटना चांगल्या आहेत असें आमचें म्हणणें नाहीं. परंतु, पुराणांतल्या नायकनायिकांच्या जीवनांत जन्मापासून तों थेट मृत्यूपर्यंत कशी अलौकिकता व असामान्यता भरली असून त्यांचे ठायीं सद्गुणांचा कसा अतुल उत्कर्ष दाखविला आहे, आणि या व इतर सर्व कारणांमुळे सामान्य वाचकांचें लक्ष त्यांतील लौकिक दृष्टीनें आक्षेपार्ह भासणाऱ्या गोष्टींवर स्थिर न होतां त्यांतील सद्गुणांच्या आदर्शांकडेच कसें वळतें, इत्यादि गोष्टींचा मुळींच विचार न करतां, केवळ जुन्या पौराणिक वाङ्मयाचे दाखले देऊन, आधुनिक लेख-कांच्या कांहीं अश्लील कृतींची निषेधार्हता झांकण्याचा प्रयत्न किती फोल आहे हें मात्र वाचकांस यावरून स्पष्ट कळून येईल.

## प्रकरण आठवें.

# कांहीं अवांतर महत्वाच्या गोष्टी

आतापावेतोंच्या आपल्या विवेचनांत ज्यांचा नीटसा उहापोह झालेला नाहीं, अशा कांहीं महत्वाच्या गोष्टींचा या प्रकरणांत आपल्यास विचार करावयाचा आहे.

पहिली गोष्ट कला व प्रचलित नीतीमधील संबंधाची. कलाकाराने स्वतःच्या कालांतील रूढ नीतिनियमांबद्दल आपली दृष्टि कशी ठेवावी याचा ओझरता उल्लेख मागे दुसऱ्या प्रकरणांत आला आहे. परंतु, या महत्वाच्या विषयासंबंधांत कोणाचा शक्यतोंवर गैरसमज होऊं नये म्हणून त्याचा कांहींसा विस्तारानें विचार करणें आवश्यक आहे. या जगांतील नीतिनियमांपैकीं कांहीं त्रिकालाबाधित व शाश्वत असतात; तर कांहींचा जन्म एखाद्या विशिष्ट परिस्थितीस अनुलक्षूनच होत असल्यानें, ती परिस्थिति बदलून तिच्या जागीं दुसरी आली म्हणजे या परिवर्तनशील नीतिनियमांतहि योग्य बदल घडवून आणणें आवश्यक असतें. परंतु मनुष्यप्राणी व्यक्तिशः कितीहि विचारशील असला तरी सर्वसाधारण समाज प्रायः जुन्यास निरर्थक चिकटणारा, परंपरागतिक व सुधारणेसाठीं अनुत्सुक असल्याने, हे नियम निर्जीव रूढींच्या रूपानें तसेच चालू राहून अनेक घातुक परिणाम घडवून आणीत असतात. या नियमांचा मूळ उद्देश शाश्वत नीतितत्वांना प्रत्यक्ष आचरणांत आणविणें हा असला, तरी कालांतरानें

जनतेचें लक्ष यांच्या बाह्य स्वरूपाकडेच लागून त्यांचे द्वारें मूळ उद्देश सफळ होत नसला तरी अज्ञ समाज त्यांचें पालन करीतच राहतो. आणि साधनांना अशा प्रकारें साध्यत्व प्राप्त होऊन, प्रचलित नीतिनियमांच्या नांवाखालीं धुडगूस घालणारे रूढीचे हे निर्जीव सांगाडे समाजांत अंधश्रद्धा, भोळेपणा, अज्ञान, असहिष्णुता, जुलूम इत्यादि अनेक दुष्ट रोगांचीं बीजें पेरण्यास मदत करीत असतात.

अशा वेळेस, या परिवर्तनशील नीतिनियमांच्या बाह्य स्वरूपावरून समाजाचें लक्ष खेंचून तें त्यांच्या मूळ हेतूकडे—शाश्वत नीतितत्वांकडे—वळविणें हें एक अत्यंत महत्त्वाचें कार्य समाजांतील विचारी पुरुषांना करावयाचें असतें. या कार्याचे साधारणतः दोन प्रकार करितां येतील. प्रचलित परिस्थितींत अगदींच निरर्थक व टाकाऊ झालेल्या नियमांना समूळ बदलून त्यांचे जागीं दुसरे योग्य नियम आणणें हा एक; व जे नियम असे सर्वस्वी त्याज्य झाले नसतील त्यांचे पालन योग्य बंधनांनीं मर्यादित करणें हा दुसरा. सती व बालविवाह यांच्याविरुद्ध चालविलेल्या चळवळी पहिल्या प्रकारांत जातील; तर सरसकट बुवाबाजीचें नियंत्रण करून जनतेला फक्त चांगल्या व योग्य साधुपुरुषांचीच भक्ति करावयास सांगणें हें दुसऱ्या प्रकारचें कार्य होऊं शकेल.

निरर्थक व अहितकारी झालेल्या प्रचलित नीतिनियमांविरुद्ध चळवळ करण्याच्या या अत्यंत उपयुक्त कार्यांत कलेने कितपत् भाग घ्यावा ? तिने नीतीचीं बंधनें पाळलीं पाहिजेत असें म्हटल्याने प्रचलित निर्जीव रूढींच्याविरुद्ध ब्र देखील काढण्याचा तिचा हक्क हिरावून घेतला जातो काय ? आमच्या मतें या संबंधांत कलाकार व इतर विचारी पुरुष यांची भूमिका सारखीच आहे. कला नीतिपर असली पाहिजे हें खरें; पण यावरून तिने अनीतीला

विषय करून तिच्याविषयी जनतेच्या मनांत तिरस्कार उत्पन्न करण्याचा प्रयत्न करूं नये असें होत नाही, हें मागे स्पष्ट केलेंच आहे. किंबहुना, नीतीचें कातडें अंगावर घेऊन समाजांत राजरोसपणे वावरणाऱ्या या अनीतीगर्दभीचें वास्तविक स्वरूप जनतेसमोर उघडें करून दाखविणें हें कलेचें एक महत्वाचें कार्य होय यांत शंका नाही. इतकेंच नव्हे, तर हें कार्य करण्यास इतरांपेक्षा एखादा श्रेष्ठ कलाकारच अधिक योग्य असतो. ज्यांच्या लक्षांत या प्रचलित निर्जीव रूढींची निरर्थकता व अहितकारिता येत नाही, त्यांना असल्या चळवळीपासून सर्व नीतिशास्त्रावरच घाला येत आहे असें साहजिकच वाटत असतें; परंतु त्याला उपाय नाही. प्रचलित रूढींविरुद्ध कोणताहि शब्द काढला असतां धर्मनाशाची ओरड करणाऱ्या या सुधारणाशत्रूंना, हल्ली प्रचलित असलेल्या नियमांना देखील प्रथम अस्तित्वांत येतांना त्यांच्यापूर्वींच्या नियमांशीं असाच विरोध करावा लागला होता, याची विस्मृति पडत असते.

वास्तविक पाहतां या लोकांनी थोडाहि विचार केला तर त्यांस दिसून येईल कीं, जगांत आजपावेतो होऊन गेलेल्या सर्व मोठमोठ्या साधुपुरुषांनी प्रचलित व कायम नीतींचा संबंध नीट जुळविण्याचें हें कार्य कमीअधिक प्रमाणांत केलें आहे. तत्कालीन हिंसात्मक यज्ञयागादिकांच्या विरुद्ध आपली अधिकारी वाणी चालविणारे अहिंसेचें जगप्रसिद्ध पुरस्कर्ते भगवान् बुद्ध, विश्वव्यापी प्रेमाचे धडे देण्यांत आपले प्राणहि खर्ची घालणारे येशु ख्रिस्त, सामान्यजनांत पसरलेल्या अज्ञानभ्रांतिमूलक गैरसमजुतींचा नाश करण्याच्या पवित्र कार्यांत जहाल विषाचा पेला आनंदाने प्राशन करणारा महात्मा सॉक्रेटीस, किंवा यांसारख्या कोणत्याहि महान विभूतींचें जीवन पाहिलें तर आपल्यास हीच गोष्ट आढळून येते. बरें, यांना सोडून आपण ज्ञानेश्वररामदासादि महाराष्ट्रीय संतांकडे वळलों तरी आपल्यास काय दिसतें ? समर्थ

रामदासस्वामी व संतशिरोमणि तुकोबा यांनीं तर प्रचलित निर्जीव चालीरूढीविरुद्ध इतके कोरडे ओढले आहेत कीं, त्यांच्यापुढे कांहीं आधुनिक 'सुधारकहि' फिके पडतील ! सगुणभक्तीचा उद्देश निर्गुणप्राप्तीचें एक साधन हाच आहे हें विसरून निबळ मूर्तिपूजेच्या बाह्य भपकाऱ्यांतच गुंग होणाऱ्यांना समर्थ स्पष्ट सांगतात : ' धातु पाषाण मृत्तिका । चित्रलेप काष्ठ देखा । तेथें देव कैचा मूर्खा । भ्रांति पडली ॥ ६-६-४४ ॥ " महंमदानें सोमनाथाची मूर्ति फोडतांच धरणी-वर आंग टाकणाऱ्या भक्तांनी पुढील ओव्या वाचल्या असत्या तर प्रतिकाराची थोडी तरी शक्ति त्यांचे ठायीं आली असती: ' कल्पनेचा केला देव । तेथें जाला दृढ भाव । देवालागीं येतां खेव । भक्त दुःखें दुःखवला ॥ ६-६-१२ ॥ पाषाणाचा देव केला । येके दिवशीं भंगोन गेला । तेणें भक्त दुखवला । रडे पडे आक्रंदे ॥ १३ ॥ देव हारपला घरीं । येक देव नेला चोरीं । येक देव दुराचारीं । फोडिला बळें ॥ १४ ॥ नर्मदागंडिकातीरीं । देव पडिले लक्षवरी । त्यांची संख्या कोण करी । असंख्यात गोटे ॥ १८ ॥ देवें निर्मिली हे क्षिती । तिचे पोटीं पाषाण होती । तयास चि देव ह्मणती । विवेकहीन ॥ ८-१-२९ ॥ भूमंडळीं देव नाना । त्यांची भीड उलंघेना । मुख्य देव तो कळेना । कांहीं केल्या ॥ १९-५-२३ ॥ " भोंदू गुरूंविरुद्ध चालविलेल्या चळवळीच्या नांवाने बोटें मोडणाऱ्यांनीं समर्थांच्या ५-२-२१।११ या ओव्या अवश्य वाचाव्या. ब्रह्म प्राप्त झालें असें ह्मणून वाटेल तसा आचार करणाऱ्यांना उद्देशून समर्थ म्हणतात: " आचार उपासना सोडिती । ते भ्रष्ट अभक्त दिसती । मळो तयांची महंती । कोण पुसे ॥ ५६ ॥ " अंतःकरण शुद्ध नसलेल्यांच्या नुसत्या बाह्य आचाराविरुद्ध तर समर्थांनी अनेक ठिकाणीं कोरडे ओढले आहेत: ( उ. ५-१-२४।३६; ९ १०-८।९; १०-१०-१५।१५; १८-१-२४; १८-८-११-१३ इ. ); आणि

सामान्य जनतेंत पसरलेल्या अनेक भ्रमांचाहि त्यांनी स्पष्ट धिःकार करून ( १०-६ ) म्हटलें आहे कीं, " म्हणोनि जितुका भोळा भाव। तितुका अज्ञानाचा स्वभाव। अज्ञानें तरी देवाधिदेव। पाविजेल कैचा ॥ २०-९-११ ॥ " आचार निंद्य असतांना पुण्यप्राप्तीच्या आशेने नानाविध दान करणाऱ्यांची त्यांनी अशीच हजेरी घेतली आहे (८-७-१०। १९ ); तर अर्थाकडे लक्ष न देतां धर्मग्रंथांची पारायणांवर पारायणें करणाऱ्यांना त्यांनी पुढील झेलका अहेर केला आहे: " अर्थांतर पाहिल्यावीण। उगेंचि करी जो श्रवण। तो श्रोता नव्हे पाषाण। मनुष्यवेषें ॥ ८-६-७ ॥ "

समर्थ रामदासस्वामींनी केलेलें हें अप्रिय पण हितकारक कार्य इतर सर्व साधुसंतांनी देखील केलें आहे असें त्यांचें वाङ्मय वाचलें असतां कळून येतें. त्यांची सविस्तर हकीकत येथें देणें अर्थातच शक्य नाही. प्रचलित व कायम नीतीची इष्ट सांगड घालतांना होणारा विरोध त्यांचे वेळेसहि प्रकट झाला होता. पण, घरांतील घड्याळ सार्वजनिक मुख्य घड्याळाप्रमाणे बरोबर लावीत असणारा मनुष्य सर्व कालमापनाच्याच विरुद्ध जात आहे, किंवा सोन्यावरचा मळ पुसून तें स्वच्छ करणारा सुवर्णकार सोनेंच फेंकीत आहे, इत्यादि आरोप जितपत न्याय्य होतील, तितकाच प्रचलित नीति-नियमांचे नांवाखाली धुडगूस घालणाऱ्या अनीतीला हुसकून लावणारे विचारी पुरुष सर्व नीतिशास्त्रावरच पाणी फिरवीत असतात हा आरोपहि न्याय्य होईल !

शाश्वत नीतितत्त्वांकडे लक्ष देऊन समाजांतील प्रचलित आचार-धर्मांत व नीतिकल्पनांत योग्य फेरबदल घडवून आणण्याचें महत्त्वाचें कार्य आजवर सर्व साधुसंतांनी केलें आहे, व तें कलंकारानेहि

केलें पाहिजे हें वर सांगितलें. परंतु या संबंधांत एक महत्वाची सूचना ध्यानांत ठेवणें आवश्यक आहे. तिच्याकडे दुर्लक्ष केल्यास समाजांत घातुक विचारसरणींचा प्रसार होऊं लागतो. प्रचलित नीतिकल्पनांत बदल करावयाचा तो केवळ शाश्वत नीतितत्वांशीं त्यांचा संबंध पुन्हां प्रस्थापित करण्यासाठींच होय. आणि म्हणूनच शाश्वत व सनातन नीतितत्वांकडे दुर्लक्ष करून, समाजांतलि प्रचलित नीतिकल्पनांत विनाकारण घोंटाळा माजविणारे लोक समाजाचें हित करीत नसून अहितच करीत असतात असें म्हणणें भाग आहे. 'नव्या' नीतिच्या नांवाखाली सनातन नीतितत्वांवरच हल्ला करूं पाहणाऱ्यांनी या गोष्टीकडे लक्ष पुरविल्यास पुष्कळसे वाद मिटून अनर्थ टळतलि. अनिष्ट बंधनांना झुगारणें न्याय्य असलें तरी पूर्णपणे निर्बंधरहित स्थिति केव्हांहि हितकर होऊं शकणार नाही. स्वतंत्रता म्हणजे स्वैराचार नव्हे. सुधारणा म्हणजे जुन्याचा सर्वस्वी नाश नव्हे. अनेक विचारी पुरुषांनी जे निर्बंध व्यक्तीच्या व समाजाच्या योग्य उन्नतीला आवश्यक आहेत असें म्हटलें आहे, त्यांच्याविरुद्ध अपक्व तरुणांचीं मनें चिथावणें हें एखाद्या हितशत्रूला शोभण्यासारखेंच कार्य होय. केवळ कांही पाश्चिमात्य लोक एक प्रकारचें मत प्रकट करितात, म्हणून साधकबाधकविचार गुंडाळून ठेवून, आपल्या देशाच्या विशिष्ट धार्मिक, आर्थिक, सामाजिक व इतर परिस्थितिकडे दुर्लक्ष करून, पूर्वापार चालत आलेल्या उत्कृष्ट संस्कृतीला लाथ मारून कांही अनिष्ट चालीरीतींचा पुरस्कार करूं पाहणें, हें हिंदुस्थानांतल्या घड्याळी ग्रीनविचच्या घड्याळी-बरोबर लावूं पहाण्याइतकेंच हास्यास्पद पण त्याहून अत्यंत अनर्थकारक होय. एकीकडे समाजाला उपयुक्त अशा चळवळी चालविणाऱ्या कांही चांगल्या आधुनिक मासिकांना व नियतकालिकांना

दुसरीकडे समाजविघातक विचारसरणींचा उत्साहाने पुरस्कार करतांना पाहून

प्रायेण सामग्र्यविधौ गुणानां
पराङ्मुखी विश्वसृजः प्रवृत्तिः

या कालिदासोक्तीची आठवण होऊन खेद उत्पन्न होतो !

नवनीतीच्या नांवाखालीं कांही गैरसमजुतीस बळी पडून अनीतीचा प्रसार करणाऱ्यांची गोष्ट वगळल्यास, शाश्वत नीतितत्वांपासून फुटून निघालेल्या प्रचलित कल्पनांना योग्य स्वरूप देणाऱ्या विचारी पुरुषांचें कार्य स्पृहणीय आहे हें खरें असलें, तरी येथे देखील कांही महत्वाच्या गोष्टींकडे लक्ष पुरविणें अत्यंत आवश्यक आहे. ज्या नीतिकल्पना आज अनिष्ट वाटतात, त्यांतल्या बहुतेक एके काळीं इष्ट व आवश्यक होत्या, आणि म्हणून त्या वेळेस त्यांना प्रसृत करणाऱ्यांनी तसें करण्यांत समाजहिताचेंच कार्य केलें होतें ही गोष्ट दृष्टीआड करणें योग्य नव्हे. यासाठीं, असल्या कल्पनांच्या विरुद्ध चळवळ चालवितांना त्यांच्या उत्पादकांवर व्यक्तिशः दुष्टबुद्धीचा शिंतोडा उडणार नाही अशी काळजी प्रत्येक सुज्ञ सुधारणावाद्याने घेणें आवश्यक आहे. या कल्पना त्यावेळेसहि अनिष्टच होत्या असें तुम्हांस वाटत असेल तर त्यांच्या उत्पादकांना फार झालें तर 'अज्ञानी' असें तुम्ही संबोधा. परंतु त्यांचे माथीं वाईट हेतु लादण्याचा प्रयत्न मात्र अयोग्यच होय. आणि त्यांना ' अज्ञानी ' म्हणण्याचे पूर्वी सुद्धा, त्यांच्या वेळच्या परिस्थितीस कोणती गोष्ट आवश्यक होती याचें ज्ञान त्यावेळेस प्रत्यक्ष राहणाऱ्या त्यांना अगर अनेक शतकांच्या अंतरावरून पाहणाऱ्या तुम्हाला अधिक असूं शकतें याचा नीट विचार

करावयास नको काय ? दुष्ट रूढींच्या विरुद्ध यशस्वी चळवळ करणाऱ्याला प्रसंगीं कडक, तेजस्वी, व ओजयुक्त भाषा वापरावी लागते हें खरें; पण याचा अर्थ एखाद्या विशिष्ट व्यक्तीविरुद्ध घाणेरडा आरोप करावा असा मात्र होऊं शकत नाही. त्यांतहि जे लोक जाणूनबुजून स्वार्थाला बळी पडून अधर्माचरण करीत असल्याचें उघडउघड सप्रमाण सिद्ध असेल, त्यांचेविरुद्ध एक वेळ अशी भाषा वापरल्यास चालेल. पण ज्यांच्यावर स्वार्थबुद्धीचा आरोप करण्यास जागा नाही अशा भूतकालीन पूर्वजांच्या विरुद्ध बोलतांना योग्य दक्षता बाळगणें आवश्यक आहे. आणि यासाठीच, विरुद्ध पक्षीयांविषयी सहिष्णुतेचे धडे ज्यांनी साऱ्या जगाला द्यावे अशा महात्मा गांधींना देखील, बालविवाहाला पित्याच्या आवश्यक कर्तव्यांत स्थान देणाऱ्या प्राचीन आर्य स्मृतिकारांना उद्देशून, " Innocent of self-restraint and steeped in vice " असे अनुदारपणाचे उद्गार काढतांना पाहून* मनाला बरें वाटत नाही. स्मृतींतील बालविवाहविषयक सर्व श्लोक प्रक्षिप्त असून कोणीं तरी ते त्यांत मागाहून घातलेले आहेत, व हे नंतरचे लेखक अत्यंत नीच व स्वार्थसाधू होते, या दोन गोष्टी जोंपावेतों सप्रमाण सिद्ध होत नाहीत तोंपावेतों प्राचीन स्मृतिकारांना उद्देशून असे उद्गार काढणें योग्य नव्हे. आत्म्याच्या शोधाच्या मागे लागल्याने शरीरशास्त्राकडे त्यांचें दुर्लक्ष झालें असेल, समाजशास्त्राच्या बाबतींत ते अज्ञानी असतील, दूरदृष्टीचा त्यांचे ठायीं अभाव होता असेंहि वाटल्यास म्हणा, पण तेवढ्यावरून, ज्यांनीं सर्व संसाराचा त्याग केला, स्वार्थाला तिलांजलि दिली, रानावनांत कंदमुळें खाऊन ज्ञानार्जन करणें हाच आपला जीवनक्रम ठेवला

*Young India, 26th August 1926. ( ता. ६-९-२६ चा अंकही पहावा )

अशा प्राचीन स्मृतिकारांना उद्देशून "steeped in vice" असे शब्द वापरणें योग्य दिसत नाही. महात्मा गांधींचे उपर्निर्दिष्ट अपवादात्मक उद्गार पाहून 'Sometimes even the great Homer nods!' या आंग्ल म्हणीची मला आठवण होते!

वरील विवेचनावरून प्रचलित नीतिनियमांविरुद्ध चालविलेली कोणती चळवळ इष्ट असते व कोणती अनिष्ट असते हें वाचकांस कळून येईल. यांतल्या इष्ट चळवळीला पाठिंबा देणें हें केव्हांहि खऱ्या कलेचें एक महत्त्वाचें कार्य होय. किंबहुना वर सांगितल्याप्रमाणे, कलाकारच हें कार्य अधिक उपयुक्त रीतीने पार पाडू शकतो. व्यक्तीला काय किंवा समाजाला काय, दोष दाखवितांना ते हसत खेळत, मनोरंजक रीतीने दाखविले तर तें अधिक परिणामकारक होतें. स्वतःच्या कल्पनासामर्थ्याने वास्तवातील अपूर्णता क्षणभर दूर करून तिच्या पलीकडे आपली दिव्य दृष्टि टाकणारा श्रेष्ठ कलाकार या जगांतील परिवर्तनशील नीतीच्या मुळाशीं असलेली सनातन नीतितत्त्वें चांगलीं जाणू शकतो. मात्र प्रचलित अहितकारक नीतिनियमांविरुद्ध करावयाची ही चळवळ पूर्णपणे नीतिपर असली पाहिजे हें सांगणें नकोच. तिच्या मुळाशीं शुद्ध हेतु असावा, व तिचे परिणाम चांगलेच होतील अशी शक्य तितकी काळजी घेण्यांत यावी. तिने व्यक्तिद्वेषापासून अलिप्त असावें, व विशेषतः कोणत्याहि पूज्य व्यक्तीविषयी तिच्यांत संदिग्ध अगर उघड वाईट उल्लेख नसावा. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे, तिचे ठायीं 'भगवंताचें अधिष्ठान' असलें पाहिजे. तिचें मुख्य सुकाणू विद्वान व सच्चरित्र लोकांचेच हातीं असावें, व त्यांनी देखील सारासारविवेकानें व देशकालपरिस्थित्यादिकांकडे योग्य लक्ष पुरवूनच तिची दिशा ठरविली पाहिजे. येरव्हीं भलत्याच चळवळ्यांच्या

नादीं लागून आगींतून निघून फुफाट्यांत पडण्याची, किंवा तेल व तूप उभयतां सांडून हातीं अंदाधुंदीचें धुपाटणें येण्याची, पाळी मात्र समाजावर यावयाची !

धार्मिक व सामाजिक स्वातंत्र्याबद्दलच्या कांहीं विपर्यस्त कल्पनांच्या नादीं लागून समाजविघातक विचारसरणींचा पुरस्कार करणाऱ्या नवनीतिवाद्यांप्रमाणेच, कलेच्या क्षेत्रांतदेखील स्वतंत्रतेच्या कांहीं विपर्यस्त कल्पनांचें स्तोम माजविणारा एक पक्ष कधी कधी दृष्टोत्पत्तीस येतो. पूर्वीच्या काळीं कला अनेक ठरीव बंधनांनीं जखडलेली होती. आपल्या कृति निर्माण करतांना कलाकारांना प्रचलित धार्मिक व सामाजिक नियमांना, चालींना व रूढींना, आणि त्याचप्रमाणे सत्ताधारी अधिकाऱ्यांच्या लहरींना भिऊन वागावें लागत असे. परंतु जसजसा परतंत्रतेचा व परंपरागत नियमांचा अंमल इतरत्र कमी होऊं लागला, तसतसा तो कलेच्या क्षेत्रांतहि ऱ्हास पावून, कलानिर्मितीसंबंधींच्या पूर्वीच्या कल्पना झुगारून देण्यांत येऊं लागल्या. समाजांतील प्रचलित कल्पनाभावनांनाच कांहीं ठराविक पद्धतीने व्यक्त करणें हेंच कलेचें ध्येय, ही कल्पना जाऊन प्रत्येक कलावंतास व्यक्तिस्वातंत्र्याची जाणीव होऊं लागली, व मीं निर्माण केलेल्या कृतींत माझें स्वतःचें म्हणून कांहीतरी वैशिष्ट्य असलें पाहिजे असें वाटूं लागलें.*

परंपरागत नियमांच्या कडक बंधनांतून सुटून कलाकारांना व्यक्तिस्वातंत्र्याची जाणीव होऊं लागली हें वास्तविक चांगलें झालें. परंतु, याचा एक परिणाम असा झाला कीं, स्वातंत्र्याच्या गोड नांवाखालीं लवकरच कांहीं जणांच्या मनांत संपूर्णपणे निर्बंधरहित अशा नाताळ

* या दृष्टीने केलेली जुन्या व नव्या मराठी काव्याची तुलना श्री. अ. रा. देशपांडे यांच्या "फुलवात" या कवितासंग्रहाच्या प्रस्तावनेंत पृ. ५ ते १० वर सांपडेल.

उच्छृंखळपणाच्या कल्पना घोळूं लागल्या. अत्यंत जाचक आणि पदोपदी अडविणाऱ्या अशा प्रचलित बंधनांच्या विरुद्ध बंड पुकारण्याच्या भरांत, कांही कलावंत आम्ही कोणतेच नियम सहन करणार नाही अशी भाषा वापरूं लागले. कलेच्या स्वैर विहाराला धार्मिक, सामाजिक अगर नैतिक, कोणत्याच नियमांनी बाधा आणतां उपयोगाची नाही असें मत प्रकट होऊं लागलें; व जी सर्वांत कमी नियम पाळणारी असेल तीच श्रेष्ठ कला ठरूं लागली.

आता खरें पाहूं गेलें असतां, स्वतंत्रता म्हणजे परतंत्रतेचा अभाव हें बरोबर असलें तरी तिचा अर्थ निरस्तबंधनता किंवा निर्तंत्रता होऊं शकत नाही हें उघड आहे. स्वतंत्र व्यक्ति अगर राष्ट्रें कोणत्याच बंधनांनी बांधलेले नसतात काय ? वास्तविक दृष्टीने, स्वतंत्रता व परतंत्रता यांत फरक इतकाच कीं, दुसऱ्या स्थितींतलीं बंधनें बाहेरून जबरीने लादलेलीं असतात तर पहिलींतलीं स्वखुशीचीं असतात. परतंत्र व्यक्ति दुसऱ्या कोणाचें तरी साधन असते; स्वतंत्र व्यक्ति स्वतःच साध्य असते. स्वतःच्या कर्मांचें व बंधनांचें साध्य स्वतःतच असणें ही स्वतंत्रता, व तें स्वतःच्या बाहेर असणें याचेंच नांव परतंत्रता. आपलें स्वतंत्र अस्तित्व कायम ठेवण्यासाठी व्यक्तीला व राष्ट्राला अनेक बंधनें पाळावीं लागतात हें प्रसिद्धच आहे. स्वतंत्रतेचा बंधनांशीं विरोध तर नाहीच, पण उलट स्वतंत्रतेच्या पूर्ततेसाठी त्यांची आवश्यकताच आहे. स्वतंत्रता बंधनांच्या अभावांत नसून आत्मसंयमनांत आहे. बंधनें समूळ झुगारून दिलीं तर स्वतंत्रता देखील नाश पावेल असें अनेक विचारवंतांनी जगतास वारंवार बजावून सांगितलें आहे.

कलेवर नीतीचीं बंधनें नसावींत, या बंधनांपासून ती पूर्णपणे ‘स्वतंत्र’ असावी, असें म्हणणाऱ्यांना या पुस्तकांत अनेकवार

उत्तर दिलेलेंच आहे. ‘कलेसाठी कला’ असें मानून तिला पूर्णपणे स्वतंत्र असें अंतिम साध्यस्थान जरी मान्य केलें तरी तेवढ्यावरून ती सर्व बंधनांना झुगारूं शकत नाहीं. ज्याअर्थी अंतिम सौंदर्य हें विषयोपभोगाचें हीन सौंदर्य नसून उच्च, शुद्ध व सात्विक आनंद उत्पन्न करणारें आहे, त्याअर्थी स्वतःच्या योग्य अस्तित्वासाठीच तिने नैतिक बंधनें पाळणें आवश्यक आहे. कारण, हीं बंधनें झुगारून ती उच्छृंखलपणे कल्पना-भावनांच्या स्वैर संचारांतच रममाण होऊं लागेल, तर सात्विक व शुद्ध आनंदाचें जनक असें सौंदर्य व्यक्त करण्याच्या तिच्या कार्यापासून ती च्युत होऊन, ‘कला’ या नांवालाच अपात्र ठरेल. नीतीचीं आवश्यक बंधनें न पाळतां, किंवा नीतिअनीतीविषयी ‘उदासीन’ अगर ‘बेपर्वा’ राहून कला उपर्निर्दिष्ट सात्विक व शुद्ध सौंदर्य व्यक्त करूं शकेल असें आम्हास तरी वाटत नाहीं. व ज्याअर्थी हीं बंधनें पाळून कलेला आणखी कोणाचें हित साधावयाचें नसून स्वतःचेंच शुद्ध व स्वतंत्र अस्तित्व कायम ठेवावयाचें आहे, त्याअर्थी या बंधनांच्या पालनाने तिच्या स्वतंत्रतेंत (स्व+तंत्रता) कोणतीहि बाधा येऊं शकत नाहीं.

परंतु कलेला अशा रीतीने स्वतंत्र साध्यस्थान देण्यास सर्वच साहित्यसेवक तयार आहेत असें नाहीं. कित्येकांच्या मतें कलेचा उपयोग केवळ एक साधन म्हणूनच केला पाहिजे. या मतानुसार कलेने नैतिक बंधनें पाळण्याची आवश्यकता सिद्ध करणें फार सुलभ आहे. कलेला साधनाचें स्थान दिल्यानंतर, तिने आपली योग्य मर्यादा पाळावी आणि अंतिम साध्याला विरोध करून एकंदर मानवी जीवनांत घोंटाळा माजवूं नये, यासाठी तिच्यावर योग्य बंधनें घातलींच पाहिजेत. सुप्रसिद्ध कादंबरीकार प्रो. वा. म. जोशी एके ठिकाणीं लिहितातः “नैतिक तारेच्या सुराशीं कलेच्या तारेचा

सूर जर जुळला नाही, तर जीविताची सतार बदसूर वाजूं लागेल आणि कोणालाच कांही आनंद व्हावयाचा नाही. "

स्वातंत्र्याच्या नांवाखाली नैतिक बंधनें समूळ 'झुगारून' देण्याचा कांही कलाकारांचा प्रयत्न कसा युक्त नव्हे हें वर पाहिलें. परंतु स्वतंत्रतेच्या या उत्साही पुरस्कर्त्यांचा कटाक्ष केवळ नैतिक बंधनांवरच नसून यांना कोणत्याच प्रकारचीं बंधनें नको असतात. खरी कला शेवटीं स्वतःचीं बंधनेंदेखील फेकून देते असें यांचें मत असतें. श्री. वा. गो. आपटे यांनी एके ठिकाणीं यांचें पुढील सुंदर वर्णन केलें आहे : " कवि हे सरस्वती देवीचे मानसपुत्र, तेव्हा त्यांच्यावर सत्य, न्याय, धर्म, नीति, युक्तायुक्तता, संबद्धता वगैरे कोणत्याच गोष्टीचें बंधन नसलें पाहिजे असें प्रतिपादणारा एक लेखकवर्ग अलीकडे निर्माण झाला आहे. या वर्गाला स्वातंत्र्य आणि स्वैरता यांच्यातला भेद कळेनासा झाला आहे. बंधनाचें नांव घेतलें कीं, या मंडळीच्या कपाळाला तिडीक चढते. कल्पनेच्या भराऱ्या सुद्धा 'जोपर्यंत बुद्धीच्या किंवा श्रद्धेच्या कक्षेंत असतात, तोंपर्यंतच त्यांच्या ठिकाणीं काव्यप्रसवसामर्थ्य असतें' असें जर त्यांना कोणीं सांगितलें, तर 'कवीच्या स्वातंत्र्यावर गदा', 'अब्रह्मण्यम्' असा एकच कल्लोळ........उन्मादग्रस्त लेखकाप्रमाणें ते करीत सुटतात...... असल्या निरर्गल प्रलापांचा उल्लेख करण्याइतकीही त्यांची किंमत नाहीं हें सुज्ञांस सांगावयास नकोच. " †

स्वतंत्रतेच्या या हितशत्रूंना आपण वर तिच्या खऱ्या अर्थाचा उलगडा करून व तदनुरोधानें तिचा बंधनांशीं कसा विरोध नाही हें

" सरला भोळे व इंदू काळे, " पत्र ९.

† " लेखनकला. " पृ. ६७.

दाखवून ' मूले कुठारः ' या न्यायानें योग्य उत्तर दिलेंच आहे. परंतु स्वमतपुष्ट्यर्थ ह्या लोकांकडून केल्या जाणाऱ्या अनेक विधानांपैकी एका महत्वाच्या मुद्याचा विचार करणें येथे इष्ट आहे. कारण त्यांत कांही सत्यांश असून, या सत्यांशालाच विकृत स्वरूप देऊन ते स्वतःचें समर्थन करूं पाहतात. यांचें एक म्हणणें असें असतें कीं, कला प्राथमिक अवस्थेंतून बाहेर पडून प्रगल्भावस्थेंत पोंचली म्हणजे ती हळूंहळूं प्रारंभीच्या सर्व निर्बंधांचा त्याग करिते. यांच्या मताने उच्च कलाकार कोणतेहि नियम न पाळतां केवळ स्वतःच्या आनंदांत तन्मय होऊन कलानिर्मिति करीत असतो; किंबहुना तो जितका अधिक निर्बंधशत्रू होऊन आपल्या कृति निर्माण करेल, तितका तो श्रेष्ठ कोटीचा समजला पाहिजे. गायनकलेचा विद्यार्थी प्रत्येक आलाप घेतांना आपण नियम बरोबर पाळतो किंवा नाही हें दक्षतेने पाहत असला, तरी उत्तम व श्रेष्ठ गवई केवल तालसुरांच्या नियमांनाच नव्हे तर या अखिल विश्वाला —फार काय, स्वतःला देखील—विसरून आपल्या स्वर्गीय संगीताने स्वतःच्या व श्रोत्यांच्या वृत्ति उचंबळून सोडतो. व जी गोष्ट गायनाची तीच काव्य, चित्रकला, शिल्पकला इत्यादिकांची.

परंतु, कलावंताला सुरवातीच्या अवस्थेंत नियमांकडे जितकें लक्ष द्यावें लागतें तितकें नंतर द्यावें लागत नाही हें खरें असलें, तरी तेवढ्यावरून तो ते नियम पाळणेंच सोडून देतो असें म्हणतां येईल काय ? उत्तम गवई गातांना तालसुराच्या प्रत्येक नियमाकडे नजर ठेवून गात नसला, तरी चिकित्सक बुद्धीने ऐकणाऱ्या श्रोत्याला त्या गायनांत सर्व आवश्यक नियमांचें पालन झालेलें आढळून येईल. खरी स्थिति अशी असते कीं, कलावंत जसजसा प्रगल्भावस्थेस पोंचत जातो, तसतसें त्याच्या हांतून न कळत आपोआपच नियम-

पालन होऊं लागतें. कलेची प्राथमिक अवस्था व परिणतावस्था यांतील भेद निर्बंधांचें अस्तित्व व नास्तित्व हा नसून, निर्बंधांचें कष्टपूर्वक, मुद्दाम लक्ष पुरवून केलेलें पालन व त्यांचें सहजगत्याच होणारें पालन हा आहे. उच्च कलेचें हें सहजगत्या होणारें नियमपालन लक्षांत न घेतल्यामुळेच, कित्येकांना श्रेष्ठ कलाकार निर्बंधांविषयी 'बेपर्वा' असतात असें वाटत असतें. वास्तविक थोडाहि विचार केला असतां हीं विधानें कशीं चुकीचीं आहेत हें कळून येईल. सायकलवर नवनिच बसणारा मनुष्य प्रत्येक क्षणास तोल सांभाळण्याची काळजी घेत असतो; तेंच, सवय झाल्यावर त्याविषयी यत्किंचितहि विचार मनांत न आणतां, तो अनेक मैल निर्वेधपणे चालला जातो. पण म्हणून आता त्याने तोल संभाळण्याच्या नियमाला झुगारून दिलें असें म्हणणें कितपत् सयुक्तिक होईल ? शाळेंत पहिलें पुस्तक शिकणाऱ्या मुलाला प्रत्येक शब्द लिहितांना शुद्धलेखनाच्या नियमांकडे लक्ष पुरवावें लागतें; तोच विद्वान झाल्यावर त्यांकडे लक्ष न देतां वाटेल तितकें लिहीत जातो. पण यावरून त्याने आता त्या नियमांना झुगारून दिलें, किंवा त्यांचेविषयी तो 'उदासीन' असतो, असें सिद्ध होत नसून, त्याचे हातून त्यांचें पालन सहजगत्याच होत असतें हेंच सिद्ध होतें. आणि हीच गोष्ट सर्वत्र लागू आहे. श्रेष्ठ कलेंत नियमांचा अभाव नसतो, तर नियमांच्या जाचकपणाचा अभाव असतो. आपाततः पाहणाऱ्याला तिचा संचार 'स्वैर' 'निरंकुश' व निर्बंधरहित दिसला तरी आंतून तो पूर्णपणे नियमबद्ध असतो. व अशा रीतीने जी स्वतंत्रपणे नियमबद्ध असेल तीच श्रेष्ठ व खरी कला म्हटली पाहिजे, कारण कलेचें खरें स्वरूप अनिर्बंध स्वैरतेंत नसून योग्य नियमपालनांत व आत्मसंयमनांतच आहे.

येथे जातां जातां एक खुलासा करणें आवश्यक आहे. कित्येक

प्रसंगीं श्रेष्ठ कलाकार सामान्य नियमांचें मुद्दाम लक्षपूर्वक पालन करतांना तर आढळून येत नाहीच; पण उलट असल्या कांही नियमांना उघड उघड मोडतांना ते आढळून येतात. स्वतःच्या विद्यार्थ्याला एखादा नियम मुद्दाम पाळण्यासाठी सांगणारा उच्च कलावंत स्वतः कलानिर्मिति करतांना कधीं कधीं तो खुशाल मोडतांना दिसून येतो. आता निदान अशा प्रसंगीं तरी कला निर्बंधांना झुगारून स्वैर संचार करीत असते असें म्हणण्याचा मोह कित्येकांस होईल. परंतु खोल दृष्टीने पाहतां, तसा प्रकार मुळीच नसल्याचें निदर्शनास येतें. अशा प्रसंगीं श्रेष्ठ कलाकारांच्या नियम मोडण्याचें खरें कारण त्यांना निर्बंधांचें आस्तित्वच खपत नाही असें नसून, त्या ठराविक नियमांपासून प्राप्त होणारें उद्दिष्ट साध्य ते त्यांच्याऐवजी स्वतःच्या नवनिच नियमांचें पालन करून प्राप्त करून घेतात हें होय. हीच गोष्ट एका आंग्ल ग्रंथकाराने पुढील शब्दांत व्यक्त केली आहे: "Genius breaks established laws only to set up others in their place........" * हे नवीन नियम तयार करण्यास व पालन करण्यास श्रेष्ठ कौशल्याची आवश्यकता असल्याने, त्याचा ज्यांचे ठायीं अभाव आहे अशा सामान्य कोटीच्या लोकांसाठी व विद्यार्थ्यांसाठी ठराविक नियम करून दिलेले असतात. एक सुलभ दृष्टांत घेऊन हें स्पष्ट करितां येईल. सायकलवर बसणाऱ्या सामान्य मनुष्याने तिची योग्य दिशा कायम ठेवण्यासाठी पुढचा दांडा नीट पकडणें आवश्यक असतें; परंतु तेंच एखाद्या विशेष निपुण मनुष्याकडे पहा. तो दांड्यापासून आपले दोन्ही हात वेगळे काढून आनंदाने चालला असतो. पण यावरून, सायकलची योग्य दिशा ठेवण्याचा नियम तो झुगारून देतो असें होत नसून, तेंच साध्य तो दांड्याला

* *The Study of Poetry*, by A. R. Entwistle, p. 248.

पकडण्याऐवजी नानाविध अंगविक्षेप करून व इतर अनेक युक्त्यांचा अवलंब करून प्राप्त करून घेतो हेंच दिसून येतें. हीच गोष्ट इतरत्रहि लागू आहे. सारांश, श्रेष्ठ कलाकार जरी कधीं कधीं सामान्य नियम मोडतांना आपल्यास आढळून आले, तरी त्याचें कारण निर्बंधशत्रुता हें नसून, त्या नियमांचे ऐवजी अन्य त्याच कोटीच्या किंवा अधिक व्याप्त व वरच्या कोटीच्या नियमांचें पालन करून ते कलेचें ध्येय अचूक साध्य करून घेतात हेंच होय. या सर्व विवेचनावरून कला व निर्बंध यांचा मुळीच वैरभाव नसून, वरवर निर्बंधमुक्त दिसणारा श्रेष्ठ कलाकार अंतर्यामीं पूर्णपणें निर्बंधयुक्तच असतो, हें वाचकांस स्पष्ट-पणे कळून येईल. आणि यांतच त्याची खरी श्रेष्ठता व स्वतंत्रता अभिप्रेत असते.

कित्येक लोक कलेचा नीतीशीं संबंध आहे किंवा नाहीं हें ठरविण्यांतच इतके गुंग झालेले असतात कीं, नीतीचाहि कलेशीं संबंध असणें आवश्यक आहे या गोष्टीकडे त्यांचें लक्षच जात नाहीं. वस्तुस्थिति अशी आहे कीं, नीतिशास्त्रानें जर कलेवर सर्वस्वी बहिष्कार टाकला असता तर आजपावेतो त्याची या जगांत कितीशी प्रगति होऊं शकली असती याची वानवाच आहे. गणितशास्त्राच्या एखाद्या प्रमेयाप्रमाणे नीतीचे सिद्धांत विद्वानें लोकांच्या बुद्धीला पटतील अशा रीतीनें प्रस्थापित करणें वेगळें; व सर्वसाधारण जनसमुदायाची त्यांना आचरण्यांत आणण्याकडे प्रवृत्ति होईल अशा रीतीनें त्याचें स्पष्टीकरण करणें वेगळें. हें दुसरें कार्य जरी शेवटीं पहिल्यावर अवलंबून असलें, तरी त्यामुळे त्याचें महत्व कमी होत नाहीं. तर्कशास्त्रांतील निगमन व विगमन या दोन अनुमानप्रकारांप्रमाणेच हीं दोन कार्येंहि परस्परांवर अवलंबून आहेत. पहिल्याशिवाय दुसरें निराधार होईल; दुसऱ्याशिवाय

पहिलें निरर्थक व निरुपयोगी ठरेल. मानवी संस्कृतींतील नीतिशास्त्राच्या प्रगतीचा इतिहास नीट पाहिला असतां स्वतःच्या प्रसारासाठी त्याने कलेचा किती उपयोग करून घेतला आहे हें कोणासहि स्पष्ट होईल. परंतु या गोष्टीकडे दुर्लक्ष करून कित्येक लोक वाचकांचे मनांत निष्कारण गैरसमज उत्पन्न करीत असतात. कलेचा नीतीशीं मुळीच संबंध नाही असें प्रतिपादणारें एखादें पुस्तक घेतलें तर त्यांत कोठे तरी पुढील गोष्टीचा उच्चार बहुधा सांपडेलच: 'जें कार्य नीतिशास्त्रज्ञ अनेक व्याख्यानें झोडून किंवा पुस्तकें लिहून करूं शकत नाहीत तें कला एका क्षणांत करिते'; किंवा, 'कलेच्या एका फटकाऱ्यानिशीं जो उदात्त, सात्विक व नैतिक परिणाम घडून येतो तो नीतिशास्त्रवेत्त्यांनी आयुष्यभर बडबड केली किंवा पानेंच्या पानें खरडलीं तरी दृष्टोत्पत्तीस येणार नाही.' पण आता येथे असा प्रश्न उद्भवतो कीं, नीतिशास्त्रविषयक सर्व व्याख्यानें व पुस्तकें कलाविहीन असतात असा जांवईशोध हे लेखक लावतात तरी कोणत्या आधारावर ? किंवा, लेखन व वक्तृत्व या मुळी कलाच नव्हत असें त्याच कलांच्या या उपासकांचें म्हणणें आहे ? अथवा, या कलांची व्याप्ति फक्त कादंबऱ्या, नाटकें, गोष्टी इत्यादिकांपुरतीच मर्यादित आहे असें यांना वाटत असतें ? एखाद्या नीतितत्वाचें स्पष्ट प्रतिपादन करणारी कृतीच कला होऊं शकेल हा आग्रह जितका एकांगी, तितकाच एकांगी अशी कोणतीच कृति कलेच्या सदरांत येऊं शकत नाही हा आग्रह देखील नव्हे काय ? सौंदर्यप्रधान कृति नीतिपर असणें अशक्य हें जितकें असत्य, तितकेंच नीतिप्रधान कृति सुंदर असूं शकत नाही हें देखील असत्य आहे. आता ज्याप्रमाणे नीतीला सर्वस्वी झुगारून केवळ हीन सौंदर्याच्या नादीं लागणारे कांही 'कलोपासक' आढळून येतात, त्याप्रमाणेच सौंदर्यावर

सर्वस्वी बहिष्कार टाकून शुद्ध नीतितत्वांचें शुष्क प्रतिपादन करूं पाहणारे कांहीजण देखील आढळणें असंभवनीय नांही. पण तेवढ्यावरून नीतिशास्त्रावरील सर्वच ग्रंथ व व्याख्यानें कलाविहीन असतात असें कसें म्हणतां येईल ?

नीतिशास्त्र व कला यांत हे लेखक दाखवूं पाहतात त्याप्रमाणे छत्तिसाचा आंकडा नसून नीतितत्वांच्या प्रतिपादनांत लेखनकला व वक्तृत्वकला यांचा तर विशेषेंकरून उपयोग होत असतो, हें लक्षांत घेतलें म्हणजे उपर्निर्दिष्ट वाक्यें कशीं अर्थशून्य आहेत हें कळून येईल. आणि त्यांतून कांही अर्थ काढलाच तर तो इतकाच निघेल कीं, सामान्य जनतेवर गद्यलेखन व वक्तृत्व या कलांपेक्षा काव्य, चित्र इत्यादि कलांचा अधिक परिणाम होतो. या लेखकांच्या विधानांतील 'झटका', 'फटकारा' इत्यादि शब्दांवरून त्यांच्या मनांत हाच अर्थ घोळत असावा असें वाटतें. परंतु ही तर कलेच्याच दोन प्रकारांतील तुलना होईल, कला व नीति यांतली तुलना होणार नाही. या लेखकांच्या उद्देशानुसार तुलना करावयाची असेल तर प्रथम हें मान्य करावें लागेल कीं,' नीतीवर पूर्ण बहिष्कार टाकणारी कृति कलेच्या सदरांत जाऊं शकते. परंतु हें शक्य नसल्याचें मागे अनेकवार दाखविलेंच आहे. सुंदर कलाकृतीच्या योगाने जर कांही उच्च परिणाम घडून येत असेल तर तो तदंतर्गत आवृत्त नीतीचाच होय यांत शंका नाही. आणि असें असतांहि नीति जें कार्य घडवून आणूं शकत नाही तें कला घडवून आणते असें म्हणून कलेचा नीतीशीं काडीमात्रदेखील संबंध नाही असें सिद्ध करूं पाहणें हें, नुसत्या क्विनाइन्पेक्षा त्याचीच शर्करावगुंठित गोळी अधिक उपयुक्त असते म्हणून त्या गोळीचा व क्विनाइन्चा यत्किंचितहि संबंध नाही हें सिद्ध करूं पाहण्याइतकेंच हास्यास्पद आहे. कोरड्या नीतितत्वांपेक्षा तींच जर एखाद्या सुंदर कृतीच्या द्वारें जनतेसमोर आणलीं तर तीं अधिक परिणामकारक होतात हें खरें. परंतु यावरून कला नीतीविषयी

पूर्णपणे बेपर्वा अगर उदासीन असूं शकते हें कसें सिद्ध होतें समजत नाही. नीतिशास्त्रविषयक कलाकृति व तदितर ललितकलाकृति यांत मुख्यत्वेंकरून इतकाच फरक कीं, पहिली नीतिप्रधान अशी एक सुंदर कृति असते; दुसरी सौंदर्यप्रधान अशी एक नीतिपर कृति असते. पहिलींत सुंदर नीतिविवेचन असतें; दुसरींत नीतिपर सौंदर्यदर्शन असतें. पहिलींत नीति हा विषय असून सौंदर्य हा गुण असतो; दुसरींत सौंदर्य हा विषय असून नीति (परता) हा गुण असतो. आणि यावरूनच पहिलीचा सौंदर्याशीं संबंध नाही हें जसें असत्य सिद्ध होतें, तसेंच दुसरीचा नीतीशीं संबंध नसतो हें देखील असत्य सिद्ध होतें.

बरें, नीतीशीं संबंध नसलेल्या कृतीला कला म्हणणें योग्य आहे असें क्षणभर मान्य केलें, तरी जिच्यांत नीतीचा लवलेशहि नाहीं, जिचा नीतीशीं काडीइतकाहि संबंध नाही, अशी एखादी कृति साधारण जनतेच्या मनावर उच्च नैतिक परिणाम घडवून आणूं शकते, आणि तेंहि नीति-शास्त्रविषयक कृतीपेक्षा अधिक लवकर व उपयुक्त रीतीने, ही गोष्ट इतकी उघड उघड अशक्य आहे कीं, तिला स्वप्नांतहि कोणी सूज्ञ मान्यता देईल असें वाटत नाही. वदतोव्याघाताचें किंवा स्वांतर्गत विसंगतीचें याहून अधिक ढळढळीत असें एखादें उदाहरण सहसा मिळणें कठीण इतकेंच येथे सांगितलें म्हणजे पुरें आहे.

## प्रकरण नववें.

# उपसंहार

ग्रंथपावेतोचीं सर्व प्रकरणें लक्षपूर्वक वाचल्यानंतर कांहीं वाचकांच्या मनांत असा प्रश्न उद्भवण्याचा संभव आहे कीं, हें जर सर्व खरें, तर मग ' कलेसाठी कला ' या अनेकवार कानांवर पडणाऱ्या तत्वांत आता तथ्य तें काय उरलें ? या तत्वाची मोठ्या आग्रहाने घोषणा करणारे सर्वच विद्वान चुकले असून, त्यांत मुळीच ग्राह्यांश नाही की काय ? परंतु, या प्रश्नाचें समाधानकारक उत्तर देण्यासाठी आपल्यास या तत्वाचे किती निरानिराळे अर्थ होतात हें पाहणें आवश्यक आहे; कारण, याला पुढे करणारे सर्व विद्वान त्याचा एकाच अर्थाने उपयोग करतात असें आढळून येत नाही. यासाठी या सूत्रापासून ध्वनित होणारे भिन्न भिन्न अर्थ कोणते ते पाहून नंतर कोणत्या अर्थाने तें ग्राह्य होऊं शकेल, व कोणत्या अर्थाने वापरलें असतां ते मान्यतेच्या पात्र नाही, हें आपल्यास नीट रीतीने ठरवितां येईल.

' कलेसाठी कला ' या सूत्राचा एक अर्थ असा कीं, कलेचा नीतीशीं कांहींचाहि संबंध नसून तिने आपल्या लीलाविलासांत चूर असतां नीतिअनीतीसंबंधीच्या नियमांकडे लक्ष पुरविण्याचें कारण नाही. कला ही कलेसाठीच आहे, नीतीसाठी नव्हे, असें

हा अर्थ पुढे करणाऱ्यांचें मुख्य म्हणणें असतें. यांतले कांही पुरस्कर्ते कला नीतिअनीतीच्या ‘ पलीकडे ’ वावरत असते असें प्रतिपादन करीत असतात,* तर दुसरे कांही हलक्या दर्जाचे पुरस्कर्ते कलेचा प्रत्यक्ष अनीतीशीं संबंध जोडण्यासहि मागेंपुढें पाहत नाहीत. या अर्थाचें पुरेसें खंडण मागील प्रकरणांत अनेकवार झालेंच असल्याने येथे त्याचा अधिक उहापोह करण्याची आवश्यकता नाही.

याच सूत्राचा कांही लेखक जीवन व कला यांची फारकत करण्याकडे उपयोग करून घेतांना आढळून येतात. यांच्या मतानें कलाविलासाचें विश्व प्रत्यक्ष विश्वाहून अगदीच भिन्न असून, कलेपासून रसिकाने प्रत्यक्ष विश्वाशीं संबंध असलेल्या कोणत्याहि गोष्टीची अपेक्षा करूं नये. कलेकडे वळणें म्हणजे प्रत्यक्ष विश्वाला विसरणेंच होय. सामान्य जीवनांतल्या सत्यासत्यतेच्या कसोट्या कलेच्या स्वैर कल्पनासंचाराला कोणतीहि बाधा आणूं शकत नाहीं. कला ही केवळ कलेसाठीच असून, तिचा उद्देश जीवनपथांतील कांटेकुटे साफ करणें, किंवा एकापेक्षा अधिक रस्ते फुटत असतील तेथे

* या लोकांच्या मनांत नीतीविषयी कांही विपर्यस्त व कोत्या समजुती वास करीत असतात हें मागें दाखविलेंच आहे. डॉ. रॅशडॉल् एके ठिकाणीं लिहितातः— “ People in whom aesthetic interests are stronger than ethical interests frequently attempt to set up a sphere of Art to which Morality is supposed to have no relation whatever. Such persons simply show that they have too narrow a view of what Morality is......”—*Theory of Good and Evil*, Vol. I. p. 178. (See also the next five sentences ).

मार्गदर्शक पाटीप्रमाणे योग्य रस्ता दाखविणें हा नव्हे. आतां कलाकृति ह्मणजे वास्तवाची निव्वळ प्रतिकृति किंवा नकल नसून, तिच्यांत व प्रत्यक्ष अनुभवास येणाऱ्या विश्वांत कांही महत्वाचा फरक असतो हें जरी खरें असलें, तरी कला व जीवन यांची अशी संपूर्ण फारकत करून त्यांमध्ये "दोन ध्रुवां" इतकें अंतर कल्पूं पाहणें मात्र योग्य नव्हे. जीवनाशीं अगदींच संबंध नसलेली कला निरुपयोगी व टाकाऊ होईल; आणि तिच्यांत खरें स्वारस्य वाटूं शकणार नाही. केवळ नाविन्य म्हणून अशा कलेपासून जरी कोणास क्षणभर आनंद झाला, तरी तिच्यांतला सामान्य जीवनाचा पूर्ण अभाव त्याला लवकरच जाणवून तो तिचा त्याग केल्याशिवाय राहणार नाही. मानवी मनांत कलोपासनेसाठी एक आणि जीवनासाठी दुसरा असे भिन्नभिन्न कप्पे नसल्याने, कलोपासनेच्या वेळींहि त्याची सामान्य जीवनाची जाणीव कायम राहणें साहजिकच आहे. सारांश, कलेची जीवनाशीं पूर्ण फारकत ध्वनित करण्याच्या उद्देशाने कोणीं वरील तत्व वापरेल, तर तें ग्राह्य ठरूं शकणार नाही.*

'कलेसाठी कला' या तत्वाचा तिसरा अर्थ असा कीं, खऱ्या कलाकाराने कलोपासनेपासून द्रव्यप्राप्तीची आशा करूं नये. कला कलेसाठीच आहे, उदरभरणासाठी नव्हे. चरितार्थ चालविण्यासाठी दुसऱ्या एखाद्या साधनाचा अवलंब करावा, पण कलेचा उपयोग पोट भरण्याकडे करूं नये. खऱ्या कलावंताची दृष्टि पूर्णपणे निःस्वार्थी असावी; कलानिर्मितीपासून स्वतःला

* प्रकरण पहिलें पृ. १५-१६-१७ पहा.

आर्थिक दृष्ट्या लाभ करून घेण्याचा हेतु त्याने बाळगूं नये. वरील तत्वाच्या या अर्थाचाहि मागे पुरेसा उहापोह केला असल्याने येथे त्याविषयी विशेष कांही लिहिण्याची आवश्यकता नाही. कलानिर्मिति कलेसाठीच करावी, द्रव्यार्जनासाठी करूं नये या विधानांतला ग्राह्यांश इतकाच कीं, प्रत्यक्ष कलानिर्मिति करतांना आपल्यापुढे द्रव्यराशीचें चित्र न ठेवतां शुद्ध निःस्वार्थी हेतूच ठेवावा; पण इतकें असलें म्हणजे त्या हेतूस केवळ चालना देण्यासाठी धनाशेचा उपयोग झाला आहे किंवा नाही याकडे लक्ष देण्याचें कारण नाही. आणि हाच अर्थ अभिप्रेत असेल तर श्री. द. के. केळकर यांच्या पुढील विधानास मान्यता देण्यास हरकत नाही : " ' कलेकरितां कला ' या सूत्राचा अर्थ एवढाच घेतला पाहिजे कीं, कलावन्ताने कलेची पूर्णता हेंच आपलें ध्येय ठेवावें, निवळ लोकाराधन किंवा पैसा यांच्या सेवेस तिला सादर करूं नये. "*

एकाच सूत्राचे तीन भिन्न भिन्न अर्थ कसे केले जातात हें आपण पाहिलें. परंतु याच सूत्राचा कित्येकदा या सर्वांहून वेगळ्या अशा एका चवथ्याच अर्थाने उपयोग केला जातो. नागपूरच्या मॉरिस् कॉलेजमध्ये व्याख्यान देतांना तात्यासाहेब केळकरांनी पुढील उद्गार काढल्याचें प्रसिद्ध झालें आहे: " मी स्वतः कलेकारितां कला या मताचा आहे......मी जें गेलीं ३०-३५ वर्षें लिहिलें तें जनतेला बोध व्हावा म्हणून लिहिलें नाहीं; तर जें माझ्या मनांत उचंबळत होतें व जें लिहिल्याशिवाय मनाचें समाधान होत नव्हतें तें लिहिलें. लिहितांना मात्र कलेचा जितका शक्य तितका अधिकांत अधिक

*" केसरी ", ता. १८-९-३४.

अंगिकार मीं केला. "* असेच उद्गार न्यू पूना कॉलेजांत सन १९२१ सालीं व्याख्यान देतांनाहि त्यांनी काढले होते आता, या उद्गारांवरून तात्यासाहेबांच्या मनांत ‘ कलेसाठी कला ’ या सूत्राचा अर्थ ‘ खऱ्या कलेचा जन्म स्वतांचें हृदय उघडें करण्यासाठी असतो, इतरांच्यापुढे तत्वप्रतिपादन किंवा नीतिबोध करण्यासाठी नव्हे ’ असा असल्याचें दिसून येतें. आमच्या अल्पमतीप्रमाणे त्यांच्या या विधानापासून वास्तविक इतकाच अर्थ घ्यावयाचा कीं, खरी कला अंतस्फूर्तीशिवाय निर्माण होऊं शकत नाही. ज्याच्या स्वतःच्या हृदयांत आविष्कारासाठी धडपडणारें असें कांही नाही, तो खरी कला निर्माण करूं शकत नाही. स्फूर्तियुक्त प्रतिभेचा जोर नसल्यास, केवळ अमुक एका तत्वाचें प्रतिपादन करावयाचें म्हणून मुद्दाम कष्टपूर्वक कोणी शब्दामागे शब्द जोडून कांही लिहूं म्हणेल, किंवा अशाच रीतीने निराळ्या प्रकारची कला निर्माण करूं म्हणेल, तर त्याचें तें कृत्य केवळ पार्थिव अंश एकत्र करून चैतन्यविहीन सांगाडा तयार करण्याइतकेंहि उपयुक्त होईल किंवा नाही याची वानवाच आहे. यासंबंधांत भवभूतीने—

> हठादाकृष्टानां कतिपयपदानां रचयिता
> जनः स्पर्धालुश्चेदहह कविना वश्यवचसा
> भवेदद्य श्वो वा किमिह बहुना पापिनि कलौ
> घटानां निर्मातुस्त्रिभुवनविधातुश्च कलहः

या सुंदर श्लोकांत व्यक्त केलेली भीति अगदीच अनाठायी आहे असें कोण म्हणेल ? सारांश, कलानिर्मितीसाठी अंतःस्फूर्तीची आवश्यकता सर्वांनी मान्य केली असून, याच दृष्टीने ‘ जें माझ्या मनांत उचंबळत

+ " महाराष्ट्र ", ता. २६ ऑगस्ट १९३४.

होतें व जें लिहिल्याशिवाय मनाचें समाधान होत नव्हतें, तें मीं लिहिलें' या तात्यासाहेब केळकरांच्या अनुभवाच्या बोलांकडे आपण पाहिलें पाहिजे.

परंतु, खरी कला अंतस्फूर्तीच्या अभावीं अस्तित्वांत येऊं शकत नाही हें खरें असलें, म्हणून कलानिर्मितींतून कोणी सहेतुकपणाचें समूळ उच्चाटण करूं म्हणेल, किंवा तिचा हेतु 'केवळ रंजन' इतकाच आहे असें म्हणूं लागेल तर तें मात्र रास्त होणार नाही. 'काव्यदृष्टि' नामक एका निबंधांत श्री. न. चिं. केळकर म्हणतात: "भक्तिसाधनाचा हेतु मोक्ष असें म्हणतां येतें. पण मोक्षाचा हेतु मोक्षच. तसेंच कलारंजनाचा हेतु रंजनच, त्यापलीकडे जातां येत नाही." वास्तविक पाहतां अशीं हेतुनिरपेक्ष अंतिम स्थलें मानवी जीवनांत एकापेक्षा अधिक असणेंच अशक्य आहे. कोठेंहि अंतिम सार्वभौम सत्ताधीश एकच असूं शकतो; येरव्ही बेबंदशाही व अंदाधुंदी माजण्याचा प्रसंग येईल. जीवनांत शांति व एकसूत्रीपणा ज्यांना कायम ठेवावयाचीं आहेत, ते असला एकाहून अधिक अंतिम स्थलांचा आग्रह धरणार नाहीत. एकापेक्षा अधिक स्वतंत्र अंतिम साध्यें आहेत असें वाटणें हें मानवी ज्ञानाच्या अपूर्णावस्थेचें द्योतक होय. यासाठीं, एक तर, मोक्षजन्य आनंद व 'कलारंजन' हीं एकाच गोष्टीचीं दोन वर्णनें असलीं पाहिजेत; किंवा कलारंजन हें मोक्षप्राप्तीचें एक साधन म्हटलें पाहिजे. याशिवाय तिसराहि एक पंथ आहे; आणि तो म्हणजे मोक्षप्राप्तीला कलारंजनाचें साधनत्व देणें हा होय! परंतु याचा अवलंब कोणी सूज्ञ करीलसें वाटत नाही; आणि पहिले दोन

*" गद्यगुच्छ " पृ. २७-२८. शिवाय, सदर, पृ. ७ ही पहा.

पंथ केळकरांच्या उपार्निर्दिष्ट विधानांना पुष्टि न देतां उलट विरोधच करतांना आढळून येतात.

बरें, याहून थोड्या निराळ्या दृष्टीने आपण विचार केला तरी वरील अतिशयोक्तिपूर्ण व संदिग्ध विधानें केळकरांना देखील वास्तविक मान्य होण्यासारखीं नाहीत हें स्पष्ट दिसून येईल. 'कलारंजनाचा हेतु रंजनच' हें जर खरें, तर कोणी कलोपासक अश्लील कलानिर्मिति करून रंजनोत्पादन करूं म्हणेल तर त्याला श्री. केळकरांची मान्यता मिळूं शकेल काय ? असल्या अश्लील व अनीतिप्रवर्तक कलेपासून प्राप्त होणाऱ्या रंजनाला श्री. तात्यासाहेब केळकरांची केव्हांहि मान्यता मिळणार नाही याबद्दल आम्हाला शंका वाटत नाही.* पण मग कोणत्या आधारावर त्याचा प्रतिरोध करितां येईल ? आता यासंबंधांत दोन मार्ग उपलब्ध होऊं शकतात. पहिला असा कीं, असल्या अनिष्ट कलोपासनेपासून प्राप्त होणारें रंजन हें मुळी रंजनच नसून केवळ रंजनाभास होय. परंतु या मार्गांत विशेष तथ्य आहे असें दिसून येत नाही. कारण, कोणी मनुष्य 'मांझे या गोष्टी-पासून रंजन होत आहे, माझ्या मनाला तिजपासून आनंद प्राप्त होत आहे,' असें सचोटीने म्हणत असतां, 'तुझ्या मनाचें खरोखर रंजन होत नसून तुला तसा नुसता खोटा भास होत आहे' असें दुसऱ्या एखाद्या व्यक्तीने त्याला सांगू पाहणें हा शुद्ध दुराग्रह आहे. असल्या वैयक्तिक मानसिक अनुभवाचे बाबतींत कोणीहि कोणाचें सचोटीचें विधान खोडून काढूं शकत नाही. आणि यासाठीच केवलसुखवादी नीतिशास्त्रवेत्त्यांचेजवळ अनीतिमान् कृत्यांना समर्पक रीतीने अयोग्य सिद्ध करणारा एकहि मुद्दा शेवटीं सांपडत नाही, असें पाश्चिमात्य

* मागें पृ. ५२-५३ वरील टीप पहा.

नीतिशास्त्राचा इतिहास लक्षपूर्वक पाहिल्यास आढळून येतें. अशा रीतीनें अनिष्ट कलोपासनेला विरोध करण्याचा दुसरा एकच मार्ग उरला; तो हा कीं, अशा कलोपासनेपासून उत्पन्न होणारें रंजन हें रंजन खरें, पण तें हीन, अशुद्ध व अनीतिप्रवर्तक असल्यानें त्याज्य होय. सारांश, कलोपासनेचा हेतु शुद्ध, उच्च व सात्विक रंजनाचीच उत्पत्ति हा आहे असें आता म्हणावें लागेल. पण हें मान्य केल्याबरोबर कलाविलासाचा हेतु केवळ रंजनच हें विधान करतां येणार नाहीं आनंदाचे प्रकारभेद मानून, कलेचें ध्येय सात्विक व शुद्ध आनंदाची प्राप्ति हें आहे असें म्हणणें म्हणजे, तें ध्येय केवळ आनंदरूप किंवा रंजनात्मक नसून त्यांत सत्याचा किंवा नीतीचाहि अंश आहे हें कबूल करणेंच होय. आणि म्हणून याबरोबरच, कलाविलासाच्या मागे 'हेतुसंशोधनाचा गुप्तपोलिस' लावणें योग्य नव्हे, वगैरे भाषाहि* आता बदलावी लागेल. कारण, कलेपासून हीन आनंद उत्पन्न न होता शुद्ध व सात्विकच आनंद निर्माण झाला पाहिजे असें जो म्हणेल, त्यानें पुढील प्रश्नांना तोंड देण्याची तयारी केलीच पाहिजे. हीन व शुद्ध हे दोनहि जर आनंदच, तर कलाकारानें कलानिर्मिति करतांना दुसऱ्याच आनंदाला आपल्यासमोर ठेवावें व पहिल्याचा अव्हेर करावा, असा नियम काय म्हणून? कलोपासकांवर हा निर्बंध लादण्याचा उद्देश काय? आणि त्यानें तो कां पाळावा? या प्रश्नांना योग्य उत्तरें द्यावयाचीं असल्यास, कलाविलासाचा हेतु मानसिक व नैतिक उन्नति घडवून आणणें हा होय असें मानल्यावांचून गत्यंतर नाहीं हें उघड आहे.

आणि थोडा खोल विचार केला असता स्फूर्ति व हेतु यांमध्यें कांही लेखकांना वाटतो तसा आत्यंतिक विरोध नाहीं असें आढळून

* "गद्यगुच्छ" पृ. ६

येईल.* ज्यांच्या अंतःस्फूर्तीविषयी कोणी यत्किंचितहि शंका प्रदर्शित करूं शकत नाही अशा अनेक मोठमोठ्या प्रतिभासंपन्न कलावंतांनी आपली कलानिर्मिति कांही एक विशिष्ट हेतु समोर ठेवूनच केली आहे. सुप्रसिद्ध प्राचीन बौद्ध चित्रकारांनी धार्मिक तत्वें लोकांच्या मनांत सुलभतेने ठसविण्याच्या उघड उद्देशानेच आपली प्रचंड व उत्कृष्ट कला निर्माण केली. "*Indian Painting*" या पूर्वोल्लेखित पुस्तकाचे लेखक म्हणतातः "The aim of theBuddhist artist was to visualise the ideals of his creed, to illustrate by pictorial parables all the beautiful

* श्री. न. चिं. केळकर एके ठिकाणीं विचारतातः "शेक्सपिअर किंवा कालिदास यांचा आपलें प्रत्येक नाटक लिहिण्यांत नीतिबोध करण्याचा हेतु होता कीं, प्रतिभेचा उच्च दर्जाचा खेळ खेळण्याचा हेतु होता?" ("गद्य-गुच्छ," पृ. ६). परंतु या वाक्यांत गृहीत धरलेले दोन पक्ष (Alternatives) परस्परविरोधी (Exclusive of one another) आहेत हें कशावरून? हे दोन्ही हेतु एकसमयावच्छेदेंकरून कोणा कलावंताच्या मनांत वास करणें अशक्य आहे काय? शिवाय, वरील वाक्यांत "उच्च दर्जाचा" या शब्दांनी त्यांना नक्की काय ध्वनित करावयाचें आहे? याच्या पुढल्याच वाक्यांत ते लिहितातः "शाकुंतल नाटक हें नीतिबोधाच्या दृष्टीनेंच पाहिलें तर कालिदासानें शाकुंतल प्रौढ विवाहाचें खंडन करण्याकरितां लिहिलें कीं मंडन करण्याकरितां लिहिलें म्हणावें!" या वाक्यांतली विचारसरणी तर फारच उथळ आहे असें मोठ्या खेदाने म्हणावें लागतें! नीतिबोधाची दृष्टि प्रौढ विवाहाच्या खंडनमंडनापुरतीच मर्यादित आहे काय? नीति-अनीति केवळ प्रौढविवाह आणि बालविवाह यांच्या भोंवतींच घुटमळते कीं काय? या एका प्रश्नाविषयी वरील नाटकांत कालिदासाचें उदासीनत्व दिसून येतें असें मानलें तरी, नीतिबोध करण्याचे आणखी इतर कोणतेच मार्ग नाहीत काय?

sentiments of the Buddhist religion ... .. Rajput painting, while aspiring towards the same high ideals, covered a larger field. "† महाराष्ट्र वाङ्मयांतील कांही आधुनिक ठळक उदाहरणें घ्यावयाचीं झाल्यास ह. ना. आपटे, श्री. कृ. कोल्हटकर, इत्यादिकांची नांवें पुढे करता येतील. हीच गोष्ट बर्नार्ड शॉ व जगांतील इतर अनेक श्रेष्ठ कलावंतांची. शॉ यांनी तर आपल्या Man and Superman या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत स्वच्छ म्हटलें आहे कीं, "For art's sake alone I would not face the toil of writing a single sentence." 'प्रस्थान' मासिकाचे संपादक, व आधुनिक गुर्जर साहित्यांत कीर्ति पावलेले रामनारायण विश्वनाथ पाठक यांच्या सुप्रसिद्ध 'स्वैरविहारी'तील लेखांत देखील एखाद्या तत्वाच्या किंवा सिद्धांताच्या प्रतिपादनाचाच हेतु बारकाईने पाहिल्यास आढळून येतो. कै. ह. ना. आपटे यांनीही आपल्या 'विदग्ध वाङ्मय' नामक पुस्तकांत असे स्पष्ट उद्गार काढले आहेत कीं, केवळ करमणूक किंवा आनंदोत्पादन म्हणून कोणीहि मोठ्या लेखकाने किंवा कवीनें आपल्या कृति निर्माण केल्या नाहीत. पंचतंत्रकार विष्णु शर्मा, ईलियडचा कर्ता होमर, आद्यकवि वाल्मीकि, किंवा सुप्रसिद्ध ईसापनीतीचा कर्ता ईसाप, यांनी आपापलें श्रेष्ठ साहित्य केवळ 'गमतीदार चुटके' म्हणून निर्माण केलें नसून, सामान्य जनतेला मनोरंजनाच्या द्वारें सत्याचें ज्ञान करून देण्यासाठी निर्माण केलें, व हीच दृष्टि आपल्याकाहि मान्य आहे, अशी हरीभाऊंनी तेथे स्पष्ट कबूली देऊन टाकली आहे.

सहेतुक कला श्रेष्ठ किंवा निर्हेतुक कला श्रेष्ठ या वादाच्या बारिक-सारिक अंगांत शिरण्याची किंवा त्यासंबंधांत पुढे केलेल्या सर्वच उलटसुलट

†*Indian Painting* by Percy Brown, pp. 6-8. शिवाय "सौंदर्य आणि ललितकला" (आपटे), पृ. १०७ पहा.

मुद्यांचा परामर्ष घेण्याची येथे इच्छा नाही. येथे इतकेंच सांगितलें म्हणजे पुरे कीं, अंतःस्फूर्तीशिवाय खरी कला निर्माण होणें अशक्य असलें, तरी अंतःस्फूर्तीच्या दिव्य देणगीने विभूषित झालेला कोणी कलावंत तत्वप्रतिपादनाचा किंवा नीतिबोध करण्याचा हेतु नजरेसमोर ठेवून कलानिर्मिति करेल तर तेवढ्यावरूनच त्याच्या कलेच्या श्रेष्ठत्वांत न्यूनता येण्याचें मुळीच कारण नाही. किंबहुना, असेंहि म्हणतां येईल कीं, प्रत्येक नवख्या कलावंताने प्रारंभीं तरी असा एखादा उच्च हेतु समोर ठेवूनच कला निर्माण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. येरव्ही अंतःस्फूर्तीच्या प्रेरणेच्या मागे लागून भलतीच कला निर्माण व्हावयाची ! तात्यासाहेब केळकरांच्यासारखे उत्कृष्ठ व कसलेले लेखक जेव्हा 'मीं जें लिहिलें तें सर्व सहजगत्याच मनांत आलें तसें लिहिलें, विशिष्ट हेतु पुढे ठेवून लिहिलें नाही' असें म्हणतात, तेव्हा त्यांच्या बोलण्यापासून नवख्या लेखकाने इतकाच अर्थ घ्यावयाचा कीं, त्यांची प्रतिभा जात्याच (किंवा पूर्वतयारीचें फळ म्हणून) इतकी शिस्त लावलेली व श्रेष्ठ कोटीची आहे कीं, त्यांच्या लेखणींतून सहजगत्याच उत्तम व हितकारी वाङ्मय उतरेल; मुद्दाम एखादें तत्व प्रतिपादन करण्याचा हेतु मनांत बाळगण्याची त्यांना आवश्यकताच नाही. परंतु, श्री. केळकरांनी असे उद्गार काढले म्हणून, ज्याचें स्फूर्तिसुवर्ण अशुद्धवासनाभावनादि विकारांच्या भेसळीपासून अद्याप वेगळें निघालें नाही असा एखादा नवखा लेखक 'मला जें लिहिल्याशिवाय राहवत नाही तें मी लिहितों' असें म्हणून कांहीतरी भरकटूं लागला, तर त्याच्या लेखनाची सुज्ञ काय किंमत करतील हें स्पष्ट सांगावयास पाहिजे असें नाही. आणि असें कोणीं करावें असा वरील उद्गार काढतांना खुद्द तात्यासाहेबांचाहि अभिप्राय नसावा याबद्दल आम्हांस खात्री वाटते. *

* आणि आश्चर्याची गोष्ट अशी कीं, न्यू पूना कॉलेजमधील (१९२१) व्याख्यानांत त्यांनी आपल्या वाङ्मयांतील निर्हेतुकपणा हा एक दोष म्हणून

कलेसाठी कला या सूत्राच्या आणखी एका अर्थाचा जातां जातां येथे उल्लेख करणें आवश्यक आहे. कला ही कलेसाठी आहे नीतीसाठी नव्हे, असें म्हणून तिचा नीतीशीं कोणताहि संबंध नाहीं असें प्रतिपादन करणारे वादी आता वाचकांच्या बरेच परिचयाचे झाले आहेत. परंतु याउलट असाहि एक पक्ष संभवूं शकेल कीं, कला ही कलेसाठी आहे आणि म्हणूनच तिने नीतीचीं बंधनें पाळलीं पाहिजेत. या अर्थाचें काहीसें दिग्दर्शन मागे केलेलेच आहे. कलेचें अंतिम ध्येय सात्विक, शुद्ध व नैतिक आनंदाची प्राप्ति हें असल्याने नीतीचीं आवश्यक बंधनें झुगारणारी कला हें ध्येय साध्य करण्यास असमर्थ होऊन अशा रीतीने शेवटीं 'कला' या नामाभिधानासच ती अपात्र ठरेल. सारांश, ज्या-प्रमाणे एखाद्या स्वतंत्र व्यक्तीला स्वतःचें अस्तित्व उत्तम स्थितींत कायम टेवावयाचें असल्यास आरोग्याचे नियम पाळणें आवश्यक आहे, किंवा एखाद्या स्वतंत्र राष्ट्राला स्वतःची स्वतंत्रता व सुव्य-वस्थितता कायम ठेवावयाची असेल तर कायदेकानूंचीं बंधनें त्याने पाळलींच पाहिजेत, त्याप्रमाणे कलेला कोणाची 'बटीक'

कबूल केला आहे! ते म्हणाले: "येथें आमच्या नाटकाचें आत्मवृत्त खलास झालें. आतां गुणदोषचर्चा. प्रथमतः मी माझे दोष सांगतों. माझें कोणतेंही नाटक तत्वाकरितां लिहिलें नाहीं; केवळ कलेच्या अभ्यासाकरितां लिहिलें आहे. .. नाटक तत्वाच्या दृष्टीनें लिहिलें जात नाही. निदान मला तरी लिहितां येत नाहीं. माझा दुसरा दोष असा कीं......"—"केळकर" ग्रंथ १९३२ पृ. ११०. "सुभाषित आणि विनोद" च्या प्रस्तावनेंत त्यांनीच कोटी व विनोदवचन हीं पोकळ मनोरंजनाचीं साधनें नसून त्यापासून ज्ञान, शहाणपण व सद्गुण याविषयी उपयुक्त धडा मिळत असतो हें उत्तम रीतीने दाखविलें आहे.

न करतां मानवी जीवनाच्या अंतिम ध्येयांत एक स्वतंत्र स्थान दिलें, तरी देखील स्वतःचें शुद्ध अस्तित्व कायम ठेवण्यासाठीच तिने नीतिपर राहण्याची आवश्यकता सिद्ध होते.

नीति आणि कलोपासना यांच्या परस्पर निकट संबंधाविषयी आम्हांस जें सांगावयाचें होतें तें येथे संपलें. आता, हा उपसंहार पूर्ण करण्यापूर्वी एकच गोष्ट करणें आवश्यक आहे. आणि ती म्हणजे, पहिल्या प्रकरणाचे सुरवातीस म्हटल्याप्रमाणे कलेची व्याख्या करणें ही होय. या संबंधांत विषयानुरोधाने मागील पृष्ठांत अनेक महत्वाच्या गोष्टी उघड झाल्या असून, त्यांना संकलित स्वरूप देण्याचेंच कार्य मुख्यत्वेकरून उरलें आहे. कलेचें अंतिम ध्येय सात्विक, नैतिक व शुद्ध अशा आध्यात्मिक आनंदाची प्राप्ति हें असलें पाहिजे हें मागे दाखविलेंच आहे. मानवी जीवनाचेंच ध्येय याहून निराळें आहे, किंवा कलोपासना मानवी जीवनाच्या क्षेत्राबाहेर आहे यांपैकी एखाद्या पक्षाचा स्वीकार केल्याशिवाय वरील विधानास कोणी हरकत घेण्याचा संभव नाहीं. आणि, या दोघांतहि शंका तितकी उत्तरें मागे दिलींच असून, इतक्यावरहि ज्यांचे समाधान झालें नसेल, त्यांच्याशीं " तान्प्रति नैव यत्नः " असें म्हणून स्वस्थ बसण्यापलीकडे येथे तरी कांही शक्य नाही.

कलेचें अंतिम ध्येय अशा रीतीने निश्चित केल्यावर, कला व ऐंद्रियिक सौंदर्य यांचा संबंध कितपत् येतो हें आपण थोडक्यांत पाहूं. कलेने या इंद्रियग्राह्य सौंदर्याकडे पूर्ण दुर्लक्ष करावें असें आमचें म्हणणें नाहीं हें मागे अनेकवार स्पष्ट केलेंच आहे. मात्र, त्याचा उपयोग कलोपासनेंत केवळ एक साधन म्हणूनच झाला पाहिजे यांत संशय नाही. या प्रकारच्या सौंदर्योपभोगांतच भोक्त्याला सर्वस्वी

गुंगवून, त्याची सारी मानसिक व नैतिक प्रगति खुंटविणारी कृति खऱ्या कलेच्या सदरांत जाऊं शकत नाही. यासंबंधांत सर्वसाधारण वाचकवर्गांत जो गैरसमज पसरला आहे, त्यामुळेच कलेच्या नीतीशीं असलेल्या संबंधाला विरोध प्रगट केला जातो. आणि हा घोंटाळा दूर करण्यासाठी, आम्ही या स्थळीं एक सूचना आमच्या वाचकांच्या पुढे मांडण्याचें धारिष्ट करितों. आमच्या अल्पमतीला असें वाटतें कीं, ज्या कृतीपासून मागे सांगितल्याप्रमाणे मानसिक सौंदर्य व्यक्त होत असेल तिच्या निर्माण पद्धतीला 'कला' असें संबोधावें; पण जिची पोच केवळ इंद्रियग्राह्य सौंदर्यापर्यंतच असून त्यापलीकडे जी सर्वसाधारण भोक्त्याला नेऊं शकत नांही, तिच्या पद्धतीला 'कला' असें न म्हणतां केवळ 'युक्ति' या नांवानेंच संबोधावें. अन्न शिजाविण्याची पद्धति, पोहण्याची पद्धति, मृगयेची पद्धति, यांसारख्या केवळ ऐंद्रियिक उपभोगाशींच संबंध ठेवणाऱ्या क्रिया व लेखनवक्तृत्वादि मानसिक सौंदर्य व्यक्त करणाऱ्या क्रिया, या सर्वांना एकाच माळेंत गोंवल्याने विद्वानांचीहि कशी दिशाभूल होते, व एकाचे गुणधर्म दुसऱ्यावर अध्यासिण्याचा त्यांना कसा मोह होतो, हें मागे स्पष्टपणे दाखविलेंच आहे. यासाठी 'युक्ति' व 'कला' यांतला हा भेद मान्य केल्यास, पुष्कळ घोंटाळे दूर होऊन शुद्ध विचारसरणीस मदत होईल असें वाटतें. सामान्य भाषेंत कला या शब्दाचा उपयोग इतक्या व्यापक रीतीने केला जातो कीं, त्याला जणूं कांही मर्यादाच नव्हे. स्वयंपाकाची 'कला', अंगास तेल मर्दन करण्याची 'कला', श्मश्रु करण्याची 'कला', कपडे धुण्याची 'कला', केर काढण्याची 'कला', चोरी करण्याची 'कला', —कोणतीहि गोष्ट घेतली तरी ती कलेच्या सदराखाली फेकली जाते; आणि Thomas De Quincey या आंग्ललेखकाने तर *Murder As A Fine Art* म्हणून एक (विनोदी) निबंधच लिहिला आहे!

सारांश, भगवद्गीतेंतील " योग: कर्मसु कौशलम् " या सुप्रसिद्ध वचनांतल्या योग शब्दाइतकाच व्यापक अर्थ कलेचाहि सामान्यतः केला जातो. आणि या सर्व "कलां"च्या रांगेंतच बिचाऱ्या साहित्य, काव्य, चित्र, इत्यादि खऱ्या कलांनाहि ढकलण्यांत येतें. सतराविध जाति व अठराविध पंथांच्या त्या अतिविचित्र समुदायांत, या दुसऱ्या खऱ्या हक्कदारांनी नीतीच्या सख्यत्वाची कितीहि ओरड केली, तरी इतर बहुसंख्य बेगडी " कलां " च्या कलकलाटांत त्यांचे कोण ऐकतो ! ह्या अंधेरनगरींतील बेबंदशाहीचा प्रकार टाळण्यासाठीच ' कला ' व ' युक्ति ' यांची फारकत करणें आवश्यक वाटतें.

कला व युक्ति यांतला हा भेद मान्य केला म्हणजे, कलेंत इंद्रियग्राह्य सौंदर्याचें स्थान केवळ साधन म्हणूनच कसें आहे हें उघड होईल. आणि ही गोष्ट एकदा नीट ध्यानांत घेतली म्हणजे मग या प्रकारच्या सौंदर्याला कलोपासनेंत पुष्कळ महत्व आहे हें कबूल करण्यास प्रत्यवाय नाही. सर्व कलाकृतींचा चित्तैकाग्र्य कराविण्याची शक्ति हा एक महत्वाचा गुण आहे. मानवी मनाची सुप्रसिद्ध चंचलता हरण करून त्याला स्थैर्य प्राप्त करून देण्यास असमर्थ असणारी गोष्ट खरी कला होऊं शकणार नाही. एखादा वक्ता कितीहि विद्वान असला तरी त्याला जर वक्तृत्वकला अवगत नसेल, तर श्रोत्यांची अंतःकरणकपाटें खोलून त्यांत सुंदर विचार कळत न कळत अधिष्ठित करण्याऐवजी, तो त्यांच्या मुखकमलकपाटांची वारंवार उघडझांप करण्यास मात्र कारणीभूत होईल ! आणि, एखाद्या चित्रकाराचें अंतःकरण उत्कृष्ट कल्पनासंपत्तीने कितीहि समृद्ध असलें, तरी खरी चित्रकला त्याचे ठायीं वास करीत नसल्यास, स्वतःच्या चित्राचे द्वारें जनतेचें मन आकर्षून त्यांत आपल्या सुंदर कल्पनांचे प्रतिध्वनि उठविण्यास तो असमर्थच होईल. आता, हें चित्तैकाग्र्य

घडवून आणण्यांत कलोपासनेंत ऐंद्रियिक सौंदर्याची अनेक प्रकारें बहुमोल मदत होत असते हें उघड आहे. व यांतच त्याचें खरें कार्य व महत्व अभिप्रेत आहे. ऐंद्रियिक सौंदर्याचे द्वारा होणाऱ्या या चित्तैकाग्र्याचें खरें प्रयोजन शुद्ध मानसिक सौंदर्याला भोक्त्यांचे मनांत शिरकाव करून घेण्यास मार्ग सुलभ करणें हेंच आहे, याकडे दुर्लक्ष न करतां केवळ त्याच्याच मागे लागण्याचा प्रयत्न न केला म्हणजे झालें. नाहीतर, त्याचा हा खरा अर्थ व उपयोग विसरून, त्याच्यापासून उत्पन्न होणाऱ्या क्षणैक शांतीच्या व आनंदाच्या उन्मादांत, साऱ्या नीतीला झुगारून दण्याच्या व त्या स्थितींतच अखिल विश्वाच्या बुडाशीं असलेलें अंतिम तत्व हातीं आल्याच्या वल्गना करण्याचा मोह व्हावयाचा ! कलेंतील ऐंद्रियिक सौंदर्याचें साधनत्व विसरून त्याच्याच मागे लागल्यास कशी स्थिति होते, याचें उत्कृष्ट वर्णन समर्थ रामदासस्वामींनी आपल्या प्रासादिक काव्यांत एके ठिकाणीं केलें आहे, तें येथे दिल्यावांचून आमच्याने राहवत नाही. समर्थ म्हणतात: “ श्रीहरिविण जे कळा । तेचि जाणावी अवकळा । देवास सांडून वेगळा । प्रत्यक्ष पडिला ॥ १४-५-३१ ॥ सर्पीं वेष्टिलें चंदनासी । निधानाआड विवसी । नाना कळा देवासीं । आड तैशा ॥३२॥ सोडून देव सर्वज्ञ । नादामध्यें व्हावें मग्न । हेंचि प्रत्यक्ष विघ्न । आडवें आलें ॥३३॥ एक मन तें गुंतलें स्वरीं । कोणें चिंतावा श्रीहरी । बळेंच धरूनियां चोरीं । शुश्रूषा घेतली ॥३४॥ करितां देवाचें दर्शन । आडवें आलें रागज्ञान । तेणें धरूनियां मन । स्वरामागें नेलें ॥३५॥ भेटी जातां राजद्वारीं । बळेंचि धरिला वेगारी । कळावंता तैशी परी । कळेनें केली ॥३६॥”

असो. या व याव्यतिरिक्त मागे कलेसंबंधी सांगितलेल्या सर्व गोष्टींचा विचार करून आता कलेची पुढील व्याख्या येथे देण्यास हरकत वाटत नाही.

आध्यात्मिक सौंदर्यानंदाची प्राप्ति हें अंतिम ध्येय पुढे ठेवून, ऐंद्रियिक सौंदर्याचा आवश्यक तितका उपयोग करून शक्य तितकें मानसिक सौंदर्य व्यक्त करणारी, सद्धेतुमूलक, कृति करण्याची पद्धति म्हणजेच कला; व अशा कृतीचें फल म्हणजेच कलाकृति.

किंवा, आध्यात्मिक सौंदर्यानंदाची प्राप्ति हें सर्वच जीवनाचें अंतिम ध्येय असल्यानें कलेच्या बाबतींतहि तें अध्याहृत आहेच, व मानसिक सौंदर्य हें नीतिपरच असल्यानें त्याला व्यक्त करणारी कृति सद्धेतुमूलक असावी हें वेगळें सांगावयास नको, असें कोणाचें म्हणणें असल्यास वरील व्याख्येचा संक्षेप करून कलेची पुढील सुटसुटीत व्याख्या तयार करितां येईल.

ऐंद्रियिक सौंदर्याचा आवश्यक तितका उपयोग करून शक्य तितकें मानसिक सौंदर्य व्यक्त करण्याची पद्धति म्हणजेच कला होय.

---

# परिशिष्ट अ

## श्री. भा. रा. तांबे यांच्या कांही विधानांचें खंडन

कला व नीति यांसंबंधीच्या आमच्या प्रमेयाला विरोध करणाऱ्यांचे साधारणपणे आपल्यास दोन वर्ग पाडतां येतील. एक उच्च प्रकारचे विरोधक आणि दुसरे हलक्या दर्जाचे विरोधक. यांपैकी दुसऱ्या प्रकारच्या विरोधकांचा हेतु जाणुनबुजून अश्लील व अनीतिकारक कला निर्माण करून समाजांतील अपरिपक्क व सदभिरुचिरहित लोकांकडून पैसे उपटणें हा असतो. हे समाजाला मुद्दाम अधोगतीला नेण्याचा प्रयत्न करीत असतात. याउलट, दुसऱ्या प्रकारचे विरोधक मुद्दाम अनीतिकारक कला निर्माण करण्याचा प्रयत्न करीत नाहीत. त्यांच्या कृतींत प्रायः अनीतीचें प्राबल्य नसून उलट बव्हंशाने ती समाजाला उन्नतीप्रत नेणारी असते. परंतु वास्तविक स्वतःला न कळत ते नीतीचीं बंधनें पाळत असतांहि, नीति व कला यासंबंधीं कांही विपर्यस्त कल्पना उराशीं बाळगल्याने, कलेने नीतीचीं बंधनें पाळलीं पाहिजेत असें कबूल करण्यांत त्यांना एक प्रकारें कलेचा व त्याबरोबरच स्वतःचा उपमर्द झाल्यासारखा वाटतो. व यासाठी तत्वाचे नांवाखाली ते कला व नीति यांतील संबंधाच्या अस्तित्वाला विरोध प्रदर्शित करीत असतात. सुप्रसिद्ध कवि श्री. तांबे हे निःसंशय या दुसऱ्या कोटींतले विरोधक आहेत.

परंतु, हे तात्विक विरोधक प्रत्यक्षपणे जरी अनीतिमान कला निर्माण करीत नसले, तरी समाजांत होणाऱ्या असल्या प्रकारच्या हलक्या कलानिर्मितीला त्यांची अप्रत्यक्षपणे मदत होत असते. अश्लील कलाकारांना तात्विक प्रमाणांचा पुरवठा हे करीत असतात. व त्यामुळेच त्यांच्या मनांत अश्लील कला निर्माण केल्याबद्दल सदसद्विवेकबुद्धीची टोंचणी जर यत्किंचितहि शिल्लक उरली, तर तिला बोथट करण्याचें कार्य या तात्विक विरोधकांच्या विपर्यस्त विधानांनी अहेतुपुर:सरपणे का होईना पण होत असतें. उच्च व विद्वान कलावंतांनीच नीतीचा संबंध नाकारण्याचा प्रयत्न केला, तर त्यांचा आधार घेऊन समाजांतील इतर लोकांना अनीतीचा वाटेल तसा धुडगूस घालण्यास एक प्रकारें परवानाच मिळाल्यासारखा होतो, असें अनेकवार दृष्टोत्पत्तीस आलें आहे. व याकरितांच आम्हीं श्री. तांबे यांच्या "कला आणि नीति" या निबंधांतील कांही महत्वाच्या दोषस्थलांचें मागे खंडन केलें असून उरलेल्यापैकीं कांहीचें येथे करणार आहों.

## उच्च व अधम कला.

श्री. तांबे यांनी आपल्या प्रस्तावनेंत केलेल्या विधानांवरून त्यांच्या मतानें "कलेसंबंधीं उत्तम, मध्यम आणि अधर असें जें तारतम्य प्राच्य साहित्यकारांनीं केलें आहे तें यथार्थच आहे" असें दिसून येतें. व त्यास अनुसरूनच त्यांनी 'प्रस्तुत लेख हीन कलेसंबंधीं लिहिलेला नाही" असा इषाराहि वाचकांना देऊन ठेवला आहे.

परंतु, आमच्या मतें तर श्री. तांबे यांनी स्वतःच वरील निबंधात प्रतिपादन केलेल्या तत्वानें एकप्रकारें उच्च व नीच कला यांतील भेदच काढून टाकला आहे. उच्च कलेला देखील जर नीतिअनीतीचा

विधिनिषेध राहिला नाही तर तिच्यांतील व हीन कलेतील एक महत्वाचा भेदच नाहीसा होणार नाही काय? आम्हांस तर असें वाटतें कीं, जी "नीत्यनीतीविषयीं पूर्णपणें उदासीन" (पृ. ४), जिचा नीतीशीं "काडीइतका संबंध नाही" (पृ. २), जी "आपल्या लीलाविलासात चूर असतां नीतिअनीतीच्या भानगडींत पडावयास तिला सवडच नसते" (पृ २), व जी कधी "नीतीची बूज राखीत नाही" (पृ. २) ती एक तर कलाच नव्हे, किंवा कला म्हणावयाचेंच असेंल तर तिला हीन कलेच्या कोटींत तरी टाकलें पाहिजे. या संबंधांत श्री. वा. गो आपटे म्हणतात, "जें वाचकांच्या मनांत उच्च प्रतीचे विचार किंवा भावना उत्पन्न करीत नाही, किंवा त्यांचें पोषण करीत नाही, उलट जें त्याची हानि करणारें असतें, त्याला 'साहित्य' हें उच्च अभिधान लावतां येईल कीं नाही अशी शंका घेतली असता ती वावगी होणार नाही. कला खरी, पण अनर्थकारी अतएव त्याज्य असाच या प्रश्नाचा निकाल सुज्ञांना द्यावा लागेल."

## शेक्स्पिअर आणि नीतिमत्ता.

कलेचा नीतीशीं काडीमात्र संबंध नाही या आपल्या विधानाच्या पुष्ट्यर्थ श्री. तांबे यांनी जगांतील कांही प्रसिद्ध कलाकार घेऊन त्यांच्या कलेंत नीतिअनीतीसंबंधी विधिनिषेध कसा बाळगलेला नाही, हें दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. या त्यांच्या झपाट्यांत

* "लेखनकला," पृ. ६६-६७. वास्तविक पाहतां, आमच्या मताने हीन व श्रेष्ठ कलेंतला हा असला भेद व्यक्त करावयाचा झाल्यास, 'हीन कला नीतीविषयी खरोखर उदासीन असते, पण उच्च कला तिच्या हातून सहजगत्याच होणाऱ्या नीतिपालनामुळे तशी असल्यासारखी कधीं कधीं भासते', असें म्हणावें लागेल. प्रकरण आठवें, पृ. १५६--५९ पहा.

शेक्सपिअरपासून तों थेट मिल्टन्, बायरन्, वर्डस्वर्थ, टेनिसन्पर्यंत पाश्चिमात्य कवि, व कालिदास, शूद्रक इत्यादि प्राच्य कवी आले असून, यापैकीं कोणीहि नीतीची पर्वा ठेविली नाहीं, असें त्यांचें म्हणणे आहे. वास्तविक पाहतां या सर्व कवींच्या बाबतींत श्री. तांबे यांनी काढलेला निष्कर्ष खरा असता, तरी देखील कला व नीति यांच्या संबंधाच्या आमच्या प्रमेयाला बाध आला नसता. कारण टॉल्स्टॉयूने या संबंधांत अगदी योग्य तक्रार केल्याप्रमाणे,* या वादांत विवेचनाची खरी पद्धति म्हणजे प्रथम आदर्श कला कोणती हें ठरवून, नंतर निःपक्षपातीपणानें तिची कसोटी लावून खरे कलाकार कोणते तें ठरविणें हीच होय. याउलट आधीच काहीं व्यक्तींना आदर्श कलाकार म्हणून गृहीत धरून, त्यांच्या चरणीं आपली बुद्धि गहाण ठेऊन, त्यांच्या कृतींवरून आदर्श कलेच्या स्वरूपाचा निश्चय करू पाहणें म्हणजे घोड्याचे पुढे गाडी बांधण्यासारखेंच होय. ही दुसरी पद्धति प्रसंगीं किती चुकीचे निर्णय देते, याचा सखंडन उत्तम मासला पाहावयाचा असल्यास, प्रथम विनोदाचें योग्य स्वरूप काय हें निश्चित केल्यानंतर त्याची कसोटी लावून कै. गडकऱ्यांच्या विनोदांचे मार्मिक परीक्षण करणारें, व म्हणूनच गडकऱ्यांना विनोदमहर्षि समजणाऱ्या सांप्रदायिकांच्या विधानांतल्या चुका उघड करणारें, श्री. शि. गो. भावे यांचें " गडकऱ्यांचा विनोद " हें पुस्तक पाहावें.

परंतु, विवेचनपद्धतीबद्दलचा हा प्रश्न बाजूस सारला तरी, श्री. तांबे यांनी शेक्सपियर, वर्डस्वर्थ्, मिल्टन् इत्यादिकांबद्दल

* *What is Art?* pp. 115-116.

काढलेला उपर्निर्दिष्ट निष्कर्ष सर्वथैव चुकीचा आहे असें आमचें मत आहे. या सर्व कवींच्या बाबतींत त्यांच्या विधानांचें सप्रमाण खंडण करणें येथे अर्थातच अशक्य असून, त्यांनी स्वतःच म्हटल्याप्रमाणे " ' शितावरून भाताची परीक्षा ' या न्यायानेच याचा विचार करणें शक्य आहे " ( पृ. ४ ).

श्रेष्ठ नाटककार शेक्सपिअरबद्दल श्री. तांबे म्हणतातः " त्याचें कोणतेंही नाटक हातीं घ्या आणि मग पाहा कीं, आपल्या उत्तान भराऱ्या आणि उड्डाणांत त्यानें नीतीचें जड बोजकें आपल्या पंखांवर वाहून नेलें होतें कीं काय ! यागोसारखा चांडाळ, गानरिल रेगनसारख्या राक्षसिणी, लेडी मॅक्बेथसारख्या पापिणी, शायलॉकसारखे नरमांसासाठीं टपलेले खुनी—यांसारखे अनेक **स्त्रीपुरुष आणि बहुधा याचाच अंतीं जयजयकार. हें सारें नीति-प्रवर्तक होय असें म्हणणारास वेड लागलें आहे असेंच म्हणावें लागेल.** " ( पृ. ४-५. जाड टाईप आमचा )

आता शेक्सपिअरच्या नाटकांच्या चिकित्सक अभ्यासाबद्दल ज्यांची वाङ्मयक्षेत्रांत प्रसिध्दि आहे अशा कांही ग्रंथकारांचीं मतें आम्ही येथे उद्धृत करतों. त्यावरून वाचकांनी श्री. तांबे यांच्या दिशाभूलकारक विधानांची खरी किंमत ठरवावी.

*" Shakespearean Tragedy "* या पुस्तकाचा प्रसिध्द लेखक ए. सी. ब्रॅडले लिहितो " ' The doer must suffer ' — this we find in Shakespeare. *We also find that villainy never remains victorious and prosperous at the last* " ( pp. 31-32. Italics ours ). यांतील दुसऱ्या वाक्याशीं श्री. तांबे यांचे ' बहुधा यांचाच अंतीं जयजयकार ' हे उद्गार

ताडून पाहावे ! " *Shakespeare : His Life, Art and Characters* " या पुस्तकाचा कर्ता डॉ. हडसन् स्पष्ट लिहितो: " For I run no risk in saying there is not a single instance in his plays where the feelings of any natural-hearted reader fail to go along with those who are, at least relatively, the best. " ( Vol. 1, p. 252. See also the next four sentences ). आणि हेंच श्रेष्ठ कलेचें लक्षण नव्हे काय ? उत्तम कलाकृतींत दुर्जनांनी पीडलेले सज्जन नसतात असें नव्हे. परंतु त्यांत इतकी कुशलता असते कीं, सर्व-साधारण जनतेची सहानुभूति क्षणमात्र विजयी दिसणाऱ्या दुर्जनांकडे न जातां शेवटीं ती त्रस्त परंतु नीतिमान् व सज्जन अशा पात्रांकडेच वळली पाहिजे शेक्सपिअरच्या नाटकांचा एकंदर रोख नीतिप्रवर्तक नाही असें म्हणणाऱ्यांनी सदरहू ग्रंथकाराचेच पुढील निःसंदिग्ध उद्गार वाचावे. नीति व कला यांचा निकट संबंध आहे असें प्रतिपादन करून डॉ. हडसन् लिहितो: " Now I do not at all scruple to affirm that Shakespeare's poetry will stand the test of these principles better than any other writing we have outside the Bible. His rank in the school of Morals is indeed no less high than in the school of Art. He is every way as worthy to be our teacher and guide in what is morally just and noble and right as in what is artistically beautiful and true. In his workmanship the law of moral proportion is observed with a fidelity that can never be too much admired; in other words, the moral element of beautiful not only has a

place, but is in the right place,— the right place I mean, to act the most surely and the mos effectively on the springs of life, or as an inspiratioı of good thoughts and desires." *(Ibid pp- 244-245.)*

वाचकांस वरील उताऱ्यांवरून श्री. तांबे यांनी स्वपक्षस्थापनार्थ शेक्सपिअरबद्दल केलेल्या विधानांची काय किंमत आहे हे कळून आलेंच असेल. आणि वरील उतारे सोडून, कोणीहि स्वतःच जरी शेक्स-पिअरचीं नाटकें थोड्या काळजीने वाचेल, तरी त्याला श्री. तांबे यांच्या विधानांचें आश्चर्य वाटल्यावाचून राहणार नाहीं. त्यांच्या वर उद्धृत केलेल्या वाक्यात त्यांनी शेक्सपिअरच्या नाटकांतील कांहीं दुष्ट पात्रांचीं नांवें स्पष्टपणे घेतलीं असून 'बहुधा यांचाच अंतीं जयजयकार' असा भरमसाट शेरा शेवटीं ठोकून दिला आहे. परंतु, 'मर्चंट् ऑफ् व्हेनिस्' या नाटकांत शेवटीं शायलॉकचा जय कसा होतो, आणि 'मॅक्बेथ्' नाटकांत शेवटीं लेडी मॅक्बेथ् कोणत्या रीतीने जिंकते ? शेक्सपिअरच्या या नाटकांकडे पाहण्याची एक नवीच दृष्टि त्यांनी शोधून काढिली असल्यास न कळे ! आता त्यांनी निर्देशिलेल्या पहिल्या व्यक्तीसंबंधी बोलावयाचें म्हणजे, ऑथेल्लो नाटकांत शेवटीं इआगोचाच "जय" होतो असें म्हणणें म्हणजे त्या नाटकांतून भलतेंच तात्पर्य काढणे होय. शेक्सपिअरने त्या नाटकाचे द्वारें, दुर्दैवी सज्जनांच्या दुःखांत होणाऱ्या मृत्यूपेक्षांहि कित्येक नरपशूंचें जगणें देखील किती भयानक, किळसवाणें, व तिरस्कार उत्पन्न करणारें असतें हें दाखविलें आहे. त्याने ऑथेल्लो नाटक इतक्या सुंदर रीतीनें रंगविलें आहे कीं, शेवटीं इआगोला सुख तर प्राप्त होत नाहीच, परंतु या जगांतील प्रत्येक साधारण प्रवृत्तिच्या मनुष्याच्या तिरस्कारास, छी:थूस, व धिःकारासच तो पात्र होतो. डेस्डिमोना मरूनहि विजयी होते.

इआगो जगूनहि पराजित होतो. नाटक संपल्यावर प्रेक्षक इआगोची छीःथू करतात, तर उलट डेस्डिमोनाचाच 'जयजयकार' करीत घरीं जातात.*

## श्री. तांबे आणि कालिदास.

जो परिणाम कावीळाचा डोळ्यांवर होतो, तोच परिणाम दुराग्रहाचे योगाने मनावर घडून येतो. श्री. तांबे याना नीतीची 'बूज ठेवणारा' एकहि श्रेष्ठ कवी आढळूं नये इतका दुराग्रह झालेला दिसतो. त्यांनी कविकुलगुरु कालिदासाच्या शाकुंतल या जगप्रसिद्ध सर्वश्रेष्ठ कृतीबद्दल कसे विकृत उद्गार काढले आहेत पाहा: "शाकुंतलांतील नायक राजा दुष्यन्त हा परमपूज्य कुलपति कण्वऋषि याच्या पुण्याश्रमांत त्याच्या गैरहजिरींत चोरासारखा शिरतो. (शकुंतलेला त्याजकडे पोंचती करावयास गेलेल्या ऋषिकुमारानें त्यास चोरच म्हटलें आहे,..)

* ऑथेल्लो नाटकाचा खोल अभ्यास केला असतां शेवटीं पापी इआगोचा पराजयच झालेला कसा दिसतो याचें मार्मिक विवेचन डॉ. डाउडेन कृत *Shakespeare, His Mind and Art* यांत पृष्ठें २४२-४४ वर सांपडेल. 'किंग लिअर' मध्येंहि शेवटीं पापाचाच कसा पराजय होतो हें त्यांत पृ. २६८-६९ वर दाखविलें आहे. शिवाय, शेक्सपिअरच्या सर्व नाटकांच्या एकंदर तात्पर्यासाठी त्याचीं २७, ४८, २२९ इ. पृष्ठें पहावीं. हाच लेखक आपल्या *Introduction to Shakespeare* या पुस्तकांत लिहितो: "It is the destroyer Iago who really perishes as a withered branch from the tree of humanity" (p. 78); आणि 'किंग लिअर' मधील कॉर्डेलिआच्या शोचनीय अंताबद्दल लिहितो: "Cordelia dies, but love is not defeated." (p. 79)

येणेप्रमाणें शिरून कुलपतीचें केवळ ' उछ्वासितच ' अशी सुंदर शकुंतला हिला फुस लावतो आणि इतका लंपट होतो कीं, ती गुरुजनांच्या संमतीविषयीं आग्रह करीत असतां गांधर्वविवाहाच्या थापा व दाखले देऊन तिच्याशीं चोरटा विवाह् करतो ! केवढी नीतिमत्ता ही ! ! सांप्रतच्या कायद्याप्रमाणें पिनल कोडचें पुरें ४९५ कलम ! बरें, पुढें तरी त्यानें सचोटीनें वागावयाचें होतें. पण येणेंप्रमाणें त्या बिचारीला फसवून तेथेंच टाकून हे राजेश्री आपल्या राजधानींत जाऊन आपल्या राण्यांमध्यें दंग होतात व तिला साफ विसरतात ! पुढें कण्वऋषि घरीं आल्यावर त्यांस हा सारा प्रकार समजल्यावर चोराला चोरीचें धन पोचतें करावें अशा शुद्ध भावनेनें या फसव्या राजाकडे आपली लाडकी कन्या पाठवितो तेव्हां हे नीतीचे समुद्र मनांतून तिच्या रूपयौवनाला पाघळत असतां वरून ' न दर्शनीय परकलत्रम् ' असा नीतीचा कांगाव करून तिचा संबंध तोडतात ! याचें नाव नीति ! पण कोणी म्हणेल राजा काय करील ? दुर्वासानें शकुंतलेला शाप दिला होता. त्यामुळें राजा ही गोष्ट विसरला पण मूळ प्रश्न तर हाच आहे कीं, कालिदासाला नीतीची बूज राखावयाची असती तर मूळ महाभारतांतील गोष्टींत दुर्वासशापाचें कुलंगडें नसतां, त्याने असा अनीतिकारक प्रसंगच कां निर्माण केला असता ? " ( पृ. ७-८, जाड टाइप आमचा. कंसातला मजकूर मूळचा. )

शाकुंतल नाटकाविषयी इतका विपर्यस्त दृष्टिकोन इतरत्र क्वचितच् व्यक्त केलेला आढळेल !

कोणीहि मूळ शाकुंतल पूर्वग्रहदूषित न होतां वाचावें, म्हणजे वरील विधानांची सत्यासत्यता पटण्यास उशार लागणार नाही.

प्रा. वा. वि. मिराशीकृत "कालिदास" (१९३४) यांत पृ. १७७-१९४ मध्ये दिलेला शाकुंतलाचा विस्तृत गोषवारा, आणि त्यांतच पृ. १९५-२१६ मध्ये किंवा श्री. के. वि. गोडबोले यांनी "महाराष्ट्र शाकुंतलास" (१९२५) जोडलेल्या 'शाकुंतल विचार' या पुरवणीमध्ये केलेलें त्याचें मार्मिक विवेचन नीट वाचलें तरी काम होईल.

नमुन्यासाठीं म्हणून श्री. तांबे यांच्या उपर्निर्दिष्ट कांही विधानांतला फोलपणा आम्ही येथे दाखवितों. आपल्या राज्यांत जाऊन राण्यांमध्ये दंग होण्याइतक्या कर्तव्यशून्य विषयलंपटतेचा आरोप त्यांनी दुष्यंतावर केला आहे; पण वस्तुतः शाकुंतलांत नायक दुष्यंत राजा हा पूर्ण कर्तव्यदक्ष, सदैव प्रजाहिततत्पर व न्यायनिष्ठुर दाखविला आहे (प्रो. मिराशीकृत "कालिदास" पृ. २०६-२०८ पहावें). श्री. तांबे यांना दुष्यंताचा कण्वाश्रमांतला प्रवेश चोरासारखा दिसतो; आणि आधार काय तर, दुर्वासशापामुळेच राजास शकुंतलेची विस्मृति पडली आहे हें माहीत नसल्याने चिडलेल्या शार्ङ्गरवाने रागाने काढलेले उद्गार! उलट, प्रो. मिराशींच्या शब्दांत वस्तुस्थिति वर्णन करावयाची म्हणजे, "तपोवनाजवळ पोहोंचल्यावर तेथील जनांस उपसर्ग होऊं नये म्हणून तो रथांतून उतरतो व आपलें धनुष्य व अलंकार सारथ्याच्या स्वाधीन करून विनीत वेषानें तपोवनांत शिरतो." ("कालिदास" पृ. १७८; शाकुंतल अंक १ पहा.) यालाच श्री तांबे 'चोरासारखें' म्हणत असावे! शिवाय दुष्यंतावर चोरीचा आरोप करण्यापूर्वी नाटकाचे प्रारंभींच वैखानसाने यज्ञरक्षणार्थ राजाला आश्रमांत प्रवेश करण्यासाठी आमंत्रण दिलें होतें, हें श्री. तांबे यांना माहीत नव्हतें काय? राजाला प्रवेश केल्यानंतरच शकुंतलेचें दर्शन झालें; मग चोरासारखा प्रवेश करण्याचें प्रयोजनच काय? 'गांधर्व विवाहाच्या थापा,' 'चोरटा विवाह', 'फुस लावतो' इत्यादि

शब्दप्रयोगदेखील निषेधार्ह आहेत. हिंदुधर्मांत गांधर्व विवाहाला मुळीच अस्तित्व नसून त्यासंबंधांत दुष्यंत घडघडीत खोटें बोलला होता काय ! दुष्यंताने शकुंतलेला 'फसविलें' असा गर्हणीय आरोप करतांना, मदनतापाने स्वत: शकुंतलेचीच किती कठीण अवस्था झाली होती ( अंक ३, सख्यांचीं भाषणें पहा ) याची श्री. तांबे यांना विस्मृति पडली. दुष्यंताशीं विवाह न जमवून आणल्यास मला तिलोदक द्या असा निर्वाणीचा संदेश तिने आपल्या सख्यांना स्पष्ट दिला होता. (अंक ३.) आणि, दुष्यंतशकुंतलेचा हा संबंध खरोखरच केवळ फसवेगिरीचा व्यवहार असता, तर कण्वाचा त्या संबंधाला आशीर्वाद मिळाला असता काय ? स्वत: कण्वमुनींनी त्याला "चोरानें चोरीनें प्राप्त केलेलें धन " असें न म्हणतां, "सच्छिष्याला दिलेल्या विद्येची" च उपमा शकुंतलेला दिलेली आहे. ( अंक ४ प्रियंवदेचें भाषण पहा ) स्वत:च्या उछ्वासितच अशा कन्येशी स्वत:च्या पश्चात् तिला फसवून व्यभिचार करणाऱ्या व्यक्तीला शासन न करण्याइतके कण्वमुनी षंढ होते, किंवा राजाची भीड पडण्याइतक लोभी होते, असें श्री. तांबे यांच्या विधानांस प्रमाण मानल्यास मान्य करावें लागेल, याची काय वाट ? प्रत्यक्ष घरीं चालून येत असलेल्या सुंदर स्त्रीला अधर्माच्या भीतीने नाकारणाऱ्या—नव्हे, तिच्याकडे नीट पाहण्याची इच्छाहि दाबणाऱ्या—मनोनिग्रही दुष्यंताच्या कृतीला श्री. तांबे यांनी नीतिच्या कांगाव्याचें स्वरूप दिलेलें पाहून तर फारच खेद होतो ! दुष्यंतावर इंडियन पिनल कोडचें ४९५ (?) कलम बजाविण्यापूर्वी शकुंतलेचें वय व तिने स्वत: विवाहाला दिलेली संमति—नव्हे, तिने स्वत: दाखविलेली उत्सुकता—श्री. तांबे यांना लक्षांत घेतली असती तर त्यांच्या स्वत:वरच अब्रूनुकसानीचें ४९९ कलम दुष्यंताकडून बजाविलें जाण्याची भीति राहिली नसती !

श्री. तांबे यांच्या शाकुंतलविषयक उपर्निर्दिष्ट उताऱ्यांतील शेवटच्या वाक्याचा तर अर्थ लावणेंच कठीण आहे. कालिदासाला 'नीतीची बूझ राखावयाची होती' म्हणूनच तर त्याने दुर्वासशापाचें "कुलंगडें" (!) मूळ गोष्टींत नसतांहि उत्पन्न केलें. कालिदासानें कौशल्याने निर्माण केलेल्या या प्रसंगाचा परिणाम मूळ गोष्टीला संपूर्णपणे नीतिपर करण्या कडेच झाला आहे. याचें प्रो. मिराशींनी "कालिदास" पृ. १९६-१९८ वर आणि श्री. गोडबोले यांनी शाकुंतल विचार ['महाराष्ट्र शाकुंतल'] पृ. १५-१६ वर मार्मिक विवेचन केलें आहे तें यासंबंधांत वाचावें, म्हणजे भा. तांबे यांनी कालिदासावरहि केलेल्या निराधार आरोपांची किंमत कळून येईल. शेवटीं जातां जातां, ज्या दुष्यंतशकुंतलेच्या संबंधाविषयी श्री. तांबे यांनी भलभलते उद्गार काढले आहेत, त्याच मूळ स्वरूप कसें आहे हें दर्शविणारीं प्रो. मिराशींचीं कांहीं थोडीं वाक्यें आमच्या म्हणण्यास पुष्टि म्हणून येथे उद्धृत केल्यावांचून आमच्याने राहवत नाहीं. कालिदासाच्या दुष्यंताचें वर्णन करतांना ते लिहितात: "तो अत्यंत धार्मिक, पापभीरू व प्रजापालनतत्पर आहे.. दिसेल त्या सुंदर स्त्रीवर आषक होण्याइतका तो मधुकरवृत्तीचा नाहीं. .कण्वाश्रमांत गेल्यावर...सौंदर्याची पुतळी अशी शकुंतला त्याचें मन आकृष्ट करते. प्रथम ही ब्राह्मणकन्यका असेल काय असा त्याला संशय येतो. तसें शेवटीं ठरतें तर इंद्रियनिग्रह करून त्यानें आपलें मन परावृत्त केलें असतें यांत संशय नाहीं... त्यांनीं शकुंतलेचा जन्मवृत्तांत सांगितल्यावर तर मुळींच संशय राहत नाहीं. कण्व लौकरच परत येण्यासारखा असता तर तोंपर्यंत त्यानें अवश्य इन्द्रियनिग्रह केला असता. पण तिकडे शकुन्तलेची अतिशय वाईट अवस्था झाली होती... तिचे निर्वाणीचे उद्गार त्यानें ऐकिले होते. तेव्हां तिच्या सख्यांनीं तिचा स्वीकार करण्याविषयीं विनंती केल्यावर तो ती आनंदानें मान्य करतो यांत आश्चर्य नाहीं...सारांश,

पराक्रमी, विनयशील, धार्मिक, प्रेमळ व कर्तव्यतत्पर अशा या धीरोदात्त नायकाचें चित्र काढून कालिदासानें आपल्यापुढें आदर्श पुरुष उभा केला आहे." [ पृ. २०७ ते २०९. जाड टाईप आमचा. ]

## श्री. तांबे यांचें ओलेतीच्या चित्राचें समर्थन.

महाराष्ट्रांत कला व नीति यांच्या संबंधाचा वाद जाहीरपणें उजेडांत येण्यास एका मासिकांत आलेलें 'ओलेती'चें चित्र मुख्यत्वेंकरून कारणीभूत झालें हें पुष्कळांस माहितच असेल. हें चित्र प्रसिद्ध झाल्यानंतर त्याच्या गुणावगुणाविषयीं बराच वाद माजला. श्री. तांबे यांनी आपल्या निबंधांत त्याचें समर्थन करण्याचा प्रयत्न केला असून त्याप्रीत्यर्थ त्यांनी दोन मुद्दे पुढे आणले आहेत. पैकी पहिला मुद्दा असा कीं, "प्रत्यक्ष ओलेती सुंदरी पाहून ज्या भावना उद्भवतील त्याच भावना ओलेतीचें चित्र पाहून उद्भवणार नाहींत. कारण ओलेती सुंदरी पार्थिव हाडामासाची आहे तर ओलेतीचें चित्र मनोमय चैतन्यानें ओथंबलेलें आहे. हाडामासाच्या ओलेतीला पाहून पापवासना उत्पन्न होण्याचा संभव आहे.... पापवासनेचें स्थान पार्थिव शरीर, चित्रार्पित ओलेतींत हाडामासाचें शरीर कोठें आहे ? तेव्हां पापवासना कशांत गुंतावी ?" [पृ. २३-२४]

नीति व कला यांची फारकत करण्याच्या भरांत श्री. तांबे यांनी केलेलें 'ओलेती' च्या चित्राचें हें समर्थन खरोखरच अपूर्व आहे ! येथे एकच प्रश्न विचारावासा वाटतो; आणि तो असा कीं, 'ओलेतीच्या' चित्रांत प्रत्यक्ष हाडामांसाचें शरीर नसल्यानें तेथ पापवासना गुंतू शकणार नाहीं, या मुद्यावर जर त्या चित्राचें समर्थन करावयाचें असेल, तर मग सबंध चित्रसृष्टींत अश्लील किंवा वाईट असें चित्र तरी कोणतें राहिलें ! कोणतेंहि—कितीहि घाणेरडें—चित्र घेतलें तरी त्यांत अर्थातच

हाडामांसाचें शरीर हें नसणारच. मग एखादें अत्यंत बीभत्स चित्र कोणी काढून वरील मुद्याचे जोरावर तो त्या चित्राचें समर्थन करूं लागला तर त्याला श्री. तांबे काय उत्तर देणार ! श्री. तांबे यांचें वरील आश्चर्यकारक विधान जर प्रमाण मानलें, तर आजकालच्या चल-चित्रपटांतील उघड उघड अश्लीलतेविरुद्ध सुज्ञ व विचारी लोकांनी चालविलेली सर्व ओरड व्यर्थच आहे असें म्हणावें लागेल ! आणि अशा रीतीने संपूर्ण चित्रकलेस अश्लीलता व पापवासनांना उत्तेजन या दोष-द्वयापासून अलिप्त ठरविल्यानंतर, गायनकला व लेखनकला यांविषयी तर बोलावयासच नको. कारण चित्रकलेंत नुसती आकृति तरी डोळ्यांपुढे असते; परंतु, गायनांत व लेखनांत तर तीहि नसते. मग एखादें लिखाण किंवा काव्य कितीहि अश्लील, हलक्या दर्जाचें व अनीतिमान् असलें तरी त्याच्या कर्त्याने ' यांत पापवासना गुंतविणारें हाडामांसाचें शरीर कोठे आहे ? ' असें म्हणून त्याचें खुशाल समर्थन करावें !

ओलेतीच्या चित्राच्या समर्थनार्थ श्री. तांबे यांनी जो दुसरा मुद्दा पुढे आणला आहे तो विचारार्ह आहे. परंतु त्याचा जों जों अधिक विचार करावा, तों तों तो एखाद्या बदललेल्या साक्षीदाराप्रमाणें श्री. तांबे यांच्या नीति आणि कला यासंबंधीच्या प्रमेयालाच विरोध करून, त्याच्याविरुद्ध सिद्धांतास पुष्टि देतांना आढळून येतो. ते म्हणतातः " दुसरें–आणि मुख्यत्वेंकरून असें की, ही गोष्ट कलाकाराच्या दृष्टीच्या पोंचेवर आणि त्यानें योजलेल्या साधनाच अवलंबून राहील. त्याला जर आपल्या स्फूर्तिबलानें पूर्ण सौंदर्य व्यक्त करतां आलें तर त्याच्या कौतुकांत आणि अलौकिक आनंदांत आपण इतके लीन होऊन जाऊं कीं, कोणत्याही अन्य भावनेस त्या सहजसमाधींत अवकाशच राहणार नाहीं .....केवळ त्या संपूर्ण सौंदर्याशीं अलौकिक

आनंदाशीं आपण अगदीं समरस होऊन जाऊं." [ पृ. २४; जाड टाइप आमचा. ]

आता आपण श्री. तांबे यांच्या या वाक्यांचा, त्यांच्याच निबंधांत इतरत्र आढळणाऱ्या विधानांच्या मदतीने, नीट विचार करून त्यांपासून खरोखर कोणत्या पक्षाला पुष्टि मिळते हें पाहूं. वरील विधानांचा सरळ निष्कर्ष असा निघतो कीं, श्री. तांबे यांचे मताने देखील कलाकाराने आपली पोच अशी ठेविली पाहिजे व त्याने कलानिर्मिति करतांना **अशींच साधनें** व **तींहि अशाच रीतीने वापरलीं पाहिजेत** कीं, जेणेकरून त्याच्या कृतींत **पूर्ण सौंदर्य** व्यक्त होऊन तज्जन्य आनंदाहून अन्य कोणत्याहि भावना प्रेक्षकांच्या [ भोक्त्यांच्या ] मनांत उद्भवणार नाहीत. पण असें म्हणण्यांत स्वतःच्याच प्रमेयाविरुद्ध एक फार महत्त्वाची कबूली त्यांनी नकळत देऊन टाकली आहे. पहा कीं, त्यांनी स्वतःच इतरत्र म्हटल्याप्रमाणे उत्कृष्ठ कलेपासून उत्पन्न होणारा हा पूर्ण सौंदर्याचा आनंद विषयानंदाहून भिन्न असून तो 'पवित्र' व 'निष्काम' असतो [ पृ. २३ ]; आणि त्यांत अपरंपार मांगल्य, सत्य व पावित्र्य असून तो पुण्यस्वरूप असतो [ पृ. १३,१५ ]. पण पूर्ण सौंदर्य व तज्जन्य आनंद हे पवित्र, मंगल, पुण्यस्वरूप असतात हें मान्य केलें, म्हणजे तदन्य ज्या भावना त्या अर्थातच अपवित्र, अमंगल व पापस्वरूप झाल्या हें उघड आहे. व म्हणून या विशेषणांचा स्पष्ट उपयोग करून श्री. तांबे यांच्या वरील विधानांचा असा अर्थ करावा लागेल कीं, 'प्रत्येक कलाकाराने आपली पोंच अशी ठेविली पाहिजे व अशाच साधनांचा अशाच पद्धतीने उपयोग केला पाहिजे कीं, जेणेकरून त्याच्या कृतींतील सौंदर्याचे द्वारें प्रेक्षकांचे मनांत फक्त पवित्र, मंगल व पुण्यस्वरूप-

म्हणजेच उच्च, सात्विक व नैतिक – आनंद उत्पन्न होऊन, अपवित्र, पापी व अमंगल – म्हणजेच अनैतिक – भावनांना ( कल्पनांना, विचारांना ) उत्पन्न होण्यास यत्किंचितहि अवसर मिळणार नाही '. पण आम्ही तरी याव्यतिरिक्त विशेष काय सांगत आहोंत? नीतीचें बंधन कलेने पाळलेंच पाहिजे–आणि तेंहि दुहेरी रीतीने, एकतर कलाकाराचें ध्येय [ हेतु ] नीतिपर असलें पाहिजे, व दुसरें त्याने साधनांचा उपयोग सुद्धा परिणामीं अनीति उत्पन्न न होतां नीतीचाच उद्भव होईल अशी पूर्ण काळजी घेऊन केला पाहिजे—याविषयी आमचें तरी म्हणणें याहून विशेष अधिक तें काय आहे? पण मग, कलाकाराने आपल्या साधनांचा उपयोग नीतीकडे लक्ष ठेवूनच केला पाहिजे असें आग्रहाने सांगणाऱ्या या विधानांचा श्री. तांबे यांच्याच पुढील वाक्यांशीं मेळ कसा घालावयाचा? "मला वाटतें कला आणि नीति यांचा स्वभावतः काडीइतका संबंध नाही. उलट, कला आपल्या लीलाविलासांत चूर असतां नीतिअनीतीच्या भानगडींत पडावयास तिला सवडच नसते असें दिसून येतें. नीतीचा बागुलबावा पुढें ठेवून कलेने आजपर्यंत कधीही पाऊल टाकलें नाही आणि पुढें तरी कधी ती नीतीची बूज राखील कीं नाही याची वानवाच आहे. " [ पृ. २. ] कलेच्या अंतिम ध्येयाचें स्वतः श्री. तांबे यांनीच त्यांच्या निबंधाच्या उत्तरार्धात कांही प्रसंगीं योग्य वर्णन केलें आहे; तें वाचल्यानंतर त्याला विसंगत अशीं त्यांनी केलेली वरीलसारखीं विधानें पाहिलीं म्हणजे आश्चर्य वाटतें. कलाकाराची पोंच नैतिक व सात्विक आनंद उत्पन्न करण्याकडेच असली पाहिजे असें उघड उघड प्रतिपादणारे लेखक दुसरीकडे " कलांनीं नीतीचें ध्येय सोडता कामा नये " या विधानाला " वितंडवादांत " घालण्यास तयार होतात! [ पृ. ४ ] आणि अत्यंत आश्चर्याची गोष्ट अशी कीं कलेच्या " स्वातंत्र्या " बद्दल भरमसाट विधानें करतांना

तर श्री. तांबे यांना कलेवर, नीतीचें तर दूरच राहो, पण सौंदर्याचें देखील बंधन घालण्याची कल्पना सहन होत नाहा ! " सत्य, नीति किंवा सौंदर्य यांची मरभकम बोचकीं, ति या कल्पना-भावनादि पंखांवर लादलीं तर तिची धडगत राहणार नाहीं. तिचे पंख तुटून पडतील " [ पृ. १२ ]. कलेवर नीतीचें तर नकोच पण सौंदर्याचेंहि बंधन नको असें प्रतिपादन करणारें याव्यतिरिक्त दुसरें एखादें विधान जगाच्या संपूर्ण साहित्यसागराच्या तळापर्यंतहि बुडी मारून हातीं लागेल किंवा नाही याची वानवाच आहे ! * कारण नीति व कला यांचा संबंध तोडूं पहाणारे लेखकसुद्धां सामान्यतः सौंदर्य हा कलेचा आत्मा आहे असें मानतातच. निरंकुशाः कवयः, दुसरें काय ?

असो. श्री. न. चिं. केळकर यांनी म्हटल्याप्रमाणे श्री. तांबे यांच्या स्वतःच्या " कलेवर अनीतीचा आरोप येण्यासारखा नाही " [ " केसरी ", ता. ३०-११-२४, पृ. ७ पहा ] यांत संशय नाही. परंतु, आम्हीं या परिशिष्टाच्या प्रारंभीं सांगितल्याप्रमाणे, कला व नीति यांविषयींच्या त्यांच्या विपर्यस्त विधानांनी समाजांतील सर्वसाधारण वाचकवर्गावर अनिष्ट परिणाम घडून येण्याचा संभव असल्यानेच आम्हीं हें अप्रिय कार्य केलें आहे. एखादी व्यक्ति जितकी श्रेष्ठ तितकाच तिच्या चुकांचाहि परिणाम अधिक व्यापक असतो हें उघडच आहे. म्हणून शेवटीं, त्यांच्या विधानांतील सत्यपर अंशाकडेच दृष्टि ठेवून इतर भागांकडे दुर्लक्ष करण्याची वाचकां विनंति करून हें परिशिष्ट संपवितों.

---

* काव्याने सौंदर्याचें बंधन पाळण्याची आवश्यकता श्री. द. के. केळकर यांनी ' काव्यालोचनांत ' ( पृष्ठें १९६-२०४ ) सविस्तर सिद्ध केली आहे.

# परिशिष्ट आ

## कांही आक्षेपांस उत्तरें.

हजारों वर्षांपूर्वी द्रौपदीवस्त्रहरणाचे प्रसंगीं दृष्टोत्पत्तीस आलेल्या विद्वन्विमूढतेने आमच्या विद्वानांवरील आपली पकड अद्यापिहि ढिली केली नाही असें दिसतें ! अश्लीलतानिषेधाचा ठराव महाराष्ट्र साहित्यसमेलनांत पसार करून घेण्याचा कांही वर्षांपासून चाललेला प्रयत्न फलद्रूप न होतां, डिसेंबर १९३३ मध्ये भरलेल्या नागपूरच्या अधिवेशनांतहि बऱ्याच वादविवादानंतर शेवटीं तो 'परत घेण्यांत आला'. हा ठराव पसार होऊनहि हेतुपुरःसर अश्लील वाङ्मय निर्माण करणाऱ्यांवर किती परिमाण होईल हा भाग वेगळा; परंतु साहित्यसंमेलनांतहि तो पसार होत नाही याचे परिणाम मात्र घातुक होत आहेत. विशेषतः या ठरावाला विरोध करण्यांत कांही सुविद्य विद्वानांनीही भाग घ्यावा ही तर अत्यंत खेदाची व नवलाची गोष्ट आहे.

नागपूरचा ठराव किती साधा होता पहा: "सांप्रत सदभिरुचीला विघातक आणि अश्लील स्वरूपाचें वाङ्मय स्वैरपणें प्रसिद्ध होत आहे, त्यास आळा घालणें या सभेस जरूर वाटतें व ती अशा अनिष्ट वाङ्मयाचा प्रसार करणाऱ्यांचा निषेध करीत आहे. त्यापासून वाचकांनीं अलिप्त रहावें अशी या सभेची विनंति आहे."

( ' अहवाल ' पृ. १९. जा. टा. आ. ) यांत कोणता शब्द आक्षेपार्ह आहे हेंच आम्हाला समजत नाही. यासाठी त्याला विरोध करणाऱ्यांच्याच कांही विधानांचा येथे विचार करूं.

ठरावास विरोध करतांना प्रा. वा. म. जोशी म्हणाले: " अश्लीलता ही कुणालाही नको आहे... पण हा ठराव मंजूर होऊं नये असें मला वाटतें. या ठरावावरील चर्चा मोठी त्रासदायक होण्याचा संभव असतो. कारण त्यांत अनेक व्यक्ती व वर्तमानपत्रांचीं नांवें निघावयाचीं व त्यामुळें कित्येकांचीं मनें दुखावलीं जावयाचीं. म्हणून हा ठराव नको होता. सरकारी दडपशाहीमुळें राजद्रोह नाहींसा होत नाहीं; उलट वाढतो मात्र, हें आपण जाणतोंच. तीच अश्लील वाङ्मयाची स्थिति आहे... ' सेन्सारशिप ' कधींही यशस्वी होणार नाहीं, हें लक्षांत ठेवा. " [ ' अहवाल ' पृ. १३. जा. टा. आ.]

मूळ ठरावांत कोणाहि व्यक्तीचें अगर पत्राचें प्रत्यक्ष नांव नसून केवळ ' सदभिरुचीला विघातक व अनिष्ट ' वाङ्मयाच्या प्रसारकांचा निषेध करण्याचा ध्वनि असतां, वैयक्तिक उल्लेख टाळून वरील सर्व-साधारण ठराव पसार करणें अगदींच अशक्य होतें काय ! बरें, ज्या व्यक्ति बुद्धिपुरःसर असें वाईट काम करीत असल्याचें उघड असेल, त्यांचीं नांवें जाहीरपणे अशा प्रसंगीं अपरिहार्य प्रकारें पुढे आलींच, तर त्यांची भीति किंवा भीड काय म्हणून बाळगावयाची ? उद्यां एखाद्या योग्य परिषदेंत ' कोर्टकचेऱ्यांत अन्यायाने पैसे खाणाऱ्यांचा ही सभा निषेध करते ' असा ठराव आला तर, समाजांतील कांही शिष्ट धेंडांचीं मनें दुखावतील म्हणून त्याला विरोध करणें कितपत् योग्य होईल ? समाजहित अधिक किंवा या शिष्टांची मर्जी अधिक ?

आता प्रा जोशी यांनी सेन्सॉरशिप् व राजद्रोह यांचा दिलेला दाखला तर अगदीच गैरलागू आहे. अनीतिमान सत्तेनें नीतिमान चळवळीला दाबण्याचा केलेला प्रयत्न आणि नीतिमान सत्तेनं अनीति· मान चळवळीला आळा घालण्याचा केलेला प्रयत्न, यांच्या परिणामांत जमीनअस्मानाचें अंतर असतें हें निदान नीतिशास्त्राच्या अभ्यासकांना तरी सांगावयास नको. उदयोन्मुख प्रॉटेस्टंट पंथाच्या न्याय्य चळवळीला आळा घालण्याचा जुलमी प्रयत्न कांही युरोपीय सत्ताधीशांनी करतांच, किंवा मराठेशाहीला बाल्यावस्थेंतच मूठमाती देण्याचा चंग औरंगजेबाने बांधतांच, याचा परिणाम म्हणून उलट ह्या नवीन पक्षांना सबळताच प्राप्त झाली हें खरें. परंतु, जेथे नीतिमान सत्ता अनीतिमान चळवळींना विरोध करूं पाहील तेथे हा परिणाम घडून येणार नाही हें उघड आहे. आज फ्रान्स, इंग्लंड, किंवा अमेरिका देशांत कोणी चळवळे राजद्रोहाची अनिष्ट चळवळ करूं लागतील, तर तिचा यशस्वी रीतीने बीमोड केल्याशिवाय तेथील सरकार राहील काय? प्रा. जोशी यांचें म्हणणें मान्य केल्यास, सारा फौजदारी कायदाच गुंडाळून ठेवावा लागेल! कारण ‘अपराधांना शिक्षा द्याल तर लोकांची प्रवृत्ति तिकडे अधिकच वळेल’ अशी भीति तेथेहि प्रदर्शित करितां येईल! सारांश, अधिक विस्तार न करतां आम्ही येथें इतकेंच सांगतों कीं, अनैतिक कृत्यांना विरोध करण्याचा नैतिक प्रयत्न, व नैतिक चळवळींना दाबण्याचा अनैतिक प्रयत्न या दोन प्रकारांत घोंटाळा केल्यानेच प्रा. वा. म. जोशी यांनी वरील दाखला दिला आहे. जोंपावेतो अश्लीलताप्रचार अनैतिक आहे हें निर्विवाद आहे, तोंपावेतों साहित्यसंमेलनात त्याच्या निषेधपर ठराव पास झाल्याने एकंदर परिणाम इष्टच होतील, अनिष्ट होणार नाहीत. आता, सुज्ञांनी एखादी गोष्ट करूं नका असें म्हणतांच मुद्दाम ती करूं पाहणार कांही व्रात्य लोक प्रत्येक समाजांत असावयाचेच. परतु असल्या अपवादांमुळे सामान्य नियमांस बाधा येऊं शकत नाही

परंतु याशिवाय इतर चुकाहि या ठरावाचे विरोधक करीत असतात. पं. दिनकरशास्त्री कानड म्हणाले: "नाटक-कादंबऱ्यांतून तुम्हाला 'व्हिलन' निर्मावा लागतो. तो तेथे आला कीं, अश्लीलता स्वाभाविकच उत्पन्न होणार!" ('अहवाल', पृ. १३) आम्हीं मागे तिसऱ्या प्रकरणांत विशद करून दाखविलेला 'अनीतिविषयक आणि अनीतिपर' या दोन विशेषणांतला घोटाळाच या विधानाच्या बुडाशीं आहे, हें चाणाक्ष वाचकांनी ओळखलेंच असेल. सदभिरुचीला धरून दुष्टपात्रें रंगविणें अशक्य आहे काय? वाङ्मयांत अनीति विषय म्हणून येऊं द्या, गुण म्हणून नको, हें आमचें म्हणणें आहे.

परंतु, नागपूरला या ठरावाला विरोध करणाऱ्यांपैकी अश्लीलतेचें सर्वांत मौजेचें समर्थन जर कोणीं केलें असेल तर तें श्री. के. नारायण काळे यांनी होय. कांही एक विशिष्ट ज्ञान कांही वाचकांना देणें आवश्यक असल, तर तें योग्य प्रकारें द्या. परंतु तें देतांना वाचकांच्या मनांत "सदभिरुचीला विघातक व अनिष्ट" प्रवृत्ति उत्पन्न न होऊं देण्याची काळजी घ्या, असा आग्रह धरल्यास ते चूक होईल काय? आणि हें चूक नसल्यास ठरावाला विरोध काय म्हणून? पण श्री. काळे म्हणाले: "......असल्या वाङ्मयामुळें तरी त्याला वाचनाची गोडी लागते. कांहीं दिवसांनीं त्याची त्यालाच किळस येऊन तो चांगलें वाङ्मय वाचूं लागेल." ['अहवाल' पृ. १२]. एखाद्या आळशी मनुष्याला चोऱ्या करण्यास शिकूं द्यावें, व नंतर 'त्याला तें करू द्या, पूर्वी कांहीच करीत नव्हता त्यापेक्षा तर बरें? कांहीं दिवसांनी किळस येऊन तो स्वतःच सुधारेल' असें म्हणण्याइतकेंच सुज्ञपणाचें वरील

विधान आहे ! सुरवातीपासूनच लागलेली अश्लीलतेची चटक आपो-आप सुटेल अशी आशा करणे, हे एखादा दारूबाज स्वतःहून तिचा त्याग करेल अशी आशा करण्यासारखेंच आहे. वास्तविक पाहतां, वाचनाची गोडी लावावयाची असेल तर त्याला अश्लीलतेची आवश्यकता नसून मनोरंजकत्वाची जरूर आहे. पण मनोरंजकता किंवा चित्ताकर्षकता म्हणजे अश्लीलता नव्हे. उलट, अश्लील मनोरंजकतेचे परिणाम कसे घातुक होतात हें श्री. न. चिं. केळकर यांनी पुढील शब्दांत स्पष्ट सांगितलें आहे. कोल्हटकरांच्या " मतिविकारा " वरील टीकेंत ते म्हणतात: " पात्र व प्रसंग जर चित्ताकर्षक व लोकांचें मन रमविणारा असेल तर अशा ठिकाणीं अश्लीलता संबद्ध असू नये. चित्ताकर्षक असें पात्र, प्रसंग अगर विचार यांशीं संलग्न असलेली अश्लीलता चिरपरिचयानें स्वतःच चित्ताकर्षक होऊं लागेल. " (" केळकरकृत लेखसंग्रह " पृ. १४९ )

श्री. द. के. केळकर यांचें " काव्यालोचन " हें उत्कृष्ट पुस्तक आमच्या वाचकांच्या पाहण्यांत आलेंच असेल. श्री. केळकर यांना आम्हीं प्रतिपादिलेली कलेची नीतिपरता मान्य आहे. " काव्यालोचनां " त पृ. २०२ वर त्यांनी " सद्भावनापोषक अतएव सुंदर " असा शब्दप्रयोग वापरून, नीति व सौंदर्य यांचा निकट संबंध स्पष्टपणे व्यक्त केला आहे; आणि शिवाय, कलेवर नीतीचे किंवा इतर निर्बंध नसावे या मताचें अनेक ठिकाणीं खंडनहि केलें आहे. परंतु, याच पुस्तकांत काव्य व तत्वप्रतिपादन यांच्या संबंधाविषयीं कांहीं संदिग्धता आढळून आली; व ती दूर व्हावी या हेतूनेच पुढील दोन शब्द आम्हीं लिहिले आहेत.

" काव्याचें अंतिम ध्येय परमार्थ असावें कीं अन्य कांही असावें या विषयीं मतभेद " नसून, तें ध्येय परमार्थच आहे हें " काव्यालोचन " कारांस पूर्णपणें मान्य आहे [ पृ. २९० ]. परंतु, काव्यध्येयाच्या एकदर वादाचा समारोप करतांना संदिग्धता उत्पन्न करण्याचा मोह त्यानांहि आवरला नाही. " काव्यध्येयाचा तात्विक वाद चालू असतां, काव्य आणि काव्येतर वाङ्मय यांना साधारण असणारें तत्वप्रतिपादन हें ध्येय न मानतां, काव्याच्या सर्व प्रकारांना साधारण असणारा आल्हाद, हेंच ध्येय मानणें युक्त होय. काव्यांत आल्हादक्षमता आणि तत्वप्रतिपादन हीं दोन्हीं असलीं तरी, या दोहोंपैकीं जें नष्ट झालें असतां काव्याचें काव्यत्व नष्ट होईल तेंच त्याचें अनन्यसाधारण ध्येय मानलें पाहिजे, आणि हें वैशिष्ट्य आल्हादक्षमता होय. " ( पृ. २३३. जा टा. आ. ) या वाक्यांवरून श्री. द. के. केळकरांच्या मतें काव्यांतून तत्वप्रतिपादन नाहीसें झालें तरी त्याचें काव्यत्व नष्ट होणार नाहीं, असें दिसतें. हेंच त्यांनी पृ. २२४ वर कालिदासाच्या 'मेघदूता'चा उल्लेख करूनहि ध्वनित केलें आहे.

परंतु कांहीसा खोल विचार केला असतां श्री. केळकरांच्या वरील विधानांत परस्पर विसंगति असल्याचें आढळून येतें. काव्याचा हेतु केवळ रंजनच असे म्हणणाऱ्यांची गोष्ट वेगळी; त्यांना वर उद्धृत केलेलें शेवटचें वाक्य पसंत पडेल यांत आश्चर्य नाही. (श्री. न. चिं केळकरांनीं 'केसरी'त केलेलें "काव्यालोचना"चें परीक्षण पहा) पण, ज्यांनी काव्याचा अंतिम हेतु परमार्थ असून काव्य व काव्येतर वाङ्मय यांना तत्वप्रतिपादन हें साधारण ध्येय आहे, हें एकदा मान्य केलें, त्यांना काव्यांतून तत्वप्रतिपादनाची उचलपांगडी झाली असतांहि त्याचें काव्यत्व नष्ट पावणार नाही, असें म्हणतां यावयाचें

नाहीं. अंतिम ध्येयाच्या अर्थाविषयी श्री. द. के. केळकरांचे मनांत गैरसमज वसत असल्याचें दिसतें. पहा कीं, धोब्याचें अंतिम ध्येय जीवितरक्षण करणें व विशिष्ट ध्येय कपडे धुणें हें आहे. तो कपडे धुणे सोडील तर तो धोबी राहणार नाही हें खरे पण त्याबरोबरच, तो नुसतें आपल्या विशिष्ट ध्ययालाच धरून अंतिम ध्येयाचा त्याग करूं म्हणेल तर तें शक्य होईल काय ? त्याने जीवितरक्षणात्मक अंतिम ध्येयाची कास सोडतांच तो मुळी मनुष्यच राहणार नाही, मग धोबी राहण्याची गोष्ट कशाला ? **अंतिम ध्येय अस्पष्ट होईल, पण नष्ट होऊं शकणार नाही.** विशिष्ट ध्येय अंतिम ध्येयापेक्षा अधिक स्पष्ट रीतीने जगांत वावरूं शकेल. पण त्याचा आधार त्याने घेतलाच पाहिजे. कृतघ्न होऊन तें जर त्याला समूळ हाकलून लावूं म्हणेल, तर तत्क्षणींच तें स्वतःही नष्ट झाल्याशिवाय राहणार नाही. काव्याचे अंतिम व सर्वसाधारण ध्येय पारमार्थिक तत्वप्रतिपादन आहे हें एकदा मान्य केलें, म्हणजे फार झाल्यास प्रत्यक्ष व्यवहारांत तें अस्पष्ट होऊं देण्यास मान्यता देतां येईल; पण तें समूळ नष्ट झालें तरी काव्याचें काव्यत्व टिकूं शकेल असें मात्र म्हणतां येणार नाही.

याशिवाय, काव्य व काव्येतर वाङ्मय यांना तत्वप्रतिपादन हें साधारण ध्येय आहे परंतु आल्हाद हें काव्याचेंच विशिष्ट ध्येय आहे असें म्हटल्यास, काव्येतर वाङ्मयाच्या विशिष्ट ध्येयांत आल्हादाचा अंश नाही हें साहाजिकच ध्वनित होतें. परंतु असें म्हणण्यास श्री. द. के. केळकर यांचे जवळ कोणता आधार आहे ? ललितकलाकृति व तदितर कृति यांतील भेद आमच्या अल्पमतीप्रमाणे आम्हीं मागे दाखविलाच आहे, तो वाचकांनी वाटल्यास या संबंधांत पाहावा.



*An original attempt to reconcile Science with Philosophy*

# LIFE ENDURING

*by*, Dr. V V. Athalye,

Author of *Principles of Medicine and Homeopathy*, Prizeman, N. H. Society, New york.

( with a foreword by Prof. N. G. Damale )

" Immensely interesting . . . . . deserves perusal by those who are struggling to understand the meaning of life " —*Modern Review*, Calcutta.

" Author being at once a scientist, philosopher and seer, this inspiring book should stimulate 'a new understanding of life' . . . . — " *New Life*, London.

"The author has given his solution of the most perplexing problems which confront the world to-day. " —*Dr S. K. Maitra*, M. A. Ph. D., Benares University.

". . . . an original, interesting and important contribution to philosophical literature " —*Dr. Radhakumud Mookerji*, M. A , P. R. S., Ph. D., Lucknow University.

Besides, high appreciations by Shri Shankaracharya Dr Kurtakoti; Right Revd. George, Vicar General, Syrian Mission; ' Kesari ' of Poona; Sakal, Sadhana, *etc etc*.

Publishers: Satpravritti Vardhak Mandal, 148 Chimanpura, Satara.

Price Rs. three only.

Useful and Interesting

Books by Prof D. M. Borgaonkar, M. A.

Professer of English, Holkar College, Indore.

## ALL FOR YOUR DELIGHT

( Essays )

( Second Edition Revised & Enlarged. PP. 200 )

( Price Rs. 1 - 8 - 0 )

"He certainly writes admirable English',—*Education Outlook* ( London ). " A clever volume redolent of humour and written in a very pleasant style, in such good idiom and taste "—*Current Literature* (London)."A book of Sixteen exceedingly interesting and enjoyable essays"—*The Indian Review* ( Madras )."—a new note in Essay-writing" *The Hindustan Review* ( Patna ). "Spiced with brilliant wit and lively humour" *United India & Indian States* ( Delhi ). " All the Essays sparkle with wit and humour "— *Hindustan Standard* ( Calcutta ). "...They are unusually good"—*Oxford University Press.* "Rarely we come across a book of this type. Mr. Borgaonkar is a gifted writer." —*The Malayan Review,* ( Singapore ). ".. has the genuine secret of good essay-writing"—*Pandit Amaranath Jha* ( Vice-chancellor, Allahabad University).

---

## THE DEATH OF ADOLF HITLER

( one - act Play )

( PP. 75 Price 1 - 8 - 0 )

" Written in lucid style...the book provides interesting reading " *The Eastern Express* ( Calcutta )

" Excellently written drama " *Hindustan Review* ( Patna )

# राजकवि रा. अ. काळेले, इंदूर यांचीं पुस्तकें

## —प्रकाशित—

१ बागूवसन्त—पहिला काव्यसङ्ग्रह. किं. ।॥। [आवृत्ती संपली]

२ ओळखीचे सूर—दुसरा काव्यसङ्ग्रह—किं.. ॥।' "रमणीय अर्थ प्रतिपादन करणारें तें काव्य या कसोटीला या सङ्ग्रहातील गीतें पूर्णपणें उतरतात'—मनोहर, जून १९४२

३ भावपूर्णा—तिसरा काव्यसङ्ग्रह—किं. १। रुपाया. "प्रस्तुत काव्यसङ्ग्रह भावपूर्णा यामध्ये प्रकाशपूजा चालू असल्याचें आढळून येतें...'तेज भरलें' या कवितेंत कवीला तेजाचें दर्शन झालेलें आहे."—महाराष्ट्र साहित्य पत्रिका, आगस्ट १९४४. "आत्मनिष्ठ काव्यांत काळेले यांची प्रतिभा विशेष चमकते. भाषा नादवती व ठसकेदार आहे, व भावनेचा हलुवारपणा वाचकाच्या मनाला गुदगुल्या करतो."—लोकमान्य, १९४४

४ गीतनिर्वाण—किं. १ रुपाया. "महात्माजींच्या महाप्रस्थानावर हें सुन्दर लघुकाव्य लिहिलें आहे......कल्पकता, हृद्यता आणि रचना यांचा मनोहर मिलाफ त्यांत झालेला आहे"—तरुण भारत, ३० मार्च १९४९

## —: आगामी :—

१ नवे अलङ्कार—आधुनिक मराठी काव्यातून उदयास आलेल्या नव्या ठळक अलङ्कारांचें दिग्दर्शन करणारा दीर्घ निबंध.

२ मुक्तच्छन्द—नियतकालिकांतून वेळोवेळी प्रसिद्ध झालेल्या साहित्य विषयक स्फुट निबन्धांचा सङ्ग्रह.

३ आकाशयान—अलीकडील निवडक कवितांचा सङ्ग्रह.

प्रकाशक व विक्रेते—त्रिं. अ. माईनकर.

१४ इमलीबाजार, इन्दूर.

दोन नवीं पुस्तकें: प्राप्तिस्थळ: मयूर एजन्सी,
१७० रामबाग, इंदूर. [ मध्य-भारत ]

पृष्ठसंख्या दोनशेवर ] **श्री सार्थ ज्ञानेश्वरी** [ किंमत तीन रुपये

**अध्याय सातवा**

[ वेष्टणावर श्री ज्ञानेश्वर महाराजांचें अत्यंत सुंदर तिरंगी चित्र ]

श्रीमद्भगवद्गीतेंतील श्लोक, पूज्य विनोबाजी भावे यांची मराठी समश्लोकी, मुकुंदराजी (राजवाडे) प्रतीप्रमाणे मूळ ओंव्या, अन्वय, अर्थ, टीपा, विस्तृत निरूपण, व्याकरण, शब्दकोश, मार्मिक सविस्तर उपोद्घात व परिशिष्टें, आणि राजवाड्यांच्या मूळ प्रस्तावनेचा सारांश इ. इ. सह–

संपादकः–प्रा. शं. गो. वाळिंबे, एम्. ए. मराठीचे प्राध्यापक,
होळकर कॉलेज, इंदूर ( मध्य-भारत )

" आपलें पुस्तक भाविक, अभ्यासक, व विद्यार्थी यांना अत्यंत उपयुक्त होईल. आपलें विवरण तुलनात्मक अभ्यासाचें व दीर्घ परिश्रमाचें द्योतक आहे. अशाच पद्धतीनें ज्ञानेश्वरीच्या इतर अध्यायांचेंहि आपण संपादन केलें तर महाराष्ट्र वाङ्मयास ललामभूत अशा या ग्रंथराजाच्या चिकित्सक अभ्यासास मोठेंच साह्य होऊं शकेल; व विद्यापीठांनाहि त्याचा अभ्यासक्रमांत समावेश करणें सुलभ वाटेल "–विद्वानांचे वेचक बोल.

---

**प्रसिद्धीच्या वाटेवर**

ज्योतिर्कुलभूषण, सुविख्यात पंडित नीलकंठभट्ट विरचित, व ज्योतिषाच्या पदवीपरीक्षेस नेमलेल्या, उत्कृष्ट हिंदी ग्रंथाचा सुंदर अनुवाद:–

**ज्योतिष प्रकाशनिधि**

अ: प्रा. शं. गो. वाळिंबे, एम्. ए., इंदूर

कांही वैशिष्ट्यें:–१ शास्त्रीय विषय सुबोध भाषेंत सजविण्याचा यशस्वी प्रयत्न. २ 'पंचांग कसें पहावें' पासून संतानफल, भार्याफल, विद्याफल, वर्षफलादिप्रवेतों सर्व विषयांचें सुलभ ज्ञान करून देणारें मराठींतील एकच एक पुस्तक; ३ माहितींतील अद्यावतपणा ४ अनेक ठिकाणीं सारणी देऊन गणिताचें सोपें केलेलें काम.